**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. नरेंद्र पाटील)**

**माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नसल्याबाबत**

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

(माननीय मंत्री श्री. गिरीश बापट सभागृहात येतात.)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा होत आहे. प्रस्ताव एका खात्याशी सबंधित नाही तर त्यामध्ये शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, कृषी विभाग, ऊर्जा विभाग या संबंधीही विषय आहेत. सभागृहात फक्त माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री उपस्थित आहेत. बाकी विभागाचेही माननीय मंत्री सभागृहात उपस्थित असले नाहीत. बाकी माननीय मंत्र्यांशिवाय चर्चा सुरू कशी करायची ? अतिशय गंभीर विषय आहेत. राज्यामध्ये जे घोटाळे मधल्या काळात झाले, त्यावर चर्चा सुरू असताना त्या विभागचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर प्रस्तावावर चर्चा करण्याचा अर्थ काय आहे ? आपण शासनाला निर्देश दिले पाहिजेत. माननीय मंत्री उपस्थित राहणे आवश्यक आहे.

श्री. गिरीश बापट : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काढलेला मुद्दा बरोबर आहे. मात्र त्यांनाही माहीत आहे की, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावामध्ये 5-7 विषय आहेत. दोन विषयांपेक्षा जास्त विषय प्रस्तावात नसावेत असे असले तरी पण माननीय सभापतींनी हा प्रस्ताव स्वीकारला आहे. आम्हाला मान्य आहे. सन्माननीय सदस्य या विषयावर बोलतील, त्या मुद्यांची निश्चितपणे नोंद केली जाईल्. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले मात्र त्यांना उत्तर मिळाले नाही असे होणार नाही. विधानसभा देखील सुरूआहे. माननीय मंत्री थोड्या वेळात येतील. आपल्याकडे प्रथा नाही की, 6 माननीय मंत्री सभागृहात हजर पाहिजेत. ही सामुहिक जबाबदारी आहे. सन्माननीय सदस्यांचे प्रश्न, विचार म्हणणे लिहून घेतले जात आहेत, सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील. सन्माननीय सदस्यांनी भाषणाला सुरूवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय योग्य मुद्दा मांडला आहे. जनतेचे कल्याण व्हावे आणि सरकार नीट चालावे म्हणून आम्ही विरोधी पक्ष मेहनत

..2



श्री. शरद रणपिसे ....

करतो. आम्ही काही विषय या सार्वभौम सभागृहात मांडतो. आम्हीच मांडतो असे नाही तर "दैनिक सामना" मध्येही विषय मांडले जातात. मी सामनाचे नाव घेतो. तुमचे अभिनंदन करतो. पण सरकार गंभीर नाही. आता माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी असे उत्तर दिले की, आमची सामुदायिक जबाबदारी आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते साहेब, आम्ही विषय काढतो, त्या विषयावर प्रथमदर्शनी या सभागृहाला योग्य वाटले तर सामुहिकरित्या शासन राजीनामा देणार का ? माननीय मंत्री, होय म्हणा.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यात जीवनावश्यक वस्तूंची होत असलेली प्रचंड भाववाढ तसेच तत्संदर्भात होत असलेला गैरव्यवहार

**मु.शी.** : राज्यात जीवनावश्यक वस्तूंची होत असलेली प्रचंड भाववाढ तसेच तत्संदर्भात होत असलेला गैरव्यवहार या विषयावर सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, हरिसिंग राठोड, सतिश चव्हाण, राजेंद्र मुळक, जयंत पाटील, मुझफ्फर हुसेन, आनंदराव पाटील, ॲड. रामहरी रुपनवर, प्रा. जोगेंद्र कवाडे, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री. सुभाष झांबड, किरण पावसकर, प्रकाश गजभिये, संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा. जनार्दन चांदूरकर, सर्वश्री. चंद्रकांत रघुवंशी, अमरनाथ राजूरकर, डॉ. सुधीर तांबे, श्री. भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात जीवनावश्यक वस्तूंची होत असलेली प्रचंड भाववाढ, तसेच राज्य शासनाने माहे एप्रिल, २०१५ मध्ये संशयास्पदरित्या डाळींच्या साठयांवरील निर्बंध उठविणे, यासंदर्भात असे निर्बंध उठविल्यानंतर किरकोळ बाजारात डाळींचे दर ४ ते ५ पटीने भडकणे, केंद्र शासनाने तसेच विविध ग्राहक संघटनांनी यासंदर्भात शासनकर्त्यांनी वारंवार जाणीव करुनही सुमारे ६ महिने साठीबाजींवर निर्बंध न लादण्यात येणे, यासंदर्भात ८ महिन्यांच्या कालावधीत हजारो कोटी रुपयांत सर्वसामान्य माणसांची लुबाडणूक झाल्याचा अंदाज या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त करणे, याबाबत विविध संघटनांकडून सीबीआय चौकशीची करण्यात आलेली मागणी, तसेच राज्यात वर्षभरात विविध विभागांमध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येणे, या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये राज्याच्या विकास निधीपैंकी हजारो कोटी रुपयांचा निधी तसेच साधनसंपत्तीचा समावेश असणे,

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे ....

शिक्षण विभागाने सर्व शिक्षा अभियानातील निधीतून राष्ट्रपुरुषांची छायाचित्रे १३०० रुपये प्रति छायाचित्र या दराने राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ या राज्य शासनाच्या मध्यवर्ती भांडार खरेदी समितीने प्रतिबंधीत केलेल्या संस्थेकडून अवैधरित्या खरेदी करणे, तसेच अर्ली रिडर्स बुकची देखील खरेदी करणे, यासंदर्भात झालेली १०० ते १२५ कोटी रुपयांची खरेदी बेकायदेशीर व नियमबाह्य असल्याबाबत केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास विभागाने ताशेरे ओढणे, याच विभागाने अग्निशमन यंत्रांच्या बेकायदेशीर केलेल्या १९१ कोटी रुपयांच्या खरेदीची चौकशी अद्यापपर्यंत न होणे, राज्याच्या आदिवासी विकास विभागात आदिवासी विद्यार्थ्यांकरीता असलेल्या शिष्यवृत्ती योजनेत मोठयाप्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस येणे, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची ४ ते ५ हजार एकर जमीन विशिष्ट व्यक्तींना लाभ होण्याच्या हेतूने निविदा प्रक्रिया राबविल्यामुळे ५ हजार ते ७ हजार रुपये प्रति एकरी अशा अत्यंत किरकोळ दराने वाटप करण्यात येणे, याप्रकरणी ८०० ते १ हजार कोटी रुपयांचा झालेला भ्रष्टाचार, राज्याच्या ऊर्जा विभागाने कृषी सौरपंप खरेदी योजनेत बाजारभावापेक्षा व इतर राज्यांमधील दरांपेक्षा दामदुप्पट दराने सौरपंप खरेदी केल्याने याप्रकरणी शेकडो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची शक्यता वर्तविण्यात येणे, राज्य शासनात गेल्या वर्षभरात उघडकीस आलेल्या घोटाळ्यांबाबत राज्य शासनाने काहीही कार्यवाही न केल्याने भ्रष्टाचाऱ्यांची भीड चेपणे, यापूर्वीच्या भ्रष्टाचारांच्या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करुनही काहीच कारवाई न होणे, तसेच महिला व बालकल्याण विभागातील चिक्की घोटाळा व पोषण आहाराची चौकशीही न होणे, म्हणून यापूर्वीच्या व याप्रकरणांची कमिशनर ऑफ इन्क्वायरीज ॲक्ट खाली मा. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशामार्फत चौकशी करण्याची आवश्यकता असून याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मी, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे, आमचे सर्व सहकारी, सन्माननीय सदस्य सर्वश्री. संजय दत्त, हेमंत टकले, ॲड. हुस्नबानू खलिफे यांनी हा प्रस्ताव दिला आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे असले नसले तरी काळजी करूनका. आज सदर प्रस्तावात 3 महत्त्वाचे विषय घेतले आहेत. आम्ही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे ....

प्रामुख्याने 3 विषय नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावात मांडले आहेत, त्यातील एक विषय महागाईचा आहे. दुसरा विषय जीवनावश्यक वस्तुंचा आहे म्हणजे विशेषतः तूर डाळीचा आहे. दिनांक 31 ऑक्टोबर, 2014 ला राज्य शासन अस्तित्वात आले. एक वर्षाची परिपूर्ती केली, त्यामध्ये भ्रष्टाचार, घोटाळे झाले आहेत आणि याच संदर्भात आमचे 3 मुद्दे आहेत. अच्छे दिन येणार असे म्हटले गेले. (अडथळा) मला "दैनिक सामना" वर बोलताना अडथळा आणत आहेत. अच्छे दिन आयेंगे, अच्छे दिन आयेंगे अशी घोषणा केली. मात्र ते आलेच नाहीत. बुरे दिन आले आहेत. मी क्रमाक्रमाने महागाई, जीवनावश्यक वस्तू म्हणजे विशेषतः तूर डाळ आणि भ्रष्टाचार या विषयांवर बोलणार आहे. मी आता महागाईपासून सुरुवात करतो. वर्षभरात महागाई प्रचंड वाढली आहे. न भूतो, ना भविष्यती अशी महागाई वाढली आहे. आज राज्यातील जनता दुहेरी संकटात सापडली आहे. अन्न सुरक्षेचा विषय आहे. काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी मागच्या काळात अन्न सुरक्षा विधेयक आणले. देशातील सर्व जनतेला अन्न सुरक्षा मिळाली पाहिजे ही भूमिका या विधेयकाद्वारे त्यांनी मांडली, त्याची अंमलबजावणी नाही. दुसरा भाग असा आहे की, आपला देश, राज्य यांमधील 60 टक्के जनता कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. आज दुष्काळ, गारपीट हवामान बदल या सर्व गोष्टींवर आपण चर्चा करतो. शेतकरी हवालदिल झाला आहे, शेतीवर असणारे कामगार हवालदिल झाले आहेत. अन्न सुरक्षा व कृषी क्षेत्र अशा दुहेरी संकटात आपण सापडलो आहोत. परिणामी महागाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. असे प्रश्न पूर्वी निर्माण झाले नव्हते का, त्यावर त्या-त्या काळातील सरकारने योजना आणल्या नाहीत का ? मी कालच सभागृहात सांगितले की, सन 1972-73 चा दुष्काळ होता, कै. वसंतराव नाईक साहेबांच्या काळातील काँग्रेसचे शासन होते, त्यांनी सुकडी म्हणजे ऊसाचा चोथा व गूळ मिश्रीत सुकडी माणसांना खायला देऊन जगविले, मिलो दिला, त्यानंतर हरितक्रांती केली. मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढले. संकरित बियाणे निर्माण झाली. शेतकरी, शास्त्रज्ञ वं राज्यकर्ते एकत्र आल्यावर कोणत्याही संकटावर आपण मात करू शकतो हे ग्रामीण भागाबद्दलचे मत त्या वेळच्या सरकारने सिध्द केले. तुम्हाला का हे सिध्द करता आले नाही ? तुम्ही करू शकत नाही, कर्जमाफी करू शकत नाही, ही तुमची भूमिका आम्हाला बिलकूल मान्य नाही.

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे ....

(माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे सभागृहात येतात.)

सभापती महोदय, मी महागाईबद्दल सांगत होतो. अन्न सुरक्षा, कृषी क्षेत्र असा दुहेरी संकटात आपण सापडलो आहोत. आपण सरकारच्या मनात इच्छा असेल तर मार्ग काढू शकतो. घोड्यावर बसण्यासाठी तुमची मांड पक्की असली पाहिजे, ती नसेल तर हा घोडा चौफेर उधळतो. आज राज्यात अशीच परिस्थिती आहे. राज्य प्रशासनावर तुमची मांड पक्की नाही, शासन, प्रशासनाचा घोडा तुम्हाला आवरत नाही, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. महागाईला सरकारचे धोरण जसे जबाबदार आहे तसे केंद्र सरकार आणि राज्य शासन यांचा ताळमेळ नाही हेही जबाबदार आहे.

....B

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे.........

केंद्र सरकार योग्य वेळी धान्याचा पुरवठा करीत नाही आणि केंद्राने पुरवठा केला तर राज्य सरकार तो माल उचलत नाही, ही राज्य आणि केंद्र सरकारची चुक आहे.

सभापती महोदय, साठा करणारे व्यापारी हाही एक घटक महागाईला जबाबदार आहे. साठेबाज व्यापाऱ्यांमुळे कृत्रिम टंचाई निर्माण होते, महागाई निर्माण होते, हे या प्रसंगी मी सांगू इच्छितो. मला कल्पना आहे की, गेल्या दोन-तीन वर्षात सातत्याने कमी पडणारा पाऊस, हवामानातील बदल, गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे आपल्यासमोर काही प्रश्न निर्माण झाले आहेत. राज्य सरकारची अशी तीव्र इच्छा पाहिजे की, शेतकऱ्याला, कष्टकऱ्याला योग्य वेळी पतपुरवठा केला पाहिजे. पण याबाबत राज्य सरकार आणि राज्यातील बँका उदासिन आहेत. कर्जमाफी केली नाही तर पुढील कर्ज मिळणार कोठून, शेतकरी जगणार कसा ? शेतकऱ्याला आपला उत्पादन खर्च निघत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे व आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. या निमित्ताने महागाईचे विश्लेषण मी केले आहे.

सभापती महोदय, करवाढ ही प्रामुख्याने महागाईला जबाबदार आहे. 1600 कोटी रूपयांची मोठी करवाढ या सरकारने केली आहे. त्यामधील 4 हजार कोटी रूपये फक्त व्यापाऱ्यांना दिले. शेतकऱ्यांना का देता आले नाहीत ? या सरकारने टोलमाफी केली. 800 कोटी रूपयांचा खर्च दाखविला. दोन दिवसांपूर्वी 'अेबीपी माझा' वर एक कार्यक्रम दाखविला गेला. जागतिक स्तरावर क्रुड ऑईलचे भाव कोसळलेले आणि प्रति बॅरल 37 डॉलर असा भाव झालेला आहे. अशा वेळी पेट्रोल 38 रूपयांनी आणि डिझेल 26 रूपयांनी विकले गेले पाहिजे, असे 'अेबीपी माझा'च्या अहवालामध्ये दाखविण्यात आले होते. वृत्तपत्रे, इलेक्ट्रिानिक मीडिया हे लोकशाहीचा आधारस्तंभ आहेत. त्यांनी हे सांगितलेले आहे. परंतु, राज्य सरकार आणि केंद्र सरकार याबाबतीत काहीही करीत नसल्यामुळे महागाई वाढत आहे, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, आरबीआयचे गव्हर्नर काय म्हणाले ? त्यांनी भीती व्यक्त केली आहे. महागाई निर्देशांक 5.4 टक्क्यांवरून 10.01 टक्क्यांवर जाण्याची भीती त्यांनी व्यक्त केली, ही चिंतेची बाब आहे. स्वामीनाथन समितीने कृषी उत्पादनाच्या खर्चावर 50 टक्के मिळाले पाहिजेत,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे.......

असे आश्वासन दिले होते. परंतु, हे सरकार त्याबाबत काही बोलण्यास तयार नाही. म्हणून मला असे म्हणावेसे वाटते की, पावसाने नाचवले आणि सरकारने बडवले, अशी महागाईची परिस्थिती झाली आहे. महागाईवरील भाष्य मी येथे पूर्ण करतो.

सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तुंची गरज, मागणी आणि पुरवठा याबाबत काही कार्यपध्दती आहे. मध्यंतरी तुर डाळीचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यासंदर्भात मी जे वक्तव्य करणार आहे ते राज्य आणि केंद्र सरकारच्या आकडेवारीला अनुसरुन करणार आहे. मी माझ्या मनातील एकही वाक्य आपल्याला सांगणार नाही. अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, जीवनावश्यक वस्तु, जसे की, डाळ, तांदुळ, गहु यांचे देशभरातील भाव प्रत्येक राज्यातील दोन ते तीन बाजारपेठातील भाव एकत्रित करुन त्या राज्यामधील ॲव्हरेज रेट तयार केला जातो व ही आकडेवारी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून केंद्र सरकारला दिलेली असते. ही राज्य सरकारची अधिकृत आकडेवारी असते. राज्य सरकारचे 'स्टेट सिव्हिल सप्लाय डिपार्टमेंट' आणि 'भारत सरकारचे डिपार्टमेंट ऑफ कन्झुमर अफेअर्स प्राईस मॉनिटरींग सेल, डेली रिटेल प्राईस ऑफ इसेन्शिअल कमॉडिटिज', यांची ही आकडेवारी आहे. राज्याने केंद्र सरकारला दिलेल्या आकडेवारीवर आधारीत असलेली ही आकडेवारी आहे. ही आकडेवारी काय सांगते ?

सभापती महोदय, मी सुरुवातीला तुर डाळीचा विषय घेतो. आपण सन 2014 आणि सन 2015 ची या निमित्ताने तुलना करु तुर डाळीची सन 2014 मध्ये काय परिस्थिती होती ? मी संपूर्ण बारा महिन्यांची आकडेवारी देऊन सभागृहाचा वेळ घेणार नाही. आपल्या राज्याची आकडेवारी पाठवीत असताना मुंबई आणि नागपूर बाजार गृहित धरला जातो. मी फक्त 3 महिन्यांची आकडेवारी येथे सांगणार आहे. मार्च, 2014 च्या 7 तारखेला मुंबई बाजारात तुर डाळीचा दर प्रति किलो 86 रुपये होता आणि नागपूरमध्ये तो 70 रुपये होता. तीन महिन्यानंतर जुन, 2014 च्या 9 तारखेला मुंबई बाजारात तुर डाळीचा दर प्रति किलो 86 रुपये होता तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर बाजारात 70 रुपये होता, सप्टेंबर महिन्यातील 9 तारखेला तुर डाळ मुंबई बाजारात स्वस्त

...3....



श्री.शरद रणपिसे........

झाली आणि दर प्रति किलो 77 रुपयांवर आला आणि नागपूरला तो 71 रुपये झाला. दरात 1 रुपये वाढ झाली. डिसेंबर महिन्याच्या 9 तारखेला मुंबई बाजारात तुर डाळीचा दर प्रति किलो 78 रुपये होता आणि नागपूर बाजारात तो 71 रुपये होता. मार्च, 2015 मध्ये ही परिस्थिती अनुक्रमे 80 रुपये आणि 79 रुपये होती. सन 2015 चा एप्रिल महिना आल्याबरोबर या सरकारने काय केले ? नोव्हेंबर महिन्यामध्ये दिवाळी, दसरा हे सण असतात. पण दिनांक 23 एप्रिल, 2015 मध्ये राज्य सरकारने एक शासन निर्णय निर्गमित केला. त्यानुसार असा निर्णय घेण्यात आला की, "तथापि आता डाळी, खाद्य तेल व खाद्य तेल बिया यावरील साठा निर्बंध करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे." त्या सुमारास तुर डाळीचा दर प्रति किलो 80 रुपये असताना, पाच ते सहा महिन्यानंतर सणासुदीचे दिवस येत असताना शासनाने हा शासन निर्णय का निर्गमित केला ? अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदय आणि त्यांच्या विभागाला हे समजत नाही ? साठ्यावरील निर्बंध काढले तर पाच-सहा महिन्यांमध्ये व्यापारी साठा करतील आणि कृत्रिक टंचाई निर्माण होईल, हे या विभागाला कळले नाही का ? मंत्री महोदय आणि सचिवांमध्ये वाद असेल, केंद्र सरकारने पत्र पाठविले, सचिवांनी पत्र दाखविले नाही, हा आमचा विषय नाही. ते तुमचे तुम्ही बघा. अधिकारी तुमचे ऐकतात की नाही, हा तुमचा प्रश्न आहे. आपण ज्या घोड्यावर बसला आहात त्या घोड्यावरील आपली मांड पक्की नसेल तर आम्ही काय करणार ? नका चालवू सरकार, राजीनामा द्या आणि बाहेर पडा. पण तीही परिस्थिती नाही. राज्याची दैनंदिन आकडेवारी मंत्री महोदयांच्या निदर्शनास येत नाही का ? केंद्र सरकारने काय पत्र पाठविले, केंद्राने पाठविलेले पत्र मंत्री महोदयांपर्यंत आले की नाही, हा आमचा विषय नाही. विभागाकडून केंद्र सरकारला जीवनावश्यक वस्तुंचे भाव रोज पाठविले जातात, ही आकडेवारी तुम्हाला माहीत नाही का ?

सभापती महोदय, शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये देखील चुक आहे. एप्रिल, 2015 ऐवजी एप्रिल, 2014, अशी तारीख त्यावर टाकण्यात आली होती व त्यामुळे सरकारला पुन्हा दुसरा शासन निर्णय काढावा लागला. या सरकारमध्ये हे काय चालले आहे,

आपण वर्ष देखील योग्य पध्दतीने टाकू शकत नाही तर राज्यातील जनतेला जीवनावश्यक वस्तुंचा

...4....



श्री.शरद रणपिसे.....

योग्य दरात पुरवठा करण्याबाबत तुमची भावना काय आहे ? तुम्ही किती गंभीर आहात, हे यावरुन दिसते. यालाच अनुसरुन पुढे केंद्र सरकारने साठ्यावरील नियंत्रण खुले केले. हे सर्व का घडले ?

सभापती महोदय, मी या निमित्ताने या सरकारला काही प्रश्न विचारु इच्छितो. मी आपल्याला सादर केलेली सर्व आकडेवारी सरकारची आहे. आपणच ही आकडेवारी दिलेली आहे व शासन निर्णय देखील आपणच काढला आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, सणासुदीपूर्वी आपल्या राज्याला किती डाळ लागेल, हे केंद्र सरकारने विचारले असताना सुध्दा राज्य सरकारने कळविले नाही, ही गोष्ट खरी आहे का ? असे असताना सुध्दा डाळीचा साठा करु नये, यावरील निर्बंध का उठविले ? पत्रव्यवहाराचा काही घोळ असेल. पण साठा किती करावा, याबाबतचे निर्बंध दिनांक 23 एप्रिल, 2015 रोजी उठविले गेले.

....C-1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे........

मला मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, हे निर्बंध उठविल्यानंतर 7 महिन्यांच्या काळात डाळीचा साठा केला जाईल, डाळीची कमतरता निर्माण होईल, हे तुम्हाला समजले नाही काय ? मागील 7 महिन्यांच्या काळात अधिकाऱ्यांना हे समजले नाही ? आपण कोणता शासन निर्णय काढतो आणि त्यामुळे व्यापारी डाळीचा साठा करणार आहेत की नाही, हे तुम्हाला देखील समजले नाही ? तुम्ही छापे टाकले. मंत्री महोदय छापे टाकण्याच्या अविर्भावात गेले आणि छापे टाकले, तुम्ही हे चांगले काम केले. आम्ही नाही म्हणत नाही. 86 हजार टन का 98 हजार टन डाळ जप्त केल्याबाबतची आकडेवारी माझ्याकडे आता उपलब्ध नाही. तुम्ही डाळ जप्त केली. माझा प्रश्न असा आहे की, ऐन सणासुदीच्या काळात डाळ जप्त केल्यानंतर व्यापाऱ्यांकडून ती टेंडरने विकत घेऊन सर्वसामान्य जनतेला सबसिडी देऊन ती डाळ तुम्ही स्वस्त धान्य दुकानात का विकली नाही. यासाठी कोण जबाबदार आहे, सचिव जबाबदार आहेत, मंत्री जबाबदार आहेत का मुख्यमंत्री जबाबदार आहेत ? हे महाराष्ट्रातील जनता तुम्हाला विचारल्याशिवाय राहणार नाही. याचे उत्तर तुम्हाला द्यावे लागेल. तुम्ही एलबीटीसाठी 4 हजार कोटी रुपये, टोलसाठी 800 कोटी रुपये देता. तुम्ही ती डाळ ताबडतोब स्वस्त धान्य दुकानांमध्ये का विकली नाही ? तुम्ही छापे टाकले. छापे कोणावर टाकले ? व्यापाऱ्यांनी मालाचा साठा केला म्हणून तुम्ही छापे टाकले. 86 हजार टन का 98 हजार टन डाळ जप्त केली, जी काही आकडेवारी आहे ती समोर येईल.

सभापती महोदय, आदरणीय श्री.बापट साहेब, नॅशनल कमॉडिटी एक्सचेंची आपल्याला माहिती आहे. ज्याप्रमाणे शेअर बाजार असतो त्याप्रमाणे नॅशनल कमॉडिटी सक्सचेंज आहे. तुम्ही या काळात वायदे बाजारावर निर्बंध आणले नाहीत. मग जे व्यापारी वायदे बाजारात व्यवहार करतात तो साठा कोठे गेला ? तो साठा किती मेट्रीक टन होता ? तुम्ही फक्त आम्हाला व्यापाऱ्यांचे साठे दाखविता, हिशेब करता. परंतु, वायदे बाजारात जे व्यवहार होतात तो साठा कोठे ना कोठे तरी असतो. शेअर बाजारात व्यवहार झाल्यानंतर तो पैसा अ, ब, क असा कोणाकडे तरी असतो. तुम्हाला साधी गोष्ट समजली नाही की, आपण निर्बंध उठवितो, पुन्हा निर्बंघ लावतो, मग तो वायदे बाजार तुम्ही का बंद केला नाही, असा माझा प्रश्न आहे. यासाठी कोण जबाबदार आहे

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे........

याचेही उत्तर राज्य शासनाने दिले पाहिजे. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब आता सभागृहात उपस्थित नाहीत. ते तुमचे सहयोगी आहेत. सामना वृत्तपत्रात बातमी छापून आलेली आहे. राज्य मंत्रिमंडळात शिवसेना पक्षाचे अनेक मंत्री आहेत. सामना हे शिवसेना पक्षाचे अधिकृत मुखपत्र आहे. दसरा, दिवाळी हे सणासुदीचे दिवस संपल्यानंतर डाळीच्या दर वाढीवरुन अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.गिरीष बापट संतापले आहेत. केंद्र शासनाने जून महिन्यातच डाळीचे दर वाढणार असल्याचे पाठविलेले पत्र खात्याच्या सचिवांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास का आणून दिले नाही ? आपण पत्र सोडून द्यावे. तुम्ही रोज इसेन्सियल कमॉडिटीची माहिती पाठविता ती मंत्री महोदयांसमोर येत नाही काय ? ती माहिती आठवड्याने, पंधरा दिवसांनी किंवा महिन्याने मंत्रिमंडळासमोर येण्याची पद्धत नाही काय ? राज्य शासन कशा प्रकारे चालवायचे याची तुम्हाला कल्पना नाही काय ? एका महिन्याला मंत्रिमंडळाच्या 4 बैठका होत असतील तर किमान 2 बैठकांमध्ये जीवनावश्यक वस्तूंबाबत चर्चा झाली पाहिजे. यासाठी मंत्री महोदयांनी पुढाकार घ्यायचा असतो, अधिकाऱ्यांनी नाही. मंत्री महोदयांनी याबाबतीत का पुढाकार घेतला नाही ? डाळीवरील निर्बंध उठविल्यानंतर राज्यात मागील 7 महिन्यात काय परिस्थिती होती याबाबतची आकडेवारी तुम्हीच कळविता ? राज्यात डाळीचे भाव प्रती किलो 135 रुपये, त्यानंतर 125 रुपये झाल्याचे तुम्हीच कळविता ? डाळीचा भाव 200 रुपयांपर्यंत गेला. तुम्हीच ही आकडेवारी दिलेली आहे. मग हे सर्व तुम्ही मंत्रिमंडळासमोर का ठेवले नाही ? याला कोण जबाबदार आहे ? यासाठी अधिकारी तर जबाबदार आहेतच, परंतु संपूर्ण मंत्रिमंडळ याला जबाबदार आहे. ऑक्टोबर महिन्यात केंद्र शासनाने पाठविलेले पत्र दडवून ठेवण्यात आले, असा माननीय मंत्री श्री.गिरीष बापट यांचा आरोप आहे. दुसरे म्हणजे, केंद्र शासनाने दिलेल्या माहितीनुसार देशात एकूण 1.33 लाख मेट्रीक टन डाळ जप्त झाली असून त्यामध्ये महाराष्ट्रातील जप्त झालेला डाळीचा साठा 86 हजार मेट्रीक टन आहे. परंतु, राज्याचे मुख्यमंत्री मात्र 13 हजार मेट्रीक टन डाळीचा लिलाव करण्यात येईल, असे जाहीर करतात. सामना वृत्तपत्रातून विचारण्यात आले की, तुम्ही 86 हजार मेट्रीक टन डाळीचा

..3...

श्री.शरद रणपिसे........

साठा जप्त केला असेल तर फक्त 13 हजार मेट्रीक टन डाळीचाच लिलाव का करता ? सामना वृत्तपत्रातून असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उर्वरीत 13 हजार मेट्रीक टन डाळ कोणत्या व्यापाऱ्याच्या किंवा कॉर्पोरेटच्या घशात गेली, असा सवाल सामना वृत्तपत्रातून विचारण्यात आला होता. हे मी विचारत नाही. तुम्ही डाळीच्या बाबतीत अतिशय प्रचंड घोळ, गैरव्यवहार, घोटाळा केलेला आहे, हे मी आपल्याला सांगू इच्छितो. मी संसदीय शब्दच वापरतो. मला माफ करावे. परंतु, लाज हा संसदीय शब्द असेल तर तो मी वापरतो. भाजपचे प्रवक्ते इलेक्टॉनिक मीडियासमोर चर्चेला गेले आणि त्यांनी कोणते प्रश्न विचारावेत ? कॉंग्रेस पक्षाच्या प्रवक्त्यांनी डाळीचा विषय उपस्थित केला त्यावेळी भाजपचे प्रवक्ते म्हणाले की, देशात आणि राज्यात लोक फक्त डाळच खातात काय ? किती अश्लील प्रश्न, हा निर्लज्जपणा कळस आहे. संसदीय शब्द नसेल तर तो आपण रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

सभापती महोदय, दक्षिण भारतात इडली-वडा-सांबार प्रसिद्ध आहे. त्यासाठी डाळ लागत नाही काय ? महाराष्ट्रात बटाटे-वडा-भजी-झुनका प्रसिद्ध आहे. त्यासाठी डाळ लागत नाही काय ? गुजरातमध्ये फाफडा-डोकळा प्रसिद्ध आहे. त्यासाठी डाळ लागत नाही काय ? माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेबांच्या गुजरात राज्यातील ते प्रसिद्ध जेवण आहे. राजस्थानमध्ये डाळ-बाटी प्रसिद्ध आहे. उत्तर भारत आणि मध्य भारतात सर्वसामान्य जनता म्हणते की, दाल रोटी खायेंगे, अपना जीवन बितायेंगे. मी घोसचा उल्लेख करणार नाही. आपण नॉनव्हेज खायचे नाही. आपल्याला या सरकारचा खिमा करायचा आहे. या सर्व प्रकाराच्या वेळी बिहार राज्यात निवडणुका होत्या. बिहार निवडणुकांचे यामध्ये काही कनेक्शन आहे काय ? इलेक्टॉनिक मीडिया, वृत्तपत्रांच्या माध्यमातून असे प्रश्न विचारण्यात आले होते. आपण त्याबाबत खुलासा करावा. महागाई, डाळ, भ्रष्टाचार या संदर्भात माझी जी मागणी आहे ती मी माझ्या भाषणाच्या शेवटी करणार आहे.

सभापती महोदय, डाळीचा गंभीर विषय मी सांगितला. आता मी भ्रष्टाचाराच्या संदर्भात बोलणार आहे. आम्ही किती वेळा आणि किती तास भ्रष्टाचाराच्या विषयावर बोलावयाचे ? शेवटी, आम्हाला असे वाटते की, या सरकारची कातडी आता गेंड्याच्या कातडीच्याही पुढे गेलेली आहे.

..4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभाध्यक्षा ॲड.हुस्नबानू खलिफे )**

श्री.शरद रणपिसे........

सर्वसामान्य जनता काय म्हणते ? सर्वसामान्य जनता म्हणते की, आम्ही कष्ट करतो, घाम गाळतो आणि विकासाचा राक्षस भ्रष्टाचारातून देश आणि विकास नष्ट करतो. ही सर्वसामान्य जनतेची भावना आहे. मी केवळ तुम्हालाच दोष देत नाही. आम्ही सर्वच राजकीय पक्षांनी या भावनेची कदर केली पाहिजे आणि आत्मपरीक्षण केले पाहिजे, हेही मी या निमित्ताने सांगू इच्छितो. मागील वर्षात आम्ही अनेक घोटाळे उधडकीस आणले. मी त्यातील काही घोटाळ्यांचा उल्लेख करणार नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांचे अंतिम आठवडा प्रस्तावावर प्रभावी भाषण होणार आहे. त्या प्रभावी भाषणासाठी मी काही मुद्दे राखून ठेवतो. आमच्यामध्ये एकजूट आहे, सामंजस्य आहे. तुम्ही त्याची चिंता करु नका. परंतु, पूर्वी भ्रष्टाचाराच्या ज्या गोष्टी घडल्या त्या विषयावर मी बोलणार आहे. आदिवासी विकास विभागात घोटाळा झाला. आदिवासी विकास मंत्र्यांनीच मान्य केले की, वह्यांमध्ये घाटाळा झालेला आहे. शिक्षण विभागात अग्निशामक यंत्राच्या संदर्भात घोटाळा झाला आणि सर्वात मोठा कहर म्हणजे महिला व बाल विकास विभागात प्रचंड मोठा घोटाळा झाला. त्याची किंमत 166 कोटी 78 हजार 175 रुपये होती.

..D-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

चिक्की, पोषण आहार बिस्कीटे यांची करेक्ट किंमत सरकारने दिलेली आहे, मी दिलेला आकडा सांगितला तर ते चुक आहे असे म्हणतील, सरकारी आकडा 166 कोटी 78 लाख 175 रुपये आहे. मी व विरोधी पक्ष नेत्यांनी हा विषय उपस्थित केला होता. 18 डिसेंबर 2014 मध्ये जी.आर. काढला, त्यामध्ये असे नमूद केले होते की, 3 लाख रुपयांच्या पुढील खरेदी ई-निविदेने होईल. डिसेंबर 2014 मधील जी.आर.असताना दोन महिन्यानंतर फेब्रुवारी 2015 मध्ये दर कराराने खरेदी करण्यात आली. रूल्स् ऑफ बिझनेसमध्ये काय सांगितले आहे, याची आपणाला माहिती नाही काय ? माननीय राज्यपाल महोदयांचा मी उल्लेख करु इच्छित नाही. राज्यपाल आपल्या कुटुबांचे म्हणजे विधिमंडळाचे प्रमुख आहेत, त्यांना जे भाषण दिले जाते, त्याचा मसुदा मंत्रिमंडळात तयार होतो. मंत्रिमंडळाच्या भाषणात असे नमूद केले होते की, आमचे सरकार ई-टेंडरिंग अनिवार्य करीन. त्याप्रमाणे 18 डिसेंबर, 2014 मध्ये जी.आर.काढण्यात आला होता. तुम्हाला रूल्स् ऑफ बिझनेस कळत नाही. तुमची मांड पक्की नाही, घोड्यावर बसण्याची मांड काय आहे, ही चिज तुम्हाला माहीत नाही. भराभर काही तरी निर्णय घ्या, आपले घर भरा, या राज्याचे वाटोळे करा. एवढीच भूमिका सरकार घेत असेल तर महाराष्ट्रातील जनता तुम्हाला कधी माफ करणार नाही. रूल्स् ऑफ बिझनेस तुम्ही वाचला नाही. शेड्यूल दोन मध्ये असे नमूद केले आहे की, ज्या विषयाबाबत धोरणात्मक निर्णय झाला असेल त्यात बदल करायचा असेल तर ती फाईल माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे गेली पाहिजे. मुख्यमंत्री यांच्या मंजुरीनंतर ती कॅबिनेटच्या मंजुरीसाठी गेली पाहिजे. तुम्ही नियम पाळत नाहीत, कोण मुख्यमंत्री ? आम्ही नेते आहोत, आम्ही ठरवू ते होईल, आम्हाला कोणाची गरज नाही, ही भावना तुमची असेल तर ती योग्य नाही. हे कायद्याचे राज्य आहे, कोणत्या ना कोणत्या आयुधाने मी आणि विरोधी पक्ष नेते चिक्की घोटाळ्याचा पाठपुरावा करणार आहोत, आम्ही न्यायालयीन प्रक्रियेबाबत काही बोलणार नाही. संसदीय आयुधांचा वापर करुन चिक्की घोटाळ्याचा या सभागृहात पर्दाफाश केल्याशिवाय राहणार नाही. हे मी आपणाला सांगू इच्छितो. आपण त्यांना शिक्षा करु शकतो, तसा आपणाला अधिकार आहे, कोणी असे समजू नये की, मंत्री बोलले म्हणजे तेच सत्य आहे, आमच्याकडे हक्कभंगाचे मोठे आयुध आहे, या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

बाबी आम्ही हक्कभंग समिती समोर मांडू. हक्कभंग समिती सभागृहात देखील होऊ शकते. सभागृह देखील तुम्हाला शिक्षा ठोकू शकते, मंत्र्यांनो हे लक्षात ठेवा. आपण रुल्स् ऑफ बिझनेस वाचा. योग्य पध्दतीने कारभार करा. सचिव आणि अधिकाऱ्यांना असे वाटत असेल की, आम्ही त्यातून सुटलो ते देखील त्या प्रकरणातून सुटू शकणार नाहीत. मी आणि विरोधी पक्ष नेते यांच्यासह सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे असे आम्ही सर्व लोक अत्यंत खंबीर आहोत. तुम्हाला आम्ही सोडणार नाही, असे मी या प्रसंगी सांगू इच्छितो. न्यायालयीन प्रक्रियेत कोणताही हस्तक्षेप न करता या ना त्या मार्गाने चिक्की घोटाळ्यात कसा भ्रष्टाचार झाला, हे आम्ही सिध्द करुन त्याची शिक्षा तुम्हाला भोगावीच लागेल.

सभापती महोदय, चिक्की घोटाळा झाल्यानंतर काही विषय मी विरोधी पक्ष नेत्यांसाठी राखून ठेवले आहेत, मी आता ऊर्जा विभागाबाबत बोलणार आहे. इलेक्ट्रीसिटी, प्रकाश, दिवा. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित दिव्याखाली अंधार आहे, जेएसडब्ल्यू इस्पात स्टील कंपनी लिमिटेड, डोही, तालुका पेण, जिल्हा रायगड. सन 1993 मध्ये उद्योग विभागाने सामुहिक प्रोत्साहानात्मक योजना सुरु केली होती. सदर योजनेमध्ये 1996 मध्ये बदल करुन मेघा प्रोजेक्ट घेण्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये नवीन संवर्ग तयार करण्यात आला. एखाद्या अविकसित भागात उद्योग सुरु होत असेल तर त्याचे आम्ही स्वागत करतो. अविकसित भागात जे उद्योग सुरु होतात त्यांना काही प्रमाणात शासन सवलत देते. यानुसार 6 ऑगस्ट 1998 ते 5 ऑगस्ट 2012, अशा प्रकारे 14 वर्षे या कंपनीला विक्रीकरातून 4306.79 कोटी रुपयांची सुट देण्यात आली. आमची काही हरकत नाही, जे केले ते योग्य केले आहे, यापुढे काय झाले तर ही 14 वर्षाची मुदत योग्य वाटली नाही, पुन्हा त्यांना सात वर्षाचा कालावधी वाढवून देण्यात आला. त्यामुळे ही मुदत 5 ऑगस्ट 2019 पर्यंत म्हणजे 21 वर्षे त्यांना वाढवून देण्यात आली. याबाबत देखील हरकत नाही. त्यानंतर या कंपनीत एक प्रकारचे षडयंत्र सुरु झाले. आम्हाला विक्रीकरात माफी दिलेली

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे, त्यामुळे राज्य सरकारच्या वीज शुल्काची माफी घेण्यास आम्ही पात्र आहोत, त्यासाठी कंपनीने शासनाकडे पत्र व्यवहार सुरु केला. उद्योग विभागाने कंपनीला कळविले की, तुम्हाला

...3..



श्री.शरद रणपिसे....

विक्रीकरात माफी आहे, परंतु विद्युत शिल्कात माफी नाही. राज्य सरकारचा महसूल तुम्हाला बुडविता येणार नाही. महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी ड्युटी ॲक्ट सेक्शन 5 (a) अंतर्गत सरकारला इलेक्ट्रीसिटी ड्युटी माफ करण्याचा अधिकार आहे, यामध्ये शासनाने नंतर धोरणात्मक बदल केला, 29 डिसेंबर, 1999 च्या सूचनेप्रमाणे इलेक्ट्रीसिटी ड्युटी माफ करण्यास मान्यता दिली. त्यानंतर मंत्रालय इमारतीला आग लागली. आग हे पळवाढ काढण्याचे मोठे साधन झाले आहे, कोठेही भ्रष्टाचार करा व आगीत नस्ती जळून गेली, आगीमध्ये कागदपत्रांची राख झाली, असे सांगण्यात येते. या कंपनीची नस्ती जळाली, त्यानंतर कंपनीने असे प्रप्रोजल सादर केले की, 5 ऑगस्ट, 2012 ते 4 ऑगस्ट 2019 अशी पुढील सात वर्षे बेनिफिट घेण्यासाठी ॲडिशनल मिळाली होती. त्यानुसार आम्हाला 572 कोटी रुपयाची शुल्क माफी अनुज्ञेय आहे ती मिळाली पाहिजे. अशा पध्दतीचा प्रस्ताव त्यांनी पाठविला होता. चिक्कीमध्ये 166.78 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे, विरोधी पक्ष नेत्यांचे असे म्हणणे आहे की, इतर साहित्यांचा विचार करता ही रक्कम 200 कोटी रुपयांपर्यंत गेली आहे. शेकडो आणि हजारो कोटींचा भ्रष्टाचार चालला आहे, दाळीमध्ये 2000 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे, सर्व वर्तमानपत्राचे अग्रलेख आपण वाचा. मी फक्त सामना दैनिकाचा उल्लेख करीत नाही. हजारो कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे, येथे 572 कोटी रुपयांची विद्युत शुल्काची माफी पाहिजे. ही फाईल विधी व न्याय विभागाकडे गेली त्यावेळी विधी व न्याय विभागाने काही सूचना केल्या आहेत. जे मंत्री झाले त्यांचा सभापती महोदयांनी एक वर्ग घ्यावा मंत्री महोदयांना रूल्स् ऑफ बिझनेस समजावून सांगा, रूल्स् ऑफ बिझनेसच्या शेड्यूल 2 मधील मुद्दा क्रमांक 17 मध्ये असे नमूद केले आहे की, 50 लाख रुपयांच्यावर शासनाचा महसूल बुडत असेल तर मंत्रिमंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. अशी तरतूद आहे, मंत्री महोदयांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाटते युतीचे शासन आहे, "कोई भी आओं, कोई भी जाओं, घर तुम्हारा है, लूटो, मस्ती करो," असे चालणार नाही.

....E..-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे......

सभापती महोदय, आपण संविधानावर चर्चा केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेची भरभक्कम चौकट तयार केली आहे. मी संविधानावर बोलत असताना 1950 पासून 2015 पर्यंत 65 वर्षे या देशातील लोकशाही टिकून आहे हे सांगितले होते. अफगाणिस्तानच्या पंतप्रधानाला विजेच्या खांबावर फाशी देण्यात आले. पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष भुत्तो यांना आर्मीच्या हुकूमशहाने फाशी दिली. आपल्या देशात लोकशाही टिकली याचे कारण की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मूलभूत तत्वाची चौकट राज्य घटनेत तयार केली. त्यामुळे लोकशाहीला आणि सर्वसामान्य जनतेला कोणी फसवू शकत नाही. तुम्ही कितीही फसविण्याचा प्रयत्न केला तरी तुम्हाला राज्य घटना मान्य करावी लागेल आणि त्याला अनुसरूनच रूल्स ऑफ बिझिनेस तयार केले आहेत.

सभापती महोदय, ऊर्जामंत्र्यांना ही फाईल पाठवावी असे वाटले नाही. कोण मुख्यमंत्री, कोण कॅबिनेट, मी कोणाला विचारत नाही, मला गरज नाही. पुढे असे झाले की, ही फाईल वित्त विभागाकडे गेल्यानंतर वित्त विभागाने त्यावर स्पष्टपणे अभिप्राय दिले की, 2013 च्या औद्योगिक धोरणानुसार विद्युत शुल्क माफी देता येत नाही. 1999 मध्ये विद्युत शुल्क माफी अनुज्ञेय होती. परंतु 2013 च्या धोरणानुसार ही विद्युत शुल्क माफी देता येत नाही, त्यामुळे आम्ही हा प्रस्ताव रिजेक्ट करीत आहोत. मंत्रालयाला लागलेल्या आगीमध्ये ही नस्ती जळून गेली हे कारण तुम्हाला पुढे करता येणार नाही. वित्त विभाग म्हणते की, विद्युत शुल्क माफी देता येत नाही. उद्योग विभागाचे म्हणणे आहे की, याच्याशी आमचा संबंध नाही. वित्त विभाग, उद्योग विभाग किंवा विधि व न्याय विभाग याची जबाबदारी घ्यायला तयार नाही. संबंधित विभागाचे सचिव किंवा प्रधान सचिव जबाबदारी घ्यायला तयार नाहीत. त्यांना कल्पना आहे की, राज्याचा राज्य कारभार रूल्स ऑफ बिझिनेसप्रमाणे चालला पाहिजे. राज्य घटनेनुसार काम केले पाहिजे. म्हणून आज मंत्र्यांकडून तक्रार केली जाते की, वरिष्ठ अधिकारी आम्हाला साथ देत नाहीत. तुम्ही जर राज्य घटनेप्रमाणे राज्य कारभार करणार असाल, रूल्स ऑफ बिझिनेसप्रमाणे राज्य कारभार करणार असाल तर वरिष्ठ अधिकारी तुमचे ऐकतील. तुम्ही नियमानुसार काम करूनही अधिकारी तुमचे ऐकत नसतील तर त्यांना मंत्रिमंडळासमोर हजर करा. तुम्ही बेकायदेशीर काम करण्यास सांगणार, भ्रष्टाचार करणार असाल तर वरिष्ठ आयएएस दर्जाचे अधिकारी तुमचे ऐकणार नाहीत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे......

सभापती महोदय, ही केस सर्व विभागांनी रिजेक्ट केल्यानंतर सुध्दा ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवांनी अधिसूचना काढली नाही. दिनांक 26 ऑगस्ट, 2015 रोजी 572 कोटी रुपयांची विद्युत शुल्क माफी दिल्याचे पत्र वीज मंडळ आणि सर्व संबंधितांना पाठविले. तुमची हिंमत किती पहा. रूल्स ऑफ बिझिनेस विचारात घेऊन वित्त विभाग, विधि व न्याय विभाग, उद्योग विभागाने विद्युत शुल्क माफीला नकार दिला. आम्ही मंत्री आहोत या अविर्भावात राज्य कारभार करणार असाल तर राज्य घटना आणि रूल्स ऑफ बिझिनेस तुम्हाला सत्तेवरुन खाली खेचल्याशिवाय राहणार नाही हे लक्षात ठेवावे.

सभापती महोदय, दिनांक 14 ऑक्टोबर, 2015 रोजी ऊर्जामंत्र्यांनी घाईघाईने पत्रकार परिषद घेतली. प्रधान सचिवांनी 572 कोटी रूपयांची विद्युत शुल्क माफी देण्याबाबत वीज मंडळाला जे पत्र लिहिले त्याच्याशी मंत्र्यांचा काय संबंध होता? प्रधान सचिवांनी पत्रकार परिषद घेतली नाही. मंत्र्यांनी पत्रकार परिषद घेऊन अनवधानाने हे घडल्याचे सांगितले. राज्य घटनेमध्ये आणि रूल्स ऑफ बिझिनेसमध्ये अनवधानाने काही केलेले चालत नाही. विधीमंडळ आणि संसदेमध्ये अवधानाने केलेले चालत नाही, सावधानाने केलेले चालते. ही सावधानाची पध्दत तुम्हाला संविधानाने शिकविलेली आहे का? मंत्र्यांचा याच्याशी काही संबंध नव्हता. अनवधानाने झाल्यामुळे 572 कोटीचा आकडा 26 कोटी रूपयांवर आला. ज्यावेळी कागदपत्रे सभागृहासमोर येतील, न्यायालयासमोर येतील तेव्हा सर्व काही उघड होईल. आम्ही आर.टी.आय.अंतर्गत कागदपत्रे मागविली. आमच्या पक्षाचे प्रतिनिधी श्री.सचिन सावंत यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. त्यांना धमक्यांचे फोन येत आहेत. तुम्ही प्रकरण मागे घ्या असे सांगण्यात येत आहे. न्याय व्यवस्था व इतर सर्व व्यवस्थेसमोर ही कागदपत्रे येतील त्यावेळी दूध का दूध और पानी का पानी झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, या सरकारला ऐकू येत नाही आणि बोलताही येत नाही. राज्यात डाळीच्या साठ्याबाबत आणि व्यवहाराबाबत 4000 कोटी रूपयांचा घोटाळा झाला, याला अन्न व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागरी पुरवठा विभाग जबाबदार आहे. चिक्की घोटाळयाचा विषय आम्ही मांडला. चिक्कीच्या व्यवहारामध्ये 167 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. याला महिला व बालकल्याण विभाग

...3..



श्री.शरद रणपिसे......

जबाबदार आहे. जेएसडब्ल्यू इस्पात कंपनीला ऊर्जा शुल्कामध्ये माफी देत असताना 572 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. मी अशी मागणी करतो की, अन्न व नागरी पुरवठा; ऊर्जा व महिला बालकल्याण विभागांच्या मंत्र्यांनी त्वरित राजीनामा दिला पाहिजे. सभापती महोदय, दूध का दूध और पानी का पानी करण्यासाठी कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्टनुसार उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांमार्फत या प्रकरणांची चौकशी करण्यात यावी.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)**

सभापती महोदय, थर्ड पार्टी येऊ द्या. न्यायालयीन प्रक्रिया सुरु होऊ दे. सीबीआय या यंत्रणेवर आमचा विश्वास नाही. एसीबीने चौकशी केली तरी काही होत नाही. आमची अनेक पत्रे त्यांच्याकडे प्रलंबित आहेत. म्हणून मी मागणी करतो की, अन्न व नागरी पुरवठा, महिला व बालकल्याण आणि ऊर्जा या तीनही विभागाच्या मंत्र्यांनी ताबडतोब राजीनामा द्यावा आणि कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्टखाली उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांमार्फत या प्रकरणांची चौकशी झाली पाहिजे. आपण मला या ठिकाणी माझे विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

एफ.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) :** सदर प्रस्ताव हा सन्माननीय सदस्यांकडून सुरूवातीलाच वाचणे आवश्यक होते असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केला होता. सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरूवात केली होती त्यामुळे मी त्यांना मध्येच थांबविले नाही. त्यामुळे हा प्रस्ताव आता मी वाचून दाखविलेला आहे. मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांना विनंती करतो की, त्यांना आता त्यांच्या भाषणास सुरूवात करावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, एका महत्त्वाच्या कामानिमित्त मला जावयाचे असल्याने आपण मला आता बोलण्यासाठी संधी द्यावी अशी मी आपणास विनंती करीत आहे.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेला सुरूवात केलेली असल्यामुळे आता त्यावर माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे हे आपले विचार मांडतील.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, राज्यातील विविध विभागांच्या घोटाळ्यासंबंधी म.वि.प.नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सत्तांतर झाल्यानंतर या सरकारचे चौथे अधिवेशन नागपूर येथे होत आहे. या चौथ्या अधिवेशनापैकी मागची दोन अधिवेशने या राज्य सरकारमधील विविध मंत्र्यांच्या घोटाळ्यांसंबंधी या सभागृहात चर्चा व्हावी, जे सरकार भ्रष्टाचाऱ्याच्या विरोधात सत्तेमध्ये आले त्याच सरकारमधील काही मंत्र्यांच्यावर भ्रष्टारासंबंधी प्रस्तावाअंती चर्चा व्हावी ही सरकारसाठी अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे.

या राज्यात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेला दोनदा संधी मिळाली. दोनदा सत्तांतर झाले. एक 1994-95 च्या काळात आणि दुसरे सन 2014-15 मध्ये झाले आहे. एखाद्या राजकीयपक्षाला गोष्ट धार्जिणी आहे किंवा नाही यासंबंधी माझ्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे. भाजप सरकार सत्तेमध्ये आल्यानंतर डाळीच्याच बाबतीत घोटाळा का होतो, हा प्रश्न पहिल्यांदा माझ्या मनात आला. 1995 मध्ये डाळीमुळे सरकार बदनाम झाले होते. सन 2014 नंतर आलेल्या

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

सत्तांतराच्या काळात देखील डाळीमुळे सरकार बदनाम होत आहे हे देखील मला सर्वांच्या समोर स्पष्टपणे सांगावेसे वाटते. आता येथे सन्माननीय मंत्री श्री.गिरीश बापट बसले आहेत. श्री.बापट साहेबांना माझी विनंती आहे. मी प्रामाणिकपणे सांगातो की, एप्रिल महिन्यांपासून या राज्यात डाळ महाग झाली. त्यामुळे या राज्यात महागाई वाढली. आपण निवडणुकीच्या काळात आमच्या एका काकूंना जाहिरातीसाठी आणले होते. त्या काकू जाहिरातींमध्ये म्हणायच्या की, महंगाई बढानेवालो जनता तुम्हें माफ नही करेगी. अहो काका, त्या काकू नेमक्या कुठे आहेत ? त्या मला पाच महिने सापडतच नाही. त्या सापडल्या तर सभापती महोदय, मला त्यांना विचारावचयाचे आहे की, महंगाई बढानेवालो आपको जनता माफ नही करेगी. आता त्या काळातील 100 रूपयांची डाळ 200 रूपयांवर गेली. काकू आता आपले काय मत आहे ? हे मला एकदा त्यांना विचारावाचे आहे.

देशात सत्तांतर होऊन 19 महिने आणि राज्यात सत्तांतर होऊन 13 महिने झालेले आहेत. देशातील सत्तांतर होताना देशाचे प्रतप्रधान श्री. नरेंद्र मोजी म्हणाले होते की, न खाऊंगा न खाने दूंगा अशा प्रकारची त्यांनी घोषणा केली होती. आता न खाऊंगा न खान दूंगा हे कशाबद्दल होते? ते डाळीसंबंधात होते की, मांसाहारासंबंधी होते. हा रज्यातील आणि देशाच्या प्रत्येक माणसाच्या मनामध्ये प्रश्न निर्माण होत आहे. या देशाचे पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांची रेडियोवर मन की बात ऐकवली जाते. त्यावेळी त्यांच्या मनातील बात मी प्रामाणिकपणे ऐकत असतो. या देशात, या राज्यात सत्तांतर होण्याच्या आधी भारतीय जनता पार्टीकडून घोषणा केली जात होती. ती घोषणा टीव्हीवर आणि डीजीटल बोर्डवर दाखविली जात होती. ती घोषणा सोशल मीडियावर देखील होती. "बहुत होगी महंगाई की मार, अबकी बार मोदी सरकार. तेव्हा महागाईच्या बाबत आपण बोलणार आहात ? आज आम्ही सत्तेत नाही. या वाढत्या महागाईवर कोण बोलणार आहे ? पण महागाईसंबंधात संपूर्ण देशात, राज्यात चर्चा व्हायला लागली त्याच दरम्यान श्री.मोदी साहेबांचे मन की बात आले. या मन की बात मध्ये श्री.मोदी साहेबांनी एक योजना जाहीर केली. ती योजना

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

होती मित्रों मैं भारत स्वच्छता अभियान की माध्यम से इस देश में 6 करोड शौचालय बनावऊंगा. ती मन की बात ऐकल्यानंतर माझ्या मनात असा प्रश्न पडला की, तूर डाळ 200 रूपये झाली, मसूर डाळ 200 रूपये झाली, मूग डाळ 200 रूपये झाली, मांस खाण्यास बंदी घातली. श्री.बापट साहब कुछ तो समजाओ, खाएगा इंडिया तोही जागेगा इंडिया. 6 कोटी शौचालय बांधण्याची घोषणा त्यांनी केली. ज्या ज्या वेळी सरकारसाठी विषय अडचणीचा यईल त्या त्या वेळेस भावनिक मुद्दा काढायचा, भावनिक विषयावर यायचे.

G-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे ......

मग ते व्हेज,नॉन व्हेजचे भांडण असेल, असहिष्णुतेच्या बाबतीतील विषय असेल की, आणखीन कोणताही विषय असेल. सामान्य माणसांच्या प्रश्नावरील भावना भडकवून सत्तेमध्ये यायचे आणि 200 रुपये किलो डाळ झाल्यानंतर त्याचे साधे उत्तर सुध्दा मंत्र्यांनी द्यावयाचे नाही ? डाळीचा भाव हा अचानक वाढलेला नाही. मी आपल्या साक्षीने या सभागृहात सांगू इच्छितो की, यामध्ये अन्न व नागरी पुरवठा विभाग, या विभागाचे अधिकारी व सन्माननीय मंत्री सुध्दा जबाबदार आहेत हे या ठिकाणी मी आपल्या साक्षीने सिध्द करुन दाखवू शकतो. आम्ही सरकारमध्ये असताना माणसाच्या जीवनातील आणि जेवणातील अविभाज्य घटक असलेली डाळ महाग होऊ नये यासाठी प्रयत्न केला होता. डाळच नाही तर जीवनावश्यक जेवढया काही गोष्टी आहेत त्या सर्व गोष्टी, महाग होऊ नयेत यासाठी आम्ही काळजी घेतली आणि आघाडी शासनाने सन 2010 मध्ये राज्यात तत्कालीन परिस्थितीत वाढलेल्या जीवनावश्यक वस्तूचे दर लक्षात घेऊन ज्या हाती घेण्याच्या उपाययोजना आहेत त्याचा भाग म्हणून डाळीच्या साठेबाजीवर दि.23 फेब्रुवारी, 2010 च्या अधिसूचनेन्वये निर्बंध घातले होते. या कारणामुळे आमच्या काळात 100 रुपयांच्यावर डाळीचे भाव कधीही गेले नाही. परंतु आमच्या वेळेस असलेल्या 100 किलो च्या भावाची डाळ भाजपाच्या मंडळींनी सर्वसामान्य माणसांच्या मनात महागाईचा असंतोष निर्माण करण्यासाठी महाग वाटत होती. आज डाळीचा भाव 200-225 रुपये किलो असताना या डाळीचा भाव सन्माननीय मंत्र्यांना महाग वाटली नाही ? हा निर्णय आघाडी सरकारने सन 2010 मध्ये घेतला होता. या निर्बंधाचा प्रमुख उद्देश काय होता ? तर डाळीच्या साठेबाजीला प्रतिबंध करुन बाजारात जास्तीत जास्त डाळ उपलब्ध करुन डाळीचे भाव नियंत्रणात ठेवण्यात यावे असा उद्देश होता. देशातील अन्न धान्याच्या एकंदरित मागणी व पुरवठयातील तुटवडा लक्षात घेऊन केंद्र शासनाने जीवनावश्यक वस्तू पैकी डाळी, खाद्यतेल, खाद्य तेलबिया या जीवनावश्यक वस्तुवर दि. 30.9.2014 च्या अधिसूचनेन्वये एक वर्षाकरिता साठा निर्बंध लागू केला होता. म्हणजेच किमान 30.9.2015 पर्यंत डाळी, खाद्यतेल व खाद्यतेल बियांच्या साठेबाजीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे असे केंद्रशासनाचे मत होते. परंतु असे झाले नाही. यासंदर्भात राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने सादर केलेल्या टिपणीमध्ये साठवणुकीवर निर्बंधाचा उद्देश प्रामुख्याने अन्न धान्याची कृत्रिम टंचाई रोखून जीवनावश्यक वस्तुचे

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे ......

भाव स्थीर ठेवणे हा आहे असे स्पेसिफिकली नमूद केलेले आहे. तसेच या टिपणीमध्ये जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस देशामध्ये झालेला अपुरा पाऊस व त्यामुळे होणारी साठेबाजी, याकारणीभूत असलेल्या, अलीकडेच केंद्रीय मंत्रीमंडळ सचिवांनी राज्यशासनाला कळविल्याबाबत देखील नमूद केले आहे. यासंदर्भात खाद्यतेल व्यापारी असोसिएशन तसेच महाराष्ट्र व इंडियन वनस्पती प्रोडयूसर्स असोसिएशन्स यांनी खाद्यतेल व तेलबिया साठा निर्बंध उठविण्याबाबत विनंती केली होती. त्यावर विभागाने टाकलेल्या टिपणीमध्ये साठा निर्बंधातून खाद्यतेल व तेलबिया यांना वगळावयाचे झाल्यास प्रथमतः राज्यातील खाद्यतेल बियांचे उत्पादन, मागणी व मागणी नुसार उत्पादन झाले किंवा कसे, खाद्यतेलाचे मागील दोन वर्षातील तुलनात्मक दर या बाबी तपासण्याची गरज आहे असे फाईलमध्ये नमूद केले आहे. याच टिपणीमध्ये सन 2013-2014 मध्ये खाद्यतेल बियांचे उत्पादन 52.40 मे.टन वरुन सन 2014-2015 मध्ये 22.21 लक्ष मे.टन इतके कमी झाल्याचेही नमूद केले आहे.

सभापती महोदय, मी या फाईल मधील केवळ तपशील वाचून दाखवत आहे. पूर्ण फाईल वाचणे वेळेमुळे शक्य होणार नाही. याच टिपणीत असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, कोणत्याही संघटनेचे डाळीवरील साठा, निर्बंध उठवण्याची मागणी दिसून येत नाही. यासंदर्भात कक्ष अधिकाऱ्यांनी नकारात्मक रित्या लिहिलेल्या टिपणीत डाळीचा प्रस्ताव नसतांना अपर मुख्य सचिव, पणन यांनी डाळीचा अंतर्भाव करुन प्रस्ताव टाकला व त्यास माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसेच मुख्यमंत्र्यांनी तात्काळ मान्यता दिली. या बाबतीत यांना थोडासाही विचार करण्याची गरज का वाटली नाही ? ही फाईल ज्या क्षणी मुव्ह झाली त्या क्षणी या फाईलमध्ये डाळीचा विषयच नव्हता. या फाईलमध्ये स्पष्ट खाद्यतेल आणि तेलबिया यासंबंधीची उल्लेख होता. माझ्याकडे जी टिपणी आहे त्या टिपणीमध्ये सुरुवातीपासून माननीय सचिव यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार राज्यातील खाद्यतेल व खाद्यतेल व तेलबिया यावरील साठा निर्बध रद्द करण्याच्या अनुषंगाने खाद्यतेल व्यापारी असोसिएशन महाराष्ट्र तसेच इंडियन वनस्पती प्रोडयुसर असोसिएशन यांनी विभागास प्रस्ताव सादर केलेला आहे. सभापती महोदय, टिपणीमध्ये डाळीचा कोठेही उल्लेख नाही. टिपणीतील पहिल्या ओळीत डाळीचा उल्लेख नाही. परंतु सभापती महोदय, टिपणीत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे ......

शेवटच्या ओळीमध्ये जे काही लिहिले गेले त्यात मात्र पहिलाच शब्द गाळलेला आहे. डाळीच्या संदर्भात या शासनाने पूर्वीच्या सरकारचा थोडासा तरी अनुभव घ्यावयास पाहिजे होता. या डाळीमुळे ताईंना मंत्रिपद सोडावे लागले होते.

श्रीमती शोभा फडणवीस : नाही.

श्री.धनंजय मुंडे :मंत्री पद सोडावे लागले होते.

श्रीमती शोभा फडणवीस : नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ही डाळ आली कशी.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनचा मुद्दा आहे. मी माझ्या मंत्रिपदाच्या कारकिर्दीत राजीनामा दिला नाही.मी पाच वर्षे सलग मंत्री म्हणून काम केलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझ्या बाबतीत जे आरोप केलेले आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे. रेकॉर्डवर खाटे आरोप येऊ नये यासाठी मी पॉईंट ऑफ ऑर्डरचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझ्याकडे त्यावेळच्या नियम 93 च्या सूचनेनुसार डाळीच्या बाबतीत जी काही चर्चा झाली, यामध्ये 1995 चा संदर्भ सुध्दा माझ्याकडे आहे.

**तालिका सभापती :** ही बाब तपासून निर्णय घेण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांवर आरोप केलेला नाही. या फाईलवर सुरुवातीला डाळीचा उल्लेख नसतांना खाद्यतेल व तेलबिया यासंबंधीचा विषय असताना डाळ आली कशी ? या डाळीच्या बाबतीत सबंध एक पॅरेग्राफ आहे. सरकारने यामध्ये लिहिले आहे की, डाळीवरील निर्बंध कशा पध्दतीने उठवणे आवश्यक आहे. म्हणजे डाळ स्टॉक करणे कसे आवश्यक आहे याचा उल्लेख या फाईलमध्ये आहे. खरे तर फाईल फक्त खाद्यतेल व तेलबियांच्या संबंधित होती. या फाईलला सर्वांच्या परवानग्या मिळाल्यानंतर एक नोट तर अतिशय गंभीर आहे. त्या नोटवरुन डाळीमध्ये नेमके काय झाले हे लक्षात येते. या नोटमध्ये म्हटले आहे की, "कृपया सदर आदेशाची" ....अक्षर खराब असल्यामुळे पटकन वाचता येत नाही. परंतु पुढे असे लिहिले आहे की, "डाळी व तेलबिया या दोन्ही साठयात परवानगी मिळालेली आहे. आभार."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे ......

सभापती महोदय, आपण माहिती घ्या की, ज्यावेळेस सरकारी फाईल्स मुव्ह होतात त्या फाईलवर "आभार" असे लिहिले जाते काय ?

H-1/......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

आभार लिहिले गेले म्हणजे याचा अर्थ ज्यांनी ही नोट लिहिली, परवानगी मिळाल्यानंतर त्यांना प्रचंड आनंद झाला आणि त्या आनंदात त्यांनी आभार लिहून टाकले. हा आनंद का व्हावा ? मी सदनाला एका गोष्टीची आठवण करुन देतो की, सन 2003-2004 च्या दरम्यान श्री.सुरुपसिंग नाईक यांनी वनमंत्री असताना एका फाईलवर आभार लिहिले म्हणून कोर्टात केस झाली आणि कोर्टाने त्यांना एक महिन्याचा तुरुंगवास केला होता. या ठिकाणी तर सर्वसामान्य माणसांच्या जीवनावश्यक वस्तुसाठीची ही फाईल आहे. डाळीच्या संदर्भातील ही फाईल आहे. डाळ आल्यामुळे जो आनंद झाला, त्या आनंदात आभार लिहिले, त्या आभाराचा मोबदला काय मिळाला हे सदनाला समजले पाहिजे. दिनांक 31.3.2015 रोजी केंद्र सरकारला साठा निर्बंध उठविण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला. त्यास केंद्र शासनाने दिनांक 15.4.2015 रोजी मान्यता देताना याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घ्यायचा असून राज्यातील जीवनावश्यक वस्तुंचे भाव अचानक वाढले तर तत्काळ केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्याची सूचना देऊन त्यास मान्यता दिली. म्हणजे राज्यात वस्तुंचे भ्‍ाव वाढत असतील तर याबाबतचा निर्णय राज्य सरकारने घ्यायचा आहे आणि राज्यात वस्तुंचे भ्‍ाव वाढत असतील तर केंद्र सरकारकडे लगेच प्रस्ताव पाठवून त्याबाबत निर्णय घ्‍ेणे आवश्यक आहे. त्यानंतर दिनांक 23.4.2015 रोजी डाळीच्या साठ्यावरील निर्बंध उठविण्यात आले. म्हणजे स्टॉक लिमिटच्या बाबतीत परमिशन देण्यात आली. म्हणजे मूळ प्रस्ताव डाळीच्या बाबतीत नसताना डाळीचे उत्पादन आणि पुरवठ्याचे प्रमाण व्यस्त असताना तसेच ती उठविण्याबाबत कोणतीही कारणमीमांसा न देता आपण डाळीवरील निर्बंध उठविताना एका शब्दाचे काही कारण लिहिलेले नाही. डाळीच्या बाबतीत असा का निर्णय घेतला ? याची माहिती मंत्री महोदयांनी घ्यावीशी वाटली नाही काय, मुख्यमंत्री महोदयांनी या फाईलवर सही केली आहे त्यांना सुद्धा या संदर्भात माहिती घ्यावीशी वाटली नाही काय ?

सभापती महोदय, राज्यात डाळीचे उत्पादन आणि डाळीची मागणी याचा दोन वर्षातील तुलनात्मक दर यासारख्या कोणत्याही बाबी न तपासता, प्रस्तावाची छाननी न करता, मुळात प्रस्तावात डाळ नसल्यामुळे अचानकपणे विशिष्ट घटकाचे हित डोळ्यासमोर ठेवून डाळीच्या साठेबाजीचे निर्बंध उठविण्यात आले व त्या योगे मोठ्या प्रमाणावर डाळीची साठेबाजी करण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

संधी राज्य सरकारने त्यांच्या या धोरणाच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिली, ही साधी गोष्ट नाही. सरकारच्या या धोरणामुळे साठेबाजांचा कमीत कमी साडेचार ते पाच हजार कोटी रुपयांचा फायदा झालेला आहे. तो कसा झाला ते उदाहरणाने सांगण्यास मी तयार आहे. प्रत्येक महिन्यात डाळीचा भाव किती होता याची माहिती मी सभागृहासमोर ठेवण्यास तयार आहे. महिनानिहाय तूरडाळीचे वाढलेले दर पुढीलप्रमाणे आहेत. जानेवारी 2015 मध्ये 100 रुपये दर होता. फेब्रुवारी महिन्यात 112 रुपये, मार्च महिन्यात 115 रुपये , एप्रिल महिन्यात 115 रुपये म्हणजे ज्यावेळी आपण हा निर्णय घेत होता, त्यावेळी डाळीचे भाव वाढू लागले हे माहीत असताना सुद्धा तुम्ही या फाईलमध्ये डाळ समाविष्ट करुन त्याबाबत निर्बंध टाकले. हे फायदा करुन देण्यासारखे नाही काय ? आपणास आणखी कोणता स्पष्ट पुरावा पाहिजे ? साठेबाजांना चार ते पाच हजार कोटी रुपयांचा फायदा करुन दिलेला आहे त्याचा पुरावा ही फाईल आहे. मे महिन्यात डाळीचा दर 120 रुपये होता. जूनमध्ये 125 रुपये, जुलैमध्ये 140रुपये , ऑगस्टमध्ये 150 रुपये आणि शेवटी आजही डाळीचा भाव 200 रुपये आहे. या संदर्भात जानेवारी 2015 पासून डाळीचे दर चढे असताना देखील राज्य शासनाकडून साठा निर्बंध एप्रिल, 2015 मध्ये उठविण्यात आला. म्हणजे डाळीचे भाव वाढायला लागले आहेत हे तुम्हाला माहीत होते. भाववाढीमध्ये सामान्य माणसे होरपळली तरी चालतील. महागाई कितीही वाढली तरी चालले, पण साठेबाजांचा फायदा झाला पाहिजे हा उद्देश स्पष्ट होत नाही काय ? यासंदर्भात केंद्र सरकारकडून एप्रिल, 2015 पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व पत्रव्यवहारांची तत्काळ दखल अन्न व नागरी पुरवठा विभागाने घेतलेली आहे. ते या फाईलमध्ये आहे. त्यानंतर भाववाढ सुरु झाल्यानंतर स्टॉक लिमिट टाकणे, प्राईज मॉनेटरींग सेल स्थापन करणे, प्राईज मॉनेटींग फंड स्थापन करणे, स्वस्त धान्य दुकांनातून जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करुन देणे यासारख्या सूचना दिनांक 10.6.2015 पासून केंद्र शासन वारंवार देत असताना त्याकडे मात्र विभागाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे. आपण एप्रिल महिन्यापर्यंत दखल घेतली. परंतु एप्रिल महिन्यानंतरच्या निर्णयाची दखल का घेतली नाही, केंद्र सरकारकडून आलेल्या सूचनांची दखल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

आपणास का घ्यावीशी वाटली नाही ? दिनांक 17.6.2015 रोजी केंद्र सरकारकडून राज्य सरकारकडे स्टॉक लिमिटबद्दल अभिप्राय मागविले असताना अन्न व नागरी पुरवठा विभागाने त्याबाबत माहिती दिली नाही. त्यानंतर दिनांक 17.6.2015 रोजी पुन्हा एकदा केंद्र शासनाने पत्राद्वारे राज्य शासनाला जनतेला योग्य किंमतीमध्ये जीवनावश्यक वस्तू उपलब्ध व्हाव्यात म्हणून साठेबाजीवर निर्बंध घालण्याचे अधिकार दिल्याचे कळविले. तथापि, अशाप्रकारचे निर्बंध घालण्यात आलेले नाहीत असे फाईल सांगत आहे. केंद्र सरकारने सहाव्या महिन्यात, सातव्या महिन्यात पत्र दिले. केंद्र शासनाने आठव्या महिन्यात जे पत्र दिले त्यामध्ये साठेबाजांवर कारवाई करण्याबाबत राज्य शासनास कळविले. तरी सुद्धा त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही. दिनांक 25.8.2015 रोजी मुंबई ग्राहक पंचायत या 35 हजार सदस्य असलेल्या ग्राहकांच्या संघटनेच्या प्रतिनिधींनी माननीय मुख्यमंत्री यांची भे्ट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन दिले. कांदा, तूर, उडीद व डाळीच्या वाढत्या दरांना लगाम घालून जीवनावश्यक वस्तू अधिनियम 3 नुसार तूर आणि उडीद डाळीची खरेदी विक्रीचे दर निश्चित करावेत, प्राईज मॉनेटींग सेलची स्थापना करावी अशा मागण्या मुंबई ग्राहक पंचायत समितीने माननीय मुख्यमंत्र्यांकडे केल्या. माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन दिवसात साठेबाजांवर धाडी टाकण्यात येतील असे जाहीर केले. तसे आश्वासन ग्राहक पंचायतीला दिले. परंतु प्रत्यक्षात त्यावेळी साठेबाजांवर कोणतेच निर्बंध नव्हते. हे त्यावेळेस खोटे बोलणे नव्हते काय, जनतेला फसविले नव्हते काय, ग्राहक पंचायतीला फसविले नव्हते काय ? दिनांक 28.9.2015 रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक होऊन त्यांनी डाळी व जीवनावश्यकवस्तुंच्या साठेबाजीवर दिनांक 30.9.2015 रोजी वैद्य असलेल्या प्रतिबंधाची मुदत एक वर्षांनी वाढविली. म्हणजे दिनांक 30 सप्टेंबर 2016 पर्यंत साठेबाजीवर प्रतिबंध असणे आवश्यक आहे असे मत केंद्रीय मंत्रिम्ंडळाच्या बैठकीत झाले. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत केंद्राने राज्यांना अवैध व्यापार, साठेबाजी, नफेखोरीला आळा घालण्यासाठी साठ्यावर निर्बंध घालण्याचे आदेश घालावेत असे सांगितले. केंद्र सरकारने वारंवार बजावूनसुद्धा डाळीचे दर अवाच्यासवा झाल्यावर सुद्धा राज्य शासनाने जाणीवपूर्वक साठेबाजीवर निर्बध घालण्याचे टाळले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....... I-1

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, त्यानंतर मुंबई ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी पुन्हा माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांची भेट घेतली. त्यांनी केंद्र शासनाच्या सर्व पत्र व्यवहाराच्या आणि निर्णयाच्या प्रती माननीय मंत्र्यांना दिल्या. परंतु मंत्री महोदयांनी सांगितले की, ही कागदपत्रे त्यांच्या विभागाकडेच नाहीत. महोदय, वस्तुत: साठे निर्बंध टाकण्यासाठी केंद्र सरकारकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या उत्तरादखल केंद्र शासनाने दि.15/4/2015 पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराची कागदपत्रे सन्माननीय मंत्री श्री.गिरीष बापट यांना प्राप्त झाली होती. परंतु त्यानंतर त्यांच्या विभागाला कोणताही पत्रव्यवहार प्राप्त झाला नाही. दिनांक 8/10/2015 रोजी पुन्हा एकदा मुंबई ग्राहक पंचायतीने माननीय मुख्यमंत्र्यांशी केलेल्या पत्र व्यवहाराच्या प्रतींसह पत्र लिहिले आणि त्यात डाळीचे दर बेसुमार वाढल्यामुळे साठेबाजीवर निर्बंध घालावे, साठेबाजांवर कारवाई करावी, प्राईस मॉनिटरींग सेल स्थापन करावा, किंमत स्थिरीकरण निधीची स्थापना करावी, जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम 3 (2) अन्वये कांदा, तूर आणि उडीद डाळ यांच्या किंमती निश्चित कराव्यात, इत्यादी मागण्यांबाबत पत्र दिले दिनांक 19/10/2015 रोजी मुंबई ग्राहक पंचायतीने माननीय राज्यपालांची सकाळी 11.00 वाजता राज भवनवर भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन दिले. कदाचित त्या निवेदनामुळेच माननीय राज्यपालांच्या तंबीनंतर त्या दिवशी साठे निर्बंधीबाबतचे आदेश काढण्यात आले. याचाच अर्थ तोपर्यंत त्या साठेबाजांना मदत करण्यात आली. यातून साठेबाजांना जो नफा झाला तो मंत्रालयाच्या कोणकोणत्या मजल्यांवर गेला या बाबतची चौकशी व्हायला नको का ? मला अपेक्षा नाही की, सरकार या प्रकरणी चौकशी करेल. कारण या पूर्वीच्या अधिवेशनांमध्ये आम्ही अनेकदा पुराव्यानिशी सर्व बाबी निदर्शनास आणून देऊन सुध्दा कोणत्याही प्रकरणांच्या बाबतीत चौकशी करण्यात आली नाही. मग ते विषय चिक्कीच्या बाबतीत किंवा अन्य प्रकरणांच्या बाबतीत असतील, परंतु सरकार त्या विषयी चौकशीला तयार झाले नाही. आपण या संदर्भातील चौकशी करा किंवा करु नका. आपण चौकशी केल्यानंतर त्या चौकशीतून काही निष्पन्न होईल की नाही माहीत नाही. कदाचित हे सरकार माननीय मंत्र्यांना वाचवेल. परंतु राज्यातील जनता आणि माननीय न्यायालय मात्र या सरकारने केलेल्या पापाला कधीच वाचविणार नाही, एवढा विश्वास आम्हाला नक्कीच आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, दि.20/10/2015 रोजी राज्यभरात साठेबाजांवर धाडी टाकण्यात आल्या. वास्तविकत: साठे करण्यावर निर्बंध टाकल्यानंतर विशिष्ट कालावधीची मुभा घाऊक विक्रेत्यांना देणे आवश्यक होते. जेणेकरुन, त्या कालावधीत त्यांनी त्यांचा माल साठे बाजारात आणला असता आणि किंमती कमी होण्यास मदत झाली असती. परंतु असे जाणीवपूर्वक करण्यात आले नाही. सभापती महोदय, दि.27/10/2015 रोजी पुन्हा एकदा जप्त केलेला साठा रेशन दुकानामार्फत नागरिकांना उपलब्ध करुन देण्याची विनंती विभागाला करण्यात आली. दि.28/10/2015 रोजी हीच विनंती माननीय मुख्यमंत्री आणि माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांकडे करण्यात आली. त्यात जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत कलम 6 (अ) (2) मधील तरतुदीनुसार जप्त केलेला साठा निश्चित किंमतीत रेशन दुकानामार्फत सर्वसामान्य जनतेला खुला करुन देण्याची विनंती करण्यात आली. महोदय, यात जगलरी कशी करण्यात आली हे आपल्याला समोर दिसून येईल. महोदय, जीवनावश्यक वस्तू कायद्यात कोणतीही तरतूद नसताना दि.5/11/2015 रोजी राज्य शासनाने हा साठा साठेबाजांकडून जप्त केला. त्यांच्याकडून 95 रुपये अधिक 5 रुपये वजा जाता, या दराने विकण्यासाठी हजार रुपयांच्या हमी पत्रावर त्यांना परत करण्याचा अत्यंत बेकायदेशीर स्वरुपाचा निर्णय घेतला. जीवनावश्यक वस्तू कायद्यामध्ये अशा प्रकारची तरतूद नाही. माननीय मंत्र्यांनी उत्तरात या बाबतचा खुलासा करावा. या कायद्यात हमी पत्राच्या आधारावर साठे बाजांकडून हमी पत्र घ्यावयाचे आणि त्यांना सांगायचे की, तुम्ही अमुक दराने माल बाजारात विकून टाका. मी विचारु इच्छितो की, हा प्रकार साठेबाजांना पुन्हा मदत करणारा नाही काय ? या साठेबाजांच्या बाबतीत काय काय व्यवहार झाला हे चौकशी अंती स्पष्ट होणे आवश्यक आहे. व्यापाऱ्यांनी अशा प्रकारे हमी पत्रावर माल विकण्यास नकार दिला. कारण ती बाब कायदेशीर नव्हती. या सर्व प्रक्रियेमध्ये वेळकाढूपणा झाला. पुन्हा वस्तूचे भाव वाढले आणि त्यांना नफा कमविण्याची पुन्हा संधी दिली गेली. त्यावेळी या डाळीची किंमत 225 प्रती किलो झाली होती. मुंबई ग्राहक पंचायतीने माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून सी.बी.आय. चौकशीची मागणी केली. हे सर्व वर्तमानपत्र आणि टी.व्ही. चॅनेल्सवर प्रसिध्द झाले. अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी मुंबई ग्राहक

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना मोबाईलवरुन असे सांगितले की, आपल्या सोबत तूर डाळीचा एक

..3..



श्री.धनंजय मुंडे....

व्यापारी आहे आणि आमच्याकडे 5 टन तूर डाळ आहे. ती तूर डाळ तुम्हाला 97 रुपये किलो दराने देतो आणि तुम्ही आम्हाला परत ती डाळ 100 रुपये दराने द्या, असे सांगितले. महोदय, हे संभाषण फोनवरील आहे. हे संभाषण होताना नागरी पुरवठा मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसमक्ष व्यापारी बसलेला होता. त्या व्यापाऱ्याचा संदर्भ देऊन ते अधिकारी मुंबई ग्राहक पंचायतीच्या संबंधित जबाबदार पदाधिकाऱ्यांसोबत हे बोलत होते. याचा अर्थ काय ? सभापती महोदय, या व्यतिरिक्त अजून काय उघड सांगावे. ?

सभापती महोदय, मध्यंतरीच्या कालावधीत माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी खालापूर येथील ई.टी.सी. कंपनीला दिलेली गुप्त भेट जगजाहीर झाली. माननीय मंत्री त्या कंपनीला भेट द्यावयास गेले असता माननीय मंत्र्यांनी सोबत गाडी घेतली नाही किंवा त्या भेटी बाबत कोणाला सांगितले सुध्दा नाही. माननीय मंत्र्यांच्या दूरध्वनीवरील स्टेटमेंट आणि प्रेस रिलीजमध्ये वाचले की, ई.टी.सी. कंपनी ही डाळ बनविणारी कंपनी वजा फॅक्टरी आहे. या निमित्ताने सांगू इच्छितो की, त्या कंपनीमध्ये जो स्टॉक होता तो स्टॉक पाहण्यासाठी कदाचित मंत्री महोदय गेले असतील. कदाचित त्यावेळी त्यांच्याकडे अधिकारी उपलब्ध नसतील. माननीय मंत्र्यांकडे अधिकारी नसल्यामुळे त्यांना एकट्यालाच तेथे जावे लागले असेल. परंतु जर माननीय मंत्र्यांना त्या कंपनीला भेट द्यावयाचीच होती तर ते गुप्तपणे भेट देण्यासाठी का गेले, हा खरा प्रश्न आहे. परंतु त्याच दरम्यान माननीय मंत्री त्या ठिकाणी भेट देण्यासाठी गेल्याचे कोणाला तरी कळाले आणि लगेचच संबंधित अधिकारी त्या ठिकाणी पोहचले. महोदय, पूर्वी गुप्त असलेली बैठक नंतर मात्र लगेच अधिकृत झाली. उदाहरणार्थ मी साठेबाज असेल आणि माझ्याकडे 50-60 हजार मे.टन डाळ असेल आणि त्या डाळीच्या बाबतीत मंत्री महोदय माझ्या फॅक्टरीवर धाड टाकत असतील तर साहजिकपणे मी किती दहशतीखाली असावयास पाहिजे, माझ्यावर किती दबाव असावयास पाहिजे. परंतु त्या फॅक्टरीचे मालक आणि मंत्री महोदयांनी दिलेल्या भेटीच्या वेळचे त्यांचे हसत-खेळत असलेले फोटो माझ्याकडे आहेत. ते मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. महोदय, मी विचारु इच्छितो की, त्यावेळी फक्त ई.टी.सी. कंपनीवरच का धाड टाकण्यात

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आली ? आणखी चार कंपन्या किंवा साठेबाजांवर धाड टाकली असती तर मी समजू शकलो असतो. ..4..

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) I-4

SJB/ MMP/ AKN/ 11:20

श्री.धनंजय मुंडे....

महोदय, माननीय मंत्र्यांनी 8 तारखेला ई.टी.सी. कंपनीला दिलेल्या भेटीचे मी उदाहरण देतो. ई.टी.सी. म्हणजेच ॲग्रो प्रोसेसिंग इंडिया प्रा.लि., खोपोली यांचे प्रोडक्शन ॲण्ड डिस्पॅचच्या संदर्भातील दि.15/6/2015 रोजीचे स्टेटमेंट माझ्याकडे आहे. त्यात नमूद केले आहे की, एप्रिल, 2015 मध्ये प्रोडक्शन 2363 आणि डिस्पॅच 1072 होते, मे महिन्यात प्रोडक्शन 2272 आणि डिस्पॅच 1493, जून महिन्यात प्रोडक्शन 1761 आणि डिस्पॅच 1611, जुलै महिन्यात प्रोडक्शन 1451 आणि डिस्पॅच 1205, ऑगस्ट महिन्यात प्रोडक्शन 3349 आणि डिस्पॅच 2218 तसेच सप्टेंबर महिन्यात प्रोडक्शन 3101 आणि डिस्पॅच 2747 झाले होते.

.जे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

प्रोडक्शन 16424 झाले आणि डिस्पॅच 13646 झाले. 6 महिन्यांच्या स्टटमेंटमध्ये 3 हजार मे.ट. डाळीच्या बाबतीतील विषय असेल आणि ही डाळ 100 रूपये नफ्याने कमाविली असेल तर 3 हजार मे.ट. म्हणजे 30 लाख किलो गुणिले 100 म्हणजे 300 कोटी रूपयांचा घोळ झाला आहे. तत्संबंधीचा विषय येथेच आहे. आणखी काय पुरावे द्यावेत, काय सांगावे ? डाळ सहजासहजी असा विषय झाला, एवढ्यावर या सरकारला चौकशी करावी असे वाटत नसेल तर यासारखे दुर्दैव कोणाचेच नाही. तुम्ही चौकशीपासून वाचाल, कदाचित राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय मंत्री सर्वजण चौकशीपासून बाजूला जातील. शेवटी हिंमत लागते. आरोप होतो, सरकारमध्ये असतानाच, माननीय मंत्री असतानाच त्या सरकारच्या बाबतीत चौकशी लागावी आणि त्या चौकशीला सामोरे जावे ती हिंमत आमच्या नेतृत्वात आहे, ती हिंमत आमच्या नेतृत्वाने दाखवली आहे. हिंमत असेल तर ती तुम्ही सुध्दा दाखवा, हिंमत आहे ? नाही. मला माननीय मंत्र्यांना डाळीबाबतीत काही प्रश्न विचारायचे आहेत. पहिला प्रश्नाचे उत्तर मला अपेक्षित आहे. डाळीच्या उत्पादनात व पुरवठ्यात कोणतीही मोठी वाढ झालेली नसताना किंवा डाळीच्या मागणीमध्ये कोणतीही मोठी घट झालेली नसताना डाळीच्या साठ्यावरील 5 वर्षे जुने साठेबाजीवरील निर्बंध कोणतीही कारणमीमांसा फाईलवर नमूद न करता विभागाने सादर केलेल्या प्रस्तावात डाळीवरील साठा उठविण्याच्या प्रस्तावास अंतर्भाव नसताना देखील माननीय मंत्र्यांनी हा निर्णय कशाच्या आधारे घेतला याचे उत्तर सभागृहाला पाहिजे. सभापती महोदय, असा निर्णय घेताना याबाबत सविस्तर स्पष्टीकरण किंवा निर्णय घेण्याची संयुक्तता या फाईलवर नोंदविण्यात आली होती का याचे उत्तरही आम्हाला येथे पाहिजे. फाईलमध्ये क्रमांक जीविका 1513/426, प्र.क्र.47, न.पु.23 मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील स्वाक्षरी केलेली आहे. सभापती महोदय, त्यांना देखील या संदर्भात अधिक अभ्यासाची गरज का वाटली नाही याचे सुध्दा उत्तर आम्हाला सभागृहात पाहिजे. माझा चौथा प्रश्न आहे. एक व्यापारी संघटनेच्या निवेदनावर तेलबियांची साठामर्यादा वाढविण्याचा प्रस्ताव तत्काळ सादर करण्यात आला. तथापि ग्राहक संघटनांकडून डाळींच्या झालेल्या बेसुमार भाववाढीबद्दल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

वारंवार तक्रार करून सुध्दा कारवाई का करण्यात आली नाही याचे सुध्दा उत्तर या सभागृहात पाहिजे. केंद्र शासनाने वेळोवेळी या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल का घेण्यात आली नाही याचे सुध्दा स्पष्टीकरण पाहिजे. केंद्र सरकारने दिनांक 15.04.2015 रोजी पत्रात जीवनावश्यक वस्तुंचे दर वाढल्यास तत्काळ साठा निर्बंध लावण्याबातचे स्वयंस्पष्ट निर्देश दिलेले असताना देखील किरकोळ बाजारातील डाळीचे दर हे दुप्पट ते तिप्पट झाल्यानंतर देखील ग्राहक संघटनांकडून होत असलेल्या मागण्यास केराची टोपली का दाखविण्यात आली याचे सुध्दा उत्तर आपल्याकडून पाहिजे. केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेला पत्रव्यवहार राज्य शासनाने का दडवून ठेवला याची सुध्दा माहिती पाहिजे. माननीय मंत्री, अन्न व नागरी पुरवठा हे खालापूर येथील एटीसी ॲग्रो प्रोसेसिंग प्रायव्हेट लिमिटेड या तूर डाळीच्या धाड पडलेल्या कारखान्यावर दिनांक 10.11.2015 रोजी कुठलाही शासकीय बंदोबस्त न घेता, शासकीय वाहनाचा वापर न करता, जिल्हाधिकारी रायगड यांना शासकीय दौरा न कळविता, स्थानिक अधिकाऱ्यांना सोबत न घेता कशासाठी गेले होते हे सुध्दा या सभागृहात माहीत पाहिजे. व्हिडिओ फुटेजची सर्व महिती देतो. ते माझ्याकडे आहे. एवढा दोघांमध्ये का आनंद झाला ते फोटोत, व्हिडिओ फुटेजमध्ये आले आहे, ते सुध्दा दाखवितो. आम्हाला त्याचेही उत्तर मिळाले तर कळेल की, एवढे चांगले संबंध अचानक भेट दिल्यानंतर, डाळीचे भाव वाढलेले असताना का झाले ? सभागृहाला हेही समजले पाहिजे. माननीय मंत्र्यांनी विविध डाळीच्या जप्तीच्या संदर्भात वेगवेगळे आकडे वेळोवेळी प्रसारमाध्यमांना सांगितले आहेत, त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे साहेबांनी त्यांच्या भाषणात केला. 13 हजार टन तूर डाळ जप्त केल्यासंदर्भात माननीय मंत्र्यांकडून सांगण्यात आले. वारंवार सांगण्यात आले की, 13 हजार टन तूर डाळ जप्त केली आहे. मग ती तूर डाळ लिलावाद्वारे विकण्याच्या बाबतीत का त्यांनी निर्णय घेतला नाही ? हमी पत्राच्या बाबतीत आपल्या कायद्यात तरतूद नसतानाही का निर्णय घेतला हे सुध्दा समजले पाहिजे. माननीय मंत्री म्हणतात की, 13 हजार टन डाळ जप्त केली. जप्त केलेली तूर डाळ फक्त 3854 टन आहे असे माहितीच्या अधिकारात त्याच विभागाने मला कळविले आहे. कोणाचे खरे समजायचे, 13 हजार खरे समजायचे की आपल्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

विभागाने मला फक्त 3854 टन जप्त केली आहे हे सांगितले ते खरे समजायचे याचाही खुलासा या सभागृहात होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबई ग्राहक पंचायतीने केलेल्या सीबीआयच्या चौकशीच्या मागणीत या प्रकरणी सव्वा चार हजार कोटी रूपयांची नफेखोरी अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाच्या आशीर्वादाने या 6 महिन्यांच्या काळात झालेली आहे, याबाबतीत सुध्दा माननीय मंत्र्यांनी खुलासा करणे आवश्यक आहे. ही फाईल अथक परिश्रमातून मिळालेली फाईल आहे. फार कष्ट घ्यावे लागले. फाईल देताना सुध्दा यात काय जगलरी केली आहे ते पहा. फाईलमध्ये 3 महिन्यांचा पत्रव्यवहार उपलब्धच नाही. काढून टाकला आहे. तेवढा पत्रव्यवहार काढून टाकून ती फाईल माझ्याकडे दिली आहे. ही फार गंभीर बाब आहे. मी यामध्ये आपल्याला तपशील देतो की, कोणत्या तारखेपासून, कोणत्या पृष्ठ क्रमांपासून पृष्ठे गाळली आहेत. पृष्ठ क्रमांक का गाळावी लागली, असे काय त्यामध्ये आहे ? ती गाळलेली पृष्ठे सुध्दा सभागृहात माननीय मंत्र्यांच्या उत्तराच्या अगोदर पटलावर पाहिजेत. सभापती महोदय, यातूनच उघड होते की, दाल में .... (अडथळा) पुरी दाल ही काली हैं. हा अतिशय गंभीर व सर्वसामान्य जनतेशी संबंधित डाळीच्या संबंधित घोटाळा आहे.

सभापती महोदय, माझी मागणी आहे की, शिक्षण विभागावर एकदा आरोप झाल्यावर पुन्हा अशी हिंमत करू नये. सहजासहजी कोणी करीत नाही. पण शिक्षण विभागात पुन्हा गोंधळ आहे आणि तो साधासुधा गोंधळ नाही. माननीय शिक्षणमंत्र्यांनी आणि शिक्षण विभागाने महापुरूषांना सुध्दा सोडलेले नाही. महापुरूषांच्या फोटोमध्ये भ्रष्टाचार केला आहे. शिक्षणासारख्या अतिशय महत्त्वाच्या विभागाचे माननीय मंत्री शिक्षणापेक्षा बाकी उपद्व्यापामुळेच जरा अधिक चर्चेत आहेत, त्यांना सवय आहे की, आपले खाते सोडून दुसऱ्या खात्याची उत्तरे देणे. ते का अस्वस्थ आहेत एवढी सर्व खाती असतानाही हे कळत नाही. कदाचित त्यांच्या हातात काठी येण्याऐवजी छडी आली आहे त्यामुळे ते अस्वस्थ असावेत. राज्यात शिक्षणासारख्या क्षेत्रात खूप मोठी कामे करण्यासाठी वाव आहे. माननीय मंत्री स्वतःच्या डिग्रीच्या बाबतीत, ती खरी की खोटी देव जाने, ते त्यांनाच माहिती आणि ज्ञानेश्वर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

माऊलींना माहीत. खात्यातील नियमबाह्य खरेदी करून, कधी कधी जागेवर बसून, येथेच बसून टोमणे मारायचे ही त्यांची सवय आहे. आता हा मी थोडासा बालिशपणा करीत आहे.

सभापती महोदय, दिनांक 31 मार्च, 2015 रोजी शिक्षण विभागाने राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ या संस्थेकडून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, परमपूज्यनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, जीजाऊ इत्यादी या सर्व महापुरूषांचे फोटो व अर्ली रिडर्स बूक सर्व शिक्षा अभियानातील शिल्लक निधीतून विकत घेण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांना निर्देश दिले. सदर खरेदीचा प्रस्तावित कॉंटम हा सर्वसाधारणपणे फोटोसाठी 12 कोटी रूपयांचा आहे आणि अर्ली रिडर्स बूकसाठी 94 कोटी रूपयांचा होता.

....K

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.........

अर्ली रिडर बुकची खरेदी डाटा प्रोसेसिंग फर्म्स प्रा.लि.,अहमदाबाद यांच्याकडून करण्यात आली आहे. मागील वेळी दरकराराच्या संदर्भात सभागृहात विषय उपस्थित करण्यात आला होता. आम्ही हा विषय सभागृहात उपस्थित केला होता. त्यामुळे पुन्हा एकदा दरकराराच्या बाबतीत सरकारला आपले धोरण बदलवावे लागले. दर कराराच्या माध्यमातून येथून पुढे कोणतीही खरेदी होणार नाही, असा निर्णय पुन्हा एकदा राज्य सरकारला घ्यावा लागला. महिला व बालकल्याण आणि शिक्षण विभागाने दोन महिन्यांपूर्वी दरकरारान्वये केलेली बेकायदेशीर खरेदी, हे त्यामागील कारण होते. पण पुन्हा एकदा शिक्षण विभागाने अर्ली रिडर बुकची खरेदी डाटा प्रोसेसिंग फर्म्स प्रा.लि.,अहमदाबाद यांच्याकडून दरकरार नव्हे तर कोटेशनवर केलेली आहे. केवळ भाव मागवून ही खरेदी केलेली आहे.

सभापती महोदय, शिक्षण विभागाने राष्ट्रपुरुषांच्या तसबिरी राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ या संस्थेकडून प्रति नग 1395 रुपये या दराने खरेदी करण्यास मान्यता दिलेली आहे. मी स्वत: महात्मा फुले यांचा एक फोटो विकत घेतला आहे व माझ्या नावाने पावती देखील आहे. महात्मा फुले यांच्या फोटोची किंमत 7 रुपये होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोची किंमत 16 रुपये होती. पण सन्माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी एक फोटो 1395 रुपयांना विकत घेतला आहे. एका महापुरुषाच्या फोटोमध्ये 1300 रुपये, ही काय पध्दत आहे ? तुम्हाला महापुरुषही कमी पडावयास लागले आहेत का ?

सभापती महोदय, तुम्हाला कुठे तरी वाटले की, शाळांना आगी लागतील, तुम्ही फायर इस्टिंग्विशर खरेदी करता. त्याबाबतची फाईल मी मागविली. मागील वेळी सभागृहात बोलण्यापूर्वी मी ही कागदपत्रे या विभागाकडे मागितली होती. परंतु, अद्यापपर्यंत मला ती कागदपत्रे मिळालेली नाहीत. सहा महिन्यांपासून माहितीच्या अधिकारात ही फाईल मी मागत असताना मला ती मिळत नाही. राज्यातील विरोधी पक्षनेत्यांना माहितीच्या अधिकारात देखील कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत. शिक्षण विभागाकडे मी ही कागदपत्रे मागितली होती. त्या विभागाने असे कळविले की, संचालक व उप संचालक यांच्याकडे सदर फाईल आहे. त्यांच्याकडे मी फाईलची मागणी केली. त्यांनी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

सांगितले की, ही कागदपत्रे मंत्रालयामध्ये आहे. सभापती महोदय, आपण या संदर्भात शासनाला काही निदेश देणार आहात का ? हा माझा अधिकार नाही ? माहितीच्या अधिकारात मी ही कागदपत्रे मागितली आहेत. परंतु ती न मिळाल्यामुळे मी आता आयुक्तांकडे अपील दाखल केले आहे. त्यांच्याकडूनही अद्याप या अपिलावरील निर्णय मला मिळत नाही. आम्ही का म्हणून या सभागृहाचे सदस्य व्हावे ? सामान्य माणसांच्या प्रश्नांच्या बाबतीत सरकार काही चुकीचे करीत असेल आणि त्यासंदर्भात आम्ही माहिती मागविल्यानंतर आमच्यावर अशा प्रकारचे निर्बंध सरकारकडून आणले जात असतील, विरोधी पक्ष म्हणून आमच्यावर अंकुश ठेवला जात असेल तर यासंबंधी सरकारचे काय उत्तर आहे ?

सभापती महोय, आपल्याला असे वाटेल की, मी हे फोटो एखाद्या दुकानातून खरेदी करुन आणले आहेत. परंतु, मी सांगू इच्छितो की, हे फोटो मी शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री व प्रकाशन संचालनालय, शासकीय प्रकाशने विक्री केंद्र, नागपूर यांच्याकडून खरेदी केलेले आहेत आणि ही संस्था शासनाची आहे.

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) :** या प्रस्तावावरील चर्चेसाठी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी 1 तास 45 मिनिटांची वेळ निश्चित करुन दिली होती. अद्याप आणखी काही सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना आणखी किती वेळ लागणार आहे ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती :** या चर्चेसाठी मी आणखी 15 मिनिटांचा वेळ वाढवून देत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, उद्योग संचालनालयाच्या मध्यवर्ती भांडार समितीने दिनांक 10/06/2014 च्या परिपत्रकान्वये त्यांच्या दरकरारावर असलेल्या संस्थांशिवाय इतर कोणत्याही संस्थांकडून केलेली खरेदी ही बेकायदेशीर असल्याबाबतचे परिपत्रक निर्गमित केलेले आहे. सदरचे परिपत्रक देखील मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. उपभोक्ता सहकारी संघ यांना कोणत्याही आदेशान्वये दरकरार करण्यास प्राधिकृत केलेले नाही तरी सुध्दा अशा प्रकारच्या संस्था

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.......

संगणक व इतर बाबींची स्वत: दरकरार करुन अधिकृत दरकरार असल्याचे भासवून विविध शासकीय विभागांना दरकराराच्या प्रती पाठविण्यात येतात व त्यानुसार शासकीय विभागाकडून सदर दरकरारानुसार खरेदी करण्यात येते, ही अतिशय गंभीर बाब आहे, ही अनियमितता आहे. अशा प्रकारच्या अनधिकृत संस्थेने केलेल्या दरकरारावर खरेदी केल्यास ही खरेदी प्रक्रियेतील अनियमितता ठरेल, असेही उद्योग संचालनालयाने सर्व विभागांना कळविण्यात आले आहे. असे असताना सुध्दा त्यांच्याकडून खरेदी करण्यात आलेली आहे. हे सर्व गंभीर आहे, यावर सरकार काही चौकशी करणार आहे का ? या सर्व बाबींची विभागाला जाणीव असताना सुध्दा सन्माननीय मंत्री महोदयांनी 15 रुपयांचे फोटो 1395 रुपयांना राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ यांच्याकडून खरेदी केलेले आहेत. हा उपभोक्ता सहकारी संघ अनधिकृत आहे, हे मी या ठिकाणी जबाबदारीपूर्वक सांगतो व त्याचे पुरावे देखील माझ्याकडे आहेत. अनधिकृत उपभोक्ता संघाकडून हे फोटो प्रति नग 1395 रुपयांना खरेदी करयास भाग पाडलेले आहे. प्रत्येक जिल्हा परिषदेला हे फोटो घेण्यास सांगितले आहे. राष्ट्रपुरुषांचे फोटो 1395 रुपयांप्रमाणे राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघाकडून घ्या, असा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे.

सभापती महोदय, अर्ली रिडर बुकची खरेदी 94 कोटी रुपयांची आहे. जो निर्णय झालेला आहे तो कोटेशनवर झालेला आहे. केंद्रीय दक्षता आयोगाने दिनांक 11 डिसेंबर, 2012 रोजी निर्गमित केलेल्या निदेशानुसार एकेरी निविदा पध्दतीने देशाच्या कोणत्याही राज्यामध्ये खरेदी करण्यात येऊ नये, असा निर्णय झालेला असताना या ठिकाणी मात्र अर्ली रिडर बुकची खरेदी कोटेशनवर का करण्यात आली ? ही या सरकारची पारदर्शकता आहे ? याला बालिशपणा म्हणावे की काय, याचेही उत्तरही मंत्री महोदयांनी द्यावे.

सभापती महोदय, वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या घोटाळ्यांच्या बातम्यांवरुन केंद्र शासनाने मंत्री महोदयांच्या विभागाचा खुलासा मागविला. केंद्र सरकारला विभागाने सादर केलेल्या खुलाशावरुन केंद्र सरकारने राज्य शासनाला दिनांक 4/11/2015 रोजी पत्र लिहून या दोन्ही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

खरेदीमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचे ताशेरे ओढून विभागाने सादर केलेला खुलासा संपूर्णपणे

...4....



श्री.धनंजय मुंडे......

अमान्य केला. म्हणजे शिक्षण विभागाने केंद्र सरकारकडे पाठविलेला खुलासा केंद्र सरकारने अमान्य केला. या पत्रात नमूद केलेल्या बाबी अतिशय गंभीर स्वरुपाच्या असून राज्यकर्त्यांच्या भ्रष्ट वर्तनाचे व वृत्तीचे दर्शन घडविणारे आहे. केंद्र सरकारचे हे पत्र मी या ठिकाणी आपल्याला देतो.

सभापती महोदय, उद्योग विभागाचे एक परिपत्रक आहे. या परिपत्रकात असे नमूद केले आहे की, "या व्यतिरिक्त इतर संस्था उदाहरणार्थ केंद्रीय भंडार, लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, महाराष्ट्र राज्य उपभोक्ता महासंघ मर्यादित, एनएसआयसी, या सारख्या संस्थांना शासनाच्या वतीने दरकरार करण्यास कोणत्याही आदेशान्वये प्राधिकृत करण्यात आलेले नाही. तरी सुध्दा अशा प्रकारच्या संस्था संगणक आणि इतर काही बाबींची स्वतः दरकरार करुन अधिकृत असल्याचे भासवून.... अशा प्रकारच्या प्राधिकृत संस्थांनी केलेल्या दरकरारावर खरेदी केल्यास ती खरेदी प्रक्रियेतील अनियमितता होईल. तरी सर्व कार्यालय विभाग प्रमुख, खरेदी अधिकारी यांनी उचित काळजी घ्यावी." उद्योग विभागाचे दर कराराच्या संदर्भातील हे पत्र आहे. हे सन 2014 मधील पत्र आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने जे ताशेरे ओढले आहेत त्या पत्रातील शेवटची ओळ मी आपल्याला वाचून दाखवितो. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, "..On the basis of above facts, it is clear that Maharashtra Government has procured the photograph of National Heroes from the unspend balance and also made additional procurement of Early Reader Books in the manner which is not in confirmity with the stipulated procedure and guidline, as no expenditure can be incurred by any activity without the prior sanction of PAP nor can funds sanctioned for specific acitivity be diverted, utilised for any other activity. Under the circumstances this expenditure on purchase of Textbooks, Early Reader Books, Potraits cannot be made from SSA funds released by this Ministry."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

....L-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.......

यापूर्वी आणि आता सुद्धा मुख्यमंत्री महोदय सांगतात की, सिद्ध गुन्हेगार, हा सिद्ध गुन्हेगाराचा पुरावा आहे. हा पुरावा दिल्यानंतर सुद्धा माननीय शिक्षण मंत्र्यांना त्या विभागाचे मंत्री म्हणून राहावेसे वाटत असेल तर त्या सारखा लाजिरवाणा प्रकार कोणाच्या जीवनात येऊ नये. मी ही कागदपत्रे आपल्याकडे देतो. तसेच, अर्लिरिडर बुकची खरेदी सुद्धा निव्वळ महाराष्ट्राच्या राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेने शिफारस केली म्हणून वैध ठरत नाही. कारण, सर्वशिक्षा अभियानांतर्गत मंजूर आराखड्याच्या व्यतिरिक्त कोणत्याही अतिरिक्त खर्चास प्रोजेक्ट ॲप्रुव्हल बोर्डाची मान्यता लागते. ते बोर्ड केंद्र शासनाचे आहे. खरे तर सर्वशिक्षा अभियानांतर्गत सर्व पुस्तकांची खरेदी वैध प्रक्रियेद्वारे करण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. टेक्सबुक कॉर्पोरेशन व्यतिरिक्त इतर कोणत्याही संस्थेकडून ऐकेरी निविदा पद्धतीने पुस्तकांची खरेदी करणे, हे सर्वशिक्षा अभियानाच्या गाईड लाईन्सचे उल्लंघन आहे आणि ऐकेरी निविदा पद्धतीने खरेदीची मर्यादा 6 कोटी रुपयांच्या आतील आहे. असे असताना 94 कोटी रुपयांची खरेदी ऐकेरी निविदा प्रक्रियेने करण्यात आली. मग हा सिद्ध गुन्हा नाही. तुम्हाला अधिकार फक्त 6 कोटी रुपयांचे आहेत. परंतु, 94 कोटी रुपयांच्या खरेदीच्या बाबतीत हिम्मत आणि बालिशपणा मंत्री महोदयांनी केलेला आहे. आणखी बरेच विषय आहेत. या संदर्भातील संपूर्ण विषय मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. उठसूट अर्धवट माहितीच्या आधारे शासन निर्णय काढून ते सभागृहात फडकविण्याची घाई मंत्री महोदयांना असते. इतर मंत्री महोदयांच्या विभागात देखील त्यांना उत्तर देण्याची घाई असते. मंत्री महोदयांनी अग्निशामक यंत्राच्या संदर्भातील फाईल त्यांच्या उत्तराच्या भाषणाच्या अगोदर सभागृहाच्या पटलावर ठेवावी. त्या प्रकरणात देखील दूध का दूध और पानी का पानी हे कळेल.

सभापती महोदय, ऊर्जा विभागाच्या संदर्भात मी बोलणार आहे. मागील हिवाळी अधिवेशनात सोलर पंपाच्या बाबतीत घोषणा करण्यात आली आणि त्याचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यात आला. आम्हीशेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर 5 लाख सोलर पंप देणार आहेत, असे सांगण्यात आले. या आश्वासनाची कितपत पूर्तता झाली, याचे मी अवलोकन करीत होतो, अंदाज घेत होतो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.......

5 लाख सोलर पंप तर सोडून द्यावेत. परंतु, 1 लाख सोलर पंप देखील मागील एका वर्षात बसविण्यात आले नाहीत. मागील एका वर्षात 5 ते 10 हजार सोलर पंप बसविण्यात आले किंवा त्याची प्रक्रिया सुरु झाली आणि त्या 5 ते 10 हजार सोलर पंपात देखील गैरव्यवहार व्हावा ? अरे सोलर पंपात गैरव्यवहार ? (...अडथळा...) माननीय श्री.महाजन साहेब मी बिलो, अबाऊ हे सर्व आपल्याला दाखवितो. खरे तर हे सरकार शेतकऱ्यांचे नाही, हे सरकार फक्त व्यापाऱ्यांचे आणि सावकारांचे आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

सभापती महोदय, राज्यातील महावितरण कंपनीमार्फत शेतकऱ्यांना विविध क्षमतेचे सौर ऊर्जेवर आधारीत कृषी पंप पुरविण्यासाठी जुलै, 2015 मध्ये निविदा प्रसिद्ध केरण्यात आल्या होत्या. या निविदा प्रक्रियेत जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड ही कंपनी पात्र झाली. मात्र आलेले दर हे गुजरात राज्यातील आणि आपल्या राज्यातील बाजार भावापेक्षा प्रत्येक कॅटॅगरीत 1 लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याचे निष्पन्न झाले, ते मी आपल्याला सांगतो. (...अडथळा...) आपण त्या खात्याचे मंत्री आहात काय ? आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. 5 अश्वशक्तीचा पंप गुजरात राज्यात 3 लाख 50 हजार रुपयांना मिळतो आणि महाराष्ट्रात तो पंप 5 लाख 40 हजार रुपयांना मिळतो. महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात असलेल्या सौर पंपाच्या किंमतीतील फरक मी वाचून दाखवितो. तुम्ही मान्य केलेल्या टेंडरमधील हा फरक आहे, गुजरात राज्याने मान्य केलेल्या टेंडरमधील हा फरक आहे. महाराष्ट्रात 3 एच.पी. (डी.सी.) च्या एका पंपाची किंमत 3,87,700/- रुपये ते 4,05,000/- रुपयांपर्यंत आहे. गुजरात राज्यात याच पंपाची किंमत जी टेंडरमध्ये फायनल केलेली आहे ती 2,52,000/- रुपये आहे. महाराष्ट्रात 5 एच.पी. (डी.सी.) च्या एका पंपाची किंमत 5,41,000/- रुपये आहे आणि गुजरात राज्यात ती 3,35,000/- रुपये आहे. 3 एच.पी.च्या एका पंपामध्ये 2,30,000/- रुपयांचा फरक आहे आणि 5 एच.पी.च्या पंपामध्ये 2,55,000/- रुपयांचा फरक आहे. याला टेंडर म्हणतात काय ? म्हणजे महाराष्ट्र शासनाने प्रत्येक कॅटॅगरीत प्रती पंप 1 ते 2 लाख रुपये जादा रक्कम दिलेली आहे. महाराष्ट्र शासन सर्व प्रकारचे एकूण 10 हजार पंप

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.......

खरेदी करणार आहे. इतर राज्यांपेक्षा जास्तीचे दर देण्याचे कारण म्हणून ऊर्जा विभागाने केलेला खुलासा खोटारडेपणाचा आहे. वर्तमानपत्रात या संदर्भात बातमी छापून आल्यानंतर ऊर्जा विभागाने याबाबत खुलासा केलेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात तो खुलासा देखील वाचून दाखवावा. मंत्री महोदयांनी खुलासा वाचून दाखविण्यापूर्वी मी तो खुलासा वाचून दाखवितो. माननीय श्री.महाजन साहेब मी आपल्याला टेंडर संदर्भातील माहिती देतो. आपण त्या खात्याचे मंत्री नसल्यामुळे कदाचित आपल्याला हे माहीत नसेल. ऊर्जा विभागाने असे म्हटले आहे की, यात प्रामुख्याने 60 टक्के पेमेंट पंप बसविल्यावर देऊन 40 टक्के पेमेंट 1.5 टक्का त्रैमासिक या पद्धतीने 30 टक्के 5 वर्षात व उर्वरीत 10 टक्के 5 वर्षानंतर अशा प्रकारचे पेमेंट शेड्युल असल्यामुळे दर जास्त आहेत व गुजरात राज्य शंभर टक्के पेमेंट पंप बसविल्यानंतरच देणार आहे. म्हणून दर वाढले आहेत, असा खुलासा मंत्री महोदयांनी केलेला आहे. परंतु, वस्तुस्थिती काय आहे ? सदरचा दावा फसवा आहे. आपण 3 एच.पी. (डी.सी.) पंपासाठी गुजरात राज्यापेक्षा 1,35,700/- रुपये जास्तीचे देत आहोत. म्हणजेच 3,87,700/- रुपये, म्हणजे आपण 60 टक्क्यांनी देणार आहोत, असे तुमचे म्हणणे आहे. मग 60 टक्क्यांनी देत असताना आपण 2,32,000/- रुपये तर अगोदरच देत आहोत. यामध्ये सुद्धा जगलरी. आपण जगलरीतून बाहेर यावे. ही जगलरी करीत आपण 15 वर्षानंतर सत्तेत आलेला आहात आणि एका वर्षाच्या आत तुमची संपूर्ण जगलरी उघडी पडत आहे, याचा विचार करावा. जनाची नाही तर मनाची तरी थोडी वाटू द्यावी. शेतकरी आत्महत्या करतो. तुम्ही एकीकडे सौर पंपाची योजना जाहीर करता आणि तुम्ही गुजरात राज्यातील दरापेक्षा 1.5 लाख रुपये जास्त दराने पंप खरेदी करता, याचे तुम्हाला काही वाटत नाही ? म्हणजे गुजरात राज्यात शंभर टक्के पेमेंट करुन आपल्या 60 टक्क्यांपेक्षा म्हणजे फक्त 20 हजार रुपये जास्त, एवढाच फरक आहे ? य संदर्भातील दुसरा खुलासा काय आहे ? महाराष्ट्रात सौर पंप योजनेत सर्व्हिस सेंटर उभारण्याची तरतूद आहे. प्रत्येक 500 सौर पंपामागे एक सर्व्हिस सेंटर उभारण्याची तरतूद आहे. अशी तरतूद गुजरात राज्याच्या निविदेत नाही, असे मंत्री

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.......

महोदयांनी खुलाशात सांगितले आहे. मी आपल्याला वस्तुस्थिती सांगतो. मी दोन्ही निविदा बघितलेल्या आहेत. दोन्ही राज्याच्या निविदेत सौर पंप बसविल्यानंतर 5 वर्षे देखभाल दुरूस्तीची जबाबदारी ठेकेदारावर आहे. त्यासाठी ठेकेदाराने कोणती व्यवस्था करावयाची याची आर्थिक जबाबदारी सरकारने का घ्यावी ? मग तुम्ही ठेकेदाराचा फायदा करता हे लक्षात येत नाही ? 5 वर्षे पंप दुरूस्त करण्याची, त्याचा मेंटेनन्स करण्याची जबाबदारी ठेकेदाराची असताना राज्याच्या निविदेत मात्र ठेकेदाराची काळजी घेण्यात आली आहे. 5 वर्षे ठेकेदाराने करावयाच्या देखभाल दुरूस्तीपोटी, उभारावयाच्या यंत्रणेपोटी महाराष्ट्राच्या खजिन्यातून प्रती पंप 1.5 लाख रूपये देणे, ही तुम्ही कोणाची दिशाभूल करता ? म्हणजे 60 टक्क्यात गुजरात राज्यातील किंमती एवढी किंमत अगोदरच द्यायची आणि राहिलेले त्रैमासिक देतो म्हणून 1.5 लाख रूपयांची किंमत वाढवून ती कशासाठी वाढविण्यात येत आहे, तर 5 वर्षे मेन्टेनन्स करण्यासाठी वाढविण्यात येत आहे....

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

..M-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यापेक्षा दीड लाख रुपये कमी किंमत घेऊन गुजरात मधील ठेकेदार पाच वर्षे देखभाल दुरुस्तीचे काम करणार आहे. त्यापेक्षा कमी सुरक्षा व्यवस्था म्हणून एकूण निविदा रकमेच्या (..अडथळा..) सभापती महोदय, मला संरक्षण द्या. जगलेरी कशी आहे ते पहा, गुजरातच्या निविदेमध्ये कंत्राटदाराने एखाद्या सौर पंपाबाबत फसविले तर 20 टक्के बँक गॅरंटी घेण्याचा निर्णय केलेला आहे. आपल्या राज्याच्या टेंडरमध्ये 20 टक्के बँक गॅरंटी घेण्याची तरतूद करण्यात आली नाही. महाराष्ट्रातील पंपावर ऑनलाईन रिमोट मॉनेटरिंग सिस्टीम लावण्याची तरतूद असून त्याद्वारे महावितरणचे नियंत्रण अशा सौर पंपावर राहील व त्या कंपनीला संपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे. त्याकरिता अतिरिक्त किंमत लावण्याचा खुलासा मंत्री महोदयांनी केला आहे. गुजरात सरकारच्या निविदेत देखील या तंत्रज्ञानाचा अंतर्भाव आहे, निव्वळ हे तंत्रज्ञात कार्यान्वित करण्यासाठी प्रतिपंप दीड लाख रुपये पुन्हा देण्याची काय गरज होती. महाराष्ट्रातील निविदेमध्ये कार्यक्षमता चाचणीची तरतूद असून प्रत्यक्ष विदर्भातील पाच जिल्ह्यातील विहीरीवर कार्यक्षमता चाचणी पास झालेल्या निविदाकारांची निविदा उघडण्यात आल्या आहेत ही तरतूद गुजरात निविदेत नव्हती असा खुलासा मंत्री महोदयांनी केला आहे. निविदा प्रक्रियेत नमूद केलल्या टेक्निकल स्पेसिफिकेशनचे व कार्यक्षमतेचे पंप पुरविण्याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची असते, असे पंप क्षमता तपासणी केल्याशिवाय पुरवठा आदेश देण्यात येत नाहीत. एल ॲन्ड टी च्या बाबतीत मीटर खरेदी करण्याचा निर्णय ऊर्जा विभागाने केला होता. निविदा फायनल झाली होती. त्यानंतर मीटर घेण्यात आले. मीटर घेण्याअगोदर ते तीन वेगवेगळ्या लॅबकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यातील काही मीटर नापास झालेत. ती ऑर्डर रद्द झाली, परंतु या बाबतीत असे झाले नाही, यापूर्वी देखील अनेक प्रकरणात कार्यक्षमता चाचणीत उत्पादन पास न होऊ शकल्यास पात्र ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आले नाहीत. हे एल ॲन्ड टी च्या उदाहरणावरुन मी सांगत आहे.

मंत्री महोदयांनी पाचवा खुलासा असा केला की, महाराष्ट्राच्या निविदेमध्ये पाच वर्षाची दुरुस्ती व देखरेखीच्या कार्यकाळात मापदंडानुसार सेवा न दिल्यास दंडाची तरतूद आहे. तक्रार

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

प्राप्त झाल्यानंतर 48 तासाच्या आत दखल न घेतल्यास तिसऱ्या दिवशी 500 रूपये प्रतिदिन दंड व त्यानंतर प्रतिदिन एक हजार रूपये तक्रारीचे निवारण होईपर्यंत दंड आकारण्याची तरतूद आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, गुजरातच्या निविदेमध्ये पाच वर्षाच्या कार्यकाळात देखभाल व दुरूस्तीची तरतूद आहे, तशी सेवा मिळण्याची हमी असावी व सेवा न मिळाल्यास ठेकेदारास दंड करता यावा यासाठी ठेकेदाराकडून प्रति सौर पंपाच्या किंमतीच्या रकमेपैकी 20 टक्के बँक गॅरंटी घेतली आहे. याचाच अर्थ या पाच ते दहा हजार पंपामध्ये ऊर्जा विभागाकडून 200 कोटी रूपयांचा घोटाळा झालेला आहे. या सरकारने काहीच सोडले नाही, चिक्की सोडली नाही, महापुरूषांचे फोटो सोडले नाहीत, दाळ सोडली नाही, शेतकऱ्यांचे पंप सोडले नाहीत, शेतकऱ्यांच्या मडावरील लोणी खाण्यासारखा हा प्रकार आहे. याची चौकशी झाली पाहिजे व याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा केला पाहिजे.

सभापती महोदय, मी आदिवासी विकास विभागाच्या बाबतीत बोलणार आहे. आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांकडे पाहिल्यानंतर असे होऊ शकते, याबाबत विश्वास बसत नाही. आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी विद्यार्थ्याकरिता मॅट्रोकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेतून आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यासंबंधी स्वयंस्पष्ट निर्णय शासनाने घेतले आहेत, त्या निर्णयाची प्रत मी आपणाकडे देतो. शिष्यवृत्तीची सर्व देणी ऑनलाईन पध्दतीने देण्याचे आदेश निर्ममित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयाला मंत्री महोदयांच्या आशीर्वादाने हरताळ फासली आहे. मी या सर्व बाबी पुराव्यानिशी सांगत आहे.

सभापती महोदय, याबाबत माझ्याकडे कागदपत्रे आहेत, त्यात ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्तीचे वाटप करणे, शिष्यवृत्तीच्या रकमा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा न करता संस्थेच्या नावावर परस्पर जमा करण्यात आल्या आहेत. अस्तित्वात नसलेल्या महाविद्यालयांना शिष्यवृत्या मंजूर करणे, शिष्यवृत्ती दिलेला विद्यार्थी हा अनुसूचित जमातीचा आहे किंवा नाही याची खात्री न करता शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. एकच विद्यार्थी अनेक

...3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

ठिकाणी दर्शवून त्याची शिष्यवृत्तीची रक्कम संस्थांना वाटप करण्यात आली आहे. व्यवस्थापन कोट्यातून भरलेल्या अभ्यासक्रमाच्या देखील शिष्यवृत्तीची रक्कम वाटप करण्यात आली आहे. अशी असंख्य उदाहरणे आहेत. यातून आदिवासी विकास विभागाने मॅट्रोकोत्तर शिष्यवृत्तीच्या रकमेत प्रचंड मोठा घोटाळा केलेला आहे. मी या ठिकाणी फक्त एका प्रकल्पाचे उदाहरण देणार आहे, यावरुन घोटाळ्याची व्याप्ती लक्षात येणार आहे.

सभापती महोदय, अतिरिक्त आदिवासी आयुक्त नाशिक व जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोदा, जिल्हा नंदूरबार या प्रकल्पाची चौकशी केली असता अस्तित्वात नसलेले बोगस रेकॉर्ड तयार करुन सन 2010-2011 पासून 2014-2015 पर्यंतच्या शिष्यवृत्तीच्या एकत्रित रकमा दिल्या नाहीत. या चार वर्षाच्या एकत्रित रकमा थेट संस्थेच्या खात्यात 2015 मध्ये जमा करण्यात आल्या आहेत. या एका प्रकल्पात 25 ते 30 कोटी रुपयांचा अपहार झालेला आहे. हा अहवाल आदिवासी आयुक्त नाशिक व जिल्हाधिकारी नंदूरबार यांच्याकडून आलेला आहे. हा अहवाल मंत्री महोदयांकडे आहे. त्या अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे की, त्या ठिकाणी विद्यार्थी नाहीत. त्या गावात त्यासंदर्भातील शिक्षण देखील मिळालेले नाही. त्या गावातील ग्रामपंचायतीने ठराव दिले आहेत की, असे कोणतेही कॉलेज आमच्याकडे नाही, किंवा असे कोणतेही शिक्षण या भागात देण्यात आले नाही. तरी देखील त्या गावातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात आली आहे.

सन 2010-2011 पासून हा प्रकार सुरु आहे म्हणजे तुम्ही म्हणाल की, तुमच्या काळातील आहे, या शिवाय दुसरे भांडवल आता सत्ताधाऱ्याकडे शिल्लक राहिले नाही. या चार वर्षातील एकत्रित देयके मंत्री महोदयांच्या आशीर्वादाने अदा झाली आहेत. बीड जिल्ह्यातील आष्टी येथील श्री. तुळजाभवानी या संस्थने विद्यार्थ्यांचे व स्वामी समर्थ सामाजिक बहुउद्देशीय विकास संस्था सिंदखेडा, जिल्हा धुळे या दोन संस्थांची ही सर्व कारनामे आहेत, या दोन संस्थांनी नोव्हेंबर, 2014 ते जून 2015 या कालावधीत सन 2010-2011 पासून शिष्यवृत्तीची रक्कम प्रलंबित आहे असे दाखवून प्रकल्प अधिकारी तळोदा यांच्याकडून कोट्यवधी रुपयांच्या

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

रकमा त्यांच्या खात्यात जमा करुन घेतल्या आहेत, आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे स्वयंस्पष्ट आदेश निर्ममित केले आहे. असे असताना या रकमा आदिवासी विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा न करता संस्थेच्या खात्यावर जाणीवपूर्वक वर्ग करण्यात आल्या आहेत. ज्या संस्थेची मी नावे घेतली, तक्रारी केल्या या संस्थेची चौकशी चालू होती, ही चौकशी चालू झाल्यानंतर त्या ठिकाणी पुन्हा गैरप्रकार झाला म्हणून ती चौकशी पुन्हा एकदा सुरु करावी अशा तक्रारी लोकांनी केल्या होत्या. तुळजाभवानी महिला मंडळ ही संस्था आष्टीची आहे. यासंदर्भातील चौकशी लागल्यानंतर त्या संस्थेचे अध्यक्ष दळवी नावाचे ग्रहस्थ आहेत, पुन्हा चौकशी होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी नंदूरबार यांना मंत्री महोदयांनी पत्र दिले आहे त्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे, दोन वेळा चौकशी झालेली असल्यामुळे फेर चौकशीस स्थगिती देण्यात येत आहे. मंत्री महोदय आपल्या सहीचे एन्डॉर्समेंट आहे. हा विषय एवढ्यावर थांबलेला नाही. श्री.दळवी हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत, एका प्रकल्पाचा 40 कोटी रूपयांचा भ्रष्टाचार मी उघडकीस केला आहे, दळवी व मंत्री महोदयांचे काय संबंध आहेत, यासंदर्भातील फोटो माझ्याकडे आहेत, या फोटोमध्ये श्री.दळवी हे मंत्री महोदयांना सोन्याची मुर्ती असलेला गणपती देत आहेत. यामध्ये आणखी खोलवर जावयाचे असेल तर हा गणपती मी तुमच्याकडे दाखवून देतो. या गणपतीची पावती दळवी यांच्या नावे आहे ते मी आणून दाखवितो. याचा अर्थ काय होतो, या गणपतीच्या मुर्तीची किंमत कमीत कमी 7 लाख रूपये इतकी आहे.

...N-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

हा फोटो मी आपल्याकडे पाठवितो. 15 वर्षात सत्ता नाही म्हणून अशा पध्दतीने काम करायचे? जत्रेत ज्याप्रमाणे रेवड्या वाटतात त्या पध्दतीने चालले आहे. सभापती महोदय, शेती महामंडळाच्या जमिनीबाबत सुध्दा चौकशी होणे आवश्यक आहे. चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत सर्व संबंधित मंत्री महोदयांनी आपल्या पदाचा त्याग केला पाहिजे. श्री.अडवाणी यांचा आदर्श समोर ठेवा. त्यांच्यावर ज्यावेळी आरोप झाले त्या आरोपातून बाहेर येईपर्यंत ते सभागृहात सुध्दा गेले नाहीत. हाच आदर्श तुम्ही ठेवा.

सभापती महोदय, आज महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडे 46 हजार एकर जमीन आहे. 1963 मध्ये या महामंडळाच्या ताब्यात 85 हजार एकर जमीन होती. 1978 मध्ये 15 हजार एकर जमीन मूळ मालकांना म्हणजे खंडकरी शेतकऱ्यांना शासनातर्फे वाटप केली गेली. सध्या शिल्लक जमिनीपैकी 18 हजार खंडकरी शेतकऱ्यांना 24 हजार एकर जमिनीचे वाटप होत आहे, ती प्रक्रिया सुरु आहे. महाराष्ट्रातील 14 मळयांवरील खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनीचे वाटप अपूर्ण आहे. महाराष्ट्रामध्ये जमीन धारणा कायदा आहे. त्या कायद्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, कुठल्याही शेतकऱ्याकडे 54 एकरपेक्षा जास्त जमीन असता कामा नये. असे असताना 500 एकरचे प्लॉट 3000 रुपयांना ई-निविदेद्वारे दिले जात आहेत. या प्लॉटचे भाडे काय आहे? माझ्या बीडसारख्या दुष्काळी जिल्हयात 1 एकर कोरडवाहू जमिनीला वार्षिक 75 हजार रुपये भाडे दिले जाते, ग्रामीण भागातील रुढीनुसार बटईने जमीन दिली तर 1 एकर कोरडवाहू जमिनीसाठी 75 हजार रुपये आणि 1 एकर बागायती जमिनीला वार्षिक 1 लाख रुपये भाडे मिळते. परंतु महामंडळाकडून कमांड एरियामधील जमीन, कॅनॉल शेजारची जमीन वार्षिक 13 हजार रुपये दराने वाटप केली जात आहे. हे जमिनीचे वाटप अद्याप पूर्ण व्हायचे असल्यामुळे ही प्रक्रिया तातडीने स्थगित करुन या प्रकरणाची चौकशी व्हावी अशी मी मागणी करतो. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. सभापती महोदय, प्रती एकर जमीन कमीत कमी 3 लाख रुपये आणि भाड्याने द्यायची असल्यास प्रती वर्षी किमान 13 ते 15 हजार रुपये भाडे मिळाले पाहिजे. या प्रकरणाची चौकशी होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागातील डाळ घोटाळा, शिक्षण विभागातील घोटाळा, आदिवासी विकासाच्या बाबतीत जे पाप झाले त्या शिवाय ऊर्जा विभागातील घोटाळयाबद्दल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N.2

SGB/ MMP/ AKN/ 12:10

श्री.धनंजय मुंडे....

मी बोललो आहे. राज्यामध्ये जमीन धारणेचा कायदा असताना 500-500 एकराचे प्लॉट दिले जातात, हे कायद्याला अनुसरुन आहे का? शेती महामंडळाच्या कामगारांना सुध्दा घरासाठी 2 गुंठे जागा देण्याबाबत निर्णय व्हावा अशी माझी शासनाला विनंती आहे. चौकशी करण्यासंबंधी जो कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्ट आहे त्या अंतर्गत या प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या माननीय न्यायाधीशांमार्फत चौकशी करण्यात यावी. तोपर्यंत सर्व संबंधित मंत्री महोदयांनी राजीनामा द्यावा. यात त्यांचा सहभाग नाही, त्यांच्या विभागाने हे काम केले हे जनतेसमोर येऊ द्या. तुम्ही स्वच्छ आहात हे दाखवून देण्यासाठी तुम्ही मंत्रीपदावरुन बाजूला होऊनच चौकशी झाली पाहिजे. तुम्हाला दुसऱ्यांच्या चौकशीबाबत बोलता येते. माझी मागणी आहे की, कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्ट आहे त्या अंतर्गत या प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या माननीय न्यायाधीशांमार्फत चौकशी करण्यात यावी. तोपर्यंत संबंधित मंत्र्यांनी आपल्या पदाचा त्याग करावा. जनतेने आपल्याला फार अपेक्षेने निवडून दिले आहे. ज्या पध्दतीने एका स्कूटरवर बसण्याची दिल्लीत वेळ आली तशी वेळ तुमच्यावर येऊ नये. उद्या महाराष्ट्राची जनता तुम्हाला 20 सीटर बस घेऊन देईल. तुम्ही जर स्वच्छ असाल तर निश्चितपणे चौकशीला सामोरे जा एवढेच बोलतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, 2012 ला मंत्रालय इमारतीला आग लागली, त्या आगीच्या झळा आज आमच्यावर येऊ लागल्या आहेत. त्या आगीमध्ये रेकॉर्ड जळाले, त्या काळात काही गोष्टी घडल्या, त्याबद्दल आम्ही काही बोललो नाही. रेकॉर्ड जळले की जाळले हा एक प्रश्नाचा भाग होता. आमच्यावर प्रचंड आरोप झाले. जणू काही आम्हीच दोषी आहोत. आम्हाला राज्य करण्याचा अधिकार नाही, अशा प्रकारचे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. 1995 मध्ये माझ्यावर डाळ घोटाळयाचे आरोप झाले. आरोप करीत असताना कोणताही व्यावहारिक विचार केला गेला नाही. त्या काळात केंद्र सरकारच्या एफसीआय या महामंडळाकडून डाळ खरेदी केली गेली होती. त्या महामंडळामध्ये केंद्र सरकारचे 75 टक्के शेअर्स आहेत आणि 25 टक्के शेअर्स महामंडळाकडे आहेत. मी घोटाळा केला असता तर काँग्रेस पक्षाच्या लोकांनी आरडाओरड केली असती. कारण केंद्रामध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार होते व महामंडळामध्ये 75 टक्के शेअर्स केंद्र सरकारचे असल्यामुळे ते महामंडळ केंद्र सरकारच्या ताब्यात होते. परंतु आरोप करायचे आणि बदनामी करुन वातावरण निर्माण करणे हीच यांची संस्कृती आहे. त्या वेळेला मी पहिली मंत्री होते, जिने न्यायालयीन चौकशी लावून घेतली. न्यायाधीशांनी केलेल्या चौकशीमधून मी भ्रष्टाचारात सामील नसल्यामुळे मला क्लीन चीट देण्यात आली होती. युती सरकारच्या काळात माझ्यावर आरोप झाले तेवढे यांना दिसले. परंतु युती सरकारने 5 वर्षे राज्य चालविले तरी कोणावर आरोप झाले नाहीत. आरोप करताना सुध्दा विचार करण्याची आवश्यकता असते, असे माझे स्पष्ट मत आहे.

सभापती महोदय, आघाडी सरकारच्या काळात पाटबंधारे विभागात झालेल्या घोटाळयाची न्यायालयीन चौकशी झाली नाही. 2005 ते 2010 या काळात समाजकल्याण विभागात शिष्यवृत्तीच्या माध्यमातून 5 ते 10 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला, त्याची चौकशी करण्यात आली नाही. वन विभागातील घोटाळयाची चौकशी झाली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागातील घोटाळयाची चौकशी झाली नाही. राधा सुता तेव्हा कुठे गेला होता तूझा धर्म. आज आम्ही तुम्हाला हेच विचारीत आहोत. करुन करुन भागले आणि आता देवपूजेला लागले, ही तुमची वृत्ती असेल तर विचार करण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) :** सभागृहाची विशेष बैठक आता 15 मिनिटांकरिता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.35 वाजता सुरु होईल. माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस या प्रस्तावावरील चर्चेत ऑन लेग राहतील.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.20 ते 12.35 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

..ओ.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**<u>ता.प्र.क्र.12511</u>**

(श्री.दिलीप कांबळे, श्री.राजकुमार बडोले यांच्याकरिता)

**(प्रेस : येथे राखून ठेवलेला ता.प्र.क्र.12511 छापावा.)**

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** आता दिनांक 15 डिसेंबर 2015 रोजी राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.12511 घेण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, "स्मार्ट दलित वस्ती अशा प्रकारची कुठलीही योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला नाही. तथापि, दिनांक 9.10.2015 च्या शासन निर्णयाद्वारे निवडक दलित वस्त्यांच्या सर्वंकष विकासासाठी योजना तयार करून कार्यान्वित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे." यातून नक्की काहीही स्पष्ट होत नाही. आता स्मार्ट या शब्दालाच अतिशय महत्त्व प्राप्त व्हायला लागले आहे. त्यामुळे प्रत्येकाला स्मार्ट व्हायची घाई झाली आहे. आपल्याला हा शब्द काढून टाकायचा असेल तर तो आपण काढून टाकावा. पण ही नक्की योजना काय आहे, कशासाठी आपण ही योजना घेतली आहे, त्यातून काय बदल होणे अपेक्षित आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्यावतीने आजही ग्रामीण भागातील दलित वस्ती विकासासाठी निधी दिला जातो. यंदाचे वर्षे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे 125 वे जयंती वर्ष आहे. याचे औचित्य साधून शासनाने नवीन योजना राबविण्याचा संकल्प आखलेला आहे. उदा. 50 मुलींसाठी वसतिगृह, बार्टीचा विस्तार त्याच बरोबर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील किमान एका दलित वस्तीचा विकास करण्यात येणार आहे. आज दलित वस्तीच्या विकासासाठी निधी दिला जातो. या वर्षी समजा एका दलित वस्तीला निधी दिला की, त्या वस्तीला पुन्हा पाच वर्षांने विकासासाठी निधी दिला जातो. स्वातंत्र्याच्या 50-60 वर्षानंतर सुद्धा आजही ग्रामीण भागातील दलित वस्तीमध्ये पिण्याचे पाणी नसेल, लाईट नसेल, रस्ता नसेल, सार्वजनिक स्वच्छतेची व्यवस्था नसेल तर ती त्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे. यासाठीच प्रत्येक जिल्ह्यातील एक मोठी दलित वस्ती निवडून त्याचा एकाच वेळी संपूर्ण विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे यास आम्ही स्मार्ट दलित वस्ती असे नाव दिले आहे.

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12511.......

श्री.दिलीप कांबळे....

यावर्षी एखादे काम केल्यानंतर पुन्हा पाच वर्षे वाट बघायची या ऐवजी त्या गावातील दलित वस्तीचा पिण्याचे पाणी, रस्ता, ड्रनेज लाईन, बौद्धविहार, अभ्यासिका, इत्यादी सुविधा पुरवून सर्वांगीण विकास करण्याचा विचार आम्ही केलेला आहे. त्यासाठी या वर्षी 20 कोटी रूपयांची तरतूद आम्ही केलेली आहे. साधारणतः 35 ते 40 गावांचा विकास या योजने अंतर्गत आम्ही करणार आहोत. त्यामुळे यावर कोणीही आक्षेप घेण्याचे कारण नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी या योजनेकडे फार मोघमपणे बघू नये. आपण अतिशय चांगला उपक्रम हातामध्ये घेण्याचा प्रयत्न करीत आहात. आता आपण सांगितले की, या वर्षासाठी आपण 20 कोटी रूपये इतका निधी उपलब्ध करून दिलेला आहे. साधारणपणे गावातील स्मार्ट नसलेल्या 40 दलितवस्त्या आपण सर्वांगीण विकासासाठी घेणार आहात. या 40 दलितवस्तींसाठी आपण 20 कोटी रूपये वाटणार आहात म्हणजे एका दलित वस्तीच्या वाट्याला किती निधी आला, त्या निधीतून आपण नेमकी कोणती कामे करणार आहात ?

P-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

यासाठी बाकीच्या आस्थापना आहेत त्यांचीही दलित वस्ती सुधारणेच्या संदर्भात जबाबदारी आहे. कामे होत असताना या वस्तीमध्ये आपण गुणात्मक बदल कोणते करणार आहात ? या वस्त्यांमध्ये अभ्यासवर्ग, वाचनालय, त्या ठिकाणी कायमस्वरुपी शिक्षक जाऊन विद्यार्थ्यांना शिकवेल अशा प्रकारचा समावेश या योजनेमध्ये करण्यात येणार आहे काय ? आता नवीन टेक्नॉलॉजी येत आहे त्यामुळे या दलित वस्त्या तुम्ही वाय-फायने जोडणार आहात काय, त्यांना नवीन ज्ञानाने समृध्द करणार काय ? या अगोदर जे चालले होते म्हणजे रस्ते, शौचालय, वीज, पाणी एवढयापुरते तुमचा कार्यक्रम सीमिती असेल तर या दलित वस्त्या स्मार्ट कशा होणार? स्मार्ट दलित वस्तीच्या संदर्भात आपण कशी योजना तयार केलेली आहे ? स्मार्ट दलित वस्त्यांसाठी फार कमी निधीची तरतूद केलेली आहे. आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने प्रकल्प करीत आहोत. आपण पूर्वीसारखेच काम केले तर या योजनेत अपूर्णत: राहून जाईल व पुढील 5 वर्षे काय परंतु पुढील 25 वर्षात हे काम होणार नाही. त्यामुळे यासाठी आपण काय करणार आहात ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी या ठिकाणी चांगला प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी विचारले आहे की, 40 वस्त्या निवडणार आणि त्यासाठी 20 कोटी रुपये खर्च करणार. परंतु 20 कोटीची तरतूद ही या वर्षाकरिता आहे. साधारणत: गावाचा आरखडा तयार केल्यानंतर त्या गावासाठी जेवढा निधी लागणार आहे तेवढा निधी शासन देणार आहे. जी गावे निवडली जातील त्या गावात अत्याधुनिक सुविधा असलेली अभ्यासिका निर्माण करणार आहोत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, स्मार्ट दलित वस्तीच्या संदर्भात मुळात मुद्दा असा आहे की, निधीबरोबर त्या गावात लोकांचे एकमेकांशी असलेले संबंध अधिक सलोख्याचे कसे होतील यासाठी दलित व दलितेतर समाजामध्ये आतापर्यंत महाराष्ट्रात खूप प्रयत्न झाले आहेत. ज्यावेळी आपण अशी एखादी योजना करतो त्यावेळी माझा पहिला प्रश्न कार्यपध्दतीच्या संदर्भात आहे. ज्यावेळी सन्माननीय श्री.अण्णा हजारे यांची गाव संकल्पना पुढे आली त्यामध्ये त्यांनी कुऱ्हाड बंदी, नशा बंदी, चारा बंदी, महिलांवरील अत्याचार बंदी असे निकष लावले होते. त्यामुळे स्मार्ट दलित वस्तीच्या संदर्भात कोणते निकष लावले जाणार आहेत ? या विषयात काम करीत असलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:12511.....

डॉ.नीलम गोऱ्हे...

लोकप्रतिनिधी असतील, अधिकारी किंवा कार्यकर्ते असतील त्यांना यामध्ये विश्वासात का घेतले जात नाही असा माझा प्रश्न आहे. हे सर्व घेण्यासाठी तुम्ही कोणती उपाययोजना केली आहे ? एका जिल्हयात स्मार्ट दलित वस्ती राहणार परंतु बाकीच्या गावातील दलित वस्ती स्मार्ट करण्यासाठी किती वर्षाचा कालावधी अपेक्षित केलेला आहे ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. दलित वस्तीचा विकास करीत असताना सुवर्ण आणि दलितांमध्ये दरी वाढणार नाही यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. बार्टीच्या माध्यमातून गावागावामध्ये आम्ही समतादूत निर्माण केले असून त्यांच्या माध्यमातून गावातील वातावरण चांगले राहण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय श्री. अण्णा हजारे यांनी गावाच्या संदर्भात जे निष्कर्ष लावले आहेत त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यांनी अजून एक मुद्दा उपस्थित केला आहे की, या सदनाचे किंवा विधानसभेचे सदस्य किंवा गावातील ज्येष्ठ नागरीक आहेत त्यांची स्मार्ट दलित वस्तीच्या संदर्भात मदत घेणार काय ? होय. या संदनातील सन्माननीय सदस्य ,विधानसभेचे सन्माननीय सदस्य तसेच खासदार तसेच गावात शांतता नांदावी, गावाचा विकास व्हावा अशा तळमळतेने काम करणाऱ्या सर्व सामाजिक कार्यकर्त्यांची आम्ही गावागावामध्ये मदत घेणार आहोत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, स्मार्ट दलित वस्तीसाठी सुरुवातीला 40 गावांची निवड केली जाणार आहे असे माननीय मंत्री महोदयांनी आता माहिती दिली आहे. त्यामुळे गावांची निवड करण्याचे निकष काही तरी ठरलेले असतील. खरे म्हणजे या विषयाचा मसुदा तयार नाही. दलित वस्तीमध्ये कोणकोणती कामे केली जाणार आहेतही यासंदर्भात सुध्दा कोणताही मसुदा तयार नाही. स्वातंत्र्य पूर्व काळापासून मी तुमच्या गावाचा रस्ता तयार करुन देईल, पाणी पुरवठयाची सोय करुन देईल असे आश्वासन दिले जात होते. हा प्रकार गेल्या 75 वर्षापासून सुरु

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे. त्यामुळे याच्या पलीकडे काही आहे की, नाही ? या योजनेचा मसुदा तयार नसल्यामुळे दलितांना प्रवाहामध्ये आणण्यासाठी या योजनेच्या संदर्भातून कोणताही उल्लेख करण्यात आलेला

...3...



ता.प्र.क्र.:12511.....

श्री.अमरसिंह पंडित.....

नाही. त्यामुळे या योजनेचा मसुदा तयार करण्यात आलेला आहे काय, 40 गावांची निवड करीत असताना त्याचे निकष काय असणार आहेत ? ...3...

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, प्रत्येक जिल्हयातील किमान एक गाव, ज्या ठिकाणी मोठी वस्ती आहे अशा गावाची आम्ही निवड करणार आहोत. 500 किंवा 1000 वस्तीचे गाव असेल व त्या ठिकाणी किमान 100-200 दलितांची वस्ती असेल ....

**सभापती :** या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या मनात एकच भावना आहे की, आपल्या राज्यात 34 जिल्हे असून त्यातील 34 गावे आपण या योजनेमध्ये घेणार आहोत. परंतु सदस्यांचे म्हणणे आहे की, गावाची निवड करताना कोणते निकष ठेवले जाणार आहे ? तसेच जो मसुदा तुमच्या मनात असेल, तो कागदावर येण्याचा राहून गेला असेल तर याबाबतीत आपण जेव्हा मसूदा तयार कराल, मी गृहीत धरतो की, स्मार्ट दलित वस्तीच्या संदर्भात तुमच्याकडे मसुदा तयार नाही. मसुदा तयार करताना तुम्ही ज्या सन्माननीय सदस्यांचे सल्ले घेणार आहात त्यांना तुमच्या दालनात बोलावून मसुद्याच्या संदर्भात त्यांच्या सूचना ऐकन घ्याव्यात.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, दोन्ही सदनातील किमान 5-5 सदस्यांना या विषयाच्या समितीमध्ये घेतले जाईल. गावाचा विकास करीत असताना सन्माननीय सदस्यांचाही त्या गावाशी संबंध असतो. या राज्याचा विकास व्हावा, राज्यातील गोरगरीब, दलित समाजाचा विकास व्हावा ही भावना सर्वांची आहे. त्यामुळे दोन्ही सदनातील 10 सन्माननीय सदस्यांची समिती गठीत करतो व जानेवारीच्या पहिल्या आठवडयात बैठक घेतली जाईल.

**सभापती :** अनुसूचित जातीचे जे मतदारसंघ आहेत त्यातील आमदारांना या समितीमध्ये घेतले तर ते चांगले होईल.

श्री. दिलीप कांबळे : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रौप्यमहोत्सवी निमित्ताने शासनाने चांगली योजना आखलेली आहे. शासनाकडे यासंदर्भात काही निधी आहे. सर्व सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, सन्माननीय मंत्री महोदय श्री.बडोले साहेब, तसेच माननीय

...4...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे.....

श्री. दिलीप कांबळेसाहेब चांगले काम करीत आहे. आमचे या योजनेच्या संदर्भात विचार ऐकून घ्यावे व कोणत्याही परिस्थित्ी 14 एप्रिल, 2016 पूर्वी या योजनेच्या निमित्ताने चांगले गाव निर्माण केले तर आम्ही दोन्ही मंत्र्यांचे आम्ही याच सभागृहात मन:पूर्वक अभिनंदन करु.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, 1000 वस्ती असलेल्या दलित गावाचे आम्ही स्मार्ट दलित वस्ती गावात रुपांतर करु.

**सभापती :** स्मार्ट दलित वस्तीच्या संदर्भात अद्याप निकष ठरावयाचे आहेत.

श्री. दिलीप कांबळे : 500-1000 वस्तीच्या गावाचा यामध्ये मी उल्लेख केलेला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : आमच्या भागात एवढया मोठया वस्तीचे एकही दलित गाव नाही, तसेच पश्चिम महारातही एकही गाव नाही. मराठवाडा किंवा विदर्भात असू शकेल.

सभापती : आता ता.प्र.क्र.11212 घेण्यात येईल.

--------

....5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.: 11212</u>**

(श्री.प्रविण पोटे पाटील, श्री.सुभाष देसाई यांच्याकरिता)

प्रेस : येथे राखून ठेवलेला ता.प्र.क्र. 11212 छापावा.)

-----

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता दिनांक 15 डिसेंबर, 2015 रोजी राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.11212 घेण्यात येईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मेक इन महाराष्ट्राच्या माध्यमातून सरकारने काही पाऊ उचलले असून त्याची माहिती उत्तरामध्ये दिलेली आहे. यासंदर्भात माझे प्रश्न असे आहेत की, धोरणात्मक दृष्टीकोनातून राज्याचा समतोल विकास व्हावा व गुंतवणूक राज्याच्या बॅकवर्ड रिजनमध्ये होण्यास प्राथमिकता देण्यात यावी असा प्रयत्न सगळया सरकारचा असतो. त्यामुळे विशेष करुन विदर्भ, मराठवाडा व कोकण हे विभाग मागासलेले मानले जातात. याभागात गुंतवणूक नेण्यासाठी सरकार कोणती पाऊले उचलणार आहे ? उत्तरामध्ये चार्टमध्ये माहिती दिलेली आहे परंतु प्रत्येक प्रोजेक्टची गेस्टेशन आणि कंपलीशन कालावधीची माहिती दिलेली नाही ती माहिती सादर करण्यात येईल काय ?

Q-1/......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11212....

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी राज्याच्या समतोल विकासाबद्दलचा मुद्दा उपस्थित केलेला आहे आणि तो योग्यच आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये जेथे जेथे औद्योगिक क्षेत्र आहे त्या त्या ठिकाणी उद्योग जावेत असा प्रयत्न उद्योग विभाग करीत आहे. कालच एक एमओयु झाला. त्यामध्ये रेमंडसारखा मोठा उद्योग अमरावती जवळच्या नांदगाव पेठ येथे् स्थापन करण्याबाबतचा करारा झाला. आपले असे अनेक प्रयत्न सुरु आहेत आणि अशा अनेक उद्योगांची यादी मला देता येईल. ही यादी मी पटलावर ठेवतो. त्या यादीवरुन असे लक्षात येईल की, बुटीबोरी, कागल, वर्धा अशा ठिक्णी नोव्हेंबर, 2014 पासून आजपर्यंत स्थापन झालेले जे उद्योग आहेत त्या यादीवर आपण नजर फिरवली तर असे अनेक उद्योग मागासभागामध्ये असल्याचे दिसून येईल. डी प्लस झोन, सी झोन आणि डी झोन अशा ठिकाणी सुद्धा उद्योग स्थापन करण्याचे प्रयत्न झालेले आहेत आणि तशी प्रगती चालू आहे.

ॲड.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, उद्योगाला चालना मिळण्यासाठी आणि उद्योग लवकर सुरु होण्याच्या दृष्टीने आपण उद्योगासाठी लागणाऱ्या परवानग्या कमी करण्यासाठी ही सर्व वाटचाल करीत आहोत. असे असताना किनारपट्टीवर इन्फ्रास्ट्रक्चर इंडस्ट्री डेव्हलप होत आहे मग त्यामध्ये पॉवर प्रोजेक्ट असतील, स्टील प्लान्ट असतील त्यांना एमसीझेडएमकडून पर्यावरणाची मंजुरी घ्यावी लागते. ही मंजुरी मिळण्यासाठी तीन ते सहा महिन्यांचा कालावधी जातो. उद्योग विभागाने केंद्रीय पर्यावरण विभागाशी समन्वय साधून ही प्रक्रिया कमी करण्यासाठी आणि त्याबाबतचा निर्णय लवकर येण्यासाठी पावले उचलणार आहे काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. समन्वयातून वेळ कमी करता येत असेल तर त्यासाठी जरूर प्रयत्न केला जाईल. आपणास पर्यावरण विभागाची देखील काळजी घेतली पाहिजे आणि उद्योगही स्थापन झाले पाहिजेत. या दोहोंचा समतोल ठेवण्यासाठी ज्या काही परवानग्या आवश्यक आहेत त्या घ्याव्या लागतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभ्पती महोदय, प्रश्नाचा रोख दुसरीकडे चालला आहे. शासनाने उद्योग उभा करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्यांची संख्या कमी केल्याची बातमी आम्ही एक महिन्यापूर्वी वर्तमानपत्रात वाचली. या संदर्भात वन विन्डो सिस्टीम सुरु करुन उद्योग उभारण्यासाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11212....

श्री.जयंत प्र.पाटील......

कमीत कमी परवानग्या कशा लागतील याची अंमलबजावणी शासन करणार काय ? माननीय मंत्र्यांनी फक्त एमआयडीसीपुरते सांगू नये. या राज्यामध्ये मी पहिला पोर्ट सुरु केला. परंतु मला जमीन ॲलॉट करण्याचे काम 14 वर्षे झालेले नाही. मला 30 वर्षाची मुदत दिलेली आहे. म्हणजे माझी निम्मी मुदत संपली आहे तरी मला परवानग्या मिळत नाहीत. या पोर्टच्या माध्यमातून मी राज्य शासनाला कमीत कमी 60 ते 70 कोटी रुपये आणि कस्टम विभागाला 250 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवून देतो. तेव्हा अशा उद्योगधंद्यांना शासन प्रोत्साहन देणार आहे काय ? या ठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड.राहूल नार्वेकर यांनी सांगितलेली बाब खरी आहे. परंतु आता त्यामध्ये सुधारणा झालेली आहे. पर्यावरण विभागाच्या सचिव श्रीमती मालिनी श्ंकर यांनी या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पर्यावरणासंबंधीत परवानगी मिळण्यासंबधीचा नंबर लवकर लागत आहे. पुढील महिन्यात पर्यावरणासंबंधीत परवानगी मिळण्यासाठीचा नंबर लागण्याचे काम डे-टू-डे सुरु होणार आहे. त्याबद्दल श्रीमती मालिनी शंकर यांचे मी अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्यांची तक्रार योग्य होती. परंतु विभागाच्या सचिवांनी चार महिन्यामध्ये पर्यावरणा संदर्भातीत सर्व केसेस पूर्ण केलेल्या आहेत. जे उद्योग शासनाच्या अखत्यारित नाहीत त्या उद्योगांना देखील झटपट एनओसी मिळण्यासाठी राज्य शासन जलद गतीने निर्णय घेईल काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, एमआयडीसी क्षेत्रामध्ये काही उद्योग आहेत आणि त्या क्षेत्रा बाहेर काही उद्योग असले तरी ते उद्योग विभागाच्या संबंधातीलच उद्योग आहेत. त्यांना परवानग्यासाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. यापूर्वी एक उद्योग स्थापन करावयाचा असेल तर त्यासाठी 76 परवानगींची आवश्यकता लागत होती. ती संख्या आता 37 वर आणली आहे. ही संख्या आणखी 25 वर आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. ते लवकरच साध्य होईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्यांना 14 वर्षे उद्योगासाठी परवानगी घेण्यासाठी लागली आहेत. येथून पुढे जास्त काळ लागू नये यासाठी नक्की सहकार्य केले जाईल आणि त्यादृष्टीने कार्यवाही केली जाईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पालघर जिल्ह्यातील आदिवासी गावांचा सर्वांगीण विकास करण्याबाबत**

**(1) * 12053 श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाणणःण** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पालघर जिल्ह्यातील आदिवासी गावांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने पेसा योजनेंतर्गत निधीचे वाटप करताना वसई व डहाणू तालुक्यांमध्ये चुकीचे निकष लावण्यात आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने` निधीचे वाटप योग्यरित्या होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (2), (3) व (४) नाही, या विभागाच्या दिनांक २१.०४.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायती अंतर्गत गावे/वाड्या/पाडे यांना एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी उपाययोजनेच्या नियतव्यायाच्या ५% अबंध निधी उपलब्ध करुन देण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता याबाबीकरीता रुपये २५८.५० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यापैकी ७०% रुपये १८०.९५ कोटी इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरणाकरीता उपलब्ध झाला आहे. त्यानुसार पालघर जिल्ह्यातंर्गत डहाणू तालुक्यातील ८५ ग्रामपंचायती अंतर्गत १७४ गावांना रुपये १०,०२,०९,५७८/- व वसई तालुक्यातील १५ ग्रामपंचायती अंतर्गत २७ गावांना रुपये १,२४,९७,१४३/- इतका निधी दिनांक ३०.०९.२०१५ च्या शासन निर्णयान्वये RTGS द्वारे थेट संबंधित गावांच्या ग्रामसभा कोष खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदरचा निधी हा लोकसंख्येच्या निकषानुसार उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भ ावत नाही.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, दिनांक 21 एप्रिल, 2015 च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी राज्यील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायती अंतर्गत गावे/वाड्या/पाडे यांना एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी उपाययोजनेच्या नियतव्ययाच्या 5 टक्के अबंध निधी उपलब्ध करून देण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. हा निर्णय एप्रिल महिन्यात झाला, परंतु सप्टेंबर पर्यंत हा निधी देण्यात आला नाही. नंतरच्या कालावधीमध्ये हा निधी देण्यात आला असून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क.12053....

श्री.आनंद ठाकूर....

तो निधी 70 टक्के दिलेला आहे. या अंतर्गत जी कामे करावयाची आहेत त्यामध्ये काही निकष ठेवलेले आहेत. पालघर जिल्ह्यामध्ये 415 ग्रामपंचायती आहेत. प्रत्येक ग्रामपंचायत निहाय पाचपाच लोकांची निवड करुन त्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी जिल्ह्यामध्ये 50 प्रशिक्षण वर्ग करण्यात येतील अशी माहिती मला देण्यात आलेली आहे. आम्हाला निधी मिळाल्यानंतरही अजूनही प्रशिक्ष्ण देण्याचे ठरलेले नाही. ही मंडळी प्रशिक्षण घेऊन त्याचा आराखडा तयार केल्यानंतरच ही कामे केली जाणार आहेत. प्रशिक्षणासाठी काही कालावधी लागणार आहे आणि प्रशिक्षण वर्ग ठरविण्याचे काम सुरु आहे. माझा प्रश्न आहे की, हे काम किती दिवसांत पूर्ण करण्यात येईल ? ऑक्टोबर महिन्यात उर्वरित 30 टक्के रक्कम देण्यात आली नाही. ही रक्कम केव्हा देण्यात येईल ? मार्च महिन्याअखेरपर्यंत किती कामे केली जातील ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाकूर यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्याबाबत सांगू इच्छितो की, आपण पेसा कायद्यांतर्गत ही कार्यवाही करतो. अशाप्रकारची कार्यवाही करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील एकमेव राज्य आहे. या माध्यमातून आपण ग्रामपंचायतीला थेट निधी देत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी प्रशिक्षणाचे काम सुरु आहे. साधारणतः 250 प्रशिक्षणार्थींचे यशदामध्ये प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. त्यानंतर खालच्या स्तरावर साधारणतः 10 ग्रामपंचातीचा ग्रुप करुन एक ग्रामपंचायतील पाच प्रतिनिधी निवडून त्यांना प्रशिक्षण देणार आहोत. हे काम जानेवारी अखेरपर्यंत पूर्ण होणार आहे. आपण त्या ग्रामपंचायतीला 70 टक्के निधी दिलेला आहे. तीन लाख रुपये पर्यंतच्या आराखड्यास कोणाचीही मान्यता घेण्याची गरज नाही. आपण ग्रामसभेला हे अधिकार दिलेले आहेत. ग्रामसभेने प्रशासकीय आणि टेक्निकल मान्यता द्यायची आहे. त्यामुळे हे प्रशिक्षण 30 तारखेपर्यंत पूर्ण होईल आणि जो निधी वितरीत केलेला आहे, त्याला कामाला सुरुवात होईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीतील इमारतींची दुरुस्ती व शासकीय**

**कर्मचा-यांना हक्काची घरे उपलब्ध करुन देणेबाबत**

**(2) * 12220 श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.अनिल परब, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वांद्रे (पूर्व) येथील ९७ एकर क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या शासकीय वसाहतीतील इमारतींचे बांधकाम सुमारे ४० ते ५० वर्षापासूनचे असल्याने कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असून कर्मचा-यांना हक्काचे घर मिळावे याकरिता तेथील कर्मचाऱ्यांनी दिनांक १८ मे, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर इमारंतीची दुरूस्ती करण्यात येत असूनन वसाहतीत अनेक ठिकाणी एक वर्षापासून डेब्रीज जमा करण्यात आले असून संबंधित ठेकेदाराने` इमारतींच्या बाथरुम व टॉयलेटच्या भिंतीवरील खिडक्यांना काचा न लावल्याने घरात मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला असून वसाहतीत डेंग्यूचे प्रमाण वाढल्याबाबत वारंवार तक्रारी देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठीची रक्कम कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वजा होत असतानाही कर्मचारी कमी असल्याच्या कारणामुळे दुरुस्ती तसेच इतर कामे करता येणे शक्य नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंत्याकडून सांगितले जाते, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीतील ९६ एकर भूखंड विदेशी संस्थांच्या कार्यालयासाठी देण्याचे धोरण गृहनिर्माण विभागाने ठरविले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, उपरोक्त गृहनिर्माण विभागाच्या धोरणाविरोधात सदर शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेने तीव्र विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(6) असल्यास, उपरोक्त प्रमाणे शासकीय वसाहतीतील इमारंतीची दुरुस्ती, त्यांना सोयीसुविधा व भूखंड उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**श्री.प्रवीण पोटे-पाटील, चंद्रकांत पाटील यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे आहे.

वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीमध्ये एकुण ४७८२ सदनिका असून त्यापैकी २१२ सदनिका तज्ञ सल्लागारांनी केलेल्या संरचनात्मक परीक्षणास अनुसरुन २१२ सदनिका सुरक्षिततेचा उपाय म्हणून रिक्त केल्या असून त्यांना याच वसाहतीत पर्यायी निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

दिनांक १८ मे, २०१५ चे पत्र प्राप्त झालेले आहे.

(2) हे खरे नाही.

शासकीय वसाहतीतील डेब्रीज वेळोवेळी उचलण्यात येत असून स्वच्छता राखण्याचे काम करण्यात येते. बाथरुम व टॉयलेटच्या भिंतीवरील खिडक्यांच्या तुटलेल्या काचा वेळोवेळी बसविण्यात येतात. तसेच महानगरपालिकेमार्फत डासप्रतिबंधक फवारणी वेळोवेळी करण्यात येते.

(3) हे खरे नाही.

(4) व (५) गृहनिर्माण विभागामार्फत विधानसभा, विधानपरिषद सदस्य आणि राज्यातील खासदारांना सूचनांसाठी पाठविण्यात आलेल्या प्रारुप गृहनिर्माण धोरणात असा प्रस्ताव होता. यासंदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही.

(6) वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील सदनिकांची कामे विशेष व विविक्षित दुरुस्तीअंतर्गत मंजूर असून ही कामे निविदा स्तरावर आहेत. सदरची मंजूर कामे येत्या एक ते दीड वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(7) प्रश्न उद्‌भवत नाही.

**सभापती :** या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती आणि त्यावर चर्चा झालेली आहे. तेव्हा आपण थोडक्यात प्रश्न मांडावेत.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, हा एकूण 154 एकरचा भूखंड आहे.या भूखंडावर शासकीय निवासस्थाने असून त्या ठिकाणी शासकीय कर्मचारी/ अधिकारी राहत आहेत. शासनाच्या जवळपास मोकळ्या जागेवर काही दादा लोकांनी झोपडपट्टया वसविल्या असून आता शासनाने त्यांना 50 एकर जागा एसआरएच्या नावाखाली देऊ केली आहे असे समजते आणि उत्तरामध्ये तसे म्हटलेले आहे. माझा प्रश्न आहे की, त्या ठिकाणी सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना घरे

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12220...

श्री.नरेंद्र पाटील......

बांधून का देण्यात येत नाहीत ? शासकीय जमिनी गुंडांना देऊन सरकार त्यांना एकप्रकारे ताकद देणार असेल तर मग सरकारी कर्मचाऱ्यांना ती जागा दिल्यास चांगले होईल असे माझे मत आहे. तेव्हा याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय ?

...R-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12220....

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या वसाहतीची जागा 145 एकर आहे. परंतु हे खरे नाही. या वसाहतीची जागा फक्त 97 एकर आहे. त्या ठिकाणी 370 इमारती असून, 4782 निवासस्थाने आहेत. या इमारती 40-50 वर्षे जुन्या आहेत. मुंबईतील खाऱ्या पाण्याच्या हवामानामुळे या इमारती खराब होत असतात. तसेच दुसरी बाब अशी की, सन्माननीय सदस्यांना जी माहिती अपेक्षित आहे ती त्यांना या प्रश्नाचे लेखी उत्तर वाचल्यानंतर मिळेल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत आपल्या दालनामध्ये बैठक घेण्याचे निश्चत झालेले आहे. माननीय मंत्र्यांनी सन्माननीय सदस्यांना या प्रश्नाचे लेखी उत्तर वाचण्याचा सल्ला दिला आहे. सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 4 असा विचारण्यात आला होता की, वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीतील 96 एकर भूखंड विदेशी संस्थांच्या कार्यालयासाठी देण्याचे धोरण गृहनिर्माण विभागाने ठरविले असल्याचे माहे ऑगस्ट, 2015 मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला "या संदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही." अशा प्रकारचे लेखी उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, त्या ठिकाणी विदेशी संस्था आणि इतरांना जागा दिली जात आहे. त्या भागातील 97 एकर जागेव्यतिरिक्त बांद्र्यामध्ये अनेक ठिकाणी भूखंड उपलब्ध आहेत. राज्य सरकारने युएलसी चे धोरण राबविले. शिवाय न्यायाधीश वा आमदारांच्या गृहनिर्माण संस्थांना शासनाने जमिनी दिल्या आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, जे सरकारी कर्मचारी आहेत त्यांच्या गृहनिर्माण संस्थांना जागा देण्यासाठी शासन धोरणात्मक निर्णय घेईल काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागामार्फत विधानसभा, विधानपरिषद सदस्य आणि राज्यातील खासदारांना सूचनांसाठी पाठविण्यात आलेल्या प्रारूप गृहनिर्माण धोरणात असा प्रस्ताव होता. परंतु या संदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही. ही जागा मुळात सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. त्यामुळे या जागेच्या बाबतीत जो काही निर्णय घेण्यात येईल तो सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून घेण्यात येईल. मी पुनश्च सांगतो की, बाहेरच्या लोकांना सदनिका किंवा कार्यालय देण्याबाबतचा कोणताही निर्णय झालेला नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12220....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा विषय धोरणात्मक स्वरूपाचा आहे. जर शासनाने असा धोरणात्मक निर्णय घेतला की, शासकीय कर्मचारी ज्या शासकीय निवासस्थानांमध्ये राहतात ती जागा त्यांना खाजगी स्वरूपात देण्यास सुरुवात केली तर राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांकडून शासकीय निवासस्थानाची जागा आपल्या नावे करण्याबाबतची मागणी केली जाईल. शासकीय निवासस्थानाची जागा सरकारी कर्मचाऱ्यांना दिल्यास आणि ते कर्मचारी निवृत्त झाल्यास अनेक प्रश्न निर्माण होतील. कारण नवीन कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थान राहणार नाहीत. अशा परिस्थितीत ते कुठे राहतील ? माननीय मंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेच्या वेळी या विषयावर जे उत्तर दिले होते ते योग्य होते. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्था उभ्या करावयाच्या असतील तर त्यांना अन्यत्र जागा द्यावी. अधिकारी मंडळी, न्यायाधीश, आयएएस अधिकाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थांसाठी शासन जागा देत आले आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना सुध्दा अन्यत्र जागा देण्यास आमचा विरोध नाही. परंतु शासकीय वसाहतीची जागा कर्मचाऱ्यांना देण्यास सुरुवात केली तर, राज्यातील सर्वच कर्मचारी वसाहती त्यांच्या मालकीच्या होतील. मला वाटते ही चर्चा या ठिकाणी थांबविली पाहजे. शासनाने अशा प्रकारचे धोरण घेणे योग्य नाही, किंबहुना राज्य सरकारने अशा पध्दतीचे धोरण घेता कामा नये. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, सरकारने शासकीय निवासस्थानाची जागा सरकारी कर्मचाऱ्यांच्या नावे करण्याबाबतचे धोरण स्वीकारणार नाही असे काही ठरविले आहे काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, मी पुन्हा सांगतो की, शासनाने सध्या शासकीय वसाहतींच्या बाबतीत कोणताही निर्णय घेतलेला नाही. मुंबईत महाराष्ट्रातून लोक नोकरीनिमित्त येत असतात. त्यांना राहण्यासाठी शासकीय निवासस्थाने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे खाजगी तत्त्वातून या सदनिका पाडून चांगल्याप्रकारे विकसित करण्याचा सरकारचा विचार आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, वांद्रे येथील शासकीय वसाहतीच्या संदर्भात दोन्ही सभागृहामध्ये वर्षानुवर्षे चर्चा उपस्थित केली जाते. प्रत्येक उत्तराच्या वेळी शासनाकडून वेगवेगळी मते मांडली जातात. या वसाहतीसमोर असलेल्या लोकांनी प्लास्टीक टाकून झोपड्या उभ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्यानंतर त्यांना तेथे जागा दिली जाते. आता वांद्रे येथील जागा 145 एकर नव्हे तर 104 एकर

..3..



ता.प्र.क्र.12220....

श्री.किरण पावसकर....

होती. यातील केवळ 97 एकर जागा सरकारकडे शिल्लक राहिली आहे. अशा प्रकारचे उत्तर मागच्या वेळी सुध्दा देण्यात आले होते. झोपडीत राहणाऱ्या लोकांना त्या परिसरातील 6 ते 7 एकर जागा देण्यात आली. परंतु ज्यांचे वडील सेवानिवृत्त व्हायला आले ती मुले गेल्या 30-40 वर्षांपासून तेथेच राहत आहेत. ते सर्व कर्मचारी दर रविवारी सकाळी इमारतीच्या खाली उतरुन आपला परिसर स्वच्छ ठेवतात. किंबहुना आपल्या इमारतीची काळजी घेतात. तसेच त्या भागात झोपड्या होऊ नयेत म्हणून झोपडपट्टीदादांसोबत दोन हात करीत आहेत. एका बाजूला झोपडपट्टीधारकांना 6-7 एकर जागा दिली जाते आणि जे कर्मचारी शासनाची वसाहत सांभाळत आहेत त्या शासकीय कर्मचाऱ्यांना मात्र वंचित ठेवले जाते. मी सांगू इच्छितो की, सरकारी कर्मचारी शासनाकडे विनामूल्य जागा मागत नाही. महोदय, वांद्र्याच्या शासकीय वसाहतीतील एक कर्मचारी गृहनिर्माण संस्था रेडी रेकनरनुसार जागा मिळावी म्हणून मागणी करीत आहे. शासन अनधिकृत झोपड्या उभारणाऱ्यांना जागा देण्यासाठी तयार होते, परंतु शासकीय कर्मचाऱ्यांना जागा देत नाही. शासकीय कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थानाची जागा सांभाळली नसती तर त्या ठिकाणी झोपड्या उभ्या राहिल्या असत्या. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, शासकीय कर्मचाऱ्यांना निवासस्थान उपलब्ध करुन देण्यासाठी शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ? त्या ठिकाणी गेल्या 40 वर्षांपासून राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना अशाप्रकारे हुसकावून लावता येणार नाही. तेथील काही पक्ष प्रमुखांनी सांगितले की, शासकीय कर्मचाऱ्यांना तेथून काढल्यानंतर तेथे एक वीटही लावू देणार नाही. कारण हे कर्मचारी त्यांना मतदानापुरते हवे असतात. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी तो पक्ष काय करणार आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, हा विषय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 104 एकर जागेपुरता मर्यादित नाही. सरकारी जमिनीवर ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारे अनधिकृत झोपड्या तयार होतात त्या झोपड्या 1995 पूर्वीच्या असतील तर त्यांना मान्यता देण्यात येते व त्यानुसार त्यांना जागा द्यावी लागते. 1995 ची मर्यादा नंतर 2000 पर्यंत वाढविण्यात आलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. शासनाच्या नियमानुसार झोपडीधारकांना त्या भागात जागा दिली गेली. राज्यातील

..4..



ता.प्र.क्र.12220....

श्री.चंद्रकांत पाटील....

कोणत्याही सरकारी जमिनीवर 2000 च्या पूर्वीपासून झोपड्या असतील तर त्यांना जागा द्यावी लागेल, अशा स्वरूपाचा कायदा केलेला आहे. त्यामुळे झोपडीधारकांना फेवर केले असे म्हणता येणार नाही. सरकारी कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थान याच कल्पनेतून दिले आहे की, ते नोकरीत असेपर्यंत त्यांनी त्या ठिकाणी राहावे व सेवानिवृत्त झाल्यानंतर आपापली व्यवस्था करावी. झोपडीधारकांसाठी जसा कायदा केला तशा प्रकारचा कायदा शासकीय वसाहतींमध्ये राहणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सर्वांनी मिळून केला तर हे करता येईल. वांद्रे येथील कर्मचारी वसाहत अपुरी पडत असल्यामुळे आता चेंबूर आणि गोवंडी या भागात शासकीय निवासस्थानाचे बांधकाम करण्यास सुरुवात केली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांची मुंबईत राहण्याची नीट सोय व्हावी म्हणून हे करीत आहोत. वर्षानुवर्षे शासकीय वसाहतीमध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नावे निवासस्थाने दिल्यास अडचणी येतील. मी या विषयावरील लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी उत्तर दिलेले आहे. हा विषय विसृत स्वरूपाचा आहे. या जागेचा विकास केल्यानंतर राज्याचे अनेक प्रश्न सुटणार आहेत. सभापती महोदय, या संपूर्ण जागेच्या संदर्भात काय केल्यानंतर सर्वांना न्याय मिळेल यासाठी मागच्या आठवड्यात कमर्शियल प्लान तयार करण्यासाठी जागतिक स्तरावरील एक एजन्सी नियुक्त केली आहे. त्यांचा अहवाल महिनाभरात येईल. त्या प्रस्तावात त्या ठिकाणी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी 4 हजार कर्मचाऱ्यांना जागा देण्याबाबत सुध्दा प्रस्ताव येऊ शकतो किंवा अन्य काही पर्याय दिले जाऊ शकतील. तसेच अजून एक बाब अशी की, या विषयाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यास सांगितलेले आहेत.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, सरकारी कर्मचाऱ्यांच्या नावे शासकीय निवासस्थाने केली तर तो चुकीचा पायंडा पडेल आणि संपूर्ण राज्यातून अशा प्रकारची मागणी होऊ शकेल. सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेने चतुर्थ श्रेणीतील सफाई कर्मचाऱ्यांच्या संदर्भात वेगळी भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, तशाच प्रकारची भूमिका इतर शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत का घेऊ नये, तसेच सार्वजनिक

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

बांधकाम विभागातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आपण अशा प्रकारची भूमिका घेणार काय ?

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12220....

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी 'नाही' असे म्हटलेले नाही. हा संपूर्ण विषय विस्तृत स्वरूपाचा आहे. या प्रकरणाचा अभ्यास करण्यासाठी प्रोफेशनल एजन्सी नियुक्त केली आहे. तसेच दुसरी बाब अशी की, या विषयावरील लक्षवेधी सूचनेच्या वेळी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मागणी केल्यानुसार माननीय सभापतींच्या दालनात बैठक घेण्याचे ठरलेले आहे. त्यामुळे त्या बैठकीत आपण सर्वजण माननीय मुख्यमंत्र्यांसोबत एकत्रित बसून निर्णय करु या. कारण आपण काही बाबतीत महापालिकांच्या ठिकाणी झालेल्या कामांच्या अनुषंगाने त्या महानगरपालिका कोट करतो, भविष्यात या विषयाच्या बाबतीत सुध्दा कोट करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, जनतेच्या हितासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले जातात. सरकारी कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना शासकीय निवासस्थान खाली करावे लागते. अशावेळी तो कर्मचारी आपले सामान खटाऱ्यात टाकून घेऊन जातो.

..एस....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12220....

डॉ. नीलम गोऱ्हे ....

हे नियम आहेत. समाजामध्ये सर्व सुशिक्षित बसले आहेत. सरकारी अधिकाऱ्यांची सुध्दा ती मागणी आहे. माझी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांना विनंती आहे की, बैठक होईल त्यावेळी त्यामध्ये अनेक प्रस्तावांचा जसा विचार करीत आहोत तसा सरकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संकुलासाठी जर जागा मागितली तर त्याबद्दल आपण सकारात्मक विचार करण्यासाठी भूमिका ठेवावी. अमुक करता येणार नाही, तमुक करता येणार नाही असे होऊ नये. नियमात बसवून ते कसे करता येईल या दृष्टीने सरकारने निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे, तसा आपण निर्णय घ्याल का ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, नक्कीच या विषयाचा सकारात्मक निर्णय करण्यात येईल.

श्री. सतिश चव्हाण : सभापती महोदय, मुंबईत क्वॉर्टर्स आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंतराव पाटील यांनी एकदम पॉईंटेड प्रश्न विचारला. 25 वर्षांनी जर सरकारी कर्मचारी अपॉईंट झाला तर त्याला क्वॉर्टर तरी मिळेल का ? मुंबईत जर आपण जागा दिली तर ते लोन औरंगाबादला सुध्दा येईल. क्लास 3, 4 चे कर्मचारी आहेत. एका ठिकाणी 25-30 वर्षे राहतात. क्वॉर्टर्स कोणाला द्याव्यात या संदर्भातील पॉलिसी एकदा जाहीर करावी. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, असा निर्णय अजून झालेला नाही. पण प्रस्ताव तरी आहे का ? आपण आपले धोरण स्पष्ट करावे.

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण बैठक घेण्याचे सूचित केले आहे, त्या बैठकीत प्रश्न विचारलेल्या सन्माननीय सदस्यांना बोलावून उचित निर्णय घ्यावा.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, जानेवारीमध्ये या विषयाच्या संदर्भातील बैठक माननीय मुख्यमंत्र्याबरोबर घेत आहोत. गृहनिर्माण विभागाने देखील एक धोरण तयार केले आहे. ड्राफ्ट आहे, जो सर्वांना पाठविला आहे, त्यातच एक सूचना होती. काही विदेशी वकिलातीसाठी जागा देण्याचा विषय होता. मग त्यांना देता तर मग यांना का नाही असे म्हटले गेले. ते सगळे ड्राफ्ट आहेत, याचा विचार करण्यासठी एक बैठक घेण्यात येईल.

**सभापती** : ठीक आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**आदिवासी विकास विभागाच्या शासकीय प्राथमिक व अनुदानित आश्रमशाळांमधील बी.एड अर्हताधारक शिक्षकांना प्रशिक्षित समजण्याबाबत**

**(3) * 12616 श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका १५३११ ते १५३३१ / २००५ मध्ये दिनांक २० फेब्रुवारी, २००७ रोजी निर्णय देणे तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाने देखील याचिका क्र.४६३२/१९९९ मध्ये दिनांक ६ मे, २००४ रोजीनुसार प्राथमिक शाळांमधील बी.एड अर्हताधारक शिक्षकांना प्रशिक्षित समजून त्यांना डी.एड. ची वेतनश्रेणी देण्याबाबत निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शालेय शिक्षण विभागाने दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार खाजगी प्राथमिक शाळांमधील बी.एड पात्रताधारक शिक्षकांना प्रशिक्षित समजून डी.एड वेतनश्रेणीस मान्यता देण्याचे आदेश निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी देखील दिनांक ७ जुलै, २०१५ रोजी शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, शालेय शिक्षण विभागाप्रमाणे आदिवासी आश्रमशाळांमधील बी.एड अर्हताधारक प्राथमिक शिक्षकांना अद्यापही प्रशिक्षित न समजण्याची कारणे काय आहेत,
(5) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विष्णू सवरा :** (१) व (२) हे खरे आहे.
(3) हे खरे आहे.
(4) व (५) प्राथमिक शाळांमधील बी.एड अर्हताधारक शिक्षकांना प्रशिक्षित समजून त्यांना डी.एड ची वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास दिनांक १५.१०.२०१५ रोजी सादर करण्यात आला आहे. वित्त विभागाने शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयाची मूळ नस्ती उपलब्ध करुन देणेबाबत कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये, आश्रमशाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांचा हा प्रश्न आहे शासनाला आवश्यकता होती. दुर्गम भागात माणसे मिळत नव्हती. प्राथामिक शिक्षकांची पात्रता एसएससी किंवा एचएससी डीएड आहे, त्यांना बीए बीएड शिक्षक मिळाले. उच्च अर्हताधारक मिळाले, ते मिळाले, त्याचवेळी शासनाने असा धोरणात्मक निर्णय घेतला की, डीएडच्या जागेवर बीएडचा उच्च अर्हततेचा माणूस नेमला तर त्याला अप्रशिक्षित समजले जाईल. सभापती महोदय, त्याला प्रशिक्षितची वेतनश्रेणी द्यायची तर अप्रशिक्षितची वेतनश्रेणी दिली गेली. न्यायालयीन प्रकरण झाले. माननीय उच्च न्यायालयाने निर्णय

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12616....

श्री. रामनाथ मोते ....

दिला की, या शिक्षकांना ते डीएडच्या ऐवजी बीएड उच्च अर्हताधारक आहेत म्हणून अप्रशिक्षित समजता येणार नाही. शासनने माननीय सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. माननीय सर्वोच्च न्यायालयाने शासनाची याचिका फेटाळली आणि माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय कायम केला. माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये आपल्या विरोधात निकाल लागल्यानंतर दिनांक 11 मार्च, 2011 ला शालेय शिक्षण विभागाने आदेश काढला आणि या बीए, बीएड झालेल्या परंतु प्राथमिक शाळेत काम करणाऱ्यांना ज्यांना आतापर्यंत अप्रशिक्षित समजले जात होते, त्यांना नेमणुकीच्या दिनांकापासून प्रशिक्षित समजण्याचे आणि डीएडचे वेतनश्रेणी देण्याचे मान्य केले. सभापती महोदय, त्याच अनुषंगाने आदिवासी विभागामध्ये सुध्दा शासनाच्या आश्रमशाळांमध्ये काम करणारे अनेक बीए बीएड शिक्षक आहेत जे उच्च अर्हताधारक आहेत, पण विभागाच्या त्यावेळच्या निर्णयामुळे त्यांना अप्रशिक्षित समजले जाते. पगारामध्ये 8 ते 10 हजार रूपयांचा फरक पडतो. शालेय शिक्षण विभागाने 4 वर्षांपूर्वी निर्णय घेतला आहे. मात्र अद्यापही आदिवासी विभागाने निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे मी हा विषय मुद्दाम मांडत आहे. माननीय मंत्र्यांनी उत्तरात सांगितले आहे की, आम्ही या संदर्भातील फाईल वित्त विभागाला सादर केली आहे. सन 2011 ला निर्णय झाला. अजुनही फाईल ये-जा करीत आहे. अधिवेशन उद्या संपणार आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आपण 15-20 दिवसांच्या आत स्वतः आपल्या कार्यालयामार्फत वित्त विभागाशी पाठपुरावा करून या शिक्षकांचा गेल्या 10-12 वर्षांचा प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवून, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांना न्याय देणार का ?

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, अशा प्रकारचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. आम्ही तशा प्रकारचा प्रयत्न करीत आहोत. वित्त विभागाकडून काही मुद्दे उपस्थित केले असल्यामुळे त्यांचा खुलासा करावयाचा आहे. आमचीही मानसिकता त्यांना देण्याचीच आहे. वित्त विभागाने ज्या बाबींच्या संदर्भात खुलासे मागविले आहेत, ते पूण करून या अशा प्रकरच्या शिक्षकांना सुध्दा अशी वेतनश्रेणी लागू करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12616....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मागितल्याप्रमाणे बैठक घ्याल का ?

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, होय. नक्की.

----

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

***मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ठेवींवर बनावट***
***कर्ज घेऊन केलेला गैरव्यवहार***

*(४) * १२७१४ श्री.महादेव जानकर : सन्माननीय पणन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ६४ कोटींच्या ठेवीवरती ६० कोटी रुपयांचे बनावट कर्ज घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, कृषी उत्पन्न बाजार समितीने कोणत्या कारणासाठी कर्ज घेतले व या कर्जासाठी परवानगी घेण्यात आली होती काय,*
*(३) असल्यास, एपीएमसीच्या सचिवांनी ठेवीची रितसर पावती न घेण्याचे कारण काय,*
*(४) सदर एपीएमसीच्या सचिवांवर कोणती कारवाई करण्यात आली व ठेवीवरती कोणाला कर्ज देण्यात आले आहे,*
*(५) असल्यास, याप्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?*

*श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.*
*(२) मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीने बँकेत ठेवी ठेवल्या होत्या. बाजार समितीने कर्ज घेतलेले नाही.*
*(३) देना बँकेकडून बाजार समितीस मुदतठेव पावत्या प्राप्त झालेल्या आहेत.*
*(४) व (५) मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या ठेवीवर देना बँकेच्या तत्कालीन मुख्य शाखा प्रबंधकांनी बाजार समितीच्या नावाने बनावट कर्ज खाते उघडून अपहार केल्याचे सी.बी.आय. तपासात निष्पन्न झाले आहे. सी.बी.आय.ने सदर प्रकरणी चौकशी करुन देना बँकेचे तत्कालीन मुख्य शाखा प्रबंधक व इतर तीन व्यक्ती यांचे विरोधात सी.बी.आय.चे विशेष न्यायालय मुंबई येथे आरोपपत्र दाखल केलेले आहे.*

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरात 64 कोटी रूपयांच्या ठेवीवर 60 कोटी रूपयांचे कर्ज घेतल्याचे मान्य केले आहे. तसेच देना बँकेकडून बाजार समितीस मुदत ठेव पावत्या प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. माझे प्रश्न असे आहेत की, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीकडून देना बँकेत 64 कोटी रूपयांची रक्कम ठेव म्हणून केव्हा ठेवण्यात आली आणि देना बँकेकडून बाजार समितीला ज्या मुदत ठेवच्या पावत्या देण्यात आल्या होत्या, त्या केव्हा प्राप्त झाल्या ?

सभापती महोदय, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ठेवीवर देना बँकेच्या तत्कालीन मुख्य शाखा प्रबंधकांनी बाजार समितीच्या नावाने कर्ज खाते उघडून अपहार झाल्याचे म्हटले आहे. तत्कालीन मुख्य शाखा प्रबंधकांनी बाजार समितीच्या नावाने बनावट कर्ज केव्हा आणि कोठे काढले, बनावट कर्ज खाते काढून किती रकमेचा अपहार झाला, सीबीआयने सदर चार्जशीट कधी दाखल केली आणि या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12714....

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सर्व सभागृहाला विचार करायला लावणारे हे प्रकरण आहे. केवळ मुंबई कृषी उत्पन्न बाजारी समितीपुरते हे नाही तर राज्यातील 3-4 महामंडळाच्या मिळून 300 कोटी रूपयांच्या बाबतीतील हा विषय आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीने देना बँकेमध्ये एफडी ठेवली, त्यामध्ये परस्पर लोन काढले, ते वापरले आणि काही कालावधीनंतर लक्षात आले की, अशा 34 महामंडळाना 300 कोटी रूपयांना गंडविण्याचा प्रकार आहे आणि त्यामध्ये त्या बँकेच्या मॅनेजरची इन्व्हॉल्व्हमेंट आहे. त्यामुळे या सर्व प्रकाराची सीबीआय चौकशी सुरूआह. सीबीआयपर्यंत ते प्रकरण गेले आहे. सीबीआयने अहवाल तयार केला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीने ॲडिशनली आपले पैसे परत मिळावेत यासाठी दोन गोष्टी करण्यामध्ये यश मिळविले आहे, एक म्हणजे त्या एफडीला रिन्यू करून देण्यासाठी आपण यशस्वी झालो आणि आपण त्याची ओरिजनल रिसिट मिळविण्यामध्ये यशस्वी झालो. आता नॅशनल कंझ्युमर फोरम म्हणजे राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे आपण तक्रार केली आहे, इतकेच नाही तर, एक अधिकारी त्यासाठी लावून रेग्यूलरली त्या संदर्भात फॉलोअप घेत आहोत. शेवटच्या सुनावणीपर्यंत हा विषय आलेला आहे. माझी खात्री आहे की, नॅशनल कंझ्युमर फोरम म्हणजे राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये यात आपल्याला न्याय मिळेल. ग्राहक म्हणून आपली फसवणूक झाली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, बाजार समितीला हे केव्हा लक्षात आले, बाजार समितीचे त्यावेळी एमडी कोण हाते आणि ही ठेव ठेवली तेव्हा एमडी कोण होते ? मला वाटते की, यामध्ये बाजार समितीचे अधिकारी, तेथील पदाधिकारी यांच्या संमतीशिवाय ही गोष्ट घडलेली नाही. आपणही सहकाराचे काम करता. सीबीआय तपासामध्ये बाजार समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर, पदाधिकाऱ्यांवर आरोप पत्र दाखल झाले की नाही, त्यामध्ये ते दोषी आहेत असे ठरविले का, ठरविले नसेल तर, वेगळ्या दिशेने तपास करण्याची शासन तयारी करणार आहे का ? कारण मोठी रक्कम ठेवली आहे. दर 6 महिन्यांनी किंवा किमान वर्षाने बाजार समितीला हे समजले



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12714....

श्री. जयंत प्र. पाटील ....

पाहिजे, त्यांनी बघितले पाहिजे. सर्व संस्थांकडून दर 2 महिन्यांनी बघितले जाते. बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी यामध्ये कसूर केला म्हणून त्यांच्यावर कारवई करण्याचे धोरण शासन राबवेल का ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सीबीआय चौकशीत हेच निष्पन्न होत आहे की, अशा प्रकारे देना बँकेचे मॅनेजर आहेत, रॅकेट निर्माण झाले आहे, जे वेगवेगळया महामंडळाच्या एफडी ड्युप्लीकेट करून लोन काढत आहे. अजून तरी सदर बाजार समितीचा सहभाग लक्षात आलेला नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या क्षणी आपण बाजार समितीच्या एखाद्या पदाधिकाऱ्याकडे शिफ्ट करू त्या क्षणी देना बँक हात वर करेल की, आम्ही हे पैसे देणे लागत नाही.

....T

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12714.........

श्री.चंद्रकांत पाटील........

त्यामुळे आपला असा प्रयत्न आहे की, देना बँकेत आपण मुदत ठेव ठेवली होती, त्या ठेव पावतीवर कर्ज काढले गेले, तेही कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अकाऊंटला शिफ्ट झालेले नाही. त्यामुळे देना बँकच यामध्ये दोषी आहे, असा स्टँण्ड आपल्याला घ्यावयाचा आहे.

-----------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*राज्यातील खाजगी विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शुल्क सवलत अभिमत विद्यापीठातील मागास व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देण्याबाबत*

*(५) *१२६४० ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.राजेंद्र जैन : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) राज्यातील खाजगी विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क सवलत दिली जाते त्याचप्रमाणे अभिमत विद्यापीठातील मागास व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शुल्क सवलत मिळावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे अभिमत विद्यापीठाकडून माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात करण्यात आली, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, शासनाने सदर विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क भरण्यास असमर्थता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, ज्याप्रमाणे राज्यातील खाजगी वैद्यकीय व अभियांत्रिकी व अन्य व्यावसायिक शिक्षक संस्थामधील प्रश्न भाग (१) मधील प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क शासन भरते त्याचधर्तीवर अभिमत विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क भरण्याचे दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. राजकुमार बडोले : (१) हे खरे नाही.*
*(२) व (३) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शिक्षण संस्थांमध्ये शासनाच्या केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या दराने शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्यात येते.*

*खाजगी अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे प्रवेश हे अभिमत विद्यापीठाच्या स्तरावर करण्यात येतात. या विद्यापीठातील शिक्षण शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येत नाही. त्यामुळे खाजगी अभिमत विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शासन शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ देत नाही.*
*(४) प्रश्न उद्‌भवत नाही.*

**सभापती :** सन्माननीय सदस्यांचे समाधान झालेले दिसते.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

----------

...3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

***मुंबईतील बीडीडी वसाहतीतील चाळीच्या दुरुस्तीबाबत***

*(६) *११२१३ श्री.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक ३७९० ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) मुंबईतील बीडीडी वसाहतीतील नागरीक हलाखीचे जीवन जगत असून या चाळीच्या पूर्ण दुरुस्तीकरीता ८०० कोटीची गरज असतांना केवळ रुपये ८ कोटी शासनाने मंजूर केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, या ८ कोटीच्या निधीतून सफाई कामगारांचा पगार, पालिकेचा मालमत्ता कर, वीज बिल भरावे लागत असून याचा खर्च ५ कोटी इतका येतो, उरलेल्या तुटपुंज्या निधीतून सर्व चाळीची दुरुस्ती शक्य नसल्याने केवळ व्हरांडे, जिने व छतांची दुरुस्ती केली जाते या कारणास्तव बीडीडी चाळीतील नागरीकांचे जीवन धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,*
*(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. चंद्रकांत पाटील : (१) अंशत: खरे आहे.*
*बीडीडी चाळींचे संरचनात्मक परीक्षण केले असता, बीडीडी चाळींच्या पूर्ण दुरुस्तीकरिता साधारणपणे रु. ७६६.०० कोटी इतक्या रकमेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात रु.१४.२६ कोटी मंजूर केले आहेत.*
*(२) हे खरे नाही.*
*(३) डिसेंबर, २०१५ च्या पुरवणी अर्थसंकल्पात रु.१५.०० कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.*
*(४) प्रश्न उद्‌भवत नाही.*

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, बीडीडी चाळीच्या दुरुस्तीकरिता 766 कोटी रुपयांची आवश्यकता असताना केवळ 14.26 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, एवढ्या तुटपुंज्या रकमेमध्ये किती खोल्यांची दुरुस्ती केली जाणार आहे आणि सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पात शासन आणखी काही निधी या कामांसाठी ॲलॉट करणार आहे का ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, बीडीडी चाळ, वरळी, एन.एम.जोशी मार्ग या ठिकाणी साधारणपणे 207 चाळी असून जवळपास 16553 खोल्या आहेत व त्यामध्ये 1 लाख लोकांची राहण्याची क्षमता आहे. या चाळींचे बांधकाम 80 ते 90 वर्षे जुने आहे. एका चाळीच्या दुरुस्तीकरिता साधारणपणे 3 लाख 70 हजार रुपये खर्च येतो. या चाळींच्या जागेची मालकी म्हाडाकडे आहे.

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11213.......

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, सन 2015-2016 मध्ये अधिकचा निधी उपलब्ध करुन देणार आहात का आणि किती चाळींची दुरुस्ती उपलब्ध निधीमधून होऊ शकेल ? अशी स्पेसिफिक माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. तशी माहिती मी काढून ठेवतो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, बीडीडी चाळींच्या संदर्भात या सभागृहात असे सांगितले जाते की, या चाळींचा पुनर्विकास केला जाणार आहे, आराखडा तयार होत आहे, आर्किटेक्ट नेमले आहेत. या चाळी 80 ते 90 वर्षे जुन्या आहेत, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. माझ्या माहितीप्रमाणे यापेक्षाही अधिक काळ या चाळींच्या बांधकामांना झाला आहे. किती वर्षाच्या बांधकामांची दुरुस्ती करावी, 90 वर्षापेक्षा अधिक काळ झालेल्या बांधकामांची दुरुस्ती केली जाऊ शकते का, या संदर्भात शासनाचे काही धोरण असेल. या चाळीतील लोकांचे जीवन सुरक्षित आहे का, या संदर्भातील धोरणही असावे. या इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाने 14 कोटी 10 लक्ष रुपये ठेवले आहेत.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी अतिशय योग्य प्रश्न विचारला आहे. कोणत्याही बांधकामाचे ठराविक आयुष्य असते. स्ट्रक्चरल ऑडिट केल्याशिवाय इमारतीचे आयुष्य किती आहे, हे आपण सांगू शकणार नाही. बीडीडी चाळींचा प्रश्न मी गेल्या 20 ते 25 वर्षांपासून ऐकतो आहे. शासनाने काही तरी धोरण घेऊन हा विषय संपवावा, असे मला वाटते.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, अनेक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट केले जात असते. कारण, जुन्या इमारतींमध्ये जीवित हानी होणार नाही, याची काळजी पावसाळ्यापूर्वी घेतली जाते. या इमारती 90 वर्षापूर्वीच्या आहेत आणि इमारतींच्या दुरुस्तीसाठी 10-15, 40-50 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले जातात. माझा प्रश्न असा आहे की, 90 वर्षानंतर शासनाने दुरुस्तीची वाट बघू नये. या दुरुस्त्या 15-20 कोटी रुपयांमध्ये होणार नाहीत. एकदा जीवित हानी सुरु झाली

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

तर ती आपल्याला रोखता येणार नाही.  कारण, त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांची संख्या खूप आहे. यासाठी शासन धोरणात्मक निर्णय किती दिवसात घेणार आहे ?

...5....



ता.प्र.क्र.11213.......

श्री.किरण पावसकर.......

सभापती महोदय, या प्रकरणी अशी धुळफेक सुरु आहे की, पुनर्विकासाच्या संदर्भात बैठका घेतल्या जातात, काही वेळा लोकप्रतिनिधींना बोलावून बैठक घेतली जाते, आराखडा समोर ठेवला जातो.  रहिवासी अधिक क्षेत्रफळाची मागणी करीत आहेत.  माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भातील धोरणात्मक निर्णय किती कालावधीत होईल ?  या इमारतींच्या बांधकामांना 90 वर्षापेक्षा अधिक काळ झालेला आहे.  असे असताना या इमारतींची दुरुस्ती करण्याचे शासनाचे अजूनही धोरण आहे का ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, ही जागा म्हाडाची आहे.  त्या अनुषंगाने माननीय गृहनिर्माण मंत्री श्री.प्रकाश महेता, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.चंद्रकांत पाटील आणि मुख्यमंत्री महोदय यांची चर्चा सुरु आहे.  त्यामुळे मला निश्चित वेळ सांगता येणार नाही.  तथापि, लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावणे आवश्यक आहे. दुरुस्तीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे.

**सभापती :** इमरजन्सी रिपेअर्स करावेच लागतात.  त्यामुळे ते बरोबर आहे.

----------

...6.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

***सोलापूर जिल्ह्यातील महादेव कोळी समाजातील शासकीय कर्मचाऱ्यांचे जातीचे दाखले अवैध ठरविल्याबाबत***

***(७) *११३६७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-***

***(१) सोलापूर जिल्ह्यातील सन १९९५ ते २००० या कालावधीत महादेव कोळी समाजाचे लोक विविध शासकीय नोकरीत कार्यरत असून त्यांच्या जातीचा दाखला अवैध ठरवूनन २५० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,***
***(२) असल्यास, ज्या कर्मचाऱ्यांवर उपरोक्त प्रमाणे कारवाई करण्यात आली अशा २ हजार कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी बँका व पतसंस्था कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याने गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,***
***(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,***
***(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?***

***श्री. विष्णू सवरा : (१), (२), (३) व (४) सन १९९५ ते २००० या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील महोदव कोळी/ कोळी महादेव जमातीचा दावा करणाऱ्या अर्जदारांपैकी २५० प्रकरणी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, पुणे यांनी जमाती प्रमाणपत्र अवैध असल्याचे आदेश निर्गमित केले.***

***जात प्रमाणपत्र व त्याच्या पडताळणीचा २००० चा कायदा तसेच २००३ चे नियम तयार केलेले आहेत. सदर अधिनियमातील कलम (८) मधील तरतुदीनुसार अर्जदार ज्या जातीचे, जमातीचे किंवा वर्गाचे आहेत. ते सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदार व्यक्तीवर आहे. तसेच अधिनियमातील कलम (१०) मध्ये जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे प्राप्त करण्यात आलेले लाभ काढून घेणेसंदर्भात तरतूद आहे.***

***समित्यांचे कामकाज हे न्यायिकवत असून अधिनियमाच्या कलम ७(२) अन्वये समितीच्या निर्णयाला केवळ मा.उच्च न्यायालयातच आव्हान देता येते.***

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, महादेव कोळी या जमातीला राज्य शासन जातीचा दाखला देत नाही. मग ही लोकवस्ती असलेले वॉर्ड राज्य शासनाने राखीव का ठेवले आहेत ? आज माझ्या तालुक्यामधील 3 ग्रामपंचायतींमध्ये गेली 15 वर्षे निवडणुकच होत नाही. गावकऱ्यांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकला आहे. त्या ठिकाणी महादेव-कोळी समाजाची वस्ती असल्यामुळे व ते वॉर्ड राखीव ठेवल्यामुळे त्यांनी बहिष्कार टाकला आहे. जोपर्यंत जातीचे दाखले दिले जात नाहीत, शासन याबाबत धोरण ठरवीत नाही, तोपर्यंत हे वॉर्ड ओपन करण्याचा निर्णय राज्य शासन घेणार आहे का ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारला आहे. त्यांनी आरक्षणाच्या संदर्भातील प्रश्न विचारला आहे. हा तारांकित प्रश्न सोलापूर जिल्ह्यातील जात पडताळणी विभागामध्ये अवैध जात प्रमाणपत्र दिल्याबाबतचा आहे. तथापि, सन्माननीय विचारलेल्या प्रश्नाचा सर्वंकष विचार करुन निश्चितपणे विचार केला जाईल.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

***पंढरपूर येथे शासकीय कार्यालयांकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत***

***(८) *१२३५१ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-***

***(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील शासकीय कार्यालये खाजगी जागेत कार्यरत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,***
***(२) असल्यास, पंढरपूर येथील शासकीय कार्यालये शासकिय जागेत उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,***
***(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?***

***श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय, हे खरे आहे.***
***(२) ज्या विभागांची शासकीय कार्यालये खाजगी जागेत आहेत. त्या विभागाने नवीन इमारत बांधणे बाबतची पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे.***
***(३) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.***

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर हे ठिकाण संबंध राज्याच्या दृष्टीने आणि भाविकांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने या ठिकाणी शासकीय सेवा उपलब्ध करुन दिली जात असते. पंढरपूरसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांमधील कमतरता वर्षानुवर्षे आपल्यासमोर आहे. शासकीय कार्यालये खाजगी जागेत असतील तर नवीन इमारती बांधण्याचे शासनाचे धोरण आहे. काही जिल्ह्यांमध्ये, तालुक्यांमध्ये असा प्रयत्न केला गेला आहे.

सभापती महोदय, येवला तालुक्यात तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांनी सर्व कार्यालये एकाच ठिकाणी येतील, ज्याला आपण मिनी मंत्रालय म्हणतो, तशा प्रकारचा प्रकल्प राबविला होता. पंढरपूरसाठी देखील अशाच प्रकारचे एकत्रित संकुल उभे राहणे आवश्यक आहे. तातडीचा विषय म्हणून शासन पंढरपूरसाठी विशेष योजना करुन सर्व शासकीय कार्यालये एका संकुलात आणून नागरिकांची सोय करणार आहे का ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, पंढरपूरमध्ये सद्य:स्थितीत एकूण 37 शासकीय कार्यालये आहेत. त्यापैकी 4 कार्यालये भाड्याच्या जागेत आहेत. सन्माननीय सदस्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-8

SRR/ AKN/ MMP/ 13:20

ता.प्र.क्र.12351.......

श्री.प्रवीण पोटे-पाटील.......

सांगितल्याप्रमाणे सर्व कार्यालये एकाच इमारतीत आल्यास नागरिकांना निश्चितपणे सुविधा उपलब्ध होते, या त्यांच्या मताशी मीही सहमत आहे. परंतु, सध्या जागेची आणि पैशांची उपलब्धता पाहिली तर त्याचा योग्य वेळी विचार करू.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे नारखेड ते हिंगणा (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) या रस्त्याच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

*(९) *१२५८५ श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) मौजे नारखेड ते हिंगणा (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) या ारस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे ग्रामस्थांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास,सरस्ता नादुरुस्त असल्यामुळे त्यावर बैलगाडी व ग्रामस्थांना चालण्यायोग्य नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, सदर रस्त्याच्या बांधकामाची चौकशी करुन पूर्ण रस्ता नवीन करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देणार आहेत काय,*
*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*
*श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय,*
*(२) नाही.*
*(३) रस्त्यांची मंजूर कामे व इतर आवश्यक कामे करण्याची कार्यवाही मंजुरी निधी, निकष, प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.*
*(४) प्रश्न उद्‌भवत नाही.*

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाच्या प्रश्न भाग -1 ला शासनाने 'होय' असे उत्तर दिलेले आहे. प्रश्न भाग -2 मध्ये "असल्यास रस्ता नादुरूस्त असल्यामुळे त्यावर बैलगाडी व ग्रामस्थांना चालण्यायोग्य नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हेही खरे आहे काय", असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे व त्याला शासनाने 'नाही' असे उत्तर दिलेले आहे. प्रश्न भाग -3 अन्वये असे विचारण्यात आले होते की, "असल्यास सदर रस्त्याच्या बांधकामाची चौकशी करून पूर्ण रस्ता नवीन करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देणार आहात काय ?"



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12585......

श्री.पांडुरंग फुंडकर.......

या रस्त्याचे फक्त माती काम करुन पूर्ण बिल काढण्यात आले आहे. रस्त्याचे फक्त मातीकाम केल्यामुळे आता त्या रस्त्यावरुन बैलगाडी सुद्धा जात नाही. तसेच, पायी चालताना देखील अडचणी येतात. रस्त्याच्या कामाचे पूर्ण बिल काढण्यात आले आहे. या रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झालेला असल्यामुळे या कामाची चौकशी करण्यात यावी, अशी ग्रामस्थांनी मागणी केली होती. परंतु, विभागाने त्याची दखल घेतलेली नाही. आजही तो रस्ता तसाच आहे. या रस्त्याच्या कामाची चौकशी करुन ज्या ठेकेदाराने काम न करता बिल काढले आहे त्या ठेकेदाराकडून तो रस्ता पुन्हा तयार करुन घेण्यात येणार आहे काय ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, भाग क्र.1 आणि भाग क्र.2 अशी 2 रस्त्यांची कामे आहेत आणि दोन्ही रस्त्यांच्या कामाची एकूण किंमत 2 लाख 99 हजार रुपये आहे. भाग क्र.1 च्या रस्त्याचे फक्त माती काम करुन ब्लँकेटिंग करण्याचे काम झालेले आहे आणि भाग क्र.2 च्या रस्त्याचे फक्त माती काम करण्यात आले आहे. आम्ही संबंधित ठेकेदारावर ताबडतोब कारवाई करण्याचा निर्णय घेतलेला आहे. जे काम खराब झालेले आहे ते त्यांच्याकडून चांगले करुन घेण्याचे आम्ही ठरविले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी अशतः काही गोष्टी मान्य केलेल्या आहेत. तो रस्ता माझ्या गावाच्या जवळचा आहे. मी स्वतः तो रस्ता बघितलेला आहे. काही ठिकाणी माती काम केलेले आहे तर काही ठिकाणी काती काम केलेले नाही, अशी स्थिती आहे. म्हणून त्याची चौकशी करुन ताबडतोब संबंधित ठेकेदारावर कारवाई करुन रस्त्याचे काम पुन्हा करण्यात यावे. जेणेकरुन शेतकऱ्यांना त्या रस्त्यावरुन ये-जा करताना अडचणी निर्माण होऊ नयेत.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12585......

**सभापती** : मंत्री महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी चौकशी करण्याची मागणी केलेली आहे. आपण चौकशी करुन उचित कारवाई करावी.

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, चौकशी करुन ताबडतोब कारवाई करण्यात येईल.

--------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्पेशल स्कूलमधील शिक्षिकांचे समायोजन करण्याबाबत**

**(10) * 12408 श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) वैशाली खमगांवकर, अंझा स्पेशल स्कूल, भायखळा, श्रीमती योगिता गावडे, अ.क. मुन्शी योजना स्पेशल स्कूल, गिरगाव, श्रीमती उज्वला मर्गल, मिरा विद्यालय स्कूल, माटुंगा यांचे रिक्त पदावर समायोजन करावे असे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर शिक्षिकांचे समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप कांबळे, श्री.राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१) व (२) मा.उच्च न्यायालयाने दिनांक ११/११/२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार श्रीमती योगिता गावडे, विशेष शिक्षीका यांचे दि.११/०९/२०१५ रोजी रिक्त पदावर समायोजन करण्यात आलेले आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, उच्च न्यायालयाने जे आदेश दिले त्या प्रमाणे श्रीमती योगिता गावडे यांचे समायोजन करण्यात आले आहे. परंतु, इतर दोन शिक्षिकांचे समायोजन करण्यात आलेले नाही. 3 शिक्षिकांपैकी 2 शिक्षिकांचे समायोजन का करण्यात आले नाही ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, स्पेशल स्कुलमधील जे शिक्षक आहेत त्यांचे समायोजन कशा पद्धतीने आणि केव्हा केले जाईल ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, उच्च न्यायालयाने या संदर्भात निर्देश दिले होते. त्या प्रमाणे एका शिक्षिकेचे समायोजन केलेले आहे. उर्वरीत 2 शिक्षिकांचे समायोजन करणे बाकी आहे. आम्ही पुढील 2 महिन्यात त्यांचे समायोजन करणार आहोत.

----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मंत्रालयातील अग्निशमन यंत्रणा सांभाळण्यासाठी मनुष्यबळ अपुरे असल्याबाबत**

**(11) * 11280 ॲड. हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मंत्रालयास लागलेल्या आगीनंतर अग्निशमन यंत्रणा भक्कम करण्यावर भर देण्यात आला होता सदरहू यंत्रणा उभारली गेली पण ही यंत्रणा सांभाळण्यासाठी मनुष्यबळाअभावी अग्निशमन यंत्रणेची स्थिती गंभीर असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यानननिदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त कारणास्तव मंत्रालयाची सुरक्षा पुन:श्च धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही,
(2) हे खरे नाही,
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, मंत्रालयाच्या इमारतीला आग लागल्यानंतर अग्निशमन यंत्रणा जास्तीत जास्त सक्षम करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मंत्रालयातील अग्निशमन यंत्रणा सांभाळण्यासाठी किती मनुष्यबळ आवश्यक आहे याबाबतची माहिती त्यांच्या पदांच्या वर्गिकरणानुसार देण्यात यावी. तसेच, आज आपल्याकडे किती मनुष्यबळ उपलब्ध आहे ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, मंत्रालयाच्या इमारतीला आग लागल्यानंतर हा विषय खूप ऐरणीवर आला होता. आपण अग्निशमन यंत्रणा मोठ्या प्रमाणावर सक्षम करण्यात आली आहे. भविष्यात असा कोणताही प्रकार होऊ नये या दृष्टीने जेवढे कर्मचारी आवश्यक आहेत त्या प्रमाणे कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**सभापती** : ज्यावेळी मंत्रालयाच्या इमारतीला आग लागली त्यावेळी मी देखील मंत्रालयात होतो. विधान सभेत, विधान परिषदेत आल्यानंतर माझ्या समोर एक प्रश्न आला की, विधान सभेची इमारत, मंत्रालयाची इमारत, मंत्री महोदयांचे बंगले किंवा इतर सरकारी इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले आहे काय ? दुसरे म्हणजे, फायर ऑडिट झालेले आहे काय आणि तिसरी गोष्ट म्हणजे या सर्वच ॲसेट्‌सच्या बाबतीत आपण इन्श्योरन्स जो फायनान्स डिपार्टमेंटचा भाग असतो,

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11280......

**सभापती**.......

आता ते नाव मला आठवत नाही. परंतु, फायनान्स डिपार्टमेंटकडून शासनाच्या सर्व ॲसेट्स इन्शुअर्ड आहेत काय ? आपण याची सखोल चौकशी करुन पुढील अधिवेशनापर्यंत ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यातील मंत्रालयासारख्या मुख्य इमारतीमध्ये अशी घटना घडण्याची शक्यता असताना आता आपण ती यंत्रणा अधिक सक्षम केली आहे, अशा मोघम उत्तराची आम्हाला अपेक्षा नाही. तेथे कोणती यंत्रणा पाहिजे, पूर्वी किती कर्मचारी होते आणि आता आपण त्यामध्ये किती वाढ झालेली आहे, आता किती कर्मचारी आहेत, त्यातील वरिष्ठ दर्जाचा अधिकारी कोण आहे आणि तो अधिकारी सतत 24 तास सजग राहील या दृष्टीकोनातून मंत्रालयात कोणती व्यवस्था करण्यात आली आहे ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मंत्रालयाच्या इमारतीला आग लागल्यानंतर तेथे एकूण किती कर्मचारी असावेत, आग लागल्यानंतर काय केले पाहिजे या संदर्भातील जवळपास सर्व गोष्टी पूर्ण झालेल्या आहेत. मी क्रमाने ती माहिती आपल्याला देतो. मंत्रालय इमारतीच्या अग्नी सुरक्षेसाठी 1 अग्नी सुरक्षा अधिकारी, 3 प्रमुख अग्निशामक विमोचक व 4 अग्निशामक विमोचक अशी एकूण 8 पदे मंजूर असून त्यापैकी रिक्त असणाऱ्या पदांवर मंत्रालय इमारतीच्या अग्निशमन कक्षामध्ये अग्नि सुरक्षेच्या कामासाठी 6 अग्निशमक विमोचकांची पदे भरलेली आहेत. म्हणजे 8 पदांपैकी 6 पदे भरलेली आहेत. प्रत्येक पाळीसाठी 2 कर्मचारी याप्रमाणे 3 पाळ्यांमध्ये 6 कर्मचारी मंत्रालय अग्निशमन कक्षात कार्यरत आहेत. मुंबई अग्निशमन दलाचे ॲडिशनली प्रत्येक पाळीसाठी 12 असे 36 कर्मचारी कार्यरत आहेत. म्हणजे 36 अधिक 6 असे एकूण 42 कर्मचारी आग लागल्यानंतर घ्यावयाची काळजी, धावपळ यासाठी कार्यरत आहेत. त्यामुळे आता या विषयात आपण पुरेसे वेलप्रुफ झालेलो आहोत.

श्री.प्रभाकर घार्गे : सभापती महोदय, मंत्रालयाच्या इमारतीला आग लागल्यानंतर बऱ्याच बाबी समोर आलेल्या आहेत. माझा प्रश्न असा आहे की, केवळ मंत्रालयच नाही तर जिल्ह्याच्या ठिकाणी देखील पाणी आणि फोम असणारे अग्निशमन दल आपल्याला उभे करावे लागणार आहे.

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11280......

श्री.प्रभाकर घार्गे.......

औद्योगिक वसाहतींमध्ये देखील असे प्रश्न निर्माण झालेले आहेत. म्हणून आपण सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी पाणी आणि फोम अशा पद्धतीने अग्निशमन दलाची पुढील काळात व्यवस्था करणार आहात काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, मंत्रालयात खूप चांगली व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--------

..7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी</u>**

**सभापती** : आज दिनांक 22 डिसेंबर, 2015 रोजी श्री.संजय दत्त वि.प.स. यांनी सकाळी 900 वाजता "कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत 27 गावांचा विरोध असताना समावेश करण्यात आला असणे, या गावांच्या समस्यांकडे महानगरपालिकेचे होत असलेले दुर्लक्ष, माननीय मुख्यमंत्र्यांनी 27 गावांची स्वतंत्र नगरपालिका करण्यात येईल व या गावांचा विकास करण्यात येईल असे जाहीर आश्वासन दिले असून त्याबाबत अध्यादेशही जारी करण्यात येणे, परंतु शासनाने या घोषणेची पूर्तता न केल्यामुळे कल्याण-डोंबिवलीतील 27 गावांमधील नागरीकांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी." याबाबत म.वि.प. नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सर्व कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे. तथापि, विषय महत्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची अनुमती देत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या घोषणेच्या अंमलबजावणी विषयी मला म.वि.प. नियम 289 अन्वये धोरणात्मक प्रश्न उपस्थित करावयाचा आहे. 15 मे रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेसंबंधी सरकारने एक शासन निर्णय निर्गमित केला आणि जी 27 गावे आहेत त्यांचा समावेश 1 जून पासून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत होईल अशी घोषणा करण्यात आली. 27 गावातील जनतेचा, सर्व पक्षीय संघर्ष समितीचा विरोध असताना शासनाने हे पाऊल उचलले आहे. त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या एका स्थानिक आमदाराने सांगितले की, आमच्या मित्र पक्षाने आमची दिशाभूल केलेली आहे. शासनाने यू टर्न घेऊन महानगरपालिकेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु असताना मुख्यमंत्री महोदयांनी 7 सप्टेंबर रोजी ही गावे महानगरपालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपालिका केली जाईल, असा शासन निर्णय निर्गमित केला.

..V-1...

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त...

त्यावेळी निवडणूक प्रक्रिया सुरु होती, त्यामुळे निवडणूक आयोगाने या निर्णयाला स्थगिती दिली होती. मात्र माननीय मुख्यमंत्री यांनी जाहीर सभेत अशी घोषणा केली की, निवडणूक संपल्यानंतर 27 गावांची स्वतंत्र नगरपालिका केली जाईल. ही घोषणा रेकॉर्डवर आहे. 1 नोव्हेंबर रोजी निवडणुकांचे निकाल आले आहेत, त्यानंतर आता डिसेंबर महिना संपत आला आहे, त्या गावांच्या संदर्भातील माहिती मी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकाडून घेतली, त्या ठिकाणी एका वर्षाची 40 कोटी रुपये ही ऑपरेशनल कॉस्ट आहे, पाच वर्षात त्या ठिकाणी 2000 कोटी रुपये लागणार आहेत, दरवर्षी 400 कोटी रुपये 27 गावांच्या विकासासाठी लागणार आहेत, इतका खर्च करण्याची क्षमता महानगरपालिकेची नाही. स्वतंत्र नगरपालिकेची घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी केली होती, त्याची अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे. ही नगरपालिका केव्हा होते याकडे स्थानिक गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे, म्हणून नियम 289 अन्वये मला ही चर्चा उपस्थित करायची आहे, महत्वाचा विषय असला तरी आपण चर्चा करण्याची संधी देऊ शकणार नाहीत तरी देखील किमान शासनाने यावर निवेदन करावे अशी मी मागणी करतो.

**सभापती** : शासनाने निवेदन करावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी अतिशय महत्वाचा विषय उपस्थित केलेला आहे. महाराष्ट्रातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पूर्व संध्येला 6500 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करणे, तसेच 27 गावांची नगरपालिका जाहीर करणे, हा एक महत्वाचा विषय आहे. यासंदर्भात आपण शासनाला निवेदन करण्याचे निर्देश दिले आहेत.

**सभापती** : ठीक आहे, आज दिनांक 22 डिसेंबर, 2015 रोजी सर्वश्री. धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, हेमंत टकले, वि.प.स. यांनी सकाळी 9.01 वाजता तसेच सर्वश्री.धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनिल तटकरे, शरद रणपिसे, हेमंत टकले, जयंत पाटील, संजय दत्त, राजेंद्र मुळक, सभाष झांबड, अमरनाथ राजूरकर, मुझफ्फर हुसेन, यांनी सकाळी 9.05 वाजता "मराठवाडा विदर्भासह राज्यातील सर्व भागात भीषण दुष्काळ होऊन नापिकी आणि कर्जबाजारीला कंटाळून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती...**

शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात प्रचंड वाढ होणे, त्यावर मदत व उपाययोजना करताना शासनास आलेले अपयश" या विषयाबाबत म.वि.स. नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते व इतर सर्व सदस्यांकडून आलेल्या म.वि.स. नियम 289 च्या प्रस्तावाचा निर्णय घेतांना मी दोन्ही प्रस्ताव एकत्रित चर्चेला घेत आहे, असा मी निर्णय दिलेला होता. सदरहू निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक 14,15 व 16 डिसेंबर, 2015 रोजी या प्रस्तावावर चर्चा झाली आहे, दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी या प्रस्तावावर माननीय कृषी मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सभागृहात सविस्तर उत्तर दिले आहे. एकदा सभागृहात या विषयावर सखोल चर्चा होऊन त्यावर मंत्री महोदयांनी शासनाची भूमिका स्पष्ट केल्यावर पुन्हा तो विषय सभागृहात चर्चेला घेणे मला उचित वाटत नाही. त्याप्रमाणे हा विषय आजच्या कामकाज पत्रिकेच्या विषयात समाविष्ट नाही. या सर्व बाबी लक्षात घेता मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे पटलावर ठेवणे.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मोर भवन बस स्थानकाची जागा महानगरपालिकेला देण्याबाबत महापौर व इतर यांचा मोर्चा या विषयावर श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत दिनांक १६ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या आश्वासनानुसार माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-----

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांना सदरहू अहवाल विधानमंडळाच्या WWW.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदर अहवाल सन्माननीय सदस्यांना विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदर अहवाल सन्माननीय सदस्यांना विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V-4

VVK/ MMP/ AKN/ 13:40

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे सन २०००-२००१ ते २००७-२००८ या वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.रविंद्र वायकर (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचा सन 2012-2013 या वर्षांचा अंकेक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अंकेक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा सन २०१३-२०१४ या वर्षांचा अंकेक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अंकेक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचे सन २०१३-२०१४ या वर्षांचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह) सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे अंकेक्षण अहवालासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V-5

VVK/ MMP/ AKN/ 13:40

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षांचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०१०, २०११, २०१२, २०१३ व २०१४ या वर्षांचा अनुक्रमे बारावा, तेरावा, चौदावा, पंधरावा व सोळावा वार्षिक अहवाल तसेच सन २०१०-२०११ ते २०१३-२०१४ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री.प्रविण पोटे-पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती शोभा फडणवीस (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर करते.

**सभापती** : रोजगार हमी योजनेचा दुसरा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

-----

...7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

श्री.जयंवतराव जाधव : सभापती महोदय, मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. आजच्या लोकमत वर्तमानपत्रामध्ये अतिशय गंभीर बातमी छापून आली आहे, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे स्फुलिंग चेतविणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पणती, पोलीस कॉन्स्टेबल होती, तिला आठ महिन्यापूर्वी कराड येथील कृष्णा हॉस्टीटलमध्ये जळालेल्या अवस्थेत ॲडमिट करण्यात आले होते. त्यानंतर मी मयत झाली आहे. तेथे सुनील इंगळे नावाची व्यक्ती होती. मुलीचे आईवडील हॉस्पीटलमध्ये गेल्यानंतर ती युवती कशाने भाजली होती, तिचा मृत्यू कशामुळे ओढवला याबाबत कराड येथील पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आली होती. इतके महिने होऊन गेले तरी याबाबत काही तपास लागलेला नाही. त्या मुलीच्या आईने अनेकांच्या भेटी घेऊन तिच्या पदरी निराशा आलेली आहे. त्यामुलीची हत्या झाली आहे. तिच्या कुटुंबांना सदर इसमाकडून धमक्या मिळत आहेत, असे वर्तमानपत्रात छापून आले आहे. मी आपल्यावतीने शासनाला विनंती करतो व आपण देखील शासनाला स्पष्ट निर्देश द्यावेत की, या कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा.

**सभापती** : शासनाने दखल घेऊन निवेदन करावे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी अतिशय महत्वाचा विषय औचित्याच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे. नुकतेच पनवेल येथे महाराष्ट्र प्रताप बटेलियन या संस्थेने नथुराम गोडसे, यांच्या मृत्युचा दिवस बलिदान दिवस म्हणून साजरा केला आहे. पुण्यामध्ये गांधीजींच्या मारेकऱ्यांना संत ठरविणारे पुस्तक निघाले आहे. महाराष्ट्रात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे मारेकरी नथुराम गोडसे यांचे संत म्हणून उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न पध्दतशीरपणे सुरु आहे. असंहिष्णुतेला खतपाणी घालणाऱ्या घटना महाराष्ट्र राज्यात सुरु आहेत. जाती जातीत तेढ निर्माण करण्याचे प्रकार राज्यात सुरु असून या घटनांना राज्य सरकारकडून खतपाणी घातले जात आहे. या संस्थांवर कारवाई करण्यास राज्य शासन अक्षम दुर्लक्ष करीत आहे.

....W-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त........

राज्यात असहिष्णुतेचा विषय चिंतेचा बनला असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या संघटनांवर कठोर कारवाई करण्याची गरज या औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

**सभापती** : शासनाने दखल घ्यावी आणि निवेदन करावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, यावर्षी अल्प पर्जन्यामुळे कापसाला योग्य बाजारभाव न मिळाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडणे, दुष्काळग्रस्त मराठवाडा आणि विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी विशेष पॅकेज आणि बोनसची मागणी करणे, शासनाने याबाबत कोणतीही कारवाई न केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आणि असंतोषाची लाट निर्माण होणे, गुजरात सरकारने कापसाला किमान आधारभूत किंमत कमी करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 500 रुपये बोनस जाहीर करणे, गुजरातचे मॉडेल आदर्श मानून महाराष्ट्र शासनाने कापूस उत्पादक शेतक-यांना कोणताही दिलासा न देणे, राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात आत्महत्या करणे, मराठवाडा आणि विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गुजरात राज्याच्या धर्तीवर आधारित प्रती क्विंटल 1000 रुपये किमान बोनस देण्यात यावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

**सभापती** :शासनाने दखल घ्यावी व निवेदन करावे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याच्या मुद्दा आहे. सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये अनेक प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा 100 टक्के अनुदानावर आहेत, त्या शाळांमधील सर्व शिक्षकांना वित्त विभागाच्या निर्णयानुसार 30 टक्के घरभाडे भत्ता व अन्य पूरक भत्ते मिळतात. कल्याण ग्रामीण क्षेत्रामधील 27 गावे कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात समाविष्ट करणारा अध्यादेश शासनाने काढला असून या 27 गावांमध्ये कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या निवडणुकांही झाल्या आहेत. 27 गावातील शासनमान्य प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महापालिका क्षेत्रात 30 टक्के घरभाडे भत्ता लागू असताना दुर्दैवाने या कर्मचाऱ्यांना हा भत्ता दिला जात नाही. हे कर्मचारी या लाभापासून वंचित झालेले आहेत. या सर्व शिक्षकांनी शासनाला विनंती करुनही कार्यवाही झालेली नाही. म्हणून शासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला करीत आहे.

**सभापती** : शासनाने कार्यवाही करावी.

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, कार्यवाही केली जाईल.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, पनवेल तालुक्यातील सिडको वसाहतीमध्ये वहाळ ग्रूप ग्रामपंचायत आहे. त्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये एकमुखी मागणी करुन महिलांनी दारु दुकान गावामध्ये नको म्हणून ठराव केला. ग्रामपंचायतीची एनओसी घेतली नसताना राजरोसपणे दारुचे दुकान सुरु आहे. याही पुढे जाऊन पंचायत क्षेत्रातील ग्रामस्थांनी विशेषतः महिलांनी मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला असताना तेथील पालीस निरीक्षक श्री.बागडे यांनी तेथील बार मालक श्री.विजय शेट्टी यांना खंडणी मागतो म्हणून राजेंद्र पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करावा असे सांगितले. श्री.बागडे यांनी ताबडतोब महिला व बाजार समितीचे चेअरमन श्री.राजेंद्र पाटील यांना बोलावले आणि गुन्हयाखाली आत टाकतो, तुम्ही मोर्चा काढू शकत नाही, गावातून कपडे काढून मिरवतो अशी धमकी द्यायला सुरुवात केली. इतकेच नव्हे तर त्यांनी तेथील सिडको वसाहतीत स्वतःच्या नावाचे रेशन कार्ड काढले असून खोट्या नावाने वेगवेगळया शेतकऱ्यांचे सिडकोचे प्लॉट विकत घेतले आहेत.

शासनाने या बाबीकडे तातडीने लक्ष द्यावे आणि ताबडतोब दारुचे दुकान बंद करावे व श्री.बागडे यांची उच्च पातळीवरुन चौकशी करुन त्यांना तातडीने निलंबित करावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

**सभापती** : शासनाने कार्यवाही करावी आणि निवेदन करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : त्या गावामधील वातावरण दूषित झाले आहे. महिला रस्त्यावर आलेल्या आहेत. त्यांना किमान मोर्चा काढायला तरी परवानगी द्यावी अशी विनती करतो.

**सभापती** : गृह राज्यमंत्र महोदय, उद्या निवेदन करावे.

श्री.एकनाथराव खडसे : उद्या निवेदन करण्यात येईल.

--------


असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने उथळसर येथील क्रांतीनगर वसाहतीत अनेक वर्षापासून रहात असलेल्या कुटुंबांच्या आणि दारिद्र्य रेषेखालील मागासवर्गीयांच्या 200 झोपड्या दिनांक 15.12.2015 रोजी तोडल्या. या झोपड्या थंडीच्या दिवसात महापालिकेने तोडल्या असल्यामुळे गोरगरिब मागासवर्गीय नागरिकांची ससेहोलपट होत आहे. झोपड्या तोडल्यामुळे विद्यार्थी, रूग्ण यांना हालअपेष्टा सहन करावी लागत आहे. परिणामी झोपड्या तोडल्यामुळे स्थानिक जनतेमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. झोपडीधारकांचे लवकरात लवकर पुनर्वसन करावे अशी माझी या माध्यमातून शासनाला विनंती आहे.

**सभापती** : शासनाने दखल घ्यावी.

---

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, यवतमाळ जिल्हयातील नेर तालुक्यातील मारवाडी येथील एक युवा शेतकरी विशाल नामदेव पवार, वय 30 वर्षे याने सलग तीन वर्षे सततची नापिकी व कर्जबाजारीपणा याला कंटाळून आत्महत्या केली असल्याची दुर्दैवी घटना घडली असल्याचे डिसेंबर, 2015 च्या दरम्यान निदर्शनास आलेले असणे, या शेतक-याची एकूण 36एकर जमीन असणे, मात्र गेली तीन वर्षे कष्ट करुनही नापिकीच होत असल्याने तो कंटाळला असणे, त्यातच तीन वर्षापूर्वी त्यांनी नेर अर्बन पतसंस्थेकडून शेतीच्या कामासाठी दीड लाखाचे कर्ज उचलले असणे, पतसंस्थेच्या कर्जावरील व्याज जास्त असल्याने त्यांना कर्ज परतफेड करणे शक्य होत नसणे, याशिवाय स्टेट बँकेचेही कर्ज त्यांच्या शिरावर असणे, पीक चांगले निघाले की संपूर्ण कर्ज फेडायचे असा त्यांना विश्वास असणे, पण 36 एकरातून त्यांना फक्त 11 क्विंटल सोयाबीन पीक मिळाले असणे, त्यामुळे ते कर्ज फेडायचे की कुटुंबाच्या गरजा भागवायच्या या विचारांनी ग्रासलेले असणे, त्यामुळे त्यांनी विहिरीत उडी मारुन आत्महत्या केलेली असणे, आत्महत्येपूर्वी माननीय महसूल राज्यमंत्री यांना त्यांनी पत्र लिहून माझ्या पश्चात माझे कर्ज माफ करावे अशी विनवणी केलेली असणे, परंतु शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफ करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही, अशा या महत्त्वाच्या विषयाकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, 36 एकर जमिनीमध्ये 11 क्विंटल सोयाबीन पीक आल्याने शेतकऱ्यांची काय अवस्था होत असावी हे या एका गोष्टीवरुन लक्षात येते. त्या शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाची तो परतफेड करु शकत नाही म्हणून त्याने मंत्री महोदयांच्या नावे पत्र लिहून कर्ज माफ करण्याची विनंती केली आहे. शासन या कर्जाच्या परतफेडीबद्दल आर्थिक तरतूद केली पाहिजे.

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

सन्माननीय मंत्र्यांचा तो मतदार संघ आहे. तेव्हा कर्ज फेडण्याच्या दृष्टीने शासनाने पावले उचलावित ही विनंती.

**सभापती :** शासनाने निवेदन करावे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा दुसरा औचित्या मुद्दा आहे. राज्यातील अपंग खेळाडुंच्या क्रीडा संघटनेला राज्य क्रीडा संघटनेची मान्यता आणि शासकीय नोकरीमध्ये हवे असलेले 5 टक्के आरक्षण या दोन्ही बाबींची पूर्तता होत नसल्याच्या कारणांवरून विविध शासकीय कार्यालयात नोकरीस लागलेल्या राज्यातील 10 अपंग खेळाडूंना नोकरी गमावण्याची वेळ आली असल्याचे माहे डिसेंबर 2015 च्या दरम्यान निदर्शनास आलेल असणे, अपंग क्रीडा क्षेत्रात मान्यताप्राप्त असलेल्या पॅरा ॲथलेटिक्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (पाम) या संघटनेने मान्यतेसाठी नोव्हेंबर 2013 मध्ये आवश्यक दस्तऐवजासह अर्ज सादर केलेला आहे. राज्य शासनाने मान्यता प्रदान केली आणि अंतिम कारवाईसाठी पुण्यातील क्रीडा आयुक्तांच्या कार्यालयाकडे फाईल पाठवली असणे, परंतु शासनाच्या अक्षम्य दुर्लक्षतेमुळे ही फाईल तशीच धूळ खात पडून आहे. त्यामुळे राज्यातील 10 अपंग क्रीडापटुंना लागलेल्या नोकऱ्या घालविण्याची वेळ आलेली आहे. या दप्तर दिरंगाईमुळे या अपंग क्रीडापटुंचे भवितव्य अंधारात आलेले असणे, उदरनिर्वाहासाठी श्री.चंदन रंगराव महिंद्रे या अपंग खेळाडूची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची होणे, त्यामुळे शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेऊन या 10 अपंग खेळाडूंच्या नोकऱ्या अबाधित ठेवण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

**सभापती :** शासनाने उचित कारवाई करावी.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील कॅन्टीनवाल्याने विद्यार्थ्यांना मारहाण केलेली आहे. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या दरा पेक्षा जास्त दराने अन्नपदार्थ का विकतो अशी विचारणा त्या विद्यार्थ्याने केली म्हणून त्यास बेदम मारहाण केली आहे. यावेळी विद्यापीठात एकही अधिकारी जागेवर नव्हता. कुलगुरू नेहमी दौऱ्यावर असतात. आता येथे माननीय उच्च शिक्षण मंत्री आहेत. तेव्हा ते सदर कंत्राट ताबडतोब रद्द करणार आहेत काय, कारण ही या आठवड्यातील तिसरी घटना आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विद्यापीठाच्या कॅन्टीनमध्ये ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक दर घेतल्याची तक्रार विद्यार्थ्याने केल्यामुळे त्या विद्यार्थ्यास कॅन्टीनमधील कर्मचाऱ्यांनी मारले असेल तर ते कॅन्टीनच्या मालकाच्या सांगण्यावरूनच आहे असा अर्थ निघतो. तेव्हा याबाबतची चौकशी करण्यात येईल. यात खरे असेल तर विद्यार्थी केंद्रित शिक्षणाचा विचार करणारे हे सरकार असल्यामुळे त्या कॅन्टीनवाल्याला तेथून हाकलल्याशिवाय राहणार नाही.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मौजा देऊरवाडी ता.दिग्रस, जिल्हा यवतमाळ येथील मयत श्री.राम तुकाराम बुटले व श्री.दत्तात्रय तुकाराम बुटले विरूद्ध शासन या प्रकरणात दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, दारव्हा यांचा निर्णय दिनांक 1 ऑक्टोबर 2014 रोजी झालेला असून तसेच सरकारी वकील दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर यांचा निर्णय झालेला असून सदर प्रकरणी दिनांक 5 मे 2015 रोजी कार्यकारी अभियंता, अरूणावती प्रकल्प विभाग, दिग्रस यांच्याकडे निधीची परिगणना करून प्रस्तावित निधीची मागणी करण्यात येणे, दिग्रस यांनी दिनांक 18.9.2015 अन्वये, सह सचिव, विधि व न्याय नागपूर यांच्या अभिप्रायाची आवश्यकता असल्याचे कळविण्यात येणे, मात्र अद्याप अभिप्राय प्राप्त न झाल्याने सदर भूसंपादनाची निधीची रक्कम मिळालेली नसल्याने मा.सहसचिव विधि व न्याय यांचा अभिप्राय तातडीने पाठविण्याची कारवाई करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

**सभापती :** शासनाने निवेदन करावे.

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, बीड जिल्ह्याचे विभाजन करून अंबाजोगाई जिल्ह्याची निर्मिती करण्याची मागणी लोकप्रतिनिधीसह विविध सामाजिक संघटना व नागरिकांनी करणे, या मागणीसाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्यात येणे, जिल्हाधिकारी बीड यांना अंबाजोगाई जिल्हा निर्मितीचा प्रस्ताव सकारात्मक शिफारशीसह सन 2008 मध्ये शासनास सादर करणे, विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी या बाबतचा प्रस्ताव शिफारशीसह सन 2009 मध्ये शासनास सादर करणे, राज्यातील नवीन जिल्हा निर्मितीसाठी नेमण्यात आलेल्या अपर मुख्य सचिवांच्या समितीची मुदत दिनांक 31.12.2015 रोजी पूर्ण होणे, या समितीसमोर सकारात्मक शिफारशीसह अंबाजोगाई जिल्ह्याचा प्रस्ताव सादर करणे, जिल्ह्यातील लोक प्रतिनिधी, तसेच सामाजिक संघटना यांची आग्रही मागणी लक्षात घेता बीड जिल्ह्याचे विभागजन करून नवीन अंबाजोगाई जिल्ह्याची निर्मिती करण्यात यावी अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

**सभापती :** शासनाने निवेदन करावे.

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील 1170 विनाअनुदानित वर्ग तुकड्यांना 1 डिसेंबर 2007 पासून अनुदान देण्यात आलेले आहे. 1170 वर्ग तुकड्यांमध्ये रायगड जिल्ह्यातील 65 वर्ग तुकड्यांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यातील तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सदर 65 वर्ग तुकड्यांना अनुदान वितरित करताना शिक्षकांना अनुदान दिले, मात्र त्या वर्गांवर काम करणाऱ्या मंजूर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या अनुदानापासून आजपर्यंत वंचित ठेवले आहे. त्यामुळे गेली आठ वर्षे या 1170 शाळांमधील एकूण 18 शिक्षकेतर कर्मचारी शिक्षणाधिकाऱ्यांच्या आठमुठ्या भूमिकेमुळे अुनदानापासून वंचित आहेत. तरी सदर कर्मचाऱ्यांना डिसेंबर 2007 पासून 2013 पर्यंतचे अुनदान वितरित करण्यात यावे एवढीच मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी एक चांगला मुद्दा उपस्थित केला आहे. हे खरे आहे की, विना अनुदान तत्त्वावर शिक्षकांना आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्यता मिळते. अनुदानावर येताना शासन शिक्षकांना मान्यता देते. मात्र, शिक्षकेतर कर्मचारी वगळलेल आहेत, वगळले जातात. या संदर्भात न्यायालय प्रकरण झाले आहे. न्यायालयाने निदेश दिलेले आहेत. एवढेच नव्हे तर अवमान याचिका देखील दाखल झाली आहे. न्यायालयाचा निदेश, अवमान याचिका याची दखल घेऊन तातडीने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदान देण्यात येणार आहे काय ? आता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदानावर आणण्यात येते. पण मधल्या 8 ते 10 वर्षातील जे वंचित आहेत त्यांना अनुदान देण्यासबंधी कृपया आपण निदेश द्यावेत.

**सभापती :** ठीक आहे. शासनाने निवेदन करावे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. इयत्ता पाचवीचे परिसर अभ्यासक्रमाचे जे पुस्तक आहे ते मराठीत उपलब्ध आहे. पण सेमी इंग्रजी किंवा इंग्रजी माध्यमासाठी ते इंग्रजीमध्ये उपलब्ध नाही. ते तातडीने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

**सभापती :** ठीक आहे.

Y-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशनचा मुद्दा आहे. आज सकाळी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा अपूर्ण असून अंतिम आठवडा प्रस्तावाला अद्याप सुरुवात झालेली नाही त्यामुळे या विषयावरील चर्चेला कधी सुरुवात केली जाणार आहे.

**सभापती** : लक्षवेधी सूचना झाल्यानंतर यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल. आता नियम 93 अन्वयेच्या सूचना घेण्यात येतील.

सन्माननीय मंत्री महोदय श्री. एकनाथराव खडसे यांनी त्यांच्यासंदर्भात ज्या सूचना आहेत त्या चारही सूचनांचे ते एकत्रीत उत्तर देणार आहेत. सूचना क्रमांक 29 ही सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे, सतीश चव्हाण यांनी दिली आहे परंतु ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आता सूचना क्रमांक 24 घेण्यात येईल.

**पृ.शी./मु.शी.** : मुंबईत विविध ठिकाणी मच्छिमारांना सागरी सुरक्षेच्या नावाखाली मच्छिमारी करण्यासाठी अनेक समस्यांना तोड द्यावे लागणे याबाबत श्री.जयंत पाटील,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. एकनाथराव खडसे ( मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 24 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील :सभापती महोदय, सागरी सुरक्षेच्या नावाखाली मच्छिमारांची मोठया प्रमाणात पिळवणूक होत आहे. मुंबई, कप परेड, ससून डॉक,मनोरी,गोराई,खारदांडा, जुहू, व्हिक्टोरिया डॉक आणि वर्सोवा याठिकाणी कुपन पध्दतीने करण्यात येते. यामध्ये माझा विरोध नाही परंतु यामध्ये सुसूत्रता आणली पाहिजे. किनाऱ्यावर बोरे टाकले पाहिजेत. या ठिकाणी जलवाहतुक मोठया प्रमाणात होत असते. या ठिकाणी बोरे टाकण्याचे काम राज्य शासन जलवाहतुकीच्या दृष्टीने आणि मच्छिमाराची जाळी तुटणार नाही म्हणून करेल काय, तसेच कुपनमध्ये पारदर्शकता येऊन कुपन जलदगतीने उपलब्ध करुन दिले जाईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सूचनेचा विचार करु. सजेशन फॉर ॲक्शन.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** :सासवणे(ता.अलिबाग,जि.रायगड) येथील इंद्रपै येथील गट नं. 97 मध्ये चुकीचा 7/12 उतारा तयार करणे, श्री. श्री.राकेश कुमार वधावन यांनी आपल्या बंगल्यासाठी पुलाचे बांधकाम करण्याकरिता खाजण जमिनीतील कांदळवनाची केलेली अवैध तोड याबाबत श्री.जयंत पाटील,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. एकनाथराव खडसे ( मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 12 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील :सभापती महोदय, मुंबईचा बंगलेवाला पाईप टाकून पाणी अडवित असल्यामुळे समुद्राच्या पाण्यामुळे लोकांचे नुकसान होत आहे. खरे म्हणजे पाईप टाकून पाणी अडविण्यास परवानगी नाही. पाणी अडवावयाचे असेल तर एमएमपीची परवानगी घ्यावी लागत असते. या गृहस्थाने अतिक्रमण केल्याची तक्रार ग्रामस्थांनी केलेली आहे. या ठिकाणी असलेले त्याचे ठेकेदार दादागिरी करुन दहशत निर्माण काम करीत आहेत. संबंधितांवर फौजदारी केसेस दाखल केल्याचे माननीय मंत्री महोदयांनी कबूल केलेले आहे. त्यामुळे याठिकाणचे काम ताबडतोब बद करुन या ठिकाणी जे पाईप टाकलेले आहेत ते तातडीने काढण्याचे काम शासन करेल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अशा स्वरुपाच्या सूचना खाली अगोदरच देण्यात आलेल्या आहेत. त्यासंदर्भात काय कारवाई झालेली आहे याची माहिती घेण्यात येईल.

-------

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अरविंद सावंत : सभापती महोदय, विधानसभेत चर्चा असल्यामुळे माझ्या संदर्भातील नियम 93 सूचना अगोदर घेण्यात याव्यात अशी विनंती आहे.

**सभापती :** ठीक आहे.

**पृ.शी./मु.शी.** : नागपूर शासकीय प्रादेशिक मनोरुग्णलयातील विविध सुविधांअभावी रुग्णांचे होत असलेले आतोनात हाल याबाबत सर्वश्री माणिकराव ठाकरे,वि.प.स यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ. अरविंद सावंत ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 34 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,नागपूर शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालयात विविध सुविधा अभावी मानसिक रुग्णांचे मोठया प्रमाणात हाल होत आहेत. नागपूर शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालय हे भव्य रुग्णालय आहे. या ठिकाणी सुविधा नसल्यामुळे त्यासंदर्भात बऱ्याचशा तक्रारी आहेत त्यामुळे या नागपूर शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालयाला सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. नागपूर शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालयाची अवस्था कोंडवाडया सारखी झाली असून सरकारी अनस्थेमुळे रुग्णालयाची अवस्था बिकट झाल्याची बाब 13 डिसेंबर रोजी उघडकीस आली आहे. दररोजच्या ताणतणावामुळे तसेच कामाचा अतिरिक्त बोजा पडत असल्यामुळे मनोरुग्णांची संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. सद्य:पिरिस्थितीत सदर रुग्णालयात आजही जुन्याच पध्दतचे उपचार व औषधोपचार सुरु आहे. तुरुंगातील कैद्यापेक्षा या ठिकाणच्या मनोरुग्णांची अवस्था वाईट आहे. सदर रुग्णालयात 140 रुग्ण बरे होऊन कुणाला 10 तर कुणाला 50 वर्षे झाली असूनही त्यांच्या नातेवाईकांनी त्यांच्याकडे पाठ फिरवल्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या मनोरुग्णाला वर्षाकाठी 5 लाख रुपयांचा निधी मिळतो तो सद्य:स्थितीत अपुरा पडत आहे. या सर्व बाबीकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,परिणामी मनोरुग्णालयातील कर्मचारी व सर्वसाधारण जनतेत तीव्र असंतोष पसरला आहे. त्यामुळे शासनाने यासंदर्भात माहिती द्यावी अशी विनंती आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, नागपूर शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालय खूप जुने आहे. या रुग्णालयाला कोंडवाडा म्हणणे चुकीचे होईल. या ठिकाणी बेड ऑक्यूपन्सी 70 % आहे. या ठिकाणी "ड" गटातील स्टाफ कमी आहे. "ड" गटातील 75 पदे रिक्त आहेत. "क" गटातील 18 पदे रिक्त आहेत. वरची पदे एमपीएससी मधून जे उमेदवार येतील त्या प्रमाणे भरली जातील. "क" आणि "ड" गटासाठी 26 डिसेंबर, 2015 रोजी राज्यव्यापी मोहिमेच्या माध्यमातून जाहीरात दिली जाणार असून राज्य शासनाने रिक्त पदाच्या 75 टक्के पदे भरण्यासाठी परवानगी दिली आहे. व पुढील एक दोन महिन्यात "क" व "ड" गटातील सर्व पदे भरले जातील असे मी या ठिकाणी आल्याला आश्वासित करतो.

सभापती महोदय, मनोरुग्ण माणूस बरा झाला तरी त्याला घेऊन जाण्यासाठी बऱ्याचदा नातेवाईक तयार नसतात. रस्त्यावर जे मनोरुग्ण फिरतात ते आमच्याकडे आणले जातात. परंतु ते मनोरुग्ण पत्ता सांगण्याच्या मन:स्थितीत नसतात. त्यामुळे त्यांचा पत्ता शोधणे मोठे काम आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.दीपक सावंत ......

यासंदर्भात एक कमिटी असून कमिटीच्या माध्यमातून तीन वेळेस पत्र पाठविले जाते. पहिले पत्र पाठविल्यानंतर परत 15 दिवसांनी पत्र पाठविले जाते व उत्तर आले नाही पुन्हा 15 दिवसांनी पत्र पाठविले जाते. नंतर त्या पत्त्यावर अटेन्टेडंटला पाठविले जाते. परंतु तरी देखील 75 टक्के रुग्ण मनोरुग्णालयात येत असतात. आपल्याकडे सोशल ॲक्सेप्टन्स फार कमी झालेला असल्यामुळे ही परिस्थिती सर्वच रुग्णालयांची आहे. नागपूर शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालयात औषधे मुबलक प्रमाणात उपलब्ध असून या ठिकाणी जास्तीत जास्त सुधारण्याचा प्रयत्न करीत आहोत. मी मागील आठवडयात या मनोरुग्णालयाला भेट दिली असून या मनोरुग्णालयात ज्या काही त्रुटी आहेत त्या त्रुटी आपल्या सुचनेनुसार कमी करण्यात येतील.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मनोरुग्ण बरे झाल्यानंतर त्यांना घरी पाठविण्याचा प्रयत्न केला जातो परंतु घरातील माणसे त्यांना ॲक्सेप्ट करीत नाही अशी माहिती मंत्री महोदयांनी दिली आहे. ही समस्या केवळ नागपूरची आहे असे नसून ही समस्या राज्याची आहे. मनोरुग्ण काही प्रमाणात बरा झाला असेल आणि त्याचे घर गरीब असेल तर ते ॲक्सेप्ट करु शकत नसेल तर जे रुग्ण थोडे बरे झाले असतील आणि ते एखादे काम करु शकत असतील तर त्यांच्यासाठी वेगळा व्यवसाय उपलब्ध करण्याच्या संदर्भात शासन विचार करणार आहे काय ?

Z-1/.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, अशाप्रकारच्या रूग्णांना मेन्टल हॉस्पीटलच्या प्रांगणातच बांधकाम, शेती काम, विणकाम, पाकिटे बनविण्याचे कामे देण्यात येतात. त्यांनी बनविलेल्या वस्तू विकल्या जातात आणि जे काही पैसे मिळतात ते त्यांच्या खात्यामध्ये जमा केले जातात. अशाप्रकारे त्यांना भौतिकोपचार पद्धतीने थोडेसे बिझी ठेवले जाते त्यामुळे त्यांचे मानसिक संतुलन कायम टिकून राहते.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औरंगाबाद शहरातील महिला रुग्णालयाच्या बांधकामासाठी तातडीने जागा उपलब्ध करुन देणे याबाबत श्री.सतीश चव्हाण,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.डॉ.दीपक सावंत ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 38 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मागील अधिवेशनात देखील मी हा प्रश्न विचारला होता. त्यावेळी माननीय मंत्र्यांनी बाणेदारपणे उत्तर देताना सांगितले होते की, आठ दिवसांत जागा मिळेल. परंतु तसे काही झालेले नाही. निवेदनात जागा मिळत नसल्याची कारणे नमूद केलेली आहेत. जागा असुनही जागा मिळत नाही. जागेच्या उपलब्धतेबाबत जिल्हाधिकारी व आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे असे सांगण्यात आले आहे. ही जागा देण्यासाठी शासन महानगरपालिकेला निर्देश देणार आहे काय ? यामुळे केंद्र शासनाचा किती निधी परत जाणार आहे ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो प्रश्न आमच्या देखील जिव्हाळ्याचा आहे. संभाजीनगरमध्ये महिला रुग्णालय व्हावे म्हणून आम्ही देखील प्रयत्न करीत आहोत. मात्र आम्हाला त्यामध्ये यश मिळत नाही ही गोष्ट मी मान्य करतो. आम्ही जागा मिळण्यासाठी अनेक ठिकाणी प्रयत्न केले. वक्फ बोर्डाची जागा मिळणार नाही याची आम्हाला कल्पना आहे, तरी देखील ही जागा मिळण्यासाठी आम्ही पुन्हा एकदा न्यायालयाला विनंती केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मी बाणेदारपणे उत्तर दिले परंतु त्यानंतर काही कार्यवाही केली नाही. मी आपणास सांगितले होते की आम्ही जुलै महिन्यात मिटींग बोलाविली होती. परंतु त्या मिटींगचे फलस्वरुप काही निघाले नाही ही देखील दुर्दैवाची गोष्ट आहे. संभाजीनगर महानगरपालिकेला जागा उपलब्ध करुन देण्याबाबत सांगण्यात येईल्. तसेच ही जागा मिळण्यासाठी आम्ही कसोशीने प्रयत्न करु एवढे या निमित्ताने सांगतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मौजे एकोडी व बाम्पेवाडा, ता.साकोली, जि.भ्ंडारा येथे एका माथेफिरुने 12 शेतकऱ्यांच्या धानाचे पुंजणे आणि तनशीचे ढीग जाळणे याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स.यांनी दिलेली नियम नियम 93 अन्वये सूचना

डॉ.रणजित पाटील ( गृहे (शहरे) राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 22 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..5..

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या प्रकरणातील आरोपीला पकडण्यात आलेले आहे असे शासनाने सांगितले आहे. परंतु जे नुकसान झालेले आहे त्याची नुकसान भरपाई शासन देणार आहे काय ? अशाप्रकारच्या घटना वारंवार होऊ नयेत म्हणून शासन काही काळजी घेईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी जे नुकसान झालेले आहे त्याची नुकसान भरपाई शासन देणार आहे काय असा प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, एका माथेफिरुने, जो व्यसनाधीन झालेला आहे, त्याने शेतीला आग लावली. सूचनेमध्ये 12 शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे नमूद केलेले आहे. परंतु आम्ही माहिती घेतली असता त्यामध्ये तीन शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे दिसून आलेले आहे. ज्या तीन शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांच्या मालकीची पूर्ण जमीन नसून काही जमीन बटाईने दिलेली होती. शासनाचे जे काही धोरण आहे त्यामध्ये अशाप्रकारच्या घटनांना मदत करण्याचा विकल्प नाही. परंतु अशा गोष्टींना आळा व जरब बसण्यासाठी आणि अशा गोष्टी पुन्हा होऊ नयेत म्हणून संबंधिताला अटक करुन त्याच्यावर कलमे सुद्धा लावलेली आहेत. ज्या लोकांनी बटाईने जमिनी दिल्या होत्या ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी आहेत, सेवानिवृत्त जिल्हाधिकारी आहेत, बिझमन आहेत. ज्यांच्या 10-12 एकर जमिनी आहेत ती मोठमोठी माणसे आहेत. या प्रकरणामध्ये सरकार सहानुभूतीपूर्वक विचार करीलच कारण यामध्ये त्यांची वर्षभराची बेगमी गेलेली आहे. परंतु प्रचलित नियमानुसार जे काही करणे शक्य आहे ते करण्यात येईल.

------------

..6..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : मुंबई व कोकण विभागातील महाविद्यालयीन शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळणे याबाबत श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. विनोद तावडे ( उच्च व तंत्र शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** या संदर्भातील निवेदन आले नसेल तरी सन्माननीय मंत्री महोदयांनी मला असे कळविले आहे की, यावर ते उत्तरे देणार आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपण्‌ास धन्यवाद देतो. आपण सांगितल्यानुसार मी काही वाद उत्पन्न करीत नाही. आपला माझ्यावरचा राग गेलेला दिसत नाही. मुंबईच्या शिक्षकांवर राग नको.

**सभापती :** आपले मधूर संबंध आहेत. आपण काळजी करु नका.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, राज्यातील सर्व प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळालेली आहे. पण कॅश कंपोनन्टच्या 20 टक्के रक्कम मुंबईच्या शिक्षकांना अद्याप मिळालेली नाही. सन 2010 नंतर ज्या शिक्षक्‌ांच्या नेमणुका झालेल्या आहेत त्यांना आपल्या प्रशासनामुळे मान्यता उशिरा मिळाल्यामुळे त्यांना पगाराची रक्कम मिळालेली नाही. या दोन्ही गोष्टी देय आहेत आणि त्यासाठी तरतूद आहे. तेव्हा शिक्षकांना ही रक्कम मिळणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकी पोटी देय असणाऱ्या थकबाकीच्या 80 टक्के थकबाकी देण्यात आली आहे. परंतु वेतन निश्चिती विलंबाने झाल्यामुळे वेतन आयोगाच्या फरकाच्या थकबाकीपोटी एकूण 45 कोटी 12 लाख 37 हजार 540 द्यायची आहे. तसेच निवडश्रेणी, पीएचडी, पदवी अनुषंगाने विलंबाने झालेली वेतन निश्चिती लक्षात घेता ही रक्कम पूर्वलक्षी प्रभावाने द्यावयाची असल्यामुळे मुंबईमध्ये 38.45 कोटी आणि सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी पनवेल संबंधी मुद्दा उपस्थित केला होता त्या पनवेल विभागासाठी 34.89 कोटी रुपये अशी एकूण 73.74 कोटी रुपयांची थकबाकी देय आहे. तत्कालीन मंत्री श्री.राजेश टोपे यांच्या कारकीर्दीपासून ही थकबाकी आहे. पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून ही रक्कम लवकर दिली पाहिजे. आता रक्कम निश्चित झालेली असल्यामुळे ती रक्कम देणे आवश्यक आहे. यासाठी निधी उपलब्ध करुन ती रक्कम लवकर अदा करण्यात येईल.

------

..8..

**पृ.शी./मु.शी.** : आर्णी, जि.यवतमाळ येथील महंत दत्ताराम भारती महाविद्यालयात बी.एससी प्रथम वर्षाच्या जुन्या विद्यार्थ्यांना गणित विषयाच्या नवीन अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका देण्यात येणे याबाबत श्री.ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. रविंद्र वायकर ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 25 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, आर्णी, जि.यवतमाळ येथील महंत दत्ताराम भारती महाविद्यालयातील हा प्रश्न आहे. बी.एससीच्या पहिल्या वर्षाच्या वर्गातील विद्यार्थ्यांना गणिताचा जुना आणि नवीन अभ्यासक्रम होता. जुन्या आणि नवीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना गणिताचा एकच पेपर देण्यात आल्यामुळे त्यांच्यामध्ये गोंधळ निर्माण झाला. निवेदनात नमूद केले आहे की, सदर परीक्षेचा निकाल अद्याप विद्यापीठाकडून जाहीर न झाल्यामुळे जुन्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन विद्यापीठामार्फत विद्यापीठाचे अधिष्ठाता तथा विषयतज्ज्ञ यांचे मत घेऊन कार्यवाही करण्यात येईल. हे उत्तर समाधानकारक आहे. या परीक्षेला जे विद्यार्थी बसले होते त्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल काय ?

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, याची निश्चितपणे दखल घेण्यात येईल.

---------

..10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : मौजे भूगाव, जि.वर्धा येथील उत्तम गल्वा मेटॅलिक कंपनीतील रासायनिक पाण्यामुळे विविध परिसरातील गावांमध्ये झालेले प्रदूषण याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.प्रवीण पोटे-पाटील ( पर्यावरण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 30 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, पॉवर प्लान्टच्या चिमणीमधून मोठ्या प्रमाणात घातक वायू हवेत विरघळत आहेत. सीओजी गॅस आकाशात मिसळल्यामुळे लहान बालके आणि वृद्ध व्यक्तींना श्वासोच्छवासाचा त्रास मोठ्या प्रमाणात होत आहे तेव्हा यासंबंधी शासन कोणती कारवाई करणार आहे ? उन्हाळयात स्लॅक जमा करण्यात येते. स्लॅक जमा करणे हे कायद्याने गुन्हा आहे, याबाबत कोणती कारवाई शसन करणार आहे ? या प्रकल्पा जवळून वाहणाऱ्या नाल्यामध्ये रसायनयुक्त विषारी पाणी सोडले जात असल्यामुळे आजूबाजूच्या गावांतील नागरिकांना अस्थमा,हृदयविकार यासारखे् मोठे रोगही होत आहेत. या संदर्भात वारंवार तक्रारी केलेल्या आहेत त्याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ? माझा तिसरा प्रश्न आहे की, प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्याकरिता त्या ठिकाणी दोन लाख झाडे लावण्यात आली असे कंपनीचे म्हणणे आहे. परंतु त्या परिसरात 10 हजार झाडे देखील जीवंत नाहीत. या संदर्भात शासन कंपनीवर कठोर कारवाई करणार आहे काय ?

....... 2A-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, वर्धा जिल्ह्यात उत्तम गल्वा मेटॅलिक, उत्तम व्हल्यू स्टील व इंद्रजित पॉवर अशा तीन फॅक्टरीज आहेत. त्या ठिकाणी अडीच कि.मी. अंतरावर मौजे बरबडी, भूगांव, चितोड, झंझापूर व सेलू-काटे ही पाच गावे आहेत. सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे, विधानसभा व विधानपरिषद सभागृहातील सदस्य तसेच ग्रामस्थांनी या कारखान्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे मी अधिकाऱ्यांसमक्ष प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन पाहणी केल्यानंतर या विषयाच्या अनुषंगाने खुलासा करु इच्छितो.

श्री.सुनील तटकरे : माननीय राज्यमंत्री, आपण ज्यावेळी तेथील पाहणी करण्यासाठी जाल त्यावेळी माननीय पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांना सोबत घेऊन जाणार काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : महोदय, मी स्वतः त्या ठिकाणी जाऊन पाहणी करेन व त्या भागातील लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न करेन.

------

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेली आहेत. ती केव्हा चर्चेला घेण्यात येतील ?

**सभापती** : त्या निवेदनांवर उद्या चर्चा करण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : बीड जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतीतील खोल्या धोकादायक झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, या बाबत श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक-15 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक शाळांचे बांधकाम करण्यासाठी आता कोणत्याही प्रकारचे लेखाशीर्ष उरलेले नाही. या शाळांचे बांधकाम डीपीसी किंवा आमदार निधीतून करता येत नाही. तसेच जिल्हा परिषदेच्या सर्व शिक्षा अभियानातून सुध्दा शाळा खोल्यांचे बांधकाम करता येत नाही. सभापती महोदय, बीड जिल्ह्यात गेल्या 3 वर्षात केवळ 12 शाळांचे बांधकाम होऊ शकले आहे. परंतु आता लेखाशीर्ष उपलब्ध नसल्यामुळे त्या ठिकाणी शाळा खोल्यांचे बांधकाम करणे शक्य नाही. काही शाळांवरील टीनपत्रे उडून गेली आहेत. काही इमारती जुन्या आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने आता विद्यार्थ्यांनी तेथे बसणे धोकादायक असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे तेथे नव्याने बांधकाम करणे गरजेचे आहे. परंतु हे बांधकाम करण्यासाठी कोणतेही लेखाशीर्ष उरलेले नाही. तसेच दुसरी बाब अशी की, जिल्हा परिषदेच्या भाड्याच्या खोलीत सुरु असलेल्या वर्गांच्या बाबतीत मागच्या अधिवेशनात चर्चा झाली हाती. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी सांगितले की, मागे माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांनी उत्तर देताना बाणेदारपणे सांगितले होते की, भाड्याच्या खोलीतील शाळांच्या बाबतीत तातडीने प्रधान सचिवांना तेथे पाठवून संबंधितांसोबत बैठक घेण्यात येईल. उत्तरात असा उल्लेख होता की, बीड जिल्हा मध्यवर्ती बँक बंद पडल्यामुळे त्या बँकेतील पैसे काढता येत नसल्यामुळे शाळा खोल्यांचे भाडे देता येत नाही. महोदय, घर मालकांनी खोल्यांना कुलूप लावून विद्यार्थ्यांना झाडाखाली बसण्यास भाग पाडले. माझी अपेक्षा आहे की, मागच्या वेळी माननीय मंत्र्यांनी ज्या बाणेदारपणे उत्तर दिले होते तशाच प्रकारे उत्तर त्यांनी आता द्यावे. तसेच मी विचारु इच्छितो की, त्यांनी जाहीर केल्यानुसार माननीय प्रधान सचिवांच्या माध्यमातून केव्हा बैठक घेण्यात येईल ? जेणेकरुन भाड्याच्या खोलीत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांचे थकलेले भाडे अदा करुन, त्या शाळा पूर्ववत सुरु होतील. तसेच सध्या प्राथमिक शाळांचे बांधकाम करण्यासंदर्भात कोणतेही लेखाशीर्ष उपलब्ध नसल्यामुळे सदरहू बांधकाम करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान किंवा अन्य लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे खरे आहे की, सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोडकळीस आलेल्या इमारती, वर्ग खोल्या पूर्णपणे पाडून नवीन इमारत बांधण्याची तरतूद आज



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

उपलब्ध नाही. विशेषतः मराठवाड्यात निजामाच्या काळापासूनच्या शाळा आहेत. आता त्या शाळा दुरुस्तीच्या पलीकडे गेल्या आहेत. त्यामुळे या सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे गरजेचे आहे. तसेच अनेक शाळा पटसंख्येअभावी कमी झाल्या आहेत. त्यामुळे त्या शाळा वगळून, ज्या शाळा बऱ्यापैकी पटसंख्येच्या आहेत त्या पुढील काळात चांगल्या पध्दतीने चालविण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. तसेच आसपास कोणतीही शाळा नसल्यामुळे ती शाळा अडचणीत येऊ शकते. त्यामुळे अशा शाळा प्राधान्याने हाती घेण्याचा विचार शिक्षण विभाग करीत आहे. सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या भाड्याच्या खोलीत सुरु असलेल्या शाळांचा प्रश्न मागच्या अधिवेशनात उपस्थित करण्यात आला होता. सदरहू विषय माननीय वित्त मंत्री, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव यांच्याशी संबंधित विषय आहे. हा प्रश्न जवळजवळ सहा जिल्ह्यांचा होता. शिक्षण विभागाच्या माध्यमातून 4 टक्के सादिल रक्कम जिल्हा परिषदेला दिली जाते. परंतु त्या त्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेल्या घोटाळ्यामुळे संबंधित जिल्हा परिषदांचे त्या बँकेत पैसे अडकून पडलेले आहेत. या जिल्हा परिषदांनी शासनाचे पैसे नीट ठेवले नाहीत म्हणून त्यांना पैसे देणे बंद करावे असे ऑडिटमध्ये नमूद केले होते. शाळा आणि शिक्षण हा विषय आमच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्यामुळे, आम्ही वित्त विभागाकडे ज्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या शाळा भाड्याच्या खोल्यांमध्ये सुरु आहेत त्या खोल्यांचे भाडे जिल्हा परिषदेला न देता थेट त्या खोली मालकाच्या खात्यात जमा करण्यासाठी परवानगी मागितली आहे. या संदर्भात वित्त विभागाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तशा प्रकारची कार्यवाही सुरु करण्यात येईल. परंतु दरम्यानच्या काळात कोणतीही शाळा बंद पडणार नाही. या कामी शिक्षण विभागाचे अधिकारी खोली मालकाला भेटून, विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतील.

**सभापती** : माननीय मंत्र्यांनी सांगितले की, मराठवाड्यातील शाळा निजामाच्या काळातील असल्यामुळे त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे लागेल. परंतु माझे म्हणणे आहे की, त्या शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा प्रश्न कुठे येतो ? कारण निजामाच्या काळातील शाळा 100-150 वर्षांपूर्वीच्या आहेत. या शाळा धोकादायक आहेत किंवा कसे हे बघण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची यंत्रणा सक्षम आहे. त्यामुळे प्रश्न असा आहे की, कोणत्या लेखाशीर्ष मधून आपण

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

रक्कम देणार आहात, आपल्याकडे स्पेशल पर्याय आहे काय किंवा सर्व शिक्षा अभियानांतर्गत निधी देणार काय, या बाबत आपण गांभीर्याने विचार करावा, असे मला वाटते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री ज्यावेळी विरोधी पक्षात बसायचे त्यावेळी त्यांनी हा प्रश्न विचारला होता. आम्ही त्यांना पाठिंबा दिला होता.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, मराठवाड्यातील शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे लागेल. त्या भागातील शाळा मोडकळीस आलेल्या आहेत किंवा धोकादायक असल्याचे माननीय मंत्र्यांनी तत्वतः मान्य केले आहे. मी त्यांना विचारु इच्छितो की, आपण स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात अजून किती कालावधी घालणार आहात ? त्यामुळे या कामासाठी तातडीने एक लेखाशीर्ष निर्माण करुन, मोडकळीस आलेल्या व धोकादायक असलेल्या इमारतीचे बांधकाम दोन-तीन महिन्यापूर्वी किंवा पुढील अधिवेशन सुरु होण्यापूर्वी या विषयाच्या अनुषंगाने निर्णय घेणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय वित्त विभागासोबत एकत्रित बसून व चर्चा करुन सोडविण्याचा आहे. स्ट्रक्चरल ऑडिटच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, ज्या इमारती नव्याने बांधावयाच्या आहेत त्या बांधाव्याच लागणार आहेत. या कामासाठी 40 कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. त्यामुळे या विषयाच्या बाबतीत आढावा घ्यावा लागेल. त्यामुळे या संदर्भात नीट माहिती घेतल्यानंतर उचित ती कार्यवाही करण्यात येईल.

**सभापती** : मला वाटते माननीय मंत्र्यांनी या संदर्भातील माहिती गोळा करुन पुढील अधिवेशपर्यंत हे काम करावे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित, आमच्याकडून या विषयाला टार्गेटवर हीट करण्यात येईल.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, माननीय मंत्र्यांनी हे सर्व काम सहा महिन्यात करावे.

**सभापती** : मी त्यांना निदेश दिलेले आहेत, की हे काम पुढील अधिवेशनापूर्वी करावे.

श्री.अमरसिंह पंडित : ठीक आहे.

-------

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करून देणे, या बाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.रविंद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक-33 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मुंबईमध्ये 1940 पूर्वीच्या 15 हजार उपकरप्राप्त इमारती असून, यातील बहुतेक इमारतीच्या पुनर्विकास आणि दुरूस्तीचे काम रखडले आहे. कारण या कामासाठी सरकारकडून पुरेसा निधी प्राप्त झालेला नाही. सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. निधी अभावी तेथील लोकांना आपला जीव मुठीत घेऊन राहावे लागत आहे. परंतु या विषयाकडे सरकार गांभीर्याने बघत नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, शासन या कामासाठी पुरेसा निधी का देत नाही, तसेच निदान आता तरी या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल काय ?

..2बी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, मुंबई शहरांतर्गत अ ते ग मध्ये 19642 सेस इमारती होत्या, त्यामध्ये पुनर्बांधणी झालेल्या उपकरातून सूट दिलेल्या इमारती 4784 आहेत आणि आताच्या उपकरप्राप्त इमारती 14858 आहेत, यासाठी निधी मिळावा या कारणाने मुंबई मनपाच्या माध्यमातून उपकर वसूल केला जाता आणि जेवढा मुंबई मनपाच्या माध्यमातून उपकर निर्माण होतो, त्याच्या इतकेच राज्य शासन म्हाडाला रि-ईम्बर्स करते. म्हाडाकडून 10 कोटी रूपये आणि मुंबई मनपाकडून 10 कोटी रूपये अशा पध्दतीने 100 कोटी रूपयांचा निधी उपकर प्राप्त इमारती ज्या मोडकळीस आलेल्या असतील त्यांच्यावर खर्च केला जातो. मी अनेक वर्षांपासून पाहत आहे की, म्हाडाने जो उपकर जमा केला पाहिजे तो अत्यंत कमी होत आहे. तो कमी होत गेल्यामुळे शासनाची रि-ईम्बर्स रक्कम कमी होत आहे. त्यामुळे मुंबई मनपाला निर्देश देण्यात येईल की, तो कर व्यवस्थित प्रमाणात जमा केला तर तो निधी उपलब्ध करण्यात येईल. आरआर बोर्डाच्या माध्यमातून हा निधी आल्यानंतर, रिपेअर बोर्डाच्या माध्यमातून तो खर्च केला जायचा. परंतु खर्च करीत असताना त्यांचा पगार देखील त्यातून काढायचे. साडे तीन लाख महिन्याला यायचे. असे केले तर आलेल्या 100 कोटी रूपयांतून 40 कोटी रूपये यायचे. त्यामुळे सभागृहात चर्चा झाल्यानंतर या महिन्यात म्हाडाला निर्देश दिले आहेत की, पगार म्हाडाच्या माध्यमातून कराव, उपकर प्राप्त इमारतींच्या माध्यमातून येणाऱ्या निधीतून करू नये. सभापती महोदय, त्या पध्दतीने या वर्षात 40 कोटी रूपये पूर्ण् त्यांना देण्यात येतील.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राज्यातील सर्व जिल्हा परिषद शिक्षकांचे एकच रोस्टर करणे, अशैक्षणिक कामांचे ओझे दूर करणे व आत्महत्याग्रस्त शिक्षकांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरीवर घेण्याची आवश्यकता याबाबत श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. दीपक केसरकर (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 11 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी तीनही प्रश्नांना बगल दिली आहे. अमरावतीला विजय नकाशे सर होते, त्यांचा मृत्यू झाला, त्यांनी आत्महत्या केली. आत्महत्येला प्रवृत्त केले गेले असा पत्नीचा आरोप आहे. त्यांच्या पत्नीला ताबडतोबीने अनुकंपा तत्वावर घेणार का ? कारण आपण एफआयआर दाखल केला आह. जिल्हा परिषदेचे रोस्टर एक करण्याची आवश्यकता आहे. कारण सर्वांची भरती आपण एकाच वेळी करीत असतो. जिल्हानिहाय नेमणुका करीत असतो. आरटीईमधील जी लिंग्विस्टिक आणि जिओग्राफिकल डिसॲडव्हान्टेज ग्रूपची तरतूद आहे तिचा नीट अंमल केला तर रोस्टर एक ठेवण्यामध्ये काही अडचण येणार नाही. ते एक करणार का ? उत्तरामध्ये म्हटले आहे की, निवडणूक प्रक्रियेशी निगडीत. 'प्रक्रिया' या शब्दाला माझी हरकत आहे. संविधनातील तरतूद स्पष्ट आहे. इलेक्शन, सार्वजनिक आपत्ती आणि जनगणना या तीन व्यतिरिक्त अन्य कोणतेही काम देता येत नाही. प्रक्रिया जोडायची आणि मग निरंतर चालणाऱ्या कामांसाठी वर्षभर बीएलओ म्हणून जुंपून ठेवायचे आणि शाळा ओस पाडायच्या हे यापुढे होणार नाही. आपण यासंबंधी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना, सर्व विभागांना आवश्यक त्या प्रतिबंधात्मक सूचना देणार का ?

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, आत्महत्याग्रस्त पत्नीला अनुकंपा तत्वावर घेण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. शासनाचा निर्णय आहे. त्यामुळे त्याप्रमाणे क्रमांक लागतात.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ही विशिष्ट परिस्थिती आहे. तुम्ही एफआयआर दाखल केला आहे. इतर ठिकाणचा मृत्यू वेगळ्या पध्दतीचा असतो. अपघाती मृत्यू, नैसर्गिक मृत्यू वेगळे आहेत. विशिष्ट परिस्थितील हा मृत्यू आहे आणि ज्याला शासन जबाबदार आहे. वरच्या प्रश्नाची हा प्रश्न निगडीत आहे. त्यामुळे शासनाची जबाबदारी आहे. आपण तो नियम लावत बसाल तर ते कधीही होणार नाही. ताबडतोबीने घेण्याची जबाबदारी तुमची आहे. शासन जबाबदार आहे.

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, अशा तऱ्हेने करता येईल का ही बाब तपासून बघितली जाईल. तपासल्याशिवाय काहीही उत्तर देणे येथे शक्य होणार नाही. कॅडरबद्दल सांगितले की, जिल्ह्याच्या स्तरावर केले जाते ते राज्य स्तरावर करावे. मात्र हे शक्य होणार नाही. कारण ही भरती जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केली जाते, तिचे असलेले रोस्टर मेंटेन करणे हे सुध्दा त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दीपक केसरकर ....

जिल्ह्याचे काम आहे. राज्याच्या स्तरावर असे केले तर यातून गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते. अनेक विभागाशी संबंधित विषय आहे, त्यामध्ये सामाजिक न्याय विभाग, सामान्य प्रशासन विभाग, आदिवासी विकास विभाग, विधी व न्याय विभाग आहेत. त्यामुळे सध्या तरी आमचे उत्तर असेच आहे की, या संदर्भात करता येणार नाही. परंतु आपण व्यक्त केलेल्या भाववा लक्षात घेऊन त्या विभागाकडे आम्ही हे मॅटर रेफर करू सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्नही विचारला आहे. बालकांचा मोफत प्रवास, सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, दशवार्षिक जनगणना, नैसर्गिक आपत्ती आणि स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभेच्या निवडणुका या व्यतिरिक्त ....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे. मघाशी सन्माननीय मंत्री म्हणाले की, तपासून बघावे लागेल. आम्ही नोटीस देतो आणि 5 दिवसांनंतर हे येते. तेव्हा होमवर्क करून आले पाहिजे. शेवटच्या प्रश्नामध्ये मी स्पेसिफिक विचारल्यानंतर सुध्दा होमवर्क केले नसल्यामुळे त्याचे उतर आलेले नाही. आता येथेही पुन्हा लेखी उत्तर वाचून दाखवित आहे. ते बरोबर नाही. मी फक्त 'प्रक्रिया' या एकाच शब्दाला हरकत घेतली आहे. निवडणुकीला भाग आहे, अटळ आहे, हे आम्ही करूपण प्रक्रिया ही निरंतर चालते, त्यावर घेऊ नये अशी संविधानिक तरतूद आहे. कायद्याची गरज नाही, काही नाही, त्यामुळे स्पेसिफिक उत्तर आले पाहिजे.

**सभापती** : माननीय मंत्र्यांनी सांगितले की, आम्ही तुमच्या भावना लक्षात घेऊन तपासून घेऊ. आपण तपासून घ्यावे आणि त्यांच्याशी बैठक करावी.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ॲडव्होकेट जनरल श्री. श्रीहरी अणे यांच्या संदर्भातील निवेदनाबाबत**

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून राज्य शासनाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. सभापती महोदय, काल ॲडव्होकेट जनरल श्री. श्रीहरी अणे साहेबांचा विषय उपस्थित केल्यानंतर शासनाला निर्देश दिले होते की, त्यावर निवेदन करावे. आतापर्यंत निवेदन आलेले नाही. माझी विनंती आहे की, निदान आज संध्याकाळपर्यंत सभागृह संपेपर्यंत निवेदन यावे.

**सभापती** : निवेदन देण्यात यावे.

----

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : आर्णी तालुक्यात होणारी अवैध वीज चोरी रोखून ग्राहकांना आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त वीज शुल्कात कपात करणे याबाबत श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 14 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. ख्वाजा बेग : सभापती महोदय, आर्णी तालुक्यात शेतकऱ्यांना मिळणारी वीज आणि घरगुती वीज आवश्यक त्या दाबाने मिळत नाही अशा विषयाची मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. मला एवढेच विचारावयाचे आहे की, संपूर्ण् तालुक्यामध्ये शेतकऱ्यांना आणि घरगुती वापरासाठी असलेली वीज पाहिजे तेवढ्या दाबाची, योग्य दाबाची नक्की केव्हा मिळेल ? 'नक्की' हा माझा अवतरण चिन्हातील शब्द आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोय, सध्या त्या ठिकाणी इन्फ्रा-2 चे काम सुरूआहे, ते जून, 2016 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. हे काम पूर्ण होताच आणि 132 केव्ही दिग्रज याचा एक पर्याय आपण काढत आहोत. दोन्ही करून जून, 2016 च्या आत हा संपूर्ण पुरवठा स्टेबल करण्यात येईल. आता त्यांना जो काही कधी कधी उच्च दाबाच्या वाहिणीचा पुरवठा कमी पडत आहे, तो जून 2016 पर्यंत स्टेबल होईल.

श्री. ख्वाजा बेग : सभापती महोदय, दिग्रज ऐवजी आमच्या जवळा येथे 132 केव्हीचे काम सुरू आहे ते काम नक्की केव्हापर्यंत संपेल ? जवळा, ता. आर्णीमध्ये 132 केव्हीचे काम प्रगतीपथावर आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, जवळा 132 केव्ही हे काम दिलेल्या वेळेत पूर्ण करू

----

..8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : ठाणे व पालघर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तरांच्या वेतननिश्चिती संदर्भात लेखा व वेतन पडताळणी कार्यालयाकडून त्यांचा जाणीवपूर्वक छळ होत असणे.

**मु.शी.** : ठाणे व पालघर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तरांच्या वेतननिश्चिती संदर्भात लेखा व वेतन पडताळणी कार्यालयाकडून त्यांचा जाणीवपूर्वक छळ होत असणे यासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे व पालघर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांची वेतननिश्चिती लेखा व वेतन पडताळणी कार्यालय यांचेकडून केली जात असणे, सदर कार्यालयातील अधिकारी सातत्याने प्रकरणे निकाली काढण्याबाबत हलगर्जीपणा करीत असणे, लक्ष्मीदर्शनाशिवाय प्रकरणे निकाली न काढणे, शिक्षक-शिक्षकेत्तरांची शेकडो प्रकरणे प्रलंबित असणे, वेतननिश्चितीबाबत शासनाचे स्पष्ट आदेश असतांनाही जाणीवपूर्वक त्रुटी काढणे, आलेल्या शालेय कर्मचाऱ्यांशी अरेरावीची व उध्दटपणाची भाषा वापरणे, कामासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना दिवसभर थांबवून काम न करता परत पाठविणे, लोकप्रतिनिधींच्या पत्राची दखल न घेणे, उडवाउडवीची व दिशाभुल करणारी उत्तरे देवून लोकप्रतिनिधींचा अवमान करणे, आर्थिक लाभासाठी प्रकरणांमध्ये जाणीवपूर्वक त्रुटी काढणे, या कार्यालयाकडून कामे होत नसल्याबाबत व जाणीवपूर्वक छळ होत असल्याबाबत मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तक्रारी करणे, शिक्षण उपसंचालक व शिक्षण सचिव यांना निवेदने देवूनही त्यांनी लोकप्रतिनिधींच्या पत्राची दखल

..9

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

न घेणे, या कार्यालयातील लेखाधिकाऱ्याबाबत शिक्षक-शिक्षकेत्तरांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, विविध संघटनांनी आंदोलन करण्याची भूमिका घेणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, ठाणे व पालघर जिल्ह्याचे विभाजन झाले असले तरी सुध्दा यापूर्वी आणि आताही प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या वेतननिश्चितीचे, लेखापरीक्षणाचे काम लेखाधिकाऱ्यांकडे आहे.

....3C

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.रामनाथ मोते.......

जवळपास 1200 पेक्षा अधिक शाळा आहेत. धक्कादायक बाब अशी आहे की, या कार्यालयामध्ये शेकडो प्रकरणे प्रलंबित आहेत. साधी साधी प्रकरणे प्रलंबित ठेवायची, संबंधित कर्मचाऱ्यांकडून काही तरी अपेक्षा करायची आणि ती पूर्ण झाली नाही तर प्रकरणात अनावश्यक त्रुटी काढायच्या आणि परत पाठवायची, हा गंभीर आक्षेप आहे. लोकप्रतिनिधी, शाळांचे मुख्याध्यापक, त्या कार्यालयात खेटा घालणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना संबंधित अधिकाऱ्यांकडून अतिशय थंड प्रतिसाद मिळतो. अनेक वेळा त्यांच्या कार्यालयामध्ये पदाधिकारी जातात, शिक्षक जातात. पण या कार्यालयाकडून कधी वेळेवर कामे होत नाहीत. पालघरचा माणूस 2 तास प्रवास करुन या कार्यालयात भेटावयास जातो, पण त्यांना चांगली वागणूक दिली जात नाही. टपाल देखील स्वीकारले जात नाही, अशा अत्यंत विचित्र पध्दतीने या अधिकाऱ्याचे काम सुरु आहे. अनेक वेळा सांगूनही दखल घेतली जात नाही आणि कामेही होत नाहीत. अशा प्रकारचा अधिकारी आकाराने मोठ्या असलेल्या ठाणे जिल्ह्यात, आपल्या जिल्ह्यात कार्यरत असणे अतिशय क्लेषकारक आहे. प्रकरणांचा निपटारा करण्यास विलंब झाला तरी चालेल, आम्ही ते सहन करु शकतो, परंतु त्या अधिकाऱ्याची सर्वांशीच असलेली वागणूक अतिशय उद्याम व आक्षेपार्ह आहे. हा अधिकारी शिक्षण विभागाचा नसून वित्त विभागाचा आहे. त्यामुळे या अधिकाऱ्याची तातडीने बदली करण्यासंबंधी शासन कार्यवाही करणार आहे का ? या ठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे हे देखील उपस्थित आहेत. ते देखील अनेक वेळा तेथे जात असतात, त्यांचाही अनुभव ते सांगतील. अतिशय वाईट अवस्था आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्याला त्या जिल्ह्यातून तातडीने हकलावे, अशी माझी मागणी आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, ठाणे व पालघर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांची वेतननिश्चिती लेखा व वेतन पडताळणी कार्यालया यांचेकडून वेळेवर होत नाही, या संदर्भातील विषय या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सभागृहात मांडण्यात आला आहे.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे.......

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सांगितलेली बाब सत्य आहे. अतिशय वाईट पध्दतीने शिक्षक व शिक्षकेतरांना वागणूक दिली जाते. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना त्या जिल्ह्यातून ताबडतोब हलवून योग्य अधिकारी त्या ठिकाणी द्यावा, जेणेकरुन शिक्षक, शिक्षकेतरांचे प्रश्न मार्गी लागतील.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, ठाणे व पालघर जिल्ह्यातील ही तक्रार आहे. लेखाधिकाऱ्यांबाबत अशाच प्रकारच्या तक्रारी सर्व ठिकाणी आहेत. वेतन निश्चितीकरिता अधिकारी अपेक्षा ठेवतात आणि ती प्रकरणे प्रलंबित ठेवली जातात. जनप्रतिनिधींचा अपमान करणे, या अधिकाऱ्यांचा स्थायीभाव झालेला आहे. अशा अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्याचा निर्णय शासन घेणार आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते, ॲड.निरंजन डावखरे आणि श्री.नागो गाणार यांनी ठाणे व पालघर जिल्ह्यातील प्रश्न सभागृहात उपस्थित केला आहे.

सभापती महोदय, एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की, ठाणे आणि पालघर या ठिकाणी असलेला स्टाफ अतिशय कमी आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे प्रकरणे प्रलंबित रहात आहेत. तथापि, सन्माननीय सदस्यांनी सभागृहात सांगितलेली बाब खरी समजून हे अधिकारी लोकप्रतिनिधींशी अशा पध्दतीने वागत असतील, शिक्षकांना या पध्दतीने वागणूक देत असतील तर ते योग्य नाही.

सभापती महोदय, हा अधिकारी शिक्षण विभागाचा नसून वित्त विभागाचा आहे. त्यामुळे त्यांच्यावर वित्त विभागामार्फत कारवाई करावी लागेल. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी आहे, असे मानून वित्त विभागाला संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्याच्या सूचना आम्ही देऊ आणि त्या पध्दतीने कारवाई करुन चांगला, इफिशिअंट अधिकारी आणून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा दोन ते अडीच महिन्यात करण्याचा प्रयत्न करु.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते, ॲड.निरंजन डावखरे आणि श्री.नागो गाणार हे तिन्ही सदस्य अतिशय गंभीर बाब सभागृहात मांडत आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांनी सदर अधिकाऱ्याविरुध्द तातडीने निलंबनाची कारवाई केली पाहिजे. मंत्री महोदयांनी दोन महिन्यांचा कालावधी दिला आहे. कदाचित त्यासाठी वर्षभराचा कालावधीही लागेल. शिक्षकांची पगाराची बिले पास करण्यासाठी अपेक्षा ठेवणे, वाईट वागणूक देणे, लोकप्रतिनिधींचा सन्मान न राखणे, अशा प्रकारच्या गंभीर तक्रारी आहेत. त्यामुळे त्या अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित करुन त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी काय उत्तर दिले, हे सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी व्यवस्थित ऐकले नाही. दोन ते अडीच महिन्यात प्रकरणे निकाली काढू, असे मी म्हणालो आहे. त्याचप्रमाणे संबंधित अधिकारी वित्त विभागाचे असल्यामुळे वित्त विभागामार्फत कारवाई होऊ शकते. तशी ती वित्त विभागामार्फत करुन घेऊ.

**उप सभापती :** एक दुसराही पर्याय आहे. वित्त विभागातील अधिकाऱ्यांना पुन्हा त्यांच्या विभागाकडे परत पाठवून त्यांच्या ऐवजी एखादा चांगला अधिकारी ठाणे आणि पालघर जिल्ह्यासाठी द्यावा. हाही एक उपाय असू शकतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण सांगितले आहे, तसेच आम्ही करु आणि त्यांच्या जागी चांगला अधिकारी आणू. ज्या अधिकाऱ्याने लोकप्रतिनिधींचा सन्मान केला नाही त्यांच्यावर कारवाई करावी, अशी सन्माननीय सदस्यांची भावना आहे. यापूर्वी दोन प्रकरणात मी कारवाई केली. वित्त विभागातील एका अधिकाऱ्याची बदली केली आणि दुसऱ्या अधिकाऱ्याला त्या ठिकाणी आणले. परंतु, त्या अधिकाऱ्याची बदली अधिक मलईदार विभागात झाल्याने तो खुष झाला.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...4....

**पृ.शी.** : ठाणे शहरानजिक असलेल्या दिघा गावाच्या परिसरातील 96 इमारती पाडण्याची कारवाई

**मु.शी.** : ठाणे शहरानजिक असलेल्या दिघा गावाच्या परिसरातील 96 इमारती पाडण्याची कारवाई यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. हेमंत टकले, प्रकाश बिनसाळे, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"ठाणे शहरानजीक असलेल्या दिघा गावाच्या परिसरातील पूर्वापार कोळी व आदिवासी पाडयांमध्ये आदिवासी कामगारांची गेल्या अनेक वर्षापासून मोठ्या प्रमाणात वस्ती असणे, दिघा ग्रामपंचायतीने दि. 16/12/1991 मध्ये ठराव क्र.3 च्या 67 अन्वये विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून विहित आराखडयानुसार 1+3 याप्रमाणे इमारतींच्या बांधकामास परवानगी दिल्यानंतर सदर लोकांनी एकत्र येऊन काही गृहनिर्माण संस्था स्थापन करुन 96 इमारती बांधणे, दिघा ग्रामपंचायतीने रहिवाशांकडून रितसर घरांच्या नोंदी करुन त्यांना पाणीपट्टी व घरपट्टी आकारुन नागरी सेवा उपलब्ध करुन देणे, सन 1800 सालापासून आदिवासींची गुरचराईची जमीन पुढे कलेक्टर लँड व सन 2012 रोजी एमआयडीसीला जाणे, दरम्यान स्थानिक नगरसेवकाने आपल्या हस्तकामार्फत सूडबुध्दीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन एमआयडीसीच्या जागेवरील सदर बांधकाम अनधिकृत असल्याचा दावा करणे, उच्च न्यायालयाने इमारती पाडण्याबाबत आदेश देणे, 25 हजार कामगार बेघर होणे, 4 महिन्यापूर्वी नोटीसा देऊन इमारती तोडण्यास सुरुवात करुन 96 इमारतींमधील कुटुंबांचे संसार उध्वस्त करुन त्यांना बेघर करणे, अशाप्रकारे सर्वच इमारती पाडून 25 ते 30 हजार कुटुंबांना बेघर करण्याचा शासनाचा मनोदय असणे, यासंदर्भात रहिवाशांनी जिल्हाधिकारी व शासनाकडे अर्जाद्वारे इमारती न पाडण्याबाबत विनंती करणे, यासंदर्भात शासनाने दुर्लक्ष केल्याने रहिवाशांमध्ये तीव्र असंतोष व संतापाची भावना निर्माण होणे, आदिवासी व कोळी यांना घटनेने दिलेल्या अधिकारांची

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.......

पायमल्ली होणे, शासनाने या रहिवाशांना तातडीने न्याय देऊन त्यांची घरे तोडण्याची कारवाई त्वरित थांबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

...6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, छापील लक्षवेधी सूचनेच्या आठव्या ओळीमध्ये एक चुक आहे व ती मंत्री महोदयांनी दुरूस्त केली पाहिजे, अशी माझी अपेक्षा आहे. आठव्या ओळीत असे नमूद केले आहे की, "सन 1800 सालापासून आदिवासींची गुरचराईची जमीन पुढे कलेक्टर लॅण्ड व सन 2012 रोजी एमआयडीसीला जाणे, दरम्यान स्थानिक नगरसेवकाने आपल्या हस्तकामार्फत ......." माझ्या सूचनेत मी 'स्थानिक' ऐवजी 'ऐरोली येथील नगरसेवकाने', असे म्हटले आहे.

सभापती महोदय, ठाणे शहरानजीक दिघा परिसरातील पूर्वापार कोळी व आदिवासी पाड्यांमध्ये कामगारांची सुमारे 25000 लोकांची घरे आहेत. जे अधिकृत आहेत. परंतु, ते अनधिकृत ठरवून, कोर्टाचे आदेश आहेत म्हणून या ठिकाणच्या 25000 लोकांना बेघर करण्याचे कारस्थान मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. त्याविषयी मला सभागृहाला काही माहिती द्यावयाची आहे.

सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, महसूल विभागाकडे नोंद नाही. परंतु, नवी मुंबईच्या दिघा येथे 5 पिढ्यांपासून आदिवासी आणि कोळी समाजाचे लोक राहतात. ते पूर्वी गुरचरण क्षेत्र होते. रामीबाई घाऱ्या भगत या भातशेती करायच्या आणि कार्वीच्या घरामध्ये रहायच्या. इंग्रजांच्या काळापासून ते लोक तेथे राहत होते आणि भातशेती करीत होते. महापालिका आज आली आणि माझ्याकडे ढळढळीत पुराव्याची झेरॉक्स प्रत आहे. ग्रामपंचायतीने एक ठराव केलेला आहे. ही बांधकामे अनधिकृत आहेत, असे प्रशासनाचे म्हणणे असले तरी ग्रामपंचायत सभा दिनांक 16/12/1991 ठराव क्रमांक 3/67 नुसार ग्रामपंचायतीने काही अटीवर प्लॅनप्रमाणे बांधकाम करण्यास ग्रामपंचायतीची काहीही हरकत नाही, तळ मजला अधिक 3 मजले, अशी परवानगी ग्रामपंचायतीने दिलेली आहे. त्यामुळे महसूल विभागाकडे नोंद नाही, हे म्हणणे चुकीचे आहे.

सभापती महोदय, महापालिका येण्यापूर्वी त्या ठिकाणी ग्रामपंचायत होती. आता मुंबई महानगरपालिका किंवा नवी मुंबई महानगरपालिका आल्या आहेत. उद्या 50 वर्षानंतर अन्य कोणत्या ॲथॉरिटी आल्यानंतर महापालिकांनी दिलेल्या परवानग्या आपण ग्राह्य धरणार नाही का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एमआयडीसी क्षेत्र त्या ठिकाणी आज झाले आहे. पूर्वी रबाळे येथे औद्योगिक क्षेत्र होते व ते वाढत

...7.....



श्रीमती विद्या चव्हाण......

जाऊन दिघ्यापर्यंत आले आहे. सन 2012 मध्ये त्यांनी एमआयडीसी डिक्लेअर केली आहे. 2009 ला अकृषक म्हणजे एन.अे.वसूल करण्याच्या आणि तो कर न भरल्यास प्रॉपर्टी जप्त करण्याचे आदेश त्यांना दिलेले आहेत. हे सर्व बघता केवळ कोर्टाचे आदेश आहेत म्हणून अधिकृत इमारती पाडून 25000 लोकांना आपण बेघर करणार आहोत का ? या लोकांची घरे शासन वाचविणार आहे का ?

सभापती महोदय, सरकारचे उत्तर जर 'नाही' असे असेल तर मला आणखी काही मुद्दे मांडावयाचे आहेत आणि सरकार ही बांधकामे वाचविणार असेल तर माझे काही म्हणणे नाही.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही गुरुचरण लॅण्ड असून सन 2011 ला एमआयडीसीकडे हस्तांतरीत झाली आहे. गट नंबर 71, 180 व 200 या 18 एकर जमिनीवर वसलेली साधारणत: 99 बांधकामे पाडण्यात याची, येथपर्यंत हे प्रकरण गेलेले आहे. सिडको, एमआयडीसी, नवी मुंबई कॉर्पोरेशन यांच्यामध्ये या जमिनीच्या हद्दीचा वाद होता स्पेसिफिकली या जमिनी कोणाच्या आहेत, या संदर्भातील वाद होता.

...DD-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील........

यासाठी आणि इतर गोष्टीच्या संदर्भात कोर्टाच्या क्लिअर डायरेक्शन्स आहेत. सन 2013 मध्ये श्री.राजीव मिश्रा नावाचे गृहस्थ या संदर्भात कोर्टात गेले होते. त्या पीआयएल संदर्भात जे जज्मेंट आहे त्यामध्ये त्यांनी बऱ्याच गोष्टी नमूद केलेल्या आहेत. त्यामध्ये ज्या 2-3 गोष्टी सांगितलेल्या आहेत त्यातील पहिली गोष्ट अशी आहे की, याबाबत हद्दीचा वाद असेल तर, The Commissioner, Navi Mumbai Municipal Corporation is the final authority to decide in this matter. मी त्या ऑर्डरमधील ॲबस्ट्रॅक्ट वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "As per the determination of the issue by the Subdivisional Officer of the concerned authority i.e. Navi Mumbai Municipal Corporation, the MIDC, and the CIDCO, as the case may be, shall immediately initiate action to demolish all illegal buildings in the village ... in accordance with the law. If the Criminal law is required to be set in motion against the person who have indulge in illegal construction the same shall be done expeditiously." कोर्टाने असेही म्हटले आहे की, दिनांक 12.06.2014 च्या आसपास शासनाने अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याचे धोरण आखले होते आणि शासनाची देखी त्या लोकांबाबत सहानुभूती होती. म्हणजे ज्या लोकांनी गरजेपोटी, निकडीपोटी तेथे बांधकाम केले त्यांचे बांधकाम या लोकांनी घेतले आहे. जी पीआयएल दाखल करण्यात आली त्यामध्ये असेही ऑब्झर्वेशन्स दिलेले आहेत की, अशा प्रकारचे काही धोरण, म्हणजे हे धोरण आपण आणणार होता त्यापूर्वी हा निर्णय झालेला आहे. त्या निर्णयात असे म्हटले आहे की, अशा प्रकारचे धोरण सरकार आणत असेल तर उच्च न्यायालयाची अनुमती घेतल्याशिवाय सदर धोरणावर कार्यवाही करु नये. सदर धोरणाबाबत न्यायालयाच्या आदेशात नमूद केलेल्या कायदेशीर बाबी विचारात घेऊनच आपण असे धोरण आणावे. अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी शिफारशी केलेल्या आहेत. म्हणून शासनाने पुन्हा एकदा कोर्टाचे एम्बॅरसमेंट अवमान होऊ नये म्हणून ॲडव्होकेट जनरल यांना हे धोरण अशा प्रकारचे आहे, आपण त्याबाबत सल्लामसलत करुन, विधीमत घेऊन किंवा हायकोर्टाला दाखवून याबाबत काही सूचना असतील तर त्या आपल्या अंतर्भूत करता येतील, असे शासनाने अगोदरच सांगितले आहे.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील........

कोर्टाने यापुढे जाऊन असे सांगितले की, एमआरटीपी ॲक्ट आणि म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्टमध्ये जे एक्सप्रेस प्रोव्हिजन आहेत की, स्पष्ट अधिकार आवश्यकतेनुसार पोलिसांच्या सहाय्याने असे अनधिकृत बांधकाम प्रत्यक्षात थांबविण्याचे विवक्षित अधिकार नाहीत म्हणून असे अधिकार मनपा व एसपीएला देण्याबाबत विचार करावा. म्हणजे फिजिकली अनधिकृत बांधकामे होत असताना अशी कोणतीही प्रोव्हिजन एमआरटीपीमध्ये किंवा एसपीएमध्ये नाही. म्हणजे अनधिकृत बांधकाम झाल्यानंतर तेथे कोणी गेल्यानंतर वेळेवर पोलीस भेटत नाहीत आणि फिजिकल स्टॉपेजचे अधिकार एमआरटीपी ॲक्ट प्रमाणे महानगरपालिकेला नाहीत. म्हणून तशा प्रकारचे अधिकार देण्याबाबतच्या सूचना हायकोर्टाने त्यामध्ये केलेल्या आहेत. न्यायालयाच्या आदेशाला अधिन राहून ही पॉलिसी ड्राफ्ट केलेली आहे आणि ॲडव्होकेट जनरल यांच्या मार्फत आपण माननीय हायकोर्टासमवेत सल्लामसलत करुन शासनाची तेथील रहिवाशांसाठी सहानुभूती आहे. तसेच, जे जुने रेकॉर्ड दाखविले आहे त्याबाबतीत माननीय उच्च न्यायालयाने संपूर्ण अभ्यास करुन निर्णय दिलेला आहे की, अशा प्रॉपर्टीज कोणाच्या ताब्यात आहेत किंवा कोणत्या खात्याच्या अखत्यारीत आहेत याबाबतीत काही कन्फ्युजन असेल किंवा डिस्प्युट असेल तर त्यांनी अधिकार दिलेले आहेत की, नवी मुंबई महानगरपालिकेने ते जाहीर करावे. त्याप्रमाणे ही 18 एकर जागा एमआयडीसीकडे आहे अशा प्रकारचा निवाडा महानगरपालिकेने दिलेला आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. त्यांनी माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला दिलेला आहे. या निमित्ताने काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात. पूर्वी ही ग्रामपंचायत होती आणि ग्रामपंचायतीच्या हद्दीत गुरुचरणाच्या जागेवर ही बांधकामे झाली. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात शासनाने असे म्हटले आहे की, गुरुचरणाची जागा सन 2011 च्या फेर बदलानुसार एमआयडीसीकडे दिली गेली. याचा अर्थ असा आहे की, पूर्वी हे गुरुचरणच होते. त्यानंतर ते एमआयडीसीला देण्यात आले. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे ही बांधकामे 5-50 वर्षापूर्वी देण्यात आली. त्यावेळी ग्रामपंचायतीने ठराव करुन त्यांना बांधकामासाठी मंजुरी देखील दिली. अनेक महानगरपालिकांची हद्द नंतरच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे........

कालावधीत वाढली, ही वस्तुस्थिती आहे. पुणे महानगरपालिका, ठाणे महानगरपालिकेची हद्द वाढलेली आहे. यापूर्वी ग्रामपंचायतीच्या हद्दीत बांधली गेलेली घरे अनधिकृत होती तरी ती गुरूचरणामध्ये होती. त्यामुळे ती घरे एमआयडीसी किंवा सिडकोच्या जागेत नव्हती. ही बाब पहिल्या प्रथम माननीय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याचे राज्य शासनाचे कर्तव्य होते. म्हणून शासनाच्या वतीने या संदर्भात फेर याचिका दाखल करण्याची आवश्यकता आहे. कारण, ग्रामपंचातीची अधिकृत परवानगी घेऊन गुरूचरणाच्या जागेवर ही घरे बांधलेली असल्यामुळे एमआयडीसीला ही जागा तद्नंतर हस्तांतरीत झाली. ज्यावेळी ही जागा एमआयडीसीला हस्तांतरीत झाली त्यावेळी तेथे बांधकामे होती याची शासनाला माहिती होती किंवा नाही, याबाबत उत्तर येणे आवश्यक आहे. ही बाब पुन्हा एकदा माननीय न्यायालयाच्या निदर्शनास आणून या संपूर्ण बांधकामांना संरक्षण देण्याची भूमिका शासन घेणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी जी गुरचरणाची जागा होती तेथे पिढीजात वास्तव्यास असलेल्या लोकांनी त्या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून परवानगी घेऊन 20-25 वर्षे अगोदर घरे बांधलेली आहेत त्याबाबत आणि शासन या संदर्भात कोर्टात फेर याचिका करणार आहे काय, असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, ज्यावेळी एमआयडीसीकडे ही जागा हस्तांतरीत झाली किंवा ज्यांची जमीन आहे त्यांच्या लक्षात आले, सन 2011 मध्ये ही जागा त्यांच्या नावाने झाली. त्यावेळी मलाही असा प्रश्न पडला की, ज्यावेळी शासकीय जागा ट्रान्सफर होते त्यावेळी मेजरमेंट होत, त्याचा पंचनामा होतो आणि पंचनामा झाल्यानंतर प्रोव्हिजो होते. त्यानंतर जागा ताब्यात आल्यावर ताबा पावती, म्युटेशन हे सर्व झाल्यानंतर आपण ते घेतो. त्यावेळी आपल्या ते लक्षात आले होते की, येथे हे झालेले आहे. त्यांनी त्याच वेळी लक्षात आणून दिले असते तर आपण अनेक वेळा डीपी करताना जीआयएस टेक्नॉलॉजिचा फोटोग्राफ्स असेल तर लिमिटेशन करतो की, जेवढे बांधकाम केलेले आहे त्याला आरक्षण न करता त्याच्या बाजूला आपण घेतो. याबाबतीत सुद्धा शासनाची सहानुभूती आहे. However, the Government is abided by the Judgement given by the Hon'ble Court. आता त्यासाठी पुन्हा फेर याचिका दाखल करणार काय ? आपल्याला यासाठी

...4/-

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

30 तारखेपर्यंत डेड लाईन दिलेली आहे. आपण अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याबाबत पॉलिसी ड्राफ्ट केलेली आहे. म्हणून आपण ॲडव्होकेट जनरल यांच्याकडून 30 तारखेपर्यंत ओपिनियम येईल. त्यानंतर आपण याबाबत निर्णय घेऊ.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी सांगितले की, एमआयडीसीकडे जागा हस्तांतरीत केली तेथे गुरूचरण संपले. मंत्री महोदय आपण नवी मुंबई डेव्हलप करता, तेथे गरेच नाहीत. म्हणून महसूल विभागाने ती नोंद बदलायला पाहिजे. ही मुंबई कोणाची आहे. मुंबई, नवी मुंबई आमची आगरी, कोळी बांधवांची आहे. तुम्ही त्यांनाच बाहेर काढता आणि कॅम्पाकोला इमारत वाचविता. कॅम्पाकोला इमारती संदर्भात सुप्रिम कोर्टाची ऑर्डर असताना तुम्ही मीडियाला किंवा इतर सर्वांना हाताशी धरून ती इमारत वाचविता. परंतु, आमचे गरीब कोळी बांधव आहेत, तेथील जे गरजू रहिवाशी आहेत त्यांना तुम्ही रस्त्यावर आणत आहात. राज्य शासनाने या अधिवेशनात कायद्यात बदल केलेला आहे. अनियमित बांधकामे नियमित करण्याबाबत जो कायदा केलेला आहे त्या कायद्याच्या आधारावर कोर्ट स्थगिती देऊ शकते. मी माननीय कोर्टाचा अवमान न करता बोलतो. आम्ही विधिमंडळात कायदे करतो आणि त्या कायद्यानुसार कोर्टाने निकाल द्यायचे आहेत, त्या आधारावर केसेस चालवायच्या आहेत. कायदे कसे करावेत हे जर कोर्ट सांगत असेल तर विधिमंडळाची काय गरज आहे ? मंत्री महोदयांनी या संदर्भात मुळमुळीत उत्तर देऊ नये. हायकोर्टाने या संदर्भात जे काही सांगितले असेल म्हणून राज्य शासन सुप्रिम कोर्टापर्यंत जाईल काय आणि तोपर्यंत या बिल्डींग तोण्यात येणार नाहीत असे आश्वासन राज्य शासन या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने देईल काय ?

..2D-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, कोर्टाचे ऑब्जर्वेशन स्ट्रीक्ट आणि सिरिएस आहेत,ते मी वाचून दाखवितो."We make it clear that this order will not effect the existing policy of regularisation of illegal structures. This order will not prevent the State Government from formulating a fresh policy of regularisation of class of illegal structures within the juridiction of three authorities. However, the policy formulated shall not be acted upon without the leave of this Court. Before initiating the process of formulation of such policy the State Government is bound to consider the law laid down by this Court in this order as regard the legality of such policy." आता सभापती महोदय, याबाबत मी अगोदर देखील उल्लेख केला आहे की,शासनाची ड्राफ्ट पॉलिसी तयार होती. कोर्टानी जे ले डाऊन केले आहे. "....the process of formulation of such policy the state government is bound to consider the law laid down by this court......... सभापती महोदय, we are bound by the law which has been laid down by the Court. ही पॉलिसी त्यांना एजी मार्फत दाखविण्यात येईल. त्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने निर्णय देतांना राज्य सरकारच्यावतीने ही बाब निदर्शनास आणली गेली काय ? गुरचरणाची जागा एमआयडीसीला 2011 मध्ये हस्तांतरित झाली आहे. या ठिकाणची बांधकामे 25 वर्षापूर्वीची असतील तर राज्य सरकारच्या कोणत्या अधिकाऱ्याने अशी बांधकामे असताना ती जागा हस्तांतरित केली. उच्च न्यायालयाचा निर्णय सिडको किंवा एमआयडीसीच्या हद्दीतील असलेल्या बांधकामासंदर्भात आहे. ही बांधकामांची जागा गुरचरण असताना 25 वर्षापूर्वी गरजेपोटी त्यावर घरे बांधण्यात आली आहेत. ही बाब राज्य शासनाच्या वतीने कोर्टाच्या निदर्शनास आणणे अत्यंत गरजेचे होते. याबाबत शासनातर्फे फेरविचार याचिका दाखल केली पाहिजे. राज्यमंत्री महोदयांनी कोर्टाचा निर्णय वाचून दाखविला तो आम्हाला मान्य आहे. कॅम्पा कोलाच्या बाबतील उच्च न्यायालयाचे निर्णय आले होते. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आले होते. केवळ उच्च न्यायालयाच्या निर्णयापुरता तो विषय सीमित नव्हता. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला होता तरी देखील राज्य सरकारने भूमिका घेऊन याबाबत बाजू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मांडण्याचा प्रयत्न केला होता. एमआयडीसीला ही जागा 2011 मध्ये हस्तांतर झाली आहे. तत्पुर्वीची ही बांधकामे आहेत, हे पुन्हा ॲडव्होकेट जनरल यांच्यामार्फत सरकारला 30 तारखेच्या पूर्वी न्यायालयात मांडता येऊ शकते. ही कार्यवाही राज्य सरकार करणार आहे, काय असा माझा प्रश्न आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, ही बाब शासनाला 30 तारखेच्या अगोदर कोर्टात मांडायची आहे. जी गुरचरणची जमीन होती.

श्री.सुनिल तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदय, हे अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या पॉलिसी संदर्भात सांगत आहेत, अनधिकृत बांधकामे सिडको, एमआयडीसी व महानगरपालिकेच्या हद्दीत आहेत, त्यासंदर्भातील पॉलिसी आहे. ही बाब त्यामध्ये येत नाही. आता शासन नव्याने पॉलिसी तयार करीत आहे, उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्यांना अगोदर दाखविली पाहिजे, त्यांची मान्यता घेतली पाहिजे, त्यानंतर ती पॉलिसी विधिमंडळात आणून कायद्यात रुपांतर केली जाईल हा भाग वेगळा आहे. माझा मुद्दा असा आहे की, पॉलिसीच्या पलिकडे जाऊन ही बाब वेगळ्या अर्थाने मांडणे आवश्यक आहे. ही जागा एमआयडीसीला 2011 मध्ये हस्तांतरित झाली आहे. ही जागा हस्तांतरित होत असताना ग्रामपंचायतीच्या परवानगीने येथील बांधकामे झाली आहेत किंवा नाहीत, हे महसूल यंत्रणेच्या लक्षात आले पाहिजे. गुरचरण ही जागा महसूल विभागाची आहे. त्या जागेवर बांधकामे असताना ती जागा एमआयडीसीला हस्तांतरित कशी झाली. याबाबत मंत्री महोदय काय खुलासा करणार आहेत ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही बाब 30 तारखेच्या आत ॲडव्होकेट जनरल यांच्या मार्फत हायकोर्टाच्या लक्षात आणून दिली जाईल. त्या जागेवर 2011 किंवा त्या अगोदर तेथे जे भूमीस्वामी आहेत, तेथे राहत होते, वास्तव्य करीत होते, अशा लोकांनी गरजेपोटी घरे बांधली असतील किंवा गावातील सरंपचाचे सर्व सोपस्कार उरकून घरे बांधली असतील ही बाब कोर्टाच्या लक्षात आणून दिली जाईल. शासनातर्फे पूर्ण सहानुभूतीपूर्वक त्यांची जागा अधिकृत कशी करता येईल व त्यांना सन्मानाने आणि स्वाभीमानाने जगता येईल याबाबत योग्य दक्षता घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, नवी मुंबईतील हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे, असे प्रश्न ठाणे व मुंबई जिल्ह्यात आहेत, अशा प्रकारची परिस्थिती बऱ्याच शहरात निर्माण झालेली

...3...



श्री.नरेंद्र पाटील...

आहे. एमआयडीसी किंवा महानगरपालिकेची जागा असेल त्यावर इमारती किंवा अशा झोपडपट्ट्या तयार होतात, कालांतराने काही वर्षानंतर सरकारच्या व अधिकाऱ्यांच्या लक्षात येते व ती घरे तोडण्याची ऑर्डर काढली जाते. त्यामुळे लोकांचा फार मोठा प्रश्न निर्माण होतो. एमआयडीसी किंवा गावठाणाची जागेवर जेव्हा घरे तयार होतात तेव्हा तेथील अधिकारी काय करीत होते. घरे तयार झाली, इमारती तयार झाल्या, त्यांना पाणी, वीज देण्यात आले, त्या घरांची खरेदी विक्रीची नोंदणी झालेली आहे. अशा परिस्थिती तेथील रहिवाशांची काय चूक आहे. बिल्डरांनी खोटे कागदपत्रे दाखवून खरेदी विक्री केली. नागरिकांनी घरे घेतली त्या कागदपत्रांच्या आधारावर बँकेतून कर्ज घेतले आहे, त्यामुळे बँका देखील अडचणीत आल्या आहेत. त्यामुळे हा प्रश्न मर्यादित न राहता ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात ही बांधकामे झाली आहेत, त्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली. घराची खरेदी विक्री होते, नोंदणी होते, त्यातून शासनाला महसूल मिळतो त्या अधिकाऱ्यांनी अशा घरांची खरेदी विक्री करताना ही जागा अधिकृत आहे की, अनधिकृत आहे, याची तपासणी का केली नाही, त्यांनी जे पैसे घेतले ते रहिवाशांना परत देण्यात येणार आहेत काय ? त्या ठिकाणी जे लोक अनेक वर्षापासून राहत आहेत, ती घरे त्यांच्या नावे कायमस्वरुपी करण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी प्रश्न विचारल्यानुसार त्या ठिकाणी जेव्हा बांधकामे होत होती तेव्हा ही बांधकामे त्याच वेळी थांबविण्यासाठी काही सिस्टीम नाही काय ? कोर्टाचे देखील असेच आर्ब्जवेशन आहे, एमआरटीपी व कॉर्पोरेशन ॲक्टमध्ये त्या ठिकाणी जाऊन फिजिकली स्टॉपेज करण्याचे अधिकार नाहीत. बांधकाम झाल्यानंतर 53,54, व 55 ची नोटीस देण्यात येते. फिजिकली स्टॉपेज करण्याची बाब या धोरणात अंतर्भूत असावी असे कोर्टाचे देखील म्हणणे आहे. जेणेकरुन एमआरटीपी व कॉर्पोरेशन ॲक्ट हे दोन्ही सशक्त झाले पाहिजेत. ज्या लोकांनी गरजेपोटी घरे घेतली त्यांच्याबाबत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सहानुभूती असायलाच पाहिजे. त्यांच्या आयुष्याची जमा पुंजी लावून त्यांनी त्यांचा निवारा शोधला असेल. दुसऱ्या बाजूला या गोष्टीचा फायदा घेत विकासक अशी घरे विकतात. कोर्टाच्या ऑर्ब्जवेशननुसार त्यामध्ये थोडे चेजेंस करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न

...4...



डॉ.रणजित पाटील...

असा विचारला होता की, यावेळी जे अधिकारी होते, ही एक सिस्टीम आहे, याबाबतील निश्चित विचार केला जाईल. आता राज्यासाठी युनिफॉर्म पॉलिसी आणली जात आहे. उल्हासनगर, ठाणे किंवा नवी मुंबईतील काही भागात अशा प्रकारची बांधकामे उभी राहतात, त्यानंतर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. ज्या लोकांना घरे विकली जातात, त्या लोकांची काहीच चुकी नसते ते निष्पाप असतात, त्यांना ही घरे विकली जातात, या घरांवर बँकाचे कर्ज काढले असते, एके दिवशी त्यांना कळते हे बांधकाम अनधिकृत आहे, म्हणून पूर्ण राज्यासाठी एक युनिफॉर्म पॉलिसी तयार केली जात आहे, ती एजी यांना दाखवून ती फूलप्रूफ असावी, टेक्निकली व कायदेशीररित्या ती मागे येऊ नये यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, कायद्याची अडचण असल्यामुळे त्यांना कारवाई करावी लागत आहे. कायदा हा माणसाला जगविण्यासाठी केला जातो, त्यामुळे महानगरपालिकेमार्फत पाणीपट्टी, घरपट्टी त्या ठिकाणी वसूल केली जात होती. या भागात आदिवासी कोळी अशा लोकांचे पारंपारिक वास्तव्य आहे, त्यामुळे त्यांची जुनी घरे तेथे आहेत, त्यांनी घरपट्टी, पाणीपट्टी असे सर्व सरकारी टॅक्स भरले आहेत, त्यासंदर्भातील पावत्या त्यांच्याकडे आहेत. अशा प्रकारची मागणी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांकडून होते, त्यामुळे मानवतावादी दृष्टीकोन ठेऊन शासन यासंदर्भात कोणती कार्यवाही तातडीने करणार आहे. याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले आहे की, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या वेळी मी सांगितले होते की, याबाबत जे भूमीस्वामी आहेत, पारंपारिक रहिवाशी आहेत. या गोष्टी पुन्हा माननीय कोर्टाच्या नजरेस आणून त्यातून मार्ग निघू शकतो काय यावा विचार करण्यात येणार आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, बांधकाम झाल्यानंतर एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत आम्ही ॲक्शन घेऊ शकतो. माझ्या मते हे उत्तर चुकीचे आहे. जर शासकीय जागा असेल तर त्या जागेची देखभाल करणे, जागेवर अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी तेथील जिल्हाधिकाऱ्यांची असते. खाजगी जागा असेल तर त्या जागेवर अनधिकृत बांधकाम होत असेल आणि ती जागा महापालिकेच्या हद्दीमध्ये असेल तर महापालिका स्टॉप वर्क नोटीस देऊ शकते, त्यासाठी बांधकाम होईपर्यंत थांबण्याची गरज नाही. बांधकाम होईपर्यंत आम्ही काही करु शकत नाही हे उत्तर दिले ते चुकीचे आहे. मंत्री महोदयांनी हेही सांगितले की, कोर्टाच्या आदेशानुसार कारवाई करीत आहेत. कोणताही नवीन कायदा करण्याविषयी कोर्टाने शासनाला रोखलेले नाही. कोर्टाने एवढेच म्हटले आहे की, नवीन कायद्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी कोर्टाची सहमती घेणे आवश्यक राहील. आज अस्तित्वात असलेल्या कायद्याची अंमलबजावणी या भागासाठी होणे, subject to Court approval, ती होईपर्यंत शासन कोणतीही कारवाई करणार नाही याची हमी मंत्री महोदय देतील काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सध्या एमआरटीपी कायद्यातील जे काही प्रचलित नियम आहेत त्यानुसार आपण स्टॉप वर्क नोटीस देऊ शकतो. But there are no specific power conferred upon the Municipal Corporation to physically stop construction. ते असेल किंवा एमएमसी ॲक्टला या दोन्हीला स्ट्रेंग्थनिंग करण्यासाठी कोर्टाने ऑब्झर्व्हेशन्स दिलेली आहेत. त्या बाबतीत बरीच हिअरिंग झाली, डिस्कशन झाले. स्टॉप वर्क आपण करु शकतो. There are no specific power conferred upon the Municipal Corporation to physically stop construction. सभापती महोदय, ही अडचण आहे म्हणूनच लोक याचा फायदा घेऊन बांधकाम करतात. आपण म्हणता ते सुध्दा बरोबर आहे. ब-याचदा असे होते की, पोलीस प्रोटेक्शन मागितले जाते तेव्हा बंदोबस्ताचे कारण सांगितले जाते. अशा काळात बांधकाम उभे होते. ही बांधकामे इतक्या गतीने केली जातात की, 3-4 आठवड्यामध्ये दोन-चार मजल्यांची इमारत उभी राहते. जोपर्यंत या संदर्भात जरब बसेल अशी काही कलमे कायद्यात अंतर्भूत होत नाहीत तोपर्यंत अशी आव्हाने आपल्याला पेलावी लागतील. कोर्टाची ऑर्डर स्पेसिफिक आहे. त्यांनी आहे ते अनधिकृत बांधकाम डिमॉलिशन करण्यास

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सांगितले आहे. 30 तारखेपर्यंत आपल्याला डेडलाईन दिली आहे. जोपर्यंत ओपिनियन येत नाही, धोरण ठरत नाही तोपर्यंत स्टेटस को ठेवले आहे. ..2...



श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, कोर्टाचे आदेश आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले. राजू मिश्रा याने कोर्टात याचिका दाखल केली. ही व्यक्ती कोणाची हस्तक आहे, कोणाच्या सांगण्यावरुन त्याने याचिका दाखल केली याचे वास्तव मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगितले पाहिजे. 25 हजार लोकांचे संसार उद्‌ध्वस्त होणार आहेत. कोणत्या नगरसेवकाने आपल्या हस्तकाकरवी ही याचिका दाखल केली हे कळले पाहिजे. मराठी माणसाचे नाव घेऊन मराठी माणसांना उद्‌ध्वस्त करण्यासाठी पुढे आले आहेत. 31 तारखेपर्यंत ही बांधकामे वाचविली पाहिजेत. ईश्वरनगर, वॉर्ड नं.1 येथे कोर्टाचे आदेश असताना सुध्दा 4 मजल्यांपर्यंत बांधकाम झाले आहे. चिंचपाडा येथे 3000 अनधिकृत बांधकामे झाली. विधीमंडळाने कायदा करावा. घटनेने तो अधिकार दिलेला आहे. त्यानुसार ताबडतोब कायदा करावी. कोर्टाची सबब सांगू नये. ग्रामपंचायतीच्या सहमतीनुसार बांधकामे झाली आहे असे कोर्टात प्रतिज्ञापत्र दिले असते तर कोर्टाने बांधकामे तोडण्याचे आदेश दिले नसते. परंतु हे राजकारण आहे. स्थानिक नगरसेवकावर राग धरुन ऐरोली चिंचपाडा येथील नगरसेवकाने मराठी माणसांना उद्‌ध्वस्त करण्यासाठी राजू मिश्रा नावाच्या व्यक्तीला याचिका दाखल करावयास सांगितले. 25 हजार लोकांचे संसार उद्‌ध्वस्त होण्यापासून वाचविणार आहात काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हा राजू मिश्रा कोण आहे याची मला सुध्दा पूर्ण माहिती नाही. याची माहिती घेतली जाईल. माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत आपली जी अडचण आहे ती मी विशद केली आहे. तरी देखील शासन सहानुभूतीने आपल्या परीने प्रयत्न करेल. तेथील लोकांनी गरजेपोटी घरे विकत घेतली, त्यासाठी आपल्या आयुष्याची पुंजी खर्च केली आहे. त्यांच्याबद्दल शासनाला सहानुभूती आहे.

**उप सभापती :** आताच्या या महत्वपूर्ण अशा प्रश्नावर सभागृहातील सर्वच माननीय सदस्यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. मी अगदी थोडक्यात आपल्याला सांगणार आहे. हा प्रश्न फक्त या एकाच विभागाचा नसून हा संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न आहे. महाराष्ट्राचा हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने आपली पावले पडत आहेत असे मला स्वतःला वाटते. त्यामुळे माझे स्वतःचे असे मत आहे की, हा संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न सोडविण्याचा आपलाही प्रयत्न आहे. हा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न एकत्रितरित्या सोडवायचा असेल तर आपल्याला हवे असल्यास विभागातील संबंधित लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या दोघांची सांगड घालून एक महत्वपूर्ण बैठक आपण बोलवावी आणि

..3..



**उप सभापती...**

त्याबाबत निर्णय घ्यावा. जोपर्यंत आपण म्हटल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेत या सर्व गोष्टीचा सारासार विचार होत नाही, तोपर्यंत दिव्यामधील कारवाई आपण ताबडतोब स्थगित करावी आणि या प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्याकरिता आपली सर्वसाधारण बैठक संपन्न होईल त्या ठिकाणी जो निर्णय बाहेर येईल त्याचा आपण अवलंब करावा. मात्र अचानकपणे 25 हजार संसार उद्‌ध्वस्त होणार असतील आणि त्याची परिणिती इतर भागातही होणार असेल तर आपण जो विषय मांडला तो सयुक्तिक मांडला, योग्य मांडला, फक्त त्याच्या एक पाऊल मी पुढे गेलो. हवे असल्यास मी आपल्याला स्पष्टपणे निर्देश देतो. ही कारवाई आपण त्वरित थांबवावी आणि आपल्या मनात आहे त्याबाबत आपण सर्व संबंधितांची एकत्रित बैठक बोलवावी आणि त्यामधून या प्रश्नाचा संपूर्णपणे विचार करावा हे निर्देश देतो.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आपण म्हणाल त्या योग्य तारखेला बैठक बोलावली जाईल. आपल्याला 30 तारखेपर्यंत अवधी आहे. तोपर्यंत आपल्याला पॉलिसी द्यायची आहे. आपले निर्देश आहेत.

श्री.नरेंद्र पाटील : मंत्री महोदय, तोपर्यंत बांधकाम तोडणार नाही हे आपण सांगावे.

**उप सभापती** : मी तसे निर्देश दिलेले आहेत. माझ्या निर्देशाची अंमलबजावणी आतापर्यंत महाराष्ट्र शासनाने केलेली आहे. ते करतील अशी मला खात्री आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आभारी आहोत.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील पोलीस दलातील अधिकाऱ्यांकडून पोलीस शिपायांना देण्यात येणारी घृणास्पद व वेठबिगार वागणूक

**मु.शी.** : राज्यातील पोलीस दलातील अधिकाऱ्यांकडून पोलीस शिपायांना देण्यात येणारी घृणास्पद व वेठबिगार वागणूक यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

***"राज्याच्या पोलीस दलातील अधिकाऱ्यांकडून पोलीस शिपायांना घृणास्पद व वेठबिगार वागणूक देण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी राज्य शासनाकडे करण्यात येणे, या तक्रारींची मा. मुख्यमंत्र्यांनी गंभीर दखल घेऊन आस्थापना विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री आशुतोष डुंबरे हे या तक्रारी प्रकरणी चौकशी करीत असणे, मुंबई व नाशिक शहर पोलीस विभागातील पोलिसांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी येणे, त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने पोलीस कर्मचाऱ्यांसाठी, वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी बैठकीचे आयोजन करून पोलीस कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने केलेल्या व करावयाच्या उपाययोजना, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."***

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) FF.5

SGB/ MMP/ AKN/ 15:20

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा प्रश्न पोलीस अधिकाऱ्यांकडे घर कामाच्या मदतीसाठी म्हणून काही कर्मचारी नेमले जातात त्यांच्या संदर्भातील आहे. वर्षानुवर्षे ही प्रथा आपण पहात आहोत. त्यामागे काही कारणे आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या घरातील मदतीसाठी काही पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. निवेदनामध्ये म्हटले आहे की, पोलीस महानिरीक्षक श्री.आशुतोष डुंबरे यांनी शहानिशा करुन पोलीस कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. ही जी निनावी तक्रार आली होती त्यानुसार पोलीस अधिकारी, विशेषतः मुंबई आणि नाशिक भागातील वरिष्ठ अधिकारी कर्मचाऱ्यांना अपमानास्पद वागवितात. पोलीस महासंचालकांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या घरी मदत करण्यासाठी नेमलेल्या कर्मचा-यांबाबत कोणत्या स्वरुपाच्या सूचना दिलेल्या आहेत? आपण घर कामगारांचा प्रश्न बघतो. त्यांनी कोणते काम करायचे हे ठरलेले असते. परंतु वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची घरी मदतसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांनी कोणते काम करायचे की ते घरगडी आहेत, पोलीस विभागाला काय अपेक्षित आहे, याबद्दल आचारसंहिता निश्चित केली आहे का किंवा मार्गदर्शन केले आहे का?

2जी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

जनता दरबार घेण्याचे सुचविण्यात आले आहे असे आपण लेखी उत्तरात नमूद केलेले आहे. दळण न्यायला न्यावे लागते, अधिकाऱ्यांच्या पत्नीला ब्युटी पार्लरमध्ये न्यावे लागते, मुलांना शाळेत सोडावे लागते अशा प्रकारच्या तक्रारी निनावी पत्रामध्ये आल्या आहेत. तेहा त्यांनी कुठली कामे करू नयेत यासाठी देखील ठोस भूमिका घ्यावी लागेल. येथे आम्ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली म्हणून हा प्रश्न नाही. अनेक वेळा सामान्य कॉन्स्टेबलकडून उद्रेक होऊन नको त्या गोष्टी घडलेल्या आपण बघितल्या आहेत. तेव्हा यासंबंधी आपण कोणत्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी संहितेनुसार ऑर्डर्लीच्या ड्युटी काय असतात यासंबंधी येथे प्रश्न उपस्थित केलेला आहे. ते निनावी पत्र माझ्याकडे देखील आहे. आता ऑर्डर्लीच्या नावामध्ये सिक्युरिटी एड असा बदल करण्यात आलेला आहे. त्यांच्या नावामध्ये बदल झाल्यानंतर देखील तेच काम असेल आणि त्यासंबंधातील व्यक्तीशः तक्रारी असतील तर त्याकडे लक्ष घालण्यात येईल. या गोष्टीसाठी बऱ्याच मोडॅलिटीज आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांचा दरबार भरविला जातो. डीवायएसपी किंवा त्यावरच्या अधिकाऱ्याचे ते कर्तव्यच असते. वर्षामध्ये किती दरबार घेतले पाहिजेत हे देखील सांगण्यात आले आहे. या दरबारामध्ये त्याने पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांचे म्हणणे मांडले जाते किंवा धोरणात्मक मुद्दे मांडले जातात. तसेच त्यांना व्यक्तिशः म्हणणे मांडण्यासाठी एक ऑर्डली रूम असते. त्यात मला म्हणणे मांडायचे आहे म्हटले तर ते तेथे मांडण्याचा त्यांना अधिकार प्राप्त होतो. तेव्हा त्या अधिकाऱ्याकडे जाऊन आपल्याला आपले मन मोकळे करता येते. यात जास्त व्यक्तीगत तक्रारी असतात. उदा.मला अपमानित करण्यात आले, कुणाचे तरी पर्सनल स्टेटस-को सेटल करण्यासाठी वारंवार सुट्टया देत नाहीत, अशा प्रकारच्या तक्रारी त्या ऑर्डर्ली रूममध्ये घेतल्या जातात. यात किती तक्रारी घ्यायच्या यासाठी देखील धोरण आहे. त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सी.आर लिहिताना त्यांनी ऑर्डली रूममध्ये जाऊन किती लोकांना भेटलेले आहे हे पाहिले जाते. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर या गोष्टीचा अंतर्मुख होऊन विचार करायलाच पाहिजे. गेल्या वर्षभरामध्ये अशा काही घटना घडल्या आहेत की, जेथे मनस्ताप झालेला आहे. आता आपण सिक्युरिटी एड असे नाव दिले असले तरी त्यांच्या संहितेबद्दल एखादे स्पष्ट धोरण असावे अशा विचाराचे शासन सुद्धा आहे. त्यासंबंधी योग्य ते निदेश देण्यात येतील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पोलीस दलातील अधिकाऱ्यांसंबंधातील ही लक्षवेधी सूचना आहे. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने फार वेगवेगळ्या संदर्भाने सभागृहात चर्चा व्हायला पाहिजे. वरिष्ठ पदावरील अधिकारी आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना कसे वागवतात आणि त्यांना नेमून दिलेल्या कामांऐवजी कोणकोणत्या गोष्टी करून घेतात यासंबंधातील ही लक्षवेधी सूचना आहे. अधिकाऱ्यांच्या मुलांना शाळेत पोहोचवायला जाणे, डबे नेऊन देणे, आलेल्या पाहुण्यांची व्यवस्था करणे, अशी जी पोलिसांची कामे नाहीत ती सर्व कामे कनिष्ठ कर्मचाऱ्यांना करायला लावतात. ती नाईलाजापोटी त्यांना करणे क्रमप्राप्त होते. त्यांच्यासाठी आचारसंहिता असावी असा एक चांगला शब्द वापरला आहे. एखादा सक्षम कॉन्स्टेबल फील्डवरील जबाबदारी चांगली पार पाडत असेल, परंतु, त्याला शिक्षा म्हणून त्याची ड्युटी बदलून त्याला कोणाच्या तरी घरी कामाला पाठविले जाते. म्हणजे एक प्रकारची निष्क्रीयता पोलीस दलामध्ये येत आहे. अशाने ते बाकीची कामे सक्षमतेने करू शकत नाहीत. हा एक यंत्रणेचा दोष असू शकतो. आपल्या पोलीस दलामध्ये ज्या उपाययोजना आहेत त्या व्यतिरिक्त ज्यांना अशा प्रकारचा स्टाफ मिळतो त्यांना देखील समुपदेशन करणे आवश्यक आहे. वरिष्ठांनी आपल्या कोड ऑड कंडक्ट प्रमाणे वर्तन करायचे ठरविले तर कनिष्ठांवर होणारे अन्याय मोठ्या प्रमाणावर थांबू शकतील. खालच्या कर्मचाऱ्यांसाठी यंत्रणा आहे तशी वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी असणे आवश्यक आहे. वरिष्ठ अधिकारी हे वेगवेगळ्या ठिकाणी जात असतात. जिल्हा स्तरावर जात असतात. त्यांच्या बदल्या होत असतात. तेथील गावाची परिस्थिती आणि अंतर्गत माहिती यासाठी त्यांना अशा प्रकारचे लोक लागतात. आज महाराष्ट्रात सगळीकडे फेव्हरीझमचा प्रकार सुरू आहे. या सगळयाला थांबवायचे असेल तर शासनाने आपल्या खात्याने यासंबंधातील यंत्रणा तयार करावी. आपल्याकडे पोलीस प्रशिक्षणासाठी फार मोठी संस्था आहे. ही संस्था नाशिक येथे असून प्रश्न देखील नाशिकचाच आहे. त्या ॲकेडमीमध्ये वारंवार रिफ्रेशर कोर्सेस सुरू करणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर वरिष्ठांसाठी मार्गदर्शन व कोड ऑफ कंडक्ट आपण करू शकतो. यासाठी मानसिकता निर्माण होण्यासाठी शासन या सर्वांचा विचार करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रश्न वजा सूचना केलेल्या आहेत. नव्याने नोकरीला लागलेल्या तरूण कॉन्स्टेबलमध्ये क्षमता जास्त असते. तेव्हा त्याला फिल्डवरून काढून अशा ठिकाणी दिले तर त्याचे मॉरलच निघून जाईल. या ॲकेडमीमध्ये वरिष्ठांसाठी रिफ्रेशर कोर्सेस किंवा कौन्सिलींग असणे आवश्यक आहे अशी त्यांनी सूचना केली आहे. ज्या वरिष्ठांकडे ऑर्डलीची ड्युटी असते त्या वरिष्ठांना देखील मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. त्या अधिकाऱ्यांना हा त्यांच्या ड्युटीचा भाग नाही हे देखील सांगितले पाहिजे. यासाठी त्यांना समुपदेशन देणे आवश्यक आहे. यासंबंधातील सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांची सूचना चांगली असून ग्राह्य अशी आहे. तेव्हा यासंबंधी शासन संहितेसंबंधातील विचार निश्चितपणे करेल.

...........

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : स्व.वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने गठीत केलेल्या समितीच्या माध्यमातून नियोजन करण्यात आलेली कामे रखडणे

**मु.शी.** : स्व.वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने गठीत केलेल्या समितीच्या माध्यमातून नियोजन करण्यात आलेली कामे रखडणे यासंबंधी सर्वश्री हरिसिंग राठोड, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम(सार्वजनिक उपक्रम वगळून). मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"**हरितक्रांतीचे** जनक स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या औचित्याने शासनाने समिती स्थापन करुन रु. १०० कोटीचे नियोजन केलेले असणे, त्याचा एक भाग म्हणून स्व. वसंतराव नाईक यांच्या नावाचे जागतिक दर्जाचे सभागृह निर्माण करण्याकरिता राज्य शासनाने नागपूर येथे चार एकर जागा मंजूर करून देखील अद्यापपर्यंत बांधकामास सुरूवात न केल्याची घटना उघडकीस येणे, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी स्तरावरुन अतिक्रमणमुक्त जागेची निवड होऊन देखील बांधकामाची प्रक्रिया रखडली असणे, वीस कोटी रुपयांच्या निधीची तरतूद होऊन देखील अद्यापपर्यंत निविदा प्रक्रियेस देखील सुरूवात न होणे, आवश्यक त्या सर्व विभागांची मंजूरी मिळून देखील सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रकल्प सुरू करण्यास होत असलेली टाळाटाळ, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अशा या सर्व सोयीयुक्त सभागृहाचे काम लवकर पूर्ण व्हावे याकरिता विमुक्त भटके सांविधानिक हक्क संरक्षण महासंघाने केलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझी लक्षवेधी सूचना हरितक्रांतीचे जनक स्व.श्री.वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने शासनाने समिती स्थापन करून एक जागा मंजूर करून घेतली होती. ही जागा मान्य झाली. त्यासाठी 20 कोटी रूपयांचा निधी देखील मंजूर झाला. परंतु, प्रत्यक्षात कामाला सुरूवात होत नाही. तेव्हा एक महिन्याच्या आत टेंडर काढून त्या बांधकामास सुरूवात होणार आहे काय ? असा माझा पहिला प्रश्न आहे. आरक्षण बदलाचे आदेश काढण्यात येतील असे आपण म्हटलेले आहे. हा विषय मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील विषय आहे. हे काम आपण कधी पर्यंत करू शकणार आहात ? असे माझे दोन प्रश्न आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, यासंबंधात 12 डिसेंबर रोजी बैठक घेऊन सूचना देण्यात आलेल्या आहेत. या जमिनीवर आरक्षण नाही असे सुरूवातीला वाटले होते. पण नंतर असे लक्षात आले की, या जमिनीवर आरक्षण आहे. त्यामुळे तातडीने स्थानिक प्राधिकरणाशी संपर्क साधून जागेचे हस्तांतरण लवकरात लवकर होईल या दृष्टीने प्रयत्न केले जातील. कारण यासंबंधातील निधी देखील उपलब्ध आहे. याची लकरात लवकर अंमलबजावणी कशी करता येईल हे पाहिले जाईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, निधी उपलब्ध आहे आणि लवकरात लवकर हे काम केले जाईल अशा प्रकरचे उत्तर दिलेले आहे. जे महनीय नेते असतात त्यांची आपण शताब्दी साजरी करतो. त्यांचे आपण कौतुक करतो. त्यासाठी निधीची तरतूद देखील करतो. काँग्रेसच्या काळात स्व.वसंतराव नाईक यांच्या जन्म शताब्दी वर्षा निमित्त 99.29 रूपयांची तदतूद करण्यात आली आहे. याकामासाठी आपण 20कोटी रूपये वर्ग देखील केले. सार्जनिक बांधकाम विभागाच्या ऐवजी नागपूर सुधार प्रन्यास ट्रस्टने काम करावे असा निर्णय झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे......

असा निर्णय झाला होता. महामहिम राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेने व माननीय राज्यपालांच्या शिफारशीनुसार ही जागा आपल्याला मिळाली. महामहिम राष्ट्रपतींपासून माननीय राज्यपालांपर्यंत सर्वांनी सांगितले की, माननीय वसंतराव नाईक यांचे स्मारक होणे गरजेचे आहे. अशा वेळेला एमआरटीपीच्या 37 नुसार तुम्ही काही कार्यवाही केली आणि ते काम वाढविले. यामध्ये एकदा नाही तर दोन वेळा हरकती मागविण्यात आल्या. हे जे काही झाले आहे ते चुकीचे आहे. एमआरटीपी ॲक्ट नुसार सार्वजनिक व महत्वाच्या कामासाठी तुम्ही अटी काढू शकता. मार्च एंड झाल्यानंतर निधीची समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे यासंदर्भातील निविदा पूर्ण करण्याची प्रक्रिया किती दिवसामध्ये व किती तासामध्ये पूर्ण होईल ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे साहेबांचे म्हणणे बरोबर आहे. या विषयाच्या संदर्भात आपल्याला दोनदा हरकती मागवाव्या लागल्या होत्या. त्याचे कारण असे होते की, आपण पहिल्यांदा हरकती व सूचना मागवल्या होत्या त्या पब्लीक-सेमी पब्लीक यानुसार मागविल्या होत्या. खरे म्हणजे त्यावेळी पब्लीक युटीलीटी म्हणून हरकती व सूचना मागवावयास पाहिजे होत्या. ही तांत्रिक बाब होती. परंतु प्रोसेसनंतर कोणी कोर्टात जाऊन आडकाठी आणू नये यासाठी काळजी घेण्यात आली आहे. ही जी जागा आहे त्या जागेचा उपयोग खेळाचे मैदान म्हणून केला जात आहे. ही जागा स्मारकासाठी दिली आणि त्यामुळे कोणी दुखावला गेला तर तो कोर्टात जाईल व आपल्या प्रक्रियेला खीळ बसेल. आता ही प्रक्रिया सुध्दा पूर्ण झालेली आहे. या विषयाच्या संदर्भात सचिवांनी सूचना सुध्दा सूचना निर्गमित केल्या आहेत. आता फक्त औपचारिकता राहिलेली आहे. त्यामुळे सगळयाच्या अधिन राहून निविदा प्रक्रिया सुरु करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी सभागृहात अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु केली असून तात्काळ काम सुरु केले जाईल असा उल्लेख मंत्री महोदयांनी केलेला आहे. 100 कोटी रुपयांचे नियोजन करीत असताना 20 कोटी रुपयांमधून हॉल किंवा इतर कक्ष बांधण्याचा प्रयत्न केला. परंतु हे काम 20 कोटी रुपयांमध्ये पूर्ण होणार नसून यासाठी आणखीन निधीची आवश्यकता लागणार आहे व त्याकरिता नव्याने प्रस्ताव सादर करावा लागणार आहे. त्यामुळे स्मारकासाठी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे .....

आवश्यक असलेला सर्व निधी देण्याच्या संदर्भात राज्य शासन भूमिका घेईल काय ? स्मारकासाठी जवळपास 4 एकर जागा उपलब्ध आहे. त्या जागेमध्ये व्यवस्थित बांधकाम होणे आवश्यक आहे. हे स्मारक नागपूरमध्ये असून नागपूर हे उपराजधानीचे शहर आहे. माननीय वसंतरावांचे श्रेष्ठत्व आपल्या सर्वांना मान्य आहे. माननीय वसंतराव नाईक यांना हरितक्रांतीचे जनक म्हटले जाते. माननीय वसंतराव नाईक हे विदर्भातील असल्यामुळे त्यांचे भव्यदिव्य स्मारक होण्यासाठी शासन आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देईल काय ? मागच्या शासनाने स्मारकासाठी 20 कोटी रुपये दिले होते. त्यामुळे स्मारकासाठी आवश्यक असलेला निधी शासन उपलब्ध करुन देणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात करेक्टेड प्रपोजल 49 कोटी रुपयांचे आलेले आहे. सुरुवातीला आपण 100 कोटी रुपये वर्ग केले होते व त्यातील 20 कोटी रुपये यासाठी ठेवले होते की, ....यामध्ये जास्त कालावधी निघून गेला आहे. आता करेक्टेड प्रप्रोजल 49 कोटी रुपयांचे आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला जोपर्यंत निधी वितरीत होत नाही तोपर्यंत ते बांधकामाला सुरुवात केली जात नाही. त्यामुळे बैठक होऊन हे प्रपोजल एनआयटीकडे सुपुर्द केले आहे. वरचा जो काही खर्च येईल तो खर्च शासनाकडून एनआयटीच्या मार्फत खर्च करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना पुन्हा सांगतो की, आपण जे 20 कोटी रुपये ठेवले होते....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, जो काही प्रस्ताव असेल त्या प्रमाणात आवश्यक असलेला निधी त्या ठिकाणी वापरला गेला पाहिजे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, 49 कोटी रुपये कोठून येतील यासंदर्भात आपल्याला नियोजन करावयाचे आहे. याबाबतीतील सूचनाही दिलेल्या आहेत की, उर्वरित निधी एनआयटी आणि डीपीडीसी ....हा प्रयत्न आहे की, 49 कोटी रुपयांचा निधी आपल्याला उभा करावयाचा आहे. निधीसाठी स्मारकाचे काम थांबणार नाही. स्मारकाचे काम होणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, राज्याचे माजी मुख्यमंत्री कृषी प्रणेते माननीय वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्मारक लवकरात लवकर पूर्ण व्हावे अशी मी शासनाला आपल्या वतीने विनंती करतो. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, माननीय वसंतराव नाईक ज्या समाजात जन्माला आले त्या भटक्या व विमुक्त समाजाचा शिष्यवृत्तीचा प्रश्न मागच्या सरकारने व या सरकारने प्रलंबित ठेवलेला आहे. क्रिमिलेअरची अट कोणालाही नसते परंतु अवैध रितीने क्रिमिलेअरची अट भटक्या व विमुक्त जातीला तसेच ओबीसीला लावली आहे. त्यामुळे माननीय सवसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त क्रिमिलेअरची अट हटविण्यासंदर्भात शासन निर्णय घेणार आहे काय ?

सभापती महोदय, ज्या प्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने दलित समाजाच्या उध्दारासाठी फंड रेज केला आहे तसेच माननीय सवसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र सरकार भटक्या व विमुक्त ए,बी,सी,डी गटांच्या गावांना फंड आणि सवलत देणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या कार्यकक्षेच्या बाहेरचा प्रश्न विचारलेला आहे. परंतु तरीही मी सांगू इच्छितो की, स्मारकाच्या संदर्भात सन 2012-2013 मध्ये 100 कोटी रुपयांचे नियोजन झालेले असले तरी सन्माननीय सदस्य श्री. जानकर साहेबांनी जी सूचना व्यक्त केली आहे ती ग्राह्य धरुन त्या बाबतीत सकारात्मक रित्या विचार होईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

---------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बिन्दु वायु(उर्जा) प्रा.लि.हैद्राबाद, मैत्राह वायु(कृष्णा) प्रा.लि. व अन्य कंपन्यांनी शासनाचा बुडविलेले मुद्रांक शुल्क

**मु.शी.** : बिन्दु वायु(उर्जा) प्रा.लि.हैद्राबाद, मैत्राह वायु(कृष्णा) प्रा.लि. व अन्य कंपन्यांनी शासनाचा बुडविलेले मुद्रांक शुल्क यासंबंधी सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे,सुनील तटकरे, जयवंतराव जाधव, सतीश चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"**बिंन्दू** वायु (उर्जा) प्रा.लि.,हैद्राबाद या कंपनीने दुय्यम निबंधक कार्यालय, सिन्नर जि.नाशिक येथे ७७४ कोटी रुपये किंमतीचे गहाणखत करणे, यासाठी सिन्नर तालुक्यातील केवळ ९.१ हेक्टर जमीन तारण देणे, मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार सुमारे ४० कोटी रुपये मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक असणे, या कंपनीने अधिकाऱ्यांशी संगनमत करुन केवळ १० लाख रुपये किंमतीचे मुद्रांक शुल्क अदा करणे, यामुळे शासनाचे सुमारे ४० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान होणे, शासनाची फसवणूक व आर्थिक नुकसान झाल्याप्रकरणी कंपनीला नियमाप्रमाणे दंड देऊन कायद्यातील तरतुदीनुसार १०० कोटी रुपये वसुल करण्याची मागणी करण्यात येणे, या मागणीकडे शासनाने अक्षम्य दुर्लक्ष करणे, मैत्राह वायु (कृष्णा) प्रा.लि. या कंपनीने अशाच पध्दतीने अहमदनगर येथे सुमारे २९ कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्क बुडविणे, आंध्रप्रदेशातील गोचीबोवली, हैद्राबाद येथे एकाच कुटुंबातील व्यक्तींनी अशा वेगवेगळ्या कंपन्या स्थापन करुन एकाच इमारतीतुन त्याचा कारभार चालविणे, अशा वेगवेगळ्या कंपन्यांकडून राज्यात विविध ठिकाणी मुद्रांक शुल्कासह इतर कर बुडविण्याचे प्रकार घडणे, लोकप्रतिनिधींनी अशा सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करुन बुडविलेला मुद्रांक शुल्क दंडव्याजासह सक्तीने वसुल करण्याची मागणी करणे, प्रकरणात अधिकाऱ्यांचे संगनमत असल्यामुळे या प्रकरणी कारवाईस अक्षम्य विलंब होणे, यामुळे शासनाचे १०० कोटीहुन अधिक रकमेचे आर्थिक नुकसान होणे, याप्रकरणी एस.आय.टी. मार्फत सखोल चौकशी करुन दोषी विरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची **प्रतिक्रया.**"

श्री. संजय राठोड ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मुद्रांक अधिनियम कलम 40(अ) प्रमाणे गहाण खताच्या किमतीवर 5 टक्के मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. मागच्या अधिवेशनात मी विचारलेल्या प्रश्नावर मैत्रावायु आणि बिंदुवायु नावाच्या कंपन्यांचे हैद्राबादमध्ये एकाच इमारतीवर जाहीरात लावलेल्या आहेत. यांचे संचालक मंडळ सुध्दा एकच आहे. माझी पहिली तक्रार नगरजिल्हयातील होती. आता ही घटना नाशिक जिल्हयातील सिन्नर येथे घडली आहे. सिन्नर येथे मुद्रांक अधिनियम कलम 40(अ) प्रमाणे गहाण खताच्या किमतीवर 5 टक्के मुद्रांक भरणे आवश्यक असतानाही तसे केलेले नाही. या ठिकाणी 10 लाख रुपयांची स्टँप डयुटी भरुन घेतली आहे. याला काहीही नियम नाहीत. खरे म्हणजे हे प्रकरण फार मोठे आहे. गेल्यावेळेस वेगळे प्रकरण होते आता वेगळे प्रकरण आहे. सगळया गोष्टींचा सारांश पाहता माझी विनंती एवढीच आहे की, उच्चस्तरीय समितीकडून या प्रकरणाची तपशिलवार चौकशी करुन एक महिन्याच्या आत चौकशीचा अहवाल दिला जाणार आहे काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित साहेबांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जी मागणी केली आहे ती खरी आहे. मागच्या अधिवेशनाच्या वेळेस सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून प्रश्न मांडले होते त्यानुसार चौकशी करण्यात आली व त्या प्रमाणे कारवाई सुध्दा झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात चौकशीची मागणी केलेली आहे, त्यानुसार नोंदणी महानिरीक्षक मुद्रांक आणि नियंत्रक यांच्या मार्फत उच्चस्तरीय चौकशी करुन एक महिन्याच्या आत चौकशी करुन कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

I-1/.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी एका वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात येतील असे सांगितलेले आहे. त्यांना असे आदेश देण्याचे अधिकार आहेत काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, होय.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडॉर प्रकल्पाच्या भूसंपादनात झालेला भ्रष्टाचार

**मु.शी.**: दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडॉर प्रकल्पाच्या भूसंपादनात झालेला भ्रष्टाचार यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, जयवंतराव जाधव, संदीप बाजोरिया,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. धनंजय मुंडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिल्ली मुंबई औद्योगिक कॉरीडॉर राज्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासाकरीता एक महत्वपूर्ण व महत्वकांक्षी प्रकल्प असणे, राज्यातील दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्ट्या अंतर्गत दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्राचे भूसंपादन करताना महामंडळाचे हित लक्षात न घेता निव्वळ विशिष्ट जमिन मालकांना फायदा होण्यासाठी सलग भूसंपादन न करता विखुरल्या स्वरुपात, संपूर्ण गट न घेता, पैकी (Partial) संपादन झाल्याचे, प्रधान सचिव, उद्योग यांनी यासंदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीत निदर्शनास येणे, भूसंपादनापोटी ४५० कोटी रुपये खर्च करुन देखील सार्वजनिक निधीचा योग्य प्रकारे वापर न झाल्याचे व सलगतेने क्षेत्राचे संपादन न केल्याने सदरचे क्षेत्र एम.आय.डी.सी. ला सद्यस्थितीत औद्योगिक वापरासाठी उपयोगात आणता येत नसल्याचे देखील निष्पन्न होणे, योग्य वापरासाठी एम.आय.डी.सी.ला संपादित क्षेत्र उपयोगात आणण्यासाठी संपादनामध्ये सलगता येत नसल्यास अशा गावांचे क्षेत्र विनाअधिसूचीत करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात येणे, अशा प्रकारे चूकीच्या पध्दतीने भूसंपादन होत असल्याने शासनाचे ४५० कोटी रूपयांचे नुकसान होऊन संपूर्ण भुसंपादनात व औद्योगिकरण अडचणीत येणे, सदर भुसंपादन प्रक्रियेत संबंधित अधिकाऱ्यांनी हितसंबंध जपत निवडक भुसंपादन केल्याने शेकडो कोटी रूपये अधिकाऱ्याच्या खिशात गेल्याची भिती व्यक्त होणे, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली असणे, प्रधान सचिव, उद्योग यांनी भूसंपादनाबाबत उपस्थित केलेले आक्षेप व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

सुचना त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींनी याविषयी केलेल्या चौकशीच्या मागणीवर शासनाने कार्यवाही करण्याची मागणी नागरिकांमधून होत असणे, या विषयी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्री. सुभाष देसाई ( उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडॉर हा राज्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासासाकरिता एक महत्वपूर्ण व महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. निवेदनात नमूद केले आहे की, पाच औद्योगिक क्षेत्रांसाठी 27 हजार हेक्टर जमीन संपादित करण्याचा निर्णय धेण्यात आला. त्यापैकी 12 हजार 140 हेक्टर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. डीएमआयसी अंतर्गत दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्राचे भूसंपादन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत संपादित केलेले आहे. रोहा-माणगाव व पाणसई औद्योगिक क्षेत्रातील घोटवळ, रातवड, निरज व रोहा-माणगाव औद्योगिक क्षेत्रातील जावटे व पाहूर या दोन औद्योगिक क्षेत्रा व्यतिरिक्त वावेदिवाळी निजामपूर व पळसगाव या क्षेत्रामध्ये किती जमीन संपादित करण्यात आली, भूसंपादनापोटी किती निधी वितरित करण्यात आला ? डीएमआयसीची बैठक झाली त्या बैठकीचे इतिवृत्त माझ्याकडे आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, औद्योगिक विभाग यांनी दिनांक 26.8.2015 रोजी रोहा-माणगाव,पाणसई,वावेदिवाळी,निजामपूर व पळसगाव या पाच औद्योगिक क्षेत्रापैकी रोहा-माणगाव व पाणसाई औद्योगिक क्षेत्रातील वरील पाच गावे सोडल्यास इतर गावांमध्ये सलगता येण्याची शक्यता नसल्याने शेतकऱ्यांना मोबदला वाटप करण्यात येऊ नये असे प्रधान सचिवांनी म्हटलेले आहे. जे डीएमआयसीचे अध्यक्ष आहेत. या बैठकीत सार्वजनिक निधीचा योग्य प्रकारे वापर करावा अशाप्रकारची तंबी प्रधान सचिवांनी अधिकाऱ्यांना दिलेली आहे. वरील पाच गावांव्यतिरिक्त उर्वरित 50 गावांमध्ये जे विखुरलेले भूसंपादन झाले आहे व त्यामध्ये सलगता आणणे शक्य नाही अशा क्षेत्रावरील चुकीच्या पद्धतीने झालेल्या भूसंपादनाची जबाबदारी शासन कोणावर निश्चित करणार आहे काय, ज्या अधिकाऱ्याने हे काम केलेले आहे त्यांच्यावर शासन जबाबदारी निश्चित करणार आहे काय, तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडॉरमध्ये सुरुवातीला 85 गावांतील 25 हजार हेक्टर क्षेत्र निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी 12 हजार 140 हेक्टर क्षेत्र अधिसूचित करण्यात आले. रोहा-माणगाव,पाणसाई आणि वावे दिवाळी या तीन औद्योगिक क्षेत्रातील 6 हजार 460 क्षेत्राकरिता दर घोषित करुन त्याप्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही केलेली आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष देसाई.....

कुठेही सक्तीचे भूसंपादन करायचे नाही, संमतीने आणि वाटाघाटीने भूसंपादन करायचे असे शासनाचे धोरण आहे. त्याप्रमाणे वावेदिवाळी येथे 522 हेक्टर, पानसई येथे 272 हेक्टर, रोहा-माणगाव येथे 478 हेक्टर क्षेत्र भूसंपादन करण्यात आले. त्यासाठी 471 कोटी रुपयांचे वाटप झालेले आहे. एकूण 1134 संमतीपत्रे आलेली आहेत. सुरुवातीला मोठे क्षेत्र घोषित झाले होते आणि नंतर ते कमी करण्यात आले. त्याचा परिणाम असा झाला की, विखुरलेल्या स्वरुपात भूसंपादन झाले म्हणून प्रधान सचिवांनी सूचना दिली की, सलगता नसेल तर विकास करणे कठीण आहे. सलगता यावी म्हणून आता ज्या ज्या ठिकाण्ी थोडे थोडे क्षेत्र बाकी आहे त्याकडे प्रथम लक्ष द्यावे आणि सलग स्वरुपाचे भूसंपादन करावे. जेथे सलगता येणे शक्य नसेल तेथ भूसंपादन करु नये अशीही सूचना प्रधान सचिवांनी केलेल्या आहेत. एवढे सर्व झाल्यानंतरही जर लोकांचा भूसंपादनासाठी विरोध असेल, या प्रक्रियेमध्ये ते सहभागी होणार नसतील तर ते क्षेत्र विनाअधिसूचित करावे काय, याचा देखील विचार केला जाईल

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मत्र्यांनी येथे दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे. याच मंत्री महोदयांनी सत्तेवर येण्यापूर्वी दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडॉरसाठी जे काही क्षेत्र संपादित केलेले आहे ते रद्द केले जाईल अशी घोषणा केली होती. आपणास हा अधिकार सत्तेवर असताना नसतो आणि सत्तेवर नसताना असतो, हा जो उक्ती आणि कृतीतील फरक आहे, तो मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचा आहे. ज्यावेळी आपणास अधिकार होता त्यावेळी आपण विरोधी पक्षात होता म्हणून आपण् राणा भीमदेवी थाटात घोषणा केली की, आम्ही सत्तेवर आल्यावर हा कॉरीडॉर पूर्णपणे रद्द करु परंतु आपण सत्तेवर आल्यानंतर मात्र या कॉरीडॉरला मान्यता दिली. आता त्यांनी पार्शली रद्द केलेले आहे. रोहा-माणगाव आणि पळसगाव त्यांनी ठेवलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या इतिवृत्ताचा हवाला दिला ते इतिवृत्त सत्य आहे. मी येथे जाणीवपूर्वक जबाबदारीने बोलत आहे की या ठिकाणी 32(1) आणि (2) खाली ही सर्व प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी याच उद्योग विभागाने आणि एमआयडीसीने ही सर्व जमीन या या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

पद्धतीने दर दिले जाऊन घेतली जाईल अशाप्रकारचे इरादापत्र राज्य शासनाच्या वतीने देण्यात आले. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, सलग जमीन मिळालेली नाही. सुरुवातीला संमती मागताना पूर्ण क्षेत्र घोषित केले आणि ज्या ज्या शेतकऱ्यांना संमती द्यायची आहे त्यांनी संमती द्यावी असे सरकारच्या वतीने आवाहन करण्यात आले. त्या ठिकाणी दरही जाहीर करण्यात आले. ज्यांनी साडेबारा टक्के विकसित जमीन घेतली तर किती दर आणि साडेबारा टक्केपूर्णपणे विकसित जमीन घेतली नाही तर किती दर देण्यात येईल हे निवेदनात नमूद केलेले आहे, ती वस्तुस्थिती खरी आहे. शेतकऱ्यांनी संमती दिली त्याप्रमाणे आपण 32(1) काढले आणि निधीचे वाटप सुरु केले. या ठिकाणी पाच समुहांचा उल्लेख आहे. रोहा-माणगाव तालुक्यातील काही गावांचा देखील येथे उल्लेख करण्यात आलेला आहे. माझा प्रश्न आहे की, माननीय मंत्री आता सांगत आहेत की, शेतकऱ्यांनी संमती दिली नाही तर अधिसूचितेच्या बाहेर जाण्याची त्यांची तयारी आहे. आज फुटकळ स्वरुपात जी जमीन संपादित झालेली आहे, त्या जमिनीचे शासन काय करणार आहे ? शेतकऱ्यांच्या सात-बारा उताऱ्यावर एमआयडीसीसाठी जमीन संपादित केली जाणार आहे अशाप्रकारच्या नोंदी आहेत, शासन त्या नोंदी काढून टाकणार आहेत काय ? या पाच समुहांतील शेतकऱ्यांची संमती घेऊन 32 (1) चा प्रस्ताव वर्षभर प्रलंबित आहे त्या संदर्भातील निर्णय शासन तातडीने घेणार आहे काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सलगता आली तर औद्योगिक विकास करणे सहज व सोपे होणार आहे आणि त्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहे. ज्यावेळी दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडॉर जाहीर झाला त्यावेळी या प्रकल्पास अनेकांनी विरोध करण्यास सुरुवात केली त्यामध्ये शिवसेना पक्षाचा देखील समावेश होता म्हणजे मी पण् त्यामध्ये आलो. लोकांवर जबरदस्ती करु नये यासाठी आम्ही आग्रह धरला होता आणि तो आग्रह आजही कायम आहे. तेव्हा लोकांवर जबरदस्ती केली जाणार नाही. ज्यांना संमतीने जमीन द्यायची नसेल त्यांच्या जमिनी वगळण्याचे शासनाचे धोरण आहे. या सर्व बाबतीत आम्ही लवकरात लवकर निर्णय घेणार आहोत. त्यासाठी संबंधितांशी चर्चा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करुन, बैठक घेऊन धोरणामध्ये स्पष्टता आणली जाईल आणि त्यानंतर त्यावर कार्यवाही केली जाईल.

...2J-1

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकल्पासाठी जमीन संपादित केलेली आहे. या प्रकल्पाचे 500 एकरचे क्षेत्र असताना माननीय मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे 200 एकर क्षेत्र असलेल्या लोकांनी जमीन देण्यास विरोध केला आणि 300 एकर क्षेत्र असलेल्या लोकांनी जमीन दिल्यास, अशा वेळी 300 एकर जमिनीचे शासन काय करणार ? त्यामुळे शासनाला अशा प्रकारचे धोरण स्वीकारता येणार नाही. दीघी पोर्ट हे डेव्हलप न होणारे पोर्ट आहे. त्या ठिकाणी ड्राप होत नाही. तेथे सतत ड्रेजिंग करावे लागते. तसेच दीघी पोर्टचा विकास जी कंपनी करीत आहेत त्या कंपनीची आर्थिक क्षमता नाही. त्या कंपनीने ज्या कमिटमेंटस् दिल्या आहेत त्या कमिटमेंटस् ती कंपनी पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे एवढी जमीन संपादित करुन उद्या जर दीघी पोर्ट वादात आले किंवा ते ऑपरेट झाले नाही तर शासन त्या संदर्भात कोणता विचार करणार आहे ? तसेच दुसरी बाब अशी आहे की, आपल्याला अशाप्रकारे अर्धवट भूसंपादन करता येणार नाही. असे केल्याने शेतकरी आणखी अडचणीत येईल. त्या बरोबरच शासन सुध्दा अडचणीत येईल. शिवाय त्यामध्ये शासनाचा पैसा अडकून पडेल. त्यामुळे शासन या बाबत गंभीरपणे विचार करणार काय ? माननीय मंत्री, आपण या प्रकल्पाला विरोध केला होता म्हणून या ठिकाणी मोघम उत्तर देता कामा नये. या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्र्यांच्या उत्तरात सुस्पष्टता असली पाहिजे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, माझ्या उत्तरात निश्चितपणे सुस्पष्टता आहे. आता त्या ठिकाणी बरचसे सलग क्षेत्र ताब्यात येत आहे. त्यामुळे ते नाकारण्याचे काही कारण नाही. त्याचा आकार विशिष्ट स्वरुपात पूर्ण झाला तर त्यावर चांगले औद्योगिकीकरण करता येईल. सन्माननीय सदस्यांची दीघी बंदराच्या बाबतीत जी सूचना आहे त्यावर निश्चितपणे विचार करण्यात येईल. तसेच पुढील नियोजन कसे असेल या संदर्भातील निर्णय राज्य सरकारच्या माध्यमातून नक्की घेण्यात येईल.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी जाहीर केले की, ज्यांची जमीन देण्यास संमती असेल त्यांच्याच जमिनी संपादित करण्यात येतील. मी सांगू इच्छितो दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडॉर प्रकल्पांतर्गत पहिला प्रकल्प औरंगाबाद येथील शेंद्रा येथे यशस्वी झाला आहे. माननीय मंत्र्यांनी हा निर्णय कोकणासाठी घेतलेला आहे. शेंद्रा औद्योगिक वसाहतीमध्ये शासनाकडून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण....

सक्तीने भूसंपादन सुरु आहे. सध्या त्या भागात 10 हजार हेक्टर जमीन संपादित केली आहे. अजून 5 हजार हेक्टर जमीन संपादित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे त्या ठिकाणी सुध्दा ज्यांची संमती असेल त्यांचीच जमीन संपादित करण्याचा निर्णय घेणार आणि ज्यांचा विरोध आहे त्यांच्या जमिनी संपादित करणार नाही काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की, शेंद्रा-बिडकीन या कॉरीडॉरमध्ये 4 हजार हेक्टर जमीन पूर्णपणे ताब्यात आली आहे. त्या ठिकाणी जमीन देण्यास कोणताही विरोध झालेला नाही. उलट त्या गावाच्या बाजूची गावे सुध्दा आग्रह करीत आहेत की, त्यांच्या जमिनी सुध्दा संपादित कराव्यात. त्यामुळे त्या भागात हा प्रश्नच आला नाही. परंतु या भागात भूसंपादन करण्याच्या अनुषंगाने आंदोलने झाली, विरोध झाला त्यामुळेच या ठिकाणी हा थोडा प्रश्न निर्माण झाला आहे. अर्थात, हा प्रश्न सुध्दा चांगल्याप्रकारे मिटवून, त्या ठिकाणी जेवढे औद्योगिकीकरण शक्य आहे तेवढे करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, जे शेतकरी सर्वसंमतीने जमिनी देतील त्यांच्याच जमिनीचे संपादन करण्यात येतील. परंतु मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, डीआयएमसी च्या बैठकीचे मिनिटस् माझ्याकडे आहेत. त्या बैठकीत प्रधान सचिवांनी दिलेल्या आदेशात असे नमूद केले आहे की, "खातेदारांची संमती प्राप्त झाल्यास व उर्वरित क्षेत्राची संमती प्राप्त होत नसेल तर सदरचे क्षेत्र सक्तीने कलम 33 (3) अंतर्गत संपादित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा." सभापती महोदय, माननीय मंत्री एका बाजूला सांगत आहेत की, सर्व संमतीने जमीन संपादित केली जाईल आणि दुसऱ्या बाजूला प्रधान सचिव आदेश देत आहेत की, या ठिकाणी सलगता आणावयाची असेल तर कलम 33 (3) नुसार जमीन संपादित करावी. सभापती महोदय, आम्ही विभागाच्या प्रधान सचिवांचे खरे मानायचे की माननीय मंत्र्यांचे खरे मानायचे ? महोदय, त्या ठिकाणी जमिनीत सलगता आली नाही. यापूर्वी अनेकांनी शेतकऱ्यांकडून कमी दराने जमिनी खरेदी केल्या आणि नंतर त्या जमिनी एमआयडीसीला जादा दराने दिल्या. त्यामुळे मी स्पेसिफिक मागणी करतो की, या संबंधीची चौकशी करण्यात येईल काय, तसेच या अनुषंगाने जे प्रश्न उपस्थित केले त्या बाबतीत चौकशी होणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, प्रधान सचिवांनी या बाबतीत एक व्यावहारिक आणि करता येण्यासारखे असे औद्योगिकीकरण व्हावे, या दृष्टीने काही सूचना दिलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते सांगत आहेत की, थोड्या क्षेत्राच्या बाबतीत त्यांनी ही सूचना केली आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, 80 टक्क्यांपर्यंत किंवा त्यांपेक्षा जास्त भूसंपादन झाले असेल आणि केवळ किरकोळ क्षेत्र मध्ये असेल तर तेवढ्यापुरतीच जमीन संपादित करण्याच्या बाबतीत त्यांची सूचना आहे. परंतु सरकारचे धोरण हेच आहे की, कुठेही सक्तीने भूसंपादन करता कामा नये. आमच्या असे निदर्शनास आले आहे की, फार मोठे क्षेत्र सलग होण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी आता अडचण येणार नाही. ज्या लोकांच्या हरकती आहेत त्यांची संमती घेऊन व त्यांना राजी करुन त्यांना यामध्ये समाविष्ट केले जाईल आणि हा टप्पा पूर्ण होईल याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, त्या भागातील पाच गावातील विखुरलेल्या जमिनी कलम 32 (1) अन्वये संपादित केल्या आहेत. ज्या ठिकाणी जमिनी संपादित करावयाचे राहिले असेल त्या ठिकाणी संपादित कराव्यात. परंतु या पाच गावांतील शेतकऱ्यांचे आपल्याकडे कलम 32 (1) अंतर्गत संमती पत्र आले आहे. परंतु ते एमआयडीसीच्या माध्यमातून माननीय मंत्र्यांच्या सहीसाठी गेल्या वर्षभरापासून प्रलंबित आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, त्या प्रस्तावाला आपण तातडीने मान्यता देणार की, दलालांची वाट बघून पुन्हा वर्षभरानंतर त्या प्रस्तावाला मान्यता देणार आहात ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, असा कोणताही प्रस्ताव प्रलंबित नाही. तरी सुध्दा या संदर्भातील माहिती घेऊन जी कामे शिल्लक असतील ती तातडीने पूर्ण करण्यात येतील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी त्या गावातील ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधी आहे. मी जबाबदारीने सांगत आहे. ही बाब मी चार-पाच महिन्यांपूर्वी माननीय उद्योग मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. मी त्यांना प्रलंबित प्रकरणांबाबत सांगितले होते. मी त्यांना सांगितले होते की, कोणीतरी आपल्या नावाने फिरत आहे. महोदय, मी ज्या पाच गावांबाबत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

बोलत आहे त्यांचा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात करण्यात आलेला आहे. त्यामुळे सलगता आणण्याच्या दृष्टीने माननीय मंत्र्यांच्या सहीसाठी त्यांच्याकडे पडून असलेल्या प्रस्तावाला मान्यता

..4..



श्री.सुनील तटकरे....

देण्यात येईल काय ? सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्र्यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी लोकांचा विरोध असेल ती जागा सक्तीने घेतली जाणार नाही. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी मिनिटसचा उल्लेख केल्यानंतर माननीय मंत्र्यांनी 'शब्दच्छल' करुन उत्तर दिले. त्यामुळे किमान या पाच गावातील सलगतेसंदर्भातील कलम 32 (1) चे जे प्रस्ताव माननीय मंत्र्यांकडे गेल्या वर्षभरापासून पडून आहेत त्या प्रस्तावाला तातडीने मान्यता देण्यात येईल काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, असे प्रस्ताव प्रलंबित असतील तर ते तातडीने पूर्ण करण्यात येतील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. माननीय मंत्र्यांना या संदर्भातील चौकशी लावण्यात काहीच अडचण नाही. कारण हा विषय पूर्वीही झालेला आहे. या विषयाच्या अनुषंगाने सांगतो की, वेगवेगळ्या ठिकाणी भूसंपादन झालेले आहे. त्यामुळे आता त्या जमिनीची संलगता करण्यात सरकारला अडचण येत आहे. विभागाचे प्रधान सचिव सांगतात की, या बाबतीत चुकीचे झाले आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, जे अधिकारी या गोष्टीला जबाबदार असतील त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, काही चुकीचे घडत असेल तर निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, प्रधान सचिवांनीच सांगितल्यामुळे आता या संदर्भात चुकीचे घडल्याचा विषय आता राहिला नाही. त्यामुळे जे घडले त्याच्या बाबतीत जबाबदारी निश्चित करुन, चौकशी करावी लागेल. जर सरकारने चौकशी समिती नेमली नाही तर, ज्यांनी चुकीचे काम केले त्यांना मंत्री महोदय संरक्षण देत आहेत की काय, असा प्रश्न उपस्थित होईल.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, मी उत्तर दिले आहे की, या बाबतीत अधिकची माहिती किंवा तपशील घेऊन या प्रकरणी काही चुकीचे होत असेल तर निश्चितपणे चौकशी केली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाईल. परंतु या संदर्भातील सलग भूसंपादनाचा विषय लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. तसेच चुकीच्या गोष्टींच्या बाबतीत कुठेही संरक्षण दिले जाणार नाही.

..5..



श्री.सुनील तटकरे : महोदय, माननीय मंत्र्यांचा प्रकल्पाला पाठिंबा आहे. त्यांची स्थिती जैतापूर प्रकल्पासारखी, सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही, अशी झालेली आहे. त्यामुळे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी निदर्शनास आणून दिले की, या सर्व जमिनींचा निवाडा जाहीर करीत कलम 32 (2) पूर्वी आपल्याच मान्यतेने ही सर्व जमीन खरेदी करण्याचा प्रस्ताव करण्यात आला.

..2के....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेते म्हणत आहेत त्याप्रमाणे चौकशी करायची झाली तर ठीक आहे. आपण त्या सर्व गोष्टींची मान्यता दिलेली होती.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यात खाजगी अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तरांची मान्य असलेल्या पदांच्या 30 टक्के पदे रिक्त असणे.

**मु.शी.** : राज्यात खाजगी अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तरांची मान्य असलेल्या पदांच्या 30 टक्के पदे रिक्त असणे यासंबंधी श्री. सतिश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सतिश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात खाजगी अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तरांची मान्य असलेल्या पदांच्या ३० टक्के पदे रिक्त असणे, रिक्त पदांवर तासिका तत्वावर प्राध्यापक नेमण्याची तरतूद असली तरी असे नियुक्त केलेले प्राध्यापक सातत्यपूर्ण सेवा देत नसणे, त्यामुळे महाविद्यालयातील अध्ययन, अध्यापन प्रक्रियेची मोठी हानी होत असणे, मोठ्या संख्येने रिक्त जागा असलेल्या महाविद्यालयांना नॅकच्या मुल्यांकन प्रक्रियेत अडचणी येत असल्याने, मा.संचालक, उच्च शिक्षण यांनी त्यांचे पत्र क्र.यु.एन.आय.२०१४/इतिवृत्त/विशि-१, दि.०४ जून, २०१४ नुसार शैक्षणिक वर्ष २०११-१२ च्या मान्य कार्यभारानुसार रिक्त असलेली पदे भरण्यास परवानगी दिलेली असणे, त्यानुसार महाविद्यालयांनी रिक्त पदे भरतीची प्रक्रिया सुरु केलेली असतांना अचानक शासनाने शैक्षणिक वर्ष १९९८-९९ च्या मान्य कार्यभारानुसार रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही करावी असे निदेश दिले असल्याने रिक्त पदे भरतीची प्रक्रिया थांबलेली असणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शैक्षणिक वर्ष सन ३० जून, २०१५ च्या मान्य कार्यभारानुसार रिक्त पदे भरण्यासाठी मान्यता देणे गरजेचे असल्याने याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतिश चव्हाण : सभापती महोदय, वरिष्ठ महाविद्यालयांतील जागा सन 1998-99 प्रमाणे भरायच्या की सन 2011-12 प्रमाणे भरायच्या या संदर्भातील प्रश्न आहे. मागच्या 6 महिन्यांपासून ही फाईल वित्त विभागाकडे प्रलंबित आहे. सुदैवाने माननीय वित्त मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. उप सचिव दर्जाचा अधिकारी क्वेरी काढतो आणि परत फाईल खाली पाठवितो. वारंवार शिक्षण विभागाने पाठपुरावा करूनही वित्त विभागाच्या असहकार्यामुळे हा प्रस्ताव मंजूर होऊ शकलेला नाही. उत्तरात असे दिले आहे की, आढावा मंजूर झाल्यानंतर मंजूर पदांपैकी रिक्त पदे भरण्याचा निर्णय होईल. माझी विनंती आहे. माननीय वित्तमंत्र्यांकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. तांत्रिकदृष्ट्या माननीय शालेय शिक्षण मंत्री उत्तर देत आहेत. परंतु आपल्या विभागाचे काही झारीतील शुक्राचार्य वारंवार क्वेरी काढून फाईल परत पाठवित आहेत. मागच्या 6 महिन्यांपासून ही फाईल आपल्या विभागाकडे आहे. माझा प्रश्न असा आहे की, हा आढावा केव्हा मंजूर होणार आणि परवानगी केव्हा देणार ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर पदे आहेत. सन 1998 प्रमाणे त्यानंतर काही झाले नाही. सन 2011 च्या विद्यार्थी संख्येप्रमाणे ही सर्व संख्या आली आणि आता जवळपास त्यातील 10287 पदे रिक्त आहेत. आताच्या जवळपास 16 टक्के पदे यातील वाढलेली आहेत. सन 1998 पासून सन 2015 पर्यंत यात बदल व्हायला पाहिजे होते, ते काही झाले नाही ही माहिती म्हणून मी नमूद करीत आहे. मधल्या काळात काहीच झाले नाही. आता 1172 अनुदानित महाविद्यालयांतील 10287 पदे आहेत. सन्माननीय सदस्य यांनी म्हटल्याप्रमाणे वित्त विभागाकडे शिक्षण विभागाच्या माध्यामातून आम्ही सातत्याने या संदर्भात पाठपुरावा करीत आहोत. वित्त विभागाच्या काही क्वेरीज आहेत, त्याची आम्ही उत्तरे काढत आहोत. सन्माननीय सदस्यांशी, सन्माननीय शिक्षक आमदारांशी बोलताना म्हटले की, 16 टक्के म्हणजे जवळजवळ दरवर्षी 600 कोटी रूपयांचा बोजा पडणार आहे, देणे निघणार आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात एकदा धोरणात्मक निर्णय वित्त विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि आपल्यासारखे जबाबदार लोकप्रतिनिधींनी यांनी बसून करण्याची गरज आहे. त्यामुळे अधिवेशन संपल्यानंतर आपल्या सारख्यांसोबत, माननीय वित्तमंत्र्यांसांबेत एक बैठक करून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

हा विषय सोडवावा लागेल. आपल्याला हा विषय सोडवायचा असेल तर अशा पध्दतीच्या बैठकीतूनच सुटेल, प्रॅक्टिकल उत्तर यातून काढावे लागेल. विद्यार्थ्यांने नुकसान होणार नाही आणि आपण विचारलेला प्रश्न शिक्षकांच्या वेतनाशिवाय नाही हे मी जानतो. आपली चिंता विद्यार्थ्यांना चांगला प्राध्यापक मिळणे ही आहे. त्यामुळे मी म्हणतो की, यात प्रॅक्टिकल उत्तर आवश्यक आहे. एकरकमी 600 कोटी रूपये मिळतील अशी आज स्थिती .... (अडथळा) जागा मंजूर आहेत. जागा विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे देखील वाढलेल्या आहेत. त्यामुळे 600 कोटी रूपयांची रचना करीत असताना, अधिवेशनानंतर माननीय वित्त खात्याबरोबर बैठक करून हा विषय मार्गी लावण्यात येईल.

----

....6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**लक्षवेधी सुचनांच्या संदर्भात**</u>

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 11 .... लक्षवेधी सूचना क्रमांक 9 नाही. लक्षवेधी सूचना क्रमांक 10 उद्या घेण्यात येणार आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 9 होती, त्याचे उत्तर नाही का ? निवेदन मिळाले नाही.

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 9 आता नाही.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण लक्षवेधी सूचना क्रमांक 9 पुढे ठेवणार आहात, उद्या ठेवणार आहात की ठेवणार नाही ?

**उप सभापती** : उद्या ठेवण्यात येईल.

----

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पुणे शहराचा बाह्यवळण महामार्ग साकार करण्यासाठी शासनाने मंजुरी देणे.

**मु.शी.** : पुणे शहराचा बाह्यवळण महामार्ग साकार करण्यासाठी शासनाने मंजुरी देणे यासंबंधी सर्वश्री. अनिल भोसले, जयवंतराव जाधव, ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहर व शहराला जोडणाऱ्या मुख्य महामार्गावरील सार्वजनिक वाहतूक कमी करण्यासाठी शहर व ग्रामस्थांच्या प्रतिक्षेत असलेला पुणे शहराचा बाह्यवळण (रिंग) महामार्ग साकार करण्यासाठी राज्य शासनाने मंजुरी देणे, मात्र राज्य सरकारने नेमलेल्या समितीच्या सर्वेक्षणातून तयार केलेल्या प्रस्तावित रिंग रोडच्या तीन आराखड्यांपैकी एका आराखड्यास नगरविकास खात्याकडून अद्याप मंजुरी न मिळाल्याने पुण्यातील बाह्यवळण रस्त्याचे काम प्रलंबित असणे, याबाबत पुण्यातील रिंग रोड बाह्यवळण रस्त्याचे काम तातडीने मंजूर करणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. एकनाथ शिंदे (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा आहे. रिंग रोड संदर्भात शासनाने कन्सल्टंट कंपनी निवडली, तिने शासनाकडे काही अहवाल दिले आहेत. उत्तरात म्हटले आहे की, प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीकडे जाणार आहे. पुणेकर नागरिकांच्या वाहतुकीच्या दृष्टीने हा प्रकल्प फार महत्त्वाचा आहे. मी आपल्याद्वारे या संदर्भात विनंती करतो. सभापती महोदय, हा प्रस्ताव कधी मंजूर होईल ? आमचा मेट्रोचा प्रकल्प रेंगाळत चालला आहे. रिंग रोड होण्याकरिता हा प्रस्ताव ताबडतोब कसा मंजूर होईल ? सभापती महोदय, सदर प्रकरणी विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांना सहभागी केले जाते. विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांनाही त्यात सहभागी करणार का ?

श्री. एकनाथ शिंदे : सभापती महोदय, पुणे रिंग रोडच्या संदर्भात दिनांक 05.11.2014 रोजी ईकॉम एशिया कंपनीला सविस्तर प्रकल्प अहवाल, डीपीआर तयार करायला वर्क ऑर्डर दिली आहे, त्यांची मुदत ऑगस्ट, 2016 पर्यंत आहे. इकॉम एशिया कंपनीने आतापर्यंत डीपीआर आणि ट्रॅफिक काऊंट इत्यादी जवळपास 63 टक्के कामे पूर्ण केली आहेत. युध्द पातळीवर या संदर्भातील काम सुरूआहे. ईकॉम एशिया कपंनीने ए, बी, सी असे 3 पर्याय दिले होते. बी पर्याय निवडला आहे. त्याचे कारण असे की, यामध्ये कमीत कमी इंटरचेंजेस आहेत. वन विभागाची जमीन कमीत कमी आहे. लागवडीखालील जमीन तिन्ही पर्यायापेक्षा सगळ्यात कमी आहे. पडीक जमीन बी पर्यायामध्ये सर्वात जास्त आहे. बांधकामे देखील या बी पर्यायामध्ये सर्वात कमी आहेत. पुनर्वसनाचा विषय आहे, किंबहुना मोबदला देण्याचा विषय आहे, या संदर्भात बी पर्याय निवडलेला आहे. त्यावर काम सुरू आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, हा प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण होईल ? डीपीआरची मुदत ऑगस्ट, 2016 पर्यंत आहे. दिनांक 04 नोव्हेंबर, 2015 पर्यंत मुदत होती, त्याला मुदतवाढी दिली आहे. डीपीआर झाला की त्यामध्ये डीपीआर व फायनान्शिअल मॉडेल तयार होऊन लवकरच पायाभूत सुविधा समितीकडे हा प्रस्ताव मान्यतेसाठी जाईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरी सूचना केली आहे की, संपूर्ण रिंग रोडच्या संदर्भात डीपीआर तयार होणार आहे, त्यामध्ये काही सूचना सन्माननीय सदस्यांना करायच्या असतील तर विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांप्रमाणे विधानपरिषदेच्या संबंधित भागातील सन्माननीय सदस्यांना देखील बोलवावे. निश्चितपणे या सुचनेचही विचार केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सुचनेच्या संदर्भात</u>**

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आता लक्षवेधी सूचना क्रमांक 10 घ्यावी. कारण उद्या माननीय मंत्री व माननीय राज्यमंत्री नाहीत.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पॅन इंडिया प्रा.लि. तसेच एस्सेल इन्फ्रा प्रोजेक्ट लि. यांच्या मालकीचे मौजे गोराई येथील स.न.268, न.भु.क्र.1912 मधील 15 एकर क्षेत्रावरील कांदळवन नष्ट करून तेथे भराव करून कृत्रिम बगीचा निर्माण करणे.

**मु.शी.** : पॅन इंडिया प्रा.लि. तसेच एस्सेल इन्फ्रा प्रोजेक्ट लि. यांच्या मालकीचे मौजे गोराई येथील स.न.268, न.भु.क्र.1912 मधील 15 एकर क्षेत्रावरील कांदळवन नष्ट करून तेथे भराव करून कृत्रिम बगीचा निर्माण करणे यासंबंधी सर्वश्री. धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. किरण पावसकर, ॲड निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पॅन इंडिया प्रा.लि.तसेच एस्सेल इन्फ्रा प्रोजेक्ट लि.यांच्या मालकीचे मौजे गोराई येथील स.नं.268 न.भु.क्र.1912 मधील १५ एकर क्षेत्रावरील कांदळवन (मँग्रुव्हज) नष्ट करून तेथे भराव करून कृत्रिम बगीचा निर्माण करणे, विभागीय अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत केलेल्या दिनांक १३ मे, २०१४ च्या स्थळ पाहणी अहवालानुसार तसेच जीपीएस रिडींग नुसार देखील सदर ठिकाणी सन २००५ ते २०१४ या कालावधीत ए-5 ते ए-8 या पॉइन्टसवर जीपीएस रिडींग नुसार उत्कृष्ट कांदळवन असल्याचे दिसुन येणे, तसेच पॉईन्ट ए-9 ते ए-10 मध्ये खाडीची वितरीका व वितरीकीच्या दोन्ही बाजुच्या क्षेत्रावर देखील उत्कृष्ट कांदळवनाचा झाडोरा दिसुन येणे, तथापि निरीक्षणाच्या दिवशी सदर ठिकाणी वितरीका बुजवुन सर्व कांदळवन नष्ट करून दगडीबांध घालुन लाल मातीचा भराव केलेला असणे, यासंदर्भात





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

सीआरझेड नियमावलीचे तसेच अर्बन ट्री फेलिंग ॲक्ट मधील तरतुदीचे तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील तरतुदींचे देखील उल्लंघन करण्यात येणे, तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी कांदळवनाच्या संवर्धनाकरीता पारित केलेल्या आदेशाचा भंग झालेला असणे, यासंदर्भात संबंधितांविरूध्द माहे जुन २०१४ व त्यासुमारास एफआयआर दाखल होऊन संबंधितांविरूध्द अद्याप काहीही कारवाई न होणे, या प्रकरणी पर्यावरण विषयक कायद्यांचे गंभीर उल्लंघन होऊन सागरी पर्यावरणाचा ऱ्हास झालेला असुन देखील प्रशासनाने जाणीवपुर्वक संबंधितांना पाठीशी घालणे, या सर्व बाबी लक्षात घेऊन एस्सेल वर्ल्ड/पॅन इंडिया प्रा.लि.मौजे गोराई यांचेवर तसेच प्रशासनातील संबंधित अधिकारी यांचेविरूध्द योग्य कारवाई होण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया"

श्री. सुधीर मुनगंटीवार (वने मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....12

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, पॅन इंडिया प्रा.लि. तसेच एस्सेल इन्फ्रा प्रोजेक्ट लि. यांच्या मालकीचे मौजे गोराई येथील स.न.268, न.भु.क्र.1912 मधील 15 एकर क्षेत्रावरील कांदळवन नष्ट करून तेथे भराव करून कृत्रिम बगीचा निर्माण केला आहे. सदर प्रकरणी मे, 2014 च्या पाहणी नंतर पुन्हा एकदा चौकशी अहवाल घेण्यात आला आणि मूळ मे महिन्याचा अहवाल व जीपीएस रिडिंगनुसार 15 एकर क्षेत्र वगळण्यात आले. माझी विनंती आहे. माननीय मंत्र्यांच्या दालनात याबाबतीत बैठक बोलाविली. 1 सदस्यीय, 2 सदस्यीय समितीची चौकशी लावून .... पुढच्याच आठवड्यात संबंधितांची आपल्या दालनात बैठक लावून याबाबतचा निर्णय होणे आवश्यक आहे.

....L

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार........

10 जानेवारीच्या अगोदर या संदर्भातील बैठक लावली जाईल. हे प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे. तथापि, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भावना आहेत की, एखादी त्सुनामी आल्यानंतर आपण जागे होण्याऐवजी कांदळवनाचे संरक्षण झाले पाहिजे. सन 2005 मध्ये उच्च न्यायालयाने असे आदेश दिले आहेत की, खाजगी जमिनीवर जरी कांदळवनाचे जंगल असले तरी त्या जमिनीच्या 7/12 वर 'वन' लावले पाहिजे. ज्या ठिकाणी तिवरांची जंगले होती त्यामधील काही भाग नष्ट करण्याचा प्रयत्न झाला व त्याचा उल्लेख अहवालामध्ये स्पष्टपणे आहे. पर्यावरण विभागाने या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट दिलेला आहे. कोर्टामध्ये केस सुरु आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या अशा भावना आहेत की, सरकारने अशा बाबींकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे. निश्चितपणे आपल्या समवेत आणि आपण सांगाल त्या सन्माननीय सदस्यांसमवेत 10 जानेवारी पूर्वी एक बैठक आपण घेऊ.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कांदळवनाच्या बाबतीत उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. ज्या गुजरात राज्याचा आदर्श घेऊन, गुजरातच्या विकासाचा बाऊ करुन आपण सांगता त्या गुजरातमध्ये कांदळवन तोडल्यानंतर दुप्पट कांदळवन लावले तर परवानगी आहे. आम्ही 10 पट कांदळवन लावण्यास तयार आहोत. आजही कांदळवन तोडले जात आहे, कोणी काही बोलले तरी या संदर्भातील कायदे नाहीत. त्यामध्ये मोठा भ्रष्टाचार आहे. म्हणूनच अधिकृतरित्या कांदळवन तोडण्याची परवानगी दिली पाहिजे. बिल्डरांच्या प्रकल्पाबाबत मला काही म्हणावयाचे नाही. परंतु, जे प्रकल्प क्रीकच्या शेजारी आहेत, जे विकासाचे प्रकल्प आहेत, त्या प्रकल्पांसाठी दुप्पट किंवा 10 पट कांदळवन लावण्याच्या अटीवर कांदळवन तोडण्याची परवानगी दिली पाहिजे. तशी तरतूद कायद्यामध्ये सुध्दा आहे. फक्त त्याची अंमलबजावणी करणार का आणि आपण जी बैठक आयोजित करणार आहात त्यासाठी मला आमंत्रित करणार का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न विचारुन खरे तर माझा अतिशय मोठा फायदा करुन दिला आहे. आता देशात दर दोन वर्षांनी फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाच्या माध्यमातून राज्यातील फॉरेस्टसंदर्भातील अहवाल तयार केला जातो. मला या गोष्टीचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार.......

अभिमान आहे की, दोन वर्षात आपण 36 चौ.कि.मी.एवढी तिवराच्या जंगलांची वाढ केली आहे आणि केंद्र सरकारने त्याबाबत उत्तम काम केल्याबाबत समाधान व्यक्त केले आहे. याचा अर्थ असा की, दोन वर्षात तिवरांच्या जंगलांची कत्तल होत होती, ती थांबली आहे. हेही तेवढेच खरे आहे की, या गोष्टीकडे आम्ही जोपर्यंत आमच्यावर संकट येत नाही तोपर्यंत गंभीरपणे घेत नव्हतो. यासाठी आपण एक फाऊंडेशन तयार केले असून त्यासंदर्भातील शासन निर्णय देखील निर्गमित केला आहे. माझ्याकडे आता तो शासन निर्णय उपलब्ध नाही. परंतु, मी तो आपल्याकडे पाठविण्याची व्यवस्था करतो.

सभापती महोदय, मॅनग्रोव्हचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी 115 कोटी रुपयांचा ट्रस्ट आपण केला असून या माध्यमातून रोजगार निर्मिती कशी होईल आणि यामधील उत्तम प्रकारची नर्सरी करुन या क्षेत्रात वाढ कशी करता येईल, हेही काम आपण या फाऊंडेशनकडे दिलेले आहे. मी आपल्याला हा शासन निर्णय उपलब्ध करुन देतो. त्याचप्रमाणे ज्या दिवशी बैठक होईल त्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनीही बैठकीला यावे, आपल्या सूचना मांडाव्यात, शासन त्या सूचनांचा गंभीरपणे विचार करील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कांदळवनाचे बी आमच्या खाजगी शेतीत येते आणि त्या ठिकाणी मॅनग्रोव्ह होतात. माझ्या मूळ गावात मोठी वडाएवढी कांदळवने झालेली आहेत. पाच वर्षापूर्वी त्या ठिकाणी भातशेती होती. त्या जमिनीवर भातशेती होती अशी शासकीय नोंदही आहे. या संदर्भातील नियंत्रण आपण कसे आणणार आहात ? खाजगी जमिनीवर कांदळवनाचे बी येते आणि कांदळवन तयार होते. या संदर्भात आपल्याला काही धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. यासंदर्भात आमच्या काही सूचना आहेत व त्या आपल्यासमोर मांडता याव्यात, यासाठी आम्ही बैठकीला आम्हाला बोलवावे, अशी विनंती करीत आहोत. या सूचनांचा आपण विचार करणार आहात का ?

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, निश्चितपणे सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचा विचार केला जाईल. एक गोष्ट मी लक्षात आणून देतो की, शेतकऱ्यांच्या खाजगी शेतामध्ये बी आली आणि कांदळवन तयार झाले तर आपण त्यांना कायद्यान्वये संधी देतो. सॅटेलाईट इमेज पाहून त्या क्षेत्रात सन 2005 मध्ये काय स्थिती होती, सन 2009 मध्ये काय स्थिती होती, सन 2011 मध्ये काय स्थिती होती, हे पाहिले जाते आणि त्यानंतर पूर्वी शेती असल्याचे लक्षात आल्यास निश्चितपणे परवानगी देण्याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने वन व पर्यावरण या दोन्ही विभागांशी संबंधित अतिशय महत्वाचा विषय समोर आला आहे. फार पूर्वी वन आणि पर्यावरण हा एकत्रित विभाग होता. आता त्याची विभागणी झाली आहे. जसे मित्रपक्ष सरकारमध्ये येतात, तशी विभागांचीही विभागणी होते. अनेक वेळा असे लक्षात येते की, त्यामुळे वन विभागाला पर्यावरणाच्या दृष्टीने जे अपेक्षित आहे, ते साध्य होत नाही. ज्याप्रमाणे शिक्षण आणि सामाजिक न्याय विभागामध्ये शिक्षणाची त्रेधातिरपिट होते, काही गोष्टी पुढे सरकत नाहीत. त्याप्रमाणेच वन आणि पर्यावरण विभागांचे जे संलग्न विषय आहेत, ज्याप्रमाणे केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे काही कॉमन विषय असतात त्याप्रमाणे विभागांचेही काही कॉमन विषय असतात. केवळ मॅनग्रोव्ह वाचवायचे, असा विषय नाही. त्यामुळे एकूणच वातावरणावर परिणाम होण्याची शक्यता असते, त्या ठिकाणी पार्क तयार केला, मनोरंजनाचे काही आले, ट्रॅफिक वाढली, पोल्युशन वाढले, असे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होऊ शकतात.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अहवालाचा उल्लेख केला असून राज्याच्या कामाबद्दल केंद्र सरकारने समाधान व्यक्त केले आहे, असेही सांगितले आहे. निश्चितपणे आपण अभिनंदनास पात्र आहात. या पध्दतीने पुढे जात असताना जी काळजी घ्यावयास हवी आणि ज्या काळजीसाठी आपल्याला पर्यावरण विभागाशी संलग्नता या सर्व कामांमध्ये कायमस्वरुपी असावी, या दोघांचे मिळून असे कोणते विषय होऊ शकतात की ज्यावर सातत्याने तुम्हाला मॉनिटरिंग करता येईल आणि लक्ष देता येईल, या पध्दतीने बैठक घेणार आहात त्यामध्ये विचार व्हावा, अशी माझी विनंती आहे.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना अतिशय चांगली आहे. व्यावहारिकदृष्टीने ती बाब तपासली जाईल आणि निर्णय केला जाईल. त्या बैठकीला सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनाही निमंत्रित केले जाईल.

------------

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी**. : विशेष उल्लेखाच्या सूचना

**उप सभापती :** आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाशी संलग्न असलेले सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल 1998 साली तयार झाले असून सन 2012 मध्ये डी.एम.कार्डिओलॉजिस्ट व डी.एम.गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी हे अभ्यासक्रम नव्याने सुरु झाले. तसेच, विविध विषयांमध्ये डी.एम.व एम.सी.एच.हे अभ्यासक्रम सुरु करावयाचे असल्याने कनिष्ठ निवासी डॉक्टरांची 39 तर वरिष्ठ निवासी डॉक्टरांची 47 अशा एकूण 86 पदांचा प्रस्ताव सन 2012 मध्ये वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालायाला पाठविण्यात आला. परंतु, अद्यापही या पदाना मंजुरी न मिळणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अति विशेषोपचार रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली असून, आंतररुग्णालयातही वाढ झालेली असताना रुग्णालयाच्या 86 कनिष्ट तसेच वरिष्ठ निवासी डॉक्टरांच्या पदास मंजुरी देण्यात होत असलेल्या विलंबामुळे सदरहू रुग्णालयामध्ये औषधोपचारासाठी येणाऱ्या गोरगरीब जनतेस नाहक विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने सदरहू रिक्त पदांची त्वरित भरती करण्याची शिफारस मी या विशेष उल्लेख्खाव्दारे शासनास करीत आहे.

...MM-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, पशुवर्तन करुन, मानवी कौर्याची सीमा ओलांडत विकृती करणाऱ्या पुरुषाचे वय 18 वर्षापेक्षा कमी असल्यास त्याला अल्पवयीन म्हणून बालगुन्हेगार कायद्याला अनुसरुन बालसुधारगृहात ठेवणे इतर गुन्हेगारांप्रमाणे कडक शिक्षा न होणे, निर्भया बलात्कार प्रकरणातील कौर्याची सीमा गाठणाऱ्या 18 वर्षाला काही महिने कमी असणाऱ्या आरोपींना 3 वर्षे सुधारगृहात ठेवून सोडून देणे, हे संतापजनक व समाजात अन्याय होत असल्याची भावना पसरविणारे आहे. शक्ती मील बलात्कार प्रकरणातही 2 अल्पवयीन आरोपी आहेत, तेव्हा 18 वर्षाची मर्यादा 15 वर्षे वयापर्यंत आणून अशा विकृतांना इतर सज्ञान इसमाप्रमाणेच गुन्हेगार ठरवून कडक शासन व्हावे. देशात अशा अनेक घटना घडत असताना बालगुन्हेगार कायद्यातील त्रुटीचा फायदा मिळू नये. बलात्कार करणाऱ्याला अल्पवयीन किंवा बालगुन्हेगार म्हणणेच चूक आहे. ही चूक सुधारण्यासाठी या बालगुन्हेगार कायद्यात महाराष्ट्र शासनाने विधिमंडळात तातडीने सुधारणा करुन नवीन कायद्याचा अध्यादेश त्वरीत जारी करावा, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पुण्यातील ससून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना डॉक्टर्स व प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे प्रचंड मनस्ताप सहन करावा लागणे, आरोग्याच्या विविध तक्रारीसाठी आलेल्या रुग्णांना विलंबाने केसपेपर मिळणे, रुग्णांना तत्काळ उपचार केंद्राकडे वाहून नेण्यासाठी वॉर्डबॉय नसणे, कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यात वेळ वाया जाणे, तसेच चुकीच्या पद्धतीने रुग्णालयात उपचार होणे, रुग्णालयात दाखल होण्यासाठी व उपचाराऐवजी औपचारिकता पूर्ण करण्यात रुग्णांचा वेळ जात असल्याने रुग्णांची व नातेवाईकांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होऊन त्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागणे, परिणामी नागरीकांच्या मनात शासनाप्रती चीड निर्माण होणे, ससून रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना चांगली आरोग्य सेवा मिळण्यासाठी तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

-------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी, ता.हळदा येथील जंगलात दिनांक 15.6.2015 रोजी बेशुद्धीचे इन्जेक्शन दिल्याने बिट्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली असणे, सदर इन्जेक्शन श्री.बंडू धोतरे, मानद वन्यजीव रक्षक, चंद्रपूर यांनी वन्य प्राण्यास बेशुद्ध करण्याकरिता दिली जाणे, वास्तविक पाहता सदर मानद वन्यजीव रक्षक यांना कोणताही अनुभव नसताना व संबंधित वन अधिकाऱ्यांबराबर कोणतीही सल्लामसलत न करता इन्जेक्शन देण्यात आले असल्याचे उप वनसंरक्षक, ब्रम्हपुरी यांचे दिनांक 13.7.2015 च्या चौकशी अहवालावरुन सिद्ध होणे, त्यामुळे पूर्णपणे बिबट्याच्या मृत्यूकरिता संबंधित मानव वन्यजीव रक्षक दोषी असल्याचे दिसून येणे, परंतु सदर वन्यजीव रक्षकावर अद्याप कोणतीही कारवाई न होणे, त्यामुळे शासनाने याची चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

-------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या "डी" वॉर्डात कार्यरत असताना मृत्युमूखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या नातलगांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याऐवजी बनावट कागदपत्रांच्या आधारे 10 ते 15 लाख रुपयांना नोकरी विकणारे रॅकेट नोव्हेंबर, 2015 मध्ये ग्राहक समाजसेवा संस्थेने उघडकीस आणणे, यामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभाग सामील असून कर्मचारी, दलाल व अधिकारीही यात सहभागी असल्याचे उघड होणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे झालेल्या भरतीमुळे जनमाणसात व बेरोजगारांमध्ये पसरलेला संताप, तीव्र चीड, सदर अवैध पद्धतीने झालेल्या भरती प्रक्रियेची सखोल चौकशी करुन तत्काळ कारवाई करुन नव्याने भरती प्रक्रिया राबवून पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याची गरज, सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास शिफारस करीत आहे.

-------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सन 2011-12 पासून डाटा एन्ट्री ऑपरेटर, पुनर्वसन कर्मचारी, भौतिक उपचार तज्ज्ञ इत्यादी पदांची जिल्हा/उप जिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने राज्यातील 17 जिल्ह्यांमध्ये 2,552 पदांची केलेली भरती, उपरोक्त कार्यालयाच्या सुसूत्रीकरण प्रक्रिये अंतर्गत सुमारे 4 ते 5 वर्षाची सेवा करुनही उपरोक्त पदे कमी करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, तथापि उपरोक्त पदांपैकी एकाच विभागातील 248 कंत्राटी कर्मचाऱ्यांना हेतुपूर्वक कमी करुन त्यांच्यावर केलेला अन्याय, त्यामुळे त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे किंवा इतर कार्यालयात त्यांचे समायोजन करण्यात यावे, राष्ट्रीय पॅलिटिव्ह केयर कार्यक्रमात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे 9 महिन्यांचे थकित वेतन तत्काळ द्यावे, जोपर्यंत कामावर घेत नाही तोपर्यंत कंत्राटी भरतीची नवीन जाहिरातीने भरती बंद करण्यात यावी अशा केलेल्या मागण्या, कामावरुन कमी केल्याने कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांची होत असलेली उपासमार, पदे कमी करताना शासनाने केलेला भेदभाव, त्यामुळे कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याकडे शासन करीत असलेले दुर्लक्ष, कमी केलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही या महत्वाच्या मुद्यावर सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

-------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, राज्य शासनाने राज्य आणि विभागीय स्तरावरील अधिस्वीकृती समित्यांवरील पत्रकारांच्या नियुक्त्या ऑगस्ट, 2015 मध्ये जाहीर केलेल्या आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद आणि नाशिक विभागांमध्ये अधिस्वीकृती समित्या आहेत. तसेच, राज्य स्तरीय पत्रकारांची देखील समिती आहे. महाराष्ट्र शासन राज्यातील महिलांचा आणि त्यांना दिलेल्या स्थानांचा नेहमीच गाजावाजा करीत असते, गौरव करीत असते. आज शहरात आणि ग्रामीण भागात अनेक महिला पत्रकार अतिशय चांगले काम करीत आहेत. परंतु, अधिस्वीकृती समित्यांवर मात्र एकाही महिलेला प्रतिनिधीत्व दिलेले नव्हते. जी नियुक्ती झाली ती आमच्या बांधवांची झालेली आहे. मुंबईतील विमेन्स जर्नालिस्ट सोसिएशन आणि अनेक महिला पत्रकारांनी या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांकडे पत्र दिलेली आहेत. राज्यात महिला आणि पुरुषांच्या समानतेसाठी राज्य शासनातर्फे अनेक सकारात्मक निर्णय घेतले जातात. परंतु, आता त्यांना एक-दोन ठिकाणी तुरळक स्थान दिले गेले आहे. विभागीय समित्यांवर तर महिलांची निवड करण्यात आलेलीच नाही. आमच्या महिला पत्रकार भगिनी ब्रेकिंग न्युज देतात, बातम्या लिहितात, लेख लिहितात. त्यांचा देखील कामाच्या संदर्भात सहभाग असला पाहिजे. नाही तर न कळत आपण त्यांना ठिकठिकाणी डावलून त्यांचा अपमानच करतो, हे निश्चित आहे. म्हणून महाराष्ट्राची प्रतिमा अधिक उज्ज्वल होण्यासाठी विभागीय स्तरावर आणि राज्य स्तरावर अधिस्वीकृती समितीवर महिला पत्रकारांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

--------

..2N-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, ठाणे, जिल्ह्यातील कल्याण तळोजा रोडवर असलेले एक गोदाम फोडून तेथे ठेवलेले हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीचे तब्बल 68 गॅस सिलींडर चोरीला गेले होते. डिस्ट्रीब्युशन फेडरेशनने हा मुद्दा माझ्या निदर्शनास आणल्यानंतर मी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांशी याबाबत बोललो आहे. चोरट्यांनी तेथील सीसीटीव्ही युनिट देखील काढून नेल्याचे दिनांक 20 डिसेंबर, 2015 रोजी उघड होणे, याप्रकरणी अज्ञात इसमांविरुध्द गुन्हा दाखल करणे, अशाच प्रकारे दिनांक 15 फेब्रुवारी 2015 रोजी अनिषा भारत गॅस एजन्सी कंपनी अंबरनाथ येथूनही गॅस सिलींडरची चोरी गोडाऊनमधून होणे, याप्रकरणीही आरोपींचा शोध अद्याप न लागणे, ठाणे जिल्ह्यातील विविध भागात असे प्रकार होत असूनही याकडे आरोपींना अटक होण्यास विलंब होत असल्याने गोडाऊनमधून गॅस चोरीचे अनेक प्रकार होत असल्याने याप्रकरणी त्वरीत कारवाई करण्याची आवश्यकता असल्याने मी हा विषय विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मांडीत आहे.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, जिल्ह्यामध्ये बऱ्याच ठिकाणी डॉक्टरांवर हल्ला होण्याचे प्रकार वाढले आहेत, याबाबत मेडिकल असोसिएशन यांची बैठक झाली आहे, त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. याबाबत सरकारने पावले उचलून त्यांना दिलासा देण्याची गरज आहे. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून माझी विनंती आहे की, माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, त्यांनी दखल घेऊन उचित कारवाई करावी.

-----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : विशेष उल्लेखामध्ये ज्या सन्माननीय सदस्यांची नावे नाहीत त्यांना आज संधी मिळणार नाही, सभागृहापुढे भरपूर कामकाज शिल्लक आहे. श्री. माणिकराव ठाकरे यांनी आपला विशेष उल्लेख मांडावा.

श्री.माणिकराव ठाकरे : मी माझा विशेष उल्लेखाचा विषय औचित्यामध्ये मांडलेला आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय,

**उप सभापती** : मी तुम्हाला सांगतो आज वेळ मिळणार नाही. त्यामुळे आपण शांत राहिलो पाहिजे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सरकार यासंदर्भात निवेदन करणार होते ते अजूनपर्यंत आले नाही इतकेच मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे होते. दुसरा कोणताही विषय मला मांडायचा नाही, आम्ही काय म्हणतो ते तरी आपण ऐकूण घ्यावे.

**उप सभापती** : मला तुमचा प्रश्न लक्षात आला नाही, मी फक्त विशेष उल्लेखाच्या सूचना मांडाव्यात याबाबत बोलत होतो. आता ज्यांना विशेष उल्लेखाची सूचना मांडायची आहे त्यांनी ती मांडावी.

------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडतो-

सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या व संवेदनशील विषयाकडे मी आपले व शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. या राज्यात शिक्षक मिळत नव्हते, त्यावेळी राज्य सरकारने जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक नेमले होते, 30 जून 1972 पर्यंत जे सेवेत आले, त्यांना पेन्शन देण्यात आले, 1 जुलै 1972 नंतर जे शिक्षक सेवेत आले त्यांना पेन्शन दिलेले नाही, 25 ते 30 वर्षाची सेवा करुन ते सेवानिवृत्त झाले, त्यानंतर त्यांना पेन्शन मिळत नाही. अनेक शिक्षक सेवानिवृत्त झाल्यावर रोजगार हमी योजनेच्या कामावर जातात, ज्या शिक्षकांनी 25 ते 30 वर्षे सेवा केली, त्यांनी तुम्हाला आम्हाला घडविले आहे, त्यांचे विद्यार्थी आज आमदार, खासदार व काही मंत्री आहेत, ते शिक्षक रोजगार हमीच्या कामावर जातात हे बरोबर नाही. हा विषय दोन वर्षापासून अनेक वेळा सभागृहात आलेला आहे, आपण देखील संवेदनशीलपणे शासनाला निर्देश दिले होते, माझी अशी विनंती आहे की, ज्या शिक्षकांनी आपली संपूर्ण हयातीमध्ये अप्रक्षित शिक्षक म्हणून सेवा केली त्यांच्या पेन्शनचा प्रश्न शासनाने सहानुभूतीपूर्वक सोडवावा. माननीय शिक्षणमंत्री आहेत, त्यांना आपण निर्देश द्यावेत अशी मी नम्र विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे, शिक्षकांनी विद्यार्थी घडविले हे खरे आहे, परंतु रोजगार हमीवर जाणे म्हणजे काही तरी गुन्हा करणे, श्रमाची अप्रतिष्ठा करु नका, हे खरे आहे की, त्यावेळी कोणीच शिक्षक म्हणून जात नव्हते. या जिल्हापरिषदेच्या शिक्षकांनी त्यावेळची महाराष्ट्रातील पिढी घडविली आहे. त्या पिढीचे भविष्य घडविले आहे. त्यामुळे त्यांच्याविषयी सरकारला सहानुभूती आहे. परंतु संवेदनशीलतेचा विषय उपस्थित करुन अरे बापरे तो रोजगार हमी योजनेवर काम करतो. क्रीडापटू रोजगार हमीवर काम करतो. रोजगार हमी योजनेवर शेतकरी देखील काम करतो. त्याचे काही वाईट आहे काय ? त्यामुळे या शिक्षकांची काळजी सरकार नक्की घेईन. ते आम्ही घेतली पाहिजे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते आमचे कर्तव्य आहे, या विषयाची भावनिकता वाढवू नका की, दुसऱ्या कामाची अप्रतिष्ठा होईल. एवढी माझी सभागृहाला विनंती आहे.

---------

...4...

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) NN-4

VVK/ AKN/ MMP/ 16:40

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडतो-

सभापती महोदय, राज्यातील मिहान प्रकल्प अत्यंत महत्वाकांक्षी आहे, 4500 कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे, पहिल्या टप्प्यात 1400 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी अपुरा निधी मिळत आहे. वर्षभरात विकासाच्या कामाचे एकही टेंडर काढण्यात आले नाही. विकासासाठी टाक्सफोर्सची स्थापना करुनही वर्षभरात एकही बैठक झालेली नाही. नागपूर विमानतळावर एकही नवीन धावपट्टी तयार करण्यात आलेली नाही. 2600 शेतकऱ्यांचे पुनर्वसन व्हायचे आहे, अशा शेतकऱ्यांनी आज डब्ल्यू इमारतीमध्ये ताबा घेतला आहे. त्यांना न्याय न मिळाल्यामुळे तेथे आंदोलन सुरु आहे, यासाठी तेथील बेरोजगारांना लवकरात लवकर रोजगार उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. 4500 कोटी रुपयांचा निधी त्वरित उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस मी सभागृहाच्या वतीने सरकारकडे करीत आहे.

---------

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती स्मिता वाघ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडते-

सभापती महोदय, जळगांव जिल्ह्यातील प्राथमिक शाळेमध्ये भरती करण्यासाठी शासनाची संच मान्यता नसताना अनेक शाळांनी बेकायदेशीर रित्या शिक्षकांची भरती करुन शासनाच्या निधीचा गैरव्यवहार गेल्या तीन ते चार वर्षापासून केलेला आहे. याबाबत सदर शाळांची चौकशी करण्यात यावी. बेकायदेशीर शिक्षकाची नियुक्ती करुन गैरप्रकार करण्यात आलेला आहे. याबाबत सखोल चौकशी करुन बेकायदेशीर शिक्षकांची नियुक्ती केल्याप्रकरणी शिक्षणाधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी शिफारस मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

डॉ.नीलम गोऱ्हे (समिती प्रमुख): सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर सन्माननीय सदस्यांनी श्री.निखील वागळे, संपादक, आयबीएन लोकमत, श्री.राजीव खांडेकर, संपादक, ए.बी.पी.माझा यांच्याविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण. या विषयावरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्यासाठी दिलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवून देण्यात यावा.

सभापती महोदय, या विषयात आतापर्यंत निखिल वागळे व राजीव खांडेकर यांच्याकडून समितीला लेखी निवेदने प्राप्त झाली आहेत. त्यावर समिती विचार विनिमय करीत असून लवकर संबंधितांचा साक्षीपुरावा नोंदवून समिती अहवाल सादर करण्याच्या प्रयत्नात आहे, मी सभागृहाला सांगू इच्छिते की, हे प्रकरण अत्यंत संवेदनशील व इलेक्ट्रानिक मिडियाशी संबंधित असल्यामुळे आपण सर्व कोणत्या ना कोणत्या प्रकारे या माध्यमांशी संबंधित आहोत. त्यामुळे समिती यावर काळजीपूर्वक विचारविनिमय करीत आहे, समितीने या प्रकरणी 23 बैठका घेतल्या असून सद्य परिस्थीतीत प्रकरण साक्षीपुराव्याच्या स्तरावर आहे, लवकर समिती समोरील प्रलंबित प्रकरणावर कार्यवाही होण्यास्तव साक्षी पुराव्याच्या बैठकीचे आयोजन करण्यात येईल. समितीच्या पुढील होणाऱ्या बैठकांमध्ये या प्रकरणावर विचार विनिमय करुन आगामी अधिवेशनात अहवाल सादर करण्याचा निश्चित प्रयत्न असेल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहाच्या दोन्ही सन्माननीय सदस्यांनी या संदर्भातील तक्रार सदनात मांडली होती व त्यानंतर हा विषय समितीसमोर गेलेला आहे. ज्या सदस्यांनी तक्रार मांडली त्या सदस्यांची समितीसमोर आजपर्यंत साक्ष झाली आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....OO-1..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

किंवा त्यावेळची त्यांची भूमिका आज वेगळी असू शकते. प्रथम त्यांनी आपली साक्ष घ्यावी आणि त्यानंतर गरज असल्यास पुढे साक्ष सुरु ठेववी. म्हणजे समितीचे पुढील कामकाज घ्यायचे की नाही या संदर्भात समिती निर्णय घेऊ शकेल.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**संदेश**

**उप सभापती** : विधानसभेकडून एक संदेश आला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

सचिव : महाराष्ट्र विधानसभेने दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजीच्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानपरिषदेच्या माहितीसाठी पाठविला आहे :-

"विधानसभेने संमत केलेले सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 12 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, 2015 दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी म.वि.स.नियम 154 अन्वये महाराष्ट्र विधानसभेत मागे घेण्यात आले आहे."

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LX OF 2015.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PREVENTION OF DANGEROUS ACTIVITIES OF SLUMLORDS, BOOTLEGGERS, DRUG-OFFENDERS, DANGEROUS PERSONS AND VIDEO PIRATES ACT, 1981.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO SELECT COMMITTEE.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 60 महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार,धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, 1981 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 60 महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार,धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, 1981 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, एमपीडीए अधिनियम, 1981 अंतर्गत सद्य:स्थितीत झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्तींना एक वर्षापर्यंत स्थानबध्द करता येते. महसूल विभाग, गृह विभाग व

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

अन्न आणि नागरी पुरवठा विभागामार्फत सादर अभियानांतर्गत वाळू तस्कर, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणा-या व्यक्तींचा सुध्दा या कायद्यांतर्गत समावेश केला आहे, हे या विधेयकाचे वैशिष्ट्य आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी प्रस्ताव दिलेला आहे, त्यांनी तो मांडावा.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

**उप सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी प्रस्ताव दिलेला आहे, त्यांनी तो मांडावा.

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 60 महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार,धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2015 विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, शासनाने या विधेयकामध्ये वाळू तस्करांबाबत तरतूद केली असून धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांचा सुध्दा या विधेयकामध्ये अंतर्भाव केला आहे. ही तरतूद करण्यापूर्वी या कायद्याची अंमलबजावणी केली असती तर डाळीच्या तुटवड्याचा प्रश्न निर्माण झाला नसता. परंतु व्यापाऱ्यांना डाळीचा साठा करण्यास मुभा मिळाली आणि सणासुदीच्या काळात सर्वसामान्य लोकांना चढ्या किंमतीने डाळ खरेदी करावी लागली. मी हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत दिलेला प्रस्ताव मागे घेणार आहे. कारण या विधेयकात केलेली तरतूद चांगली असल्यामुळे मी या विधेयकाचे स्वागत करतो.

---

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-60 यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मांडलेल्या विधेयकाचा हेतू चांगला आहे. अशा प्रकारचे निर्बंध घालण्याची आवश्यकता आहे. अलीकडच्या काळात वाळू माफिया, डिझेल व रॉकेल माफिया यांच्या संदर्भात सभागृहात चर्चा केली गेली. या माफियांच्या विरोधात कडक कायदा केला पाहिजे अशी सर्वांनी मागणी केली होती. त्यानुसार हे विधेयक आणण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. पूर्वी नदीतून वाळू काढण्यासाठी लिलाव केले जात आणि ठेके दिले जात असत. शासनाचे त्यावर निर्बंध नव्हते. नंतरच्या काळात मोठया प्रमाणात बांधकामे होत असल्यामुळे वाळूला अधिक महत्व प्राप्त झाले. ठाणे, पुणे, मुंबई शहरालगत वाळूला खूप किंमत मिळू लागली. वाळू तस्करीचे प्रमाण वाढू लागले. त्यातून शासनाला अशा प्रकारचे पाऊल उचलावे लागले. प्रत्येक जिल्हयामध्ये वाळूच्या संदर्भात नियंत्रण ठेवले जात असताना त्या ठिकाणची यंत्रणा अपुरी पडू लागली. याच्याशी पोलिसांचा संबंध येतो का, महसूल विभागाचा संबंध येतो का, नेमकी कारवाई कोणी करावी, त्याकरिता पुरेशी यंत्रणा आहे का असे अनेक महत्वाचे प्रश्न निर्माण झाले. एखाद्या ठिकाणी वाळूचा साठा सापडला तर ती वाळू वाहून नेणाऱ्या ट्रॅक्टरवाल्याला त्रास देण्यासाठी कायद्याचा उपयोग केला जायचा. नदीतून वाळू काढणाऱ्या लहान माणसावर कारवाई केली जायची. परंतु वाळू तस्कर यामधून मोकाट सुटले होते. या वाळू तस्करांचे, वाळूचा व्यवसाय करणाऱ्यांचे संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांशी महत्वपूर्ण संबंध असतात.

..2पी.1..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

हे अलीकडच्या काळात काही लपून राहिलेले नाही. हा कायदा करीत असताना कारवाई करणे हे अभिप्रेत आहे. एखाद्या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हात गुंतलेले असतील किंवा राजकीय लोकांचे हात गुंतलेले असतील तर त्यांच्यावर सुद्धा कारवाई करण्यासंबंधातील प्रभावी उपयोग या बिलातून होणे आवश्यक आहे. आज महसूल विभागाकडे या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असणारा स्टाफ नाही. त्यामुळे ते कोणावर तरी थातुरमातूर कारवाई केल्याचे दाखवतात. या कायद्याचा दुरूपयोग केला गेला तर त्यातून वेगळा अर्थ निघू शकेल. कायदा केल्यानंतरही यावर निर्बंध कसे आणायचे हे पाहणे आवश्यक आहे. यासाठी महसूल व पोलीस विभागामध्ये पुरेसा स्टाफ असणे आवश्यक असून त्यांना आज आपण डायरेक्शन्स देणे गरजेचे आहे. आपण पुरेसा स्टाफ दिला तरच खऱ्या अर्थाने या कायद्याची अंमलबजावणी होऊ शकेल. तसेच चुकीच्या लोकांवर अन्याय होणार नाही. मोठ्या प्रमाणावर वाळूचा व्यवसाय करणारे आहेत त्यांना याचा फायदा मिळणार नाही यासाठी सक्षम यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. कारण अनेक प्रकरणे आमच्या नजरेसमोर आलेली आहेत. यामध्ये कोणी किती पैसे घेतले याच्या याद्या आहेत. कायदा आपण जास्त कठोर केला तर त्यांचे आकडे फक्त वाढतील. त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. कारण आज आपल्याकडे पाहिजे तेवढी यंत्रणा नाही. 90 टक्के लोक कायदा मानत नाही आणि 10 टक्के लोक रॉयल्टी भरत असतील तर त्या कायद्याचा दुरूपयोग होऊ शकतो. तेव्हा कायदा आणत असताना या दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, हा कायदा बनविण्याचा उद्देश माननीय मंत्र्यांनी सांगितला आहे. आज राज्यामध्ये साठेबाजी व भाववाढ मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे त्यावर शासनाचेही नियंत्रण रहात नाही आणि गुप्तपणे, मोकाटपणे हा कारभार सुरू असतो आणि चढ्या भावाने माल विकला जातो. त्यावर निर्बंध आले पाहिजेत. याला कोण कारणीभूत आहे ? वाळूचा व्यवसाय करणारे, साठेबाज करणारे जे लोक आहेत त्यांना अधिकाऱ्यांचा सपोर्ट असल्याशिवाय हे सर्व काही करू शकत नाही. यात सक्षम अधिकाऱ्यांची देखील जबाबदारी आहे. यात महसूल व अन्न व नागरी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

पुरवठा विभागाची देखील जबाबदारी आहे. कोणी किती साठा केला आहे, दिलेले धान्य कुठल्या गोदामामध्ये जात आहे हे पाहण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची आहे. ही जी यंत्रणा आहे ती अधिक मजबूत करण्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे. साठेबाजांचे साठे सोडून द्यावे असे कितीही मोठा अधिकारी किंवा राजकारणी सांगत असेल तर त्यांच्यावर देखील कारवाई करण्याची तरतुद यात असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे कारवाईचा बडगा आपण उचलू शकलो तर या विधेयकाची अंमलबजावणी आपण चांगल्या पद्धतीने करू शकू. तेव्हा या ही दृष्टीने शासनाने विचार करावा. तसेच स्टाफ वाढविण्याच्या दृष्टीने, प्रभावी यंत्रणा उभारण्याच्या दृष्टीने शासनाने विचार करावा. तसेच कायदा बनविल्यानंतर नियमावली कशी असली पाहिजे, जबाबदारी कशी असली पाहिजे याचा विचार केला पाहिजे. आज आपण अधिकाऱ्यांवर जबाबदारी टाकली पहिजे. रूटीन पद्धतीने कायदा आणला तर त्याची प्रभावीपणे आपण अंमलबजावणी करू शकणार नाही. तेव्हा कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी नियमावली तयार करावी अशी मते मी मांडतो. येथे सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी उपसूचना मांडली होती. ती सूचना त्यांनी मागे घेतली आहे. हा कायदा चांगला आहे. या कायद्याचा दुरूपयोग होत असेल तर निश्चितच वेगळ्या मार्गाने त्यास आम्ही विरोध करू. आज जो कायदा आणला आहे त्याला आमचा पाठिंबा आहे.

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 60 - महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड अधिनियम, 1981 चा महाराष्ट्र 55 यामध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. या बिलाचा उद्देश खरोखरच चांगला आहे. माझ्याकडे सन 2007, 2008, 2009 चे तसेच माननीय मुख्यमंत्री विरोधी पक्षात असताना या बिलावर काय बोलले याचे देखील माझ्याकडे प्रोसिडींग्ज आहेत.

कायद्या विषयी बोलत असताना प्रत्येक लोकप्रतिनिधीला काय अनुभव आला आहे हे देखील पाहणे आवश्यक आहे. या अनुभवाचा कायद्यात केल्यानंतर जनतेला त्याचा फायदा होतो काय, हे देखील पाहणे आवश्यक आहे. कायदा हा अगोदर देखील होता. झोडपट्टी गुंड आणि हातभट्टीवाले हे काय एका दिवसात तयार झाले नाहीत. झोपडपट्टी गुंडांची कित्येक उदाहरणे आपल्या समोर आहेत. या विधेयकावर बोलत असताना मी स्पष्टपणे भूमिका मांडणार आहे की, झोपडपट्टी गुंड हे बोलण्यासाठी शीर्षक आहे. हे नाव छोटे आहे. झोपडपट्टी गुंड तयार झाले म्हणून झोपड्या तयार झाल्या. झोपड्या तयार झाल्या म्हणून आपल्याला कायदे बदलावे लागले. त्यामुळे आपल्याला सन 2000 पर्यंतच्या झोपडपट्टयात राहणाऱ्या लोकांना मोफत घरे द्यावी लागली. एसआरए योजना राबवायची असेल तर त्यांना भाडी द्यावी लागतात. त्यांच्यासाठी कॉर्पस फंड काढावा लागतो. बिल्डरला त्यांच्यासाठी चांगली घरे बांधावी लागतात. त्या घरांचे आपण पुन्हा ऑडिट करावे. ऑडिटमध्ये त्या लोकांना घरे व्यवस्थित मिळाली की नाही हे पहावे. या सर्वांचा उगम झोपडपट्टी गुंड या छोट्याशा शीर्षकामध्ये झालेला आहे. यात सरकारचा किती महसूल केला असेल ? डॉक्टर, इंजिनिअरसहीत सर्वांनी काम करायचे. ते स्वत: सॅलरी घेतात, इन्कम टॅक्स भरतात. त्याच्या जोरावर आपण या लोकांना कधी पर्यंत सगळे मोफत देणार आहोत अशा प्रकारचाही मुद्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

आहे. झोपडपट्टी गुंड तयार झाला नसता तर झोपड्या झाल्या नसत्या. झोपडपट्टी गुंडाची एवढी हिंमत होते की, तो प्रशासकीय अधिकाऱ्यांना म्हणजे पोलिसांना, म्हाडा अधिकारी, बीएमसी अधिकारी यांना स्वत:बरोबर घेऊन मी आज 10 झोपड्या बांधल्या आहेत त्या शाबूत राहिल्या पाहिजेत असे सांगून त्यांना हळूच पाणी देण्याची व्यवस्था करतो. त्यामुळे नंतर मग आपण या कायद्याकडे वळतो. यासंबंधातील सर्वात जास्त चांगला आराखडा मंत्री महोदय देऊ शकतील. मुंबईतील झोपड्यांना एसआरए अंतर्गत घरे देण्यात आली आहेत. त्यात आपण किती घरे दिली आहेत यांची संख्या काढावी. त्या संख्येवरून आपल्याला कळेल की, समाजातील काही लोकांनी कामे करायची, नियम पाळायचे, सगळा टॅक्स भरायचा, इन्कम टॅक्स द्यायचा आणि ज्यांनी काहीही केले नसेल त्यांना सर्व मोफत द्यायचे. एका कुठल्या तरी गुंडाने झोपडपट्टी वसविली आहे म्हणून ती कायदेशीर करण्यात येते.

मी सन 2006, 2007, 2008 मध्ये सातत्याने तीन वर्षे एकच उदाहरण या सभागृहापुढे मांडले होते. अंधेरी पूर्वेला चामुंडा बिल्डर्स आहेत. त्यांनी पार्ल्याला एसआरए योजना राबविली. एका घरामध्ये तीन भाऊ आणि आई राहात होती आणि तेवढाच त्यांच्याकडे पुरावा होता. हा सगळा दाखला दिल्यानंतर या तिन्ही भावांना वेगवेगळी घरे देण्यात आली. आईला देखील घर देण्यात आले. मी सभागृहात हा प्रश्न उपस्थित केला तेव्हा मला आपल्याकडे काही पुरावे असतील तर ते द्यावेत असे सांगण्यात आले. मी ते पुरावे दिले. एका घराच्या मोबदल्यात त्यांना चार घरे देण्यात आली होती. त्यामुळे त्या चार घरांवर ज्यांचा अधिकार होता तो आपण काढून घेतला आणि त्यांच्या गळ्यात मारला. कारण काय तर हे तिन्ही ठाणगे नावाचे भाऊ तडीपार गुंड होते.

QQ-1.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ......

त्या झोपडपट्टीत स्वतःचे वर्चस्व दाखवून त्या तडीपार गुंडानी 4 घरे मिळवली. विधानमंडळात काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्यानी ही बाब मला सांगितली होती की, साहेब, मी या झोपडपट्टीत राहतो, या तडीपार गुंडाकडून सगळयांना त्रास होतो त्यामुळे तुम्ही हे प्रकरण सभागृहात मांडा. मी प्रत्येक अधिवेशनात हा प्रश्न मांडला होता. आपल्याला पुरावे लागणार होते म्हणून त्यांचे सगळे कार्ड, सर्व डिटेल्स घेतले व ते सदनासमोर मांडले. मला आपल्या समोर ही गोष्ट सांगावी लागेल की, त्या गुंडावर आजपर्यंत कोणतीही कारवाई झाली नाही. म्हाडाकडून मला उत्तर आले व त्यामध्ये उल्लेख होता की, "आपले पत्र मिळाले, आपल्या पत्राप्रमाणे चौकशी केली. त्यांच्याकडे अगोदर वेगवेगळी घरे असल्यामुळे त्यांना जी घरे दिलेली आहेत ती बरोबर दिलेली आहेत, नियमानुसार दिलेली आहेत". एका घरात 3 भाऊ आणि आई राहत असेल तर त्यांना 4 घरे देण्याचा आपला नियम असेल तर ज्या पध्दतीने आपण या ठिकाणी विधेयक मांडत आहात त्याचा खरोखर समाजाला उपयोग होणार आहे काय ? तडीपारीच्या विधेयकामध्ये सन 2009 मध्ये त्यावेळेस माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेब विरोधी पक्षात होते. त्यांनी त्यावेळेस आपली भूमिका स्पष्टपणे मांडली होती. त्यांनी दि.15.12.2009 च्या या विधेयकाच्या संदर्भात असे मत व्यक्त केले होते की, "एमपीडीए संदर्भात आपले अनेक हद्दपारीचे आदेश हायकोर्ट रद्दबातल करते आणि आपल्यावर स्टीक्चर्स पास करते. म्हणून या निमित्ताने शासनाने या गोष्टीचे आश्वासन देण्याची आवश्यकता आहे की, हद्दपारीची कारवाई करताना दिलेल्या नॉर्म्सचे स्ट्रीक्टली पालन केले जाईल. आज शासनावर देखील नामुष्की येते. शासनाने एखाद्याला हद्दपार करावे व तो हायकोर्टात गेला की, हायकोर्ट त्याची हद्दपारी रद्द करते". आपण गुडांवर ॲक्शन घेता, त्यांना हद्दपार करता आणि हेच गुंड त्याच वसाहतीमध्ये सहा महिन्यानंतर पुन्हा येऊन राहतात आणि त्यांच्यावर ज्यांनी तक्रारी केलेल्या असतात त्यांना आणखीन त्रास देतात. त्यामुळे आपण तयार करीत असलेल्या कायद्याचा जनतेला फायदा होतो आहे की, जनतेचे नुकसान होते याचाही विचार करण्याची आज गरज आहे.

सभापती महोदय, हातभट्टी, औषधी द्रव्ये, गुन्हेगारीच्या संदर्भात आपण काय करणार आहात ? व्हॉट्स ॲपवर येणारे प्रत्येक प्रॉडक्टस कोण कोणाला कशा पध्दतीने विकतो आहे त्यासंदर्भात काहीही बंधने नाहीत. कायदा तयार करतांना तो नावापुरता किंवा समाजासाठी आम्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ......

काही तरी केले आहे अशा पुरता राहता कामा नये. हायकोर्ट किंवा सुप्रीम कोर्टात कोणी जात असेल तर शासनावर स्टीक्चर्स पास न होता शासन ठामपणे आपली भूमिका मांडू शकेल अशा पध्दतीचा कायदा करण्याची आवश्यकता आहे. हे विधेयक आणल्याबद्दल शासनाचे मनापासून अभिनंदन करावे लागेल. परंतु अभिनंदन करताना कायदा तेवढा मजबूत आहे का हे बघावे लागेल.

सभापती महोदय, "सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये वस्तूंचा पुरवठा व रास्त भावामध्ये गरजू व गरीब लोकांना केला जातो, त्या वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्यांना" असा विधेयकात उल्लेख आहे. काळया बाजारावर कारवाई केली असती तर डाळीचे भाव 200 रुपये किलोपर्यंत गेले नसते. पोलीस दिवाळीच्या वेळेस येऊन सांगतात की, रात्री 10 च्या पुढे फटाके वाजविण्यास बंदी आहे. परंतु ज्या कंपन्यातून हे फटाके येतात त्या कंपनीने अशा प्रकारचे प्रॉडक्टस तयार करु नये यासाठी आपण त्यांना थांबवू शकत नाही. परंतु फटाके वाजविणाऱ्यांवर आपण कारवाई करतो. त्यामुळे अशा पध्दतीचा कायदा बनविताना कायदा नावापुरता नसावा. काही अधिकारी सांगतील की, आम्हाला या कायद्या प्रमाणे काम करावयाचे आहे. परंतु कोर्टातून ज्या पळवाटा काढल्या जातात त्या पळवाटांमधून व्हाईट कॉलर गुंड सुटणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. या विधेयकामध्ये झोपडपट्टी गुंड अशा नावांचा उल्लेख केला आहे. आपण मान्यच केले आहे की, तो गुंड आहे. परंतु हा गुंड एकसारखा सुटतो. हातभट्टीचा धंदा बेकायदा आहे. हातभट्टीवाल्यांवर कारवाई केली की, दुसऱ्या दिवशी हा हातभट्टीवाला आपला धंदा दुसऱ्या ठिकाणी सुरु करतो. मालाड मालवणी येथे हातभट्टीची दारु प्याल्यामुळे 109 लोकांचा मृत्यू झाला होता. आता दहीसर,बोरीवली या ठिकाणी हातभट्टीची दारु प्राशन करुन मृत्यू होतील. यांना जर हद्दपार करावयाचे असेल, तडीपार करावयाचे असेल तर ते सुटणार नाही अशा प्रकारचा कायदा तयार झाला पाहिजे. कायदा जेव्हा अधिकाऱ्यांच्या हातामध्ये जातो तेव्हा तो कायदा एवढा कडक झाला पाहिजे की, काम करतांना अधिकाऱ्यांना पळवाट काढता येणार नाही, कोर्टालाही त्यातून पळवाट काढता येणार नाही आणि जे चांगले काम करतात त्यांना दिलासा वाटला पाहिजे असे कायदे तयार झाले पाहिजेत. माझ्या सारखा सदस्य या सदनात येऊन पुन्हा असे बोलावयास नको असे कायदे तयार झाले पाहिजेत. मी सदनामध्ये सगळया गोष्टी मांडल्या,उदाहरणे दिली,प्रुफ दिले तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ......

गुंड कोर्टातून सुटून गेले. जर कायदे बनविणाऱ्या सदस्यांची अशी परिस्थिती असेल तर हा कायदा तयार झाल्यानंतर आम्हाला काय मिळणार आहे, आपण कोणाला न्याय मिळवून देऊ शकणार आहात. त्यामुळे हा कायदा आणखीन कडक करण्यासाठी आपण त्यामध्ये कोणकोणत्या सुधारणा करणार आहात याचीही माहिती देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, व्हिडिओ पायरसीवर काही सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले आहेत. रस्त्यावर पायरेटेड व्हिडिओ सिडी विकणारे आपल्याला दिसतात. आज मराठी सिनेमांसाठी चांगले दिवस आले आहेत. परंतु मराठी सिनेमांसाठी चांगले दिवस जरी आलेले असले तरी चित्रपट निर्मात्याने कोणाकडून तरी कर्ज घ्यायचे, चित्रपट काढावयाचा आणि त्या चित्रपटाच्या पायरेटेड सिडीज बाहेर आल्या तर चित्रपट निर्माता उद्‌ध्वस्त होतो. चित्रपट निर्मात्याला पैसा न मिळता तो पैसा रस्त्यावरील पायरेटेड सिडीज विकणाऱ्यांनाच मिळतो. परंतु जे लोक पायरेटेड प्रॉडक्ट आपल्या घरी घेऊन जातात त्यामुळे घरच्या प्लेअरचा हेड सुध्दा खराब होतो. जर कोणी रस्त्यावर पायरेटेड सिडीज विकत असतील तर त्यांनाही "गुंड" हा शब्द लागू होतो. रस्त्यावर वस्तू विकण्याचा परवाना लागत असतो. पायरेटेड सिडीज विकण्याची महानगरपालिका परवानगी देत नाही. त्यामुळे "गुंड" हा शब्द पुन्हा येतो. त्यामुळे मी शासनाला विनंती करतो की, हे जे विधेयक पास केले जात आहे त्या विधेयकाच्या संदर्भात आणखीन अभ्यास करुन विधेयकामध्ये आपण "झोपडपट्टी गुंड" हा शब्द मानतात, "हातभट्टीवाले" हा शब्द मानतात तर यासाठी चांगल्या प्रकारे कडक कायदा करुन त्याचा फायदा जनतेला होईल यादृष्टीने शासनाने विचार करावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या बिलावर सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, शरद रणपिसे, किरण पावसकर यांनी विचार मांडले आहेत. या बिलामध्ये झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्ये विषयक ही मंडळी पहिल्यापासून आहे. या लोकांना धाक बसावा यासाठी हे विधेयक आणले गेले आहे. जेव्हा या विषयाच्या संदर्भात प्रश्न विचारला जायचा तेव्हा दोन्ही बाकावरुन असे मत व्यक्त केले जायचे की, या गुंडाना तुम्ही एमपीडीए लावणार का? खरे म्हणजे ही सभागृहाची किती तरी वर्षापासूनची मागणी होती. वाळू तस्कर,जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणा-या व्यक्तींना सुध्दा एमपीडीएच्या ॲम्बीटमध्ये आणले पाहिजे. जेणेकरुन एक स्टीग्मा सुध्दा असतो की, एमपीडीएमध्ये स्थानबध्द करण्याचा काहींसाठी एक वर्षाचा काळ असतो व त्यातून एक मॅसेज जात असतो की, आपण असे करावयास नको. यासंदर्भात आपण जोपर्यंत नियमावली कडक करीत नाही तोपर्यंत अशा प्रकारचा मॅसेज जनमाणसात जाऊ शकत नाही. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांच्या सूचना जेव्हा नियमावली तयार होईल त्यामध्ये सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा निश्चितपणे विचार केला जाईल. केवळ कायदा म्हणून कायदा न राहता त्याची जरब अशा प्रकारच्या गुंडावर बसली तरच या कायद्याचा काही तरी उपयोग होऊ शकेल. वाळू तस्कर, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे काही लोक व्हाईट कॉलर म्हणून समाजात वावरत असतात. परंतु त्यांना एकदा स्थानबध्दता झाली तर त्यांच्यावर एक प्रकारे स्टीग्मा येईल व प्रतिष्टीत, व्हाईट कॉलर पिपल आहेत त्यांना सुध्दा आपण ॲम्बीटमध्ये आणीत आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी स्वत:चा अनुभव या ठिकाणी सांगितला आहे. त्यासंदर्भात सुध्दा परामर्श घेतला जाईल. सन्माननीय सदस्यांनी जी उदाहरणे दिली आहेत त्यांचा देखील मागोवा घेतला जाईल. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती या ठिकाणी दिली आहे ती माहिती उपलब्ध करुन दिली त्यासंदर्भात सखोल चौकशी केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. तडीपार माणूस हायकोर्टाच्या सहाय्याने सुटून आल्यानंतर ज्या लोकांनी त्याच्या विरुध्द तक्रार केलेली असते त्यांचे जीवन हा गुंड असहाय करुन टाकत असतो त्यासंदर्भात गंभीर दखल घेतली जाईल. त्यामुळे सभागृहाने या बिलाला अनुमती द्यावी अशी विनंती आहे.

--



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील......

त्यांच्याबद्दल गंभीर दखल घेतली जाईल. माझी सभागृहाला विनंती आहे की, सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी खुलासा केलेला आहे. अवैध वाळुची वाहतूक करणारे ट्रक पकडल्यानंतर त्यांचे लायसेन्स तातडीने रद्द करून तो ट्रक जप्त करून परत मिळणार नाही अशी कारवाई करावी. अवैध वाळुची वाहतूक करणाऱ्यांवर जरब बसविणे आवश्यक आहे. असे लोक जामीन घेतात आणि ट्रक बाहेर रस्त्यावर पुन्हा धावू लागतो. यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांपासून तलाठ्यापर्यंत सर्वांचे हात ओले केले की विषय संपतो. आज हे विधेयक संमत होत आहे. जर या प्रकरणामध्ये गुन्हा घडल्यास त्यास ताबडतोब अटक करून वाहतूक करणारी यंत्रणा जप्त करण्याची यामध्ये तरतूद असावी.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अतिशय मौलिक सूचना केलेली आहे की,जे ट्रक पकडले जातात किंवा यामध्ये जे अधिकारी समविष्ट असतात त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. जसे वन विभागामध्ये अवैध वाहतुकीचे वाहन पकडल्यानंतर ते वर्षानुवर्षे दिले जात नाही. ते तसेच सडत ठेवले जाते. तशाप्रकारच्या सूचनाचा नियमावली अंतर्भाव करण्यात येईल. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांचा विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मागे घ्यावा.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते ) :** सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा आपला प्रस्ताव मागे घ्यावयाचा आहे काय ?

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा मी जो प्रस्ताव दिलेला आहे, तो मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**तालिका सभापती :** आता मी विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 60 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती :** सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 60 संमत झाले आहे.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:**राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निधिसूचित जमाती (विमुकत जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) विधेयक
L.A. BILL NO. LXIV OF 2015

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA STATE PUBLIC SERVICES (RESERVATION FOR SCHEDULED CASTES, SCHEDULED TRIBES, DE-NOTIFIED TRIBES (VIMUKTA JATIS), NOMADIC TRIBES, SPECIAL BACKWARD CATEGORY AND OTHER BACKWARD CLASSES) ACT, 2001.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO SELECT COMMITTEE.

डॉ.रणजित पाटील (सामान्य प्रशासन विभाग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 64- महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण ) अधिनियम, 2001 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 64- महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण ) अधिनियम, 2001 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, अविभाजित ठाणे जिल्ह्यामध्ये एस.टी.समाजासाठी 22 टक्के आरक्षण होते. दिनांक 9ऑगस्ट, 2014 रोजी पालघर जिल्हयाची निर्मिती झाली. नवनिर्मित जिल्ह्यामध्ये

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

आदिवासींची संख्या 37.39 टक्के आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर तेथे एस.टी.संख्या पाच टक्के आहे. ही बाब लक्षात घेऊन या विधेयकाद्वारे पालघर जिल्ह्याला एस.टी.चे 22 टक्के आरक्षण देणार आहोत, त्यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती :** विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा पहिला प्रस्ताव सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

( प्रस्ताव मांडण्यात आला नाही. )

**तालिका सभापती :** विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 64 - महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण ) अधिनियम, 2001 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेशदेऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती :** आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याच्या प्रस्ताव प्रथम मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्हा झाला पाहिजे अशी मागणी बऱ्याच वर्षापासून होती. ठाणे जिल्हा हा राजकीयदृष्टया फार संवेदनशील आहे. ज्यांना देशावर राज्य करायचे असेल तर त्यांनी उत्तर प्रदेश काबीज केले पाहिजे अशी एक राजकीय म्हण आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रात सत्ता स्थापन करायची असेल तर ठाणे जिल्हा काबीज करणे आवश्यक आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये विधानसभेच्या 24 जागा आणि मुंबईत विधानसभेच्या 36 जागा आहेत म्हणजे 60 विधानसभेच्या जागांचे हे क्षेत्रफळ आहे. ज्यांनी ठाणे आणि मुंबई काबीज केली ते राज्यामध्ये सत्ता स्थापन करु शकतात.

सभापती महोदय, आम्ही भाजप विरूद्ध शिवसेना असा संघर्ष रोज पाहतो, हे काय चालले आहे ? मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका हा बेस असतो त्याच्याच आधारावर विधानसभेच्या आणि लोकसभेच्या निवडणुका जिंकण्याचे तंत्र ठरते. तेव्हा मुंबई शहरावर राज्य कोणाचे याचेच भांडण भाजप आणि शिवसेना पक्षामध्ये चालू आहे. या भांडणामध्ये सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर यांच्या पक्षासारखे छोटेमोठे पक्ष आहेत, जे सामाजिक बांधिलकीने त्यांच्या बरोबर गेलेले आहेत, परंतु त्यांचे फार मोठे हाल होत आहेत.

सभापती महोदय, पालघर जिल्ह्यामध्ये एस.टी.संवर्गाची संख्या जास्त झालेली आहे. जे घडले ते आम्ही अमान्य करीत नाही. परंतु पालघर जिल्ह्यामध्ये ओबीसी समाज देखील मोठ्या प्रमाणात आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपणास ओबीसी घटकाला सुद्धा सामावून घ्यावे लागणार आहे. पालघर जिल्ह्यामध्ये आदिवासींची संख्या जास्त असली तरी त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले आहे. त्या ठिकाणी जमिनीचे भाव गगनाला भिडलेले आहेत. वसईपासून नरीमन पॉईंटपर्यंत श्रीखंड-भूखंड असे लेख "सामना" वर्तमानपत्रात यायचे. पालघर जिल्हा आदिवासींचा असला तरी तो मुंबईच्या लगत असल्यामुळे समृद्ध झालेला आहे. या जिल्ह्यामध्ये आता तांत्रिक बाब आली म्हणून त्या संदर्भातील विधेयक येथे मांडण्यात आलेले आहे. आम्ही ते प्रशासकीयदृष्टया मान्य करू

...2S-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे...

परंतु पालघरचा विकास झाला पाहिजे. दिनांक 1 ऑगस्ट, 2014 रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा स्वतंत्र जिल्हा निर्माण झाला. परंतु त्या ठिकाणी अजूनपर्यंत सेशन कोर्ट नाही. त्या ठिकाणी जिल्हा सामान्य रुग्णालय नाही. तसेच अद्यापपर्यंत आवश्यक त्या कार्यालयांची निर्मिती झाली नाही. या निमित्ताने सांगू इच्छितो की, राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांमध्ये ज्या योजना राबविल्या जातात त्या पालघर जिल्ह्यात राबविणे काळाची गरज आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसैन हे पालघर जिल्ह्यातील आहेत. ते मीरा-भाईंदर परिसरात चांगल्याप्रकारे काम करीत आहेत. त्यांच्याकडून मी त्या भागातील अडचणी समजून घेतल्या. माझी विनंती आहे की, पालघर जिल्ह्यातील प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणींबरोबरच त्या भागातील विकासाचे प्रश्न मार्गी लावले पाहिजेत. नवीन जिल्हा म्हणून पालघर जिल्ह्याला जे द्यावयाचे असेल ते सर्व उपलब्ध करुन दिले पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्र्यांकडून वारंवार विदर्भ आणि मराठवाड्यातील अनुशेषाबाबत सांगितले जाते. मागच्या अधिवेशनात केळकर समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला. मी विचारु इच्छितो की, तो अहवाल चर्चेला का घेण्यात आला नाही ? जर भविष्यात पालघरचा अनुशेष शिल्लक राहिला तर आम्हाला सुध्दा वारंवार त्या जिल्ह्याच्या अनुशेषबाबत चर्चा करावी लागेल. सभापती महोदय, या सरकारकडून केवळ अनुशेषाच्या बाबतीत बोलले जाते, परंतु विकासाच्या बाबतीत मात्र बोलले जात नाही. सभापती महोदय, मध्यंतरी ॲड.श्रीहरी अणे यांनी केलेल्या वक्तव्यावर दोन्ही बाजूने विचारांची देवाण-घेवाण झाली. ॲड.अणे काय बोलले हा भाग सोडून द्या. परंतु खऱ्या अर्थाने विदर्भ आणि मराठवाड्याचा अनुशेष दूर करावयाचा असेल तर केळकर समितीच्या शिफारशींचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. शासनाने विदर्भ आणि मराठवाड्यात ज्या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे त्या करणे नितांत गरजेचे आहे.

सभापती महोदय, हे विधेयक प्रशासकीय बाब आहे. राज्यघटनेमध्ये अनुसूचित जाती, जमातींच्या संदर्भात तरतुदी समाविष्ट केलेल्या आहेत. त्यानुसार शासनाला कार्यवाही करता येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्यावर खूप उपकार केलेले आहेत. त्यांच्या बाबतीत आम्ही हक्काने सांगू शकतो. या विधेयकाला आमचा विरोध नाही. परंतु या विधेयकाच्या निमात्ताने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे...

पालघर जिल्ह्याचा विकास चांगल्याप्रकारे झाला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. तसेच जिल्हा हा घटक समजून त्या ठिकाणी शासनाच्या माध्यमातून सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत, एवढेच या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील हे अतिशय चांगले काम करीत आहेत. आम्ही एखादा विषय उपस्थित केला तर तो गांभीर्याने घेऊन ते त्या बाबतची माहिती घेतात आणि आम्हाला ती माहिती अवगत करुन देतात. सभापती महोदय, मी तर म्हणेन की, माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांना कॅबिनेट मंत्री पद द्यावे. कारण ते अतिशय प्रमाणिकपणे काम करीत आहेत. मी विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबधी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो मागे घेणारच आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-64, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्वप्रथम मी या विधेयकाचे स्वागत करतो. या विधेयकाचे स्वागत करीत असताना सांगू इच्छितो की, आपल्या राज्यातील काही विशिष्ट उदा.ठाणे, नाशिक, धुळे, नंदूरबार, रायगड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांना आदिवासी जिल्ह्याचा दर्जा देण्यात आला आहे. सभापती महोदय, दिनांक 1 ऑगस्ट 2014 रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा स्वतंत्र जिल्हा निर्माण करण्यात आला. त्यामुळे पूर्वी ठाणे जिल्ह्याचे जे आदिवासीपण होते त्याचे विभाजन झाले. पालघर जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या 22 टक्के आहे. पालघर जिल्ह्यात विरार, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा, विक्रमगड, मिरा-भाईंदर या ठिकाणी अनुसूचित जातीचे लोक राहतात. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर आता आरक्षणाची टक्केवारी बदलली आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती कल्याण समितीने ठाणे जिल्ह्याचा दौरा केला होता. बैठकीच्या वेळी सांगण्यात आले की, ठाणे जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या जास्त असल्यामुळे अनुसूचित जातीसाठी 7 टक्के आणि अनुसूचित जमातीसाठी 22 टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. या निमित्ताने मी विचारणा केली की, ज्या ठिकाणी आदिवासींचे प्रमाण कमी आणि अनुसूचित जातीचे प्रमाण जास्त आहे त्या ठिकाणी अनुसूचित जातीसाठी आरक्षणाचे प्रमाण का वाढविले जात नाही ? परंतु या प्रश्नाचे उत्तर मला मिळू शकले नाही. महोदय, एखाद्या समाजाचे प्रमाण किती वाढले वा कमी झाले हा विषय नाही.

सभापती महोदय, पालघर जिल्हा निर्माण झाल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी जी भूमिका व्यक्त केली ती अत्यंत महत्त्वाची आहे. पालघर हा आदिवासीबहुल जिल्हा आहे. मी त्या भागात फिरलो आहे. त्या भागात आजही लंगोटी घातलेले लोक राहतात. ही सभ्यता, संस्कृती, विकास, प्रगती त्यांच्या वाड्यापर्यंत, पाड्यापर्यंत पोहचली पाहिजे या दृष्टिकोनातून

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने प्रयत्न केला पाहिजे.  सभापती महोदय, पालघर हा नवीन जिल्हा झाल्यामुळे त्या ठिकाणी





प्रा.जोगेंद्र कवाडे...

सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत अशा प्रकारची माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांच्याबद्दल जी भूमिका मांडली ती योग्य आहे.  माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील हे अतिशय संवेदनशील आहेत. त्यांच्यासारखा संवेदनशील मंत्री या विभागाला लाभला आहे.  आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांकडे विनंती करु की, आपण माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांना गृह मंत्री पद द्यावे.  महोदय, जसा पालघर जिल्हा निर्माण झाला तशाच प्रकारे गृह मंत्री पदाचा मुकुट माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांच्या डोक्यावर ठेवावा अशी माझी अपेक्षा आहे.  सभापती महोदय, मी शेवटी एवढीच अपेक्षा करतो की, पालघर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने जास्तीत जास्त प्रयत्न करावेत.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व या विधेयकाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-64, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पालघर हा नवीन जिल्हा झालेला आहे. या जिल्ह्यामध्ये नवीन पॅटर्न राबविला पाहिजे अशी माझी मागणी आहे. या ठिकाणी अजूनही सर्व यंत्रणा नाही, इमारती नाही, पुरेसा कर्मचारी नाही. हे सर्व खरे असले तरी पालघर जिल्हा हा कमीत कमी कर्मचारी वर्ग असणारा मॉडेल जिल्हा करु शकतो. त्यामुळे पालघर हा नवीन जिल्हा झाल्यामुळे त्या जिल्ह्यात इतर जिल्ह्यांच्या तुलनेत मॅनपॉवर कमी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी मी या विधेयकावरील चर्चेच्या अनुषंगाने विनंती करतो. सभापती महोदय, या जिल्ह्यात असलेला कर्मचारी पॅटर्न राज्यातील बाकीच्या जिल्ह्यांपेक्षा वेगळा असला पाहिजे.

सभापती महोदय, आपण सॉफ्टवेअर तयार केले आहे. त्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जमिनीची नोंदणी केल्यानंतर ताबडतोब 7/12 चा उतारा मिळणार आहे. त्यामुळे पूर्वी हे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा शासन विचार करणार आहे की नाही ? त्यामुळे पालघर जिल्ह्याच्या निमित्ताने कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च कसा कमी करता येईल हे पहावे, असे मला वाटते.

सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मंत्र्यांनी कर्मचाऱ्यांच्या पॅटर्नवर विचार करण्यासाठी या सभागृहाच्या सदस्यांची समिती गठीत करण्याबाबतचा उल्लेख करावा. ही समिती शासनाला सजेशन करेल. त्यामुळे मी पुनश्च मागणी करतो की, शासनाने सन्माननीय सदस्यांची समिती गठीत करावी. आम्ही येथे बोलतो आणि मंत्री महोदय ते लिहून घेतात आणि नंतर त्या अनुषंगाने काहीच कार्यवाही होत नाही. महोदय, या सरकारकडून पारदर्शक राज्य कारभार सुरु आहे, हे सरकार संवेदनशील आहे म्हणून मी बोलत आहे.

..2टी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

मी अनेक वेळा या सभागृहात गांभीर्याने बोललो आहे. मी सांगितले होते की, माझ्या सर्व संस्थांमध्ये पॅटर्न करताना कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मॅनपॉवर कशी कमी होईल हे मी सातत्याने पाहिले आहे. आपण ठरविलेल्या पॅटर्नपेक्षाही कर्मचारी कमी राहिले पाहिजेत या पध्दतीची चर्चा खातेनिहाय केली पाहिजे. मी स्वत: यात यशस्वी झालो आहे. माझ्या बँकेत मी यशस्वी झालो आहे, तेथे नाबार्डने 600 कर्मचारी दिले आहेत, मी 250 कर्मचाऱ्यांवर बँक चालवतो. बँकेचा व्यवहार दिवसेंदिवस वाढत आहे. तुम्ही याचा विचार गंभीरपणे करणार आहात की नाही, किती मॅनपॉवर आहे हे पाहणार आहात की नाही ? पालघरचे पूर्ण कार्यालय सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी वेढले पाहिजे. तेथे सीसीटीव्ही कॅमेरे लावले पाहिजेत. पालघरकडे देशातील मॉडेल जिल्हा म्हणून बघायला आले पाहिजेत असे मला वाटते. माझी दुसरी एक सूचना आहे. सभापती महोदय, आपण त्या एकत्रित जिल्ह्यात होता. आदिवासी उपयोजना ठराविक भागांमध्ये राबविली जाते. मी विचारतो की, एवढी वर्षे आदिवासी उपयोजनाची ग्रँट मिळते, किती आदिवासी विभागांचा परिपूर्ण विकास झाला आहे हे देखील या निमित्ताने सांगितले गेले पाहिजे. करोडो रूपयांची ग्रँट येत आहे, वेगवेगळया योजना येत आहेत. ठाणे व रायगड या दोनच जिल्ह्यांत कातकरी समाज आहे. राज्यात दुसरीकडे तो समाज कुठेही नाही, त्यांचे पैसे राज्याकडे पडून आहेत. आलेल्या निधीचा योग्यरितीने नियोजन करून व्यवस्थितरित्या योजना राबविला तर निश्चितपणे वेगळ्या तऱ्हेने पहायला मिळेल. येथील आदिवासी हा चळवळीतील आदिवासी आहे. येथील आदिवासी गोदुताई परूळेकरांनी स्वत:च्या हक्कासाठी जागरूक करून स्वत:चा हक्क लढ्यातून मिळविणारा जिल्हा म्हणून पुढे आणला आहे. त्यामुळे हा जिल्हा वेगळ्या तऱ्हेने उभा केला पाहिजे. या जिल्ह्यात मनपा आहे. अर्ध्या जिल्ह्यात किनारपट्टीच्या भागात नागरीकरण, औद्योगिकरण झाले आहे. सभापती महोदय, हा जिल्हा होत असताना शासन स्मार्टची भूमिका घेत आहे. सरकार जेथे जाईल तेथे स्मार्ट म्हणत आहे. जिल्हा कसा स्मार्ट होईल हे पाहण्याचे काम विविध योजनांतून करावे ही माझी सूचना आहे. राखीव जागांचे आरक्षण आहे. मी मघाशी एका प्रश्नाच्या संदर्भात बोलताना सांगितले की, जेथे समाजाला

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

दाखले मिळत नाही तेथे तुम्ही राजकीयदृष्ट्या तेथील वॉर्ड तेथील लोकसंख्येच्या आधारावर राखीव ठेवता आणि त्यांना मात्र देत नाही. ठाण्यामधील पालघर येथे कोळी समाजचा परिसर आहे, त्या वस्त्यांत ओपनमध्ये दाखले दिले जात नाहीत, तोपर्यंत त्या सर्व वॉर्डच्या म्हणजे ग्रामपंचायती वॉर्ड, मनपा वॉर्ड ओपनमध्ये गणले गेले पाहिजेत अशी मी सूचना करतो. धन्यवाद !

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आनंदराव ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाच्या विधेयकावर बोलण्यास संधी दिल्याबद्दल धन्यवाद. आपल्याला कल्पना आहे. पालघर जिल्ह्याच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील मुद्दा आहे. 22 टक्के आरक्षणाचा विषय आहे. पालघर जिल्ह्यामध्ये सहर्ष स्वागत केले जाणार आहे त्याबद्दल कोणतीही द्विधा मनस्थिती नाही. प्रश्न असा आहे की, आपण विधेयक संमत करणार आहोत त्याच पध्दतीने सर्व भरती होणार आहे किंवा तो वेगळा ॲक्ट लागू झालेला आहे. प्रयत्न असा आहे की, 'क' व 'ड' वर्गात 100 टक्के आरक्षण हे फक्त एसटीसाठी आहे, त्यामध्ये ओबीसी, एससी, ओपन नाही. 'स्थानिक' हा विषय घेऊन 100 टक्के आरक्षण एसटीला देण्याचा विषय आहे. तेथे बिगर आदिवासी समाज आहे, मग तो ओबीसी, एससी किंवा इतर असेल त्या सर्वांचा प्रचंड विरोध आहे. त्यांचे म्हणणे आहे की, त्यांची संख्या जास्त आहे, त्यांना टक्केवारी वाढवून द्यावी. 22 टक्के हे संपूर्ण ठाण्याला होते. ते पालघरला मान्य आहे. किंबहुना 2-5, 10-20 टक्के वाढविले तर त्यासाठीही विरोध होणार नाही. पण 100 टक्के आरक्षण 'क' व 'ड' वर्गात लागू झाले तर कसे होणार ? या विरोधात लोक न्यायालयात गेले आहेत. तेथील बिगर आदिवासी समाजातील मुले यांना नोकरीच्या दृष्टीने किंवा कोणत्याही दृष्टीने पुढे 'क' व 'ड' वर्गात जाण्याची संधी मिळणार नाही. शासन हा निर्णय लागू केल्यानंतर या बाबतीत सुध्दा फर्म राहणार आहे का ?

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 64 महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, 2001 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मंजुरीसाठी आले आहे. अध्यादेश दिनांक 02 डिसेंबरला काढला आहे, दिनांक 07 डिसेंबरला अधिवेशन सुरू होत होते. मग 02 डिसेंबरला अध्यादेश एवढ्या घाईने का काढला, अशी काय आवश्यकता होती हा सुध्दा प्रश्न अनुत्तरित आहे. अधिवेशनात स्वतंत्रपणे विधेयक आणले पाहिजे होते. परंतु आपण माननीय राज्यपालांना अध्यादेश पाठवून दिला. माननीय राज्यपालांचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न होत आहे. आपण पदे भरताना एससीसाठी 13, एसटीसाठी 7, निरधिसूचित जमातीसाठी 3 व भटक्या जमातीसाठी अडीच, त्यानंतर साडे तीन टक्के असे 52 टक्के आरक्षण दाखविले आहे. आपण निश्चितच यानुसार पदे भरणार आहात का हा प्रश्न सुध्दा अनुत्तरित आहे. आपण एसटीची पदे जास्त टक्केवारीनुसार भरणार आहात का हा प्रश्न सुध्दा अनुत्तरित आहे. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे साहेबांनी या संदर्भात एक सुधारणा दिली होती. आता ते सभागृहात उपस्थित नाहीत. अनुसूचित जातीतील प्रवर्गांचे किंवा बहुजन समाजातील प्रवर्गांचे आरक्षण कमी करण्यात येऊ नये अशी माझी विनंती आहे. आपण या संदर्भात नोंद घ्यावी.

----

..5

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पालघर जिल्ह्यात आदिवासींसाठी 22 टक्के आरक्षण दिल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. परंतु शाहू-फुले-आंबेडकर यांच्या राज्यात एखाद्या समाजाचे भले करताना दुसऱ्या समाजाचे वाटोळे होऊ नये याची काळजी सुध्दा शासनाने घ्यावी. आपण एसटीला 22 टक्के आरक्षण दिले. पण एसटी व्यतिरिक्त असलेल्या एससी, ओबीसी, ओपन यामधील लोकांच्यावर अन्याय होत आहे. मागच्या सरकारच्या काळात माननीय राज्यपालांनी या संदर्भात निर्णय घेतला आहे. शासन इतर समाजावर अन्याय होणार नाही याची तरतूद करेल का ?

----

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल धन्यवाद. मी सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 64 वर बोलण्यासाठी उभा आहे. विधेयकामध्ये 'निरधिसूचित जमाती' असे म्हटले आहे. निरधिसूचित जमातीला 'विमुक्त जाती' हा प्रचलित शब्द आहे. सकृतदर्शनी वाचताना असे वाटते की, आणखी एखादी कॅटेगरी पुढे आली आहे. माझी विनंती आहे की, शासनाने यामध्ये दुरूस्ती केली पाहिजे. विधेयकाच्या नावात दुरूस्ती झाली पाहिजे.

....U

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड........

सभापती महोदय, अशी एक वेळ येऊन ठेपलेली आहे. आपण बघावे की, आपल्या देशात आणि राज्यात मंडल आयोग आला. मंडल आयोगाने म्हटले की, देशात साधारणत: 52 टक्के ओ.बी.सी.आहेत. ते 52 टक्के असल्यामुळे त्यांना 27 टक्के आरक्षण भारत सरकारने दिले. देशामध्ये सर्वदूर ते लागू झाले. यवतमाळ असो, ठाणे असो, राज्यातील जे आदिवासी जिल्हे आहेत त्या जिल्ह्यांमध्ये ओ.बी.सी. लोकांवर अन्याय होत आहे. ठाणे आणि पालघरचेच उदाहरण आपण घ्यावे. या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर ओ.बी.सी.समाज आहे. त्या ठिकाणी कुणबी, आग्री, कोळी समाज आहे. कोळी समाजाला तर हेही सांगता येणार नाही की, ते कोणत्या प्रवर्गात आहेत. आपल्याला कल्पना आहे की, याच नागपूरमध्ये 114 गोवारी शहीद झाले. गोवारी समाज आदिवासी असूनही त्यांना सन 2010 मध्ये ओ.बी.सी.म्हणून जाहीर केले. माझा प्रश्न आहे की, सन 2010 मध्ये त्यांना केंद्राने ओ.बी.सी.मध्ये टाकले. मग 10 वर्षापूर्वी हा समाज कोणत्या प्रवर्गात होता ? या निमित्ताने या सर्व गोष्टींचा अभ्यास झाला पाहिजे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले की, धनगर समाजाला आरक्षण देऊ, आदिवासींच्या आरक्षणाला धक्का न लावता देऊ. आदिवासींच्या आरक्षणाला धक्का न लावता म्हणजे नेमके काय, याचे उत्तर ना मुख्यमंत्री महोदयांनी दिले, ना आमच्या लोकांनी विचारले, ना धनगर समाजाच्या नेत्यांनी याबाबतचे स्पष्टीकण केले आहे. हा काय प्रकार आहे ?

सभापती महोदय, मी वारंवार सांगतो आहे की, जेव्हा मंडल आयोगाने अहवाल दिला त्यावेळी श्री.एल.आर.नाईक नावाचे सदस्य होते. ते असे म्हणाले होते की, "मंडलजी आपण असे करु नका. सरसकट 27 टक्के आरक्षण देऊ नका. त्यामध्ये एवढ्या जाती आहेत. ओ.बी.सी.मध्ये काही जाती सुधारलेल्या आहेत, काही मागासलेल्या आणि वंचित आहेत." उदाहरण म्हणून सांगावयाचे झाले तर वडार समाज, मसनजोगी समाज, आपल्या अंगावर चाबुक मारुन घेणारे पोतराज, असे अनेक समाज आहेत की, जे एवढ्या वर्षापासून वंचित आहेत. त्यांच्याकडे कोणाचेही लक्ष नाही. त्यामुळे श्री.एल.आर.नाईक यांनी सांगितले होते की, "आपण दोन भाग करावेत. एक डिप्रेस्ड क्लास करावा." परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे तत्व सांगितले आहे,...(अडथळा......)

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना मी प्रश्न विचारु इच्छितो की, तुम्हाला काही द्यावयाचे नाही का, मूळ कल्पना तुमचीच होती, आज आपण प्रश्न सोडवू शकत नाही, धनगरांना आरक्षण दिले नाही तर तुमचे काय हाल होतील, याचा आपण विचार करावा. मी फार सेन्सिटिव्ह इश्यू मांडत आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांची तब्येत ठीक नव्हती. त्यांचा ब्लड प्रेशर काऊंट 200 पर्यंत गेला होता व त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. म्हणून माझी त्यांना एवढीच विनंती आहे की, तब्येत लक्षात घेऊन त्यांनी कमी आवाजात बोलावे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना मी धन्यवाद देतो.

सभापती महोदय, माझे म्हणणे एवढेच आहे की, मी फार सेन्सिटिव्ह इश्यूवर बोलत आहे. मी 20 वर्षापासून या विषयावर बोलत आहे. पण त्याकडे कोणी लक्ष दिले नाही. श्री.एल.आर.नाईक यांनी मंडल आयोगाच्या अहवालाला आपली डिसेंड नोट दिलेली आहे. ती आपण अहवालामध्ये नेटवर पाहू शकता. परंतु, या रिपोर्टकडे अद्याप कुणी पाहिलेले नाही. त्यांनी सांगितले होते की, "हा समाज संघटित झाला, आपल्या हक्कांसाठी लढला तर ठीक आहे नाही तर हा समाज मेला, याचे काही खरे नाही."

सभापती महोदय, मला आपल्याला असे विचारावयाचे आहे की, एखादा वडार, भोई, बंजारा समाजातील मुलगा आतापर्यंत आय.ए.एस.ऑफिसर झाला आहे का, केंद्र सरकारच्या किती तरी पोस्ट भरल्या जातात, रेल्वे, जी.आय.सी., मिलिटरी यामध्ये या समाजातील लोकांची संख्या किती आहे ? त्यांनी सांगितले होते की, धनगरांचा प्रश्न हा या मार्गाने सुटु शकतो. श्री.एल.आर.नाईक यांच्या शिफारसी मी वारंवार सागत आहे. भटक्या व विमुक्तांचा हा प्रश्न आहे. त्यांना केंद्रात आरक्षण नको ? मी गेल्या अनेक वर्षापासून लढतो आहे. सन्माननीय स्व.इंदिराजी गांधी, श्रीमती सोनियाजी गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, लाल बहादुर शास्त्री हे सर्व आमच्या मेळाव्याला येऊन गेले आहेत आणि त्यांनी सांगितले आहे की, आम्ही तुम्हाला आरक्षण देतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड........

सभापती महोदय, एकदा माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी हे पंढरपूरला आले होते. मी त्या कार्यक्रमाचा सहसंयोजक होतो. मी स्टेजवरुन बोललो तेच आज बोलत आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, आम्ही तुम्हाला आरक्षण मागत नाही. एकदा मी आदरणीय श्रीमती सोनिया गांधीसमोर बसलो होतो. मी त्यांना सांगितले की, "हमें आरक्षण नही चाहिए." त्यांनी मला विचारले की, "फिर आप को क्या चाहिए." मी त्यांना सांगितले की, "आप हमें ऑलरेडी 27 परसेंट आरक्षण दे रहे हो. हमे 27 परसेंट आरक्षण नही चाहिए, हमें 7 परसेंट आरक्षण दे दो."

सभापती महोदय, धनगर समाजाला साडेतीन टक्के आरक्षण आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी दिले. आम्हाला असे वाटले होते की, माननीय श्री.शरद पवार यांचे घरोघरी फोटो लागतील. फोटो लागलेच नाहीत. पण लोक वाटेल तसे त्यांना बोलत बसले. काल माझी तब्येत चांगली नसल्यामुळे मला बोलता आले नाही. ज्यावेळी मंडल आयोग लागू होत होता त्यावेळी श्री.शरद पवार साहेबांनी मला बोलावून घेतले. माझी त्यांच्याशी काही ओळख नव्हती. मी वृत्तपत्रामधून लिखाण करीत होतो, सूचना करीत होतो, काही प्रश्न मांडत होतो. मला साहेबांनी बोलावून घेतले, वंजारा, धनगर या सर्वांना मंडलच्या माध्यमातून आरक्षण मिळाले.

सभापती महोदय, या निमित्ताने मला सांगावयाचे आहे की, पालघरमध्ये ओबीसी 52 टक्क्यापेक्षाही जास्त आहेत. 60 टक्के ओ.बी.सी.समाज आहे. त्यानुसार ओ.बी.सी.ना 30 टक्के आरक्षण मिळाले पाहिजे. परंतु, एस.टी.च्या 'अ' व 'ब' वर्गाला आरक्षण वाढविले तर नैसर्गिकरित्या ओ.बी.सी.चे आरक्षण कमी होणार आहे. हा अन्याय आपण कसा दूर करणार आहात, याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. एस.टी.चे आरक्षण वाढल्यामुळे ओ.बी.सी.चे आरक्षण कमी होणार आहे. आमच्या यवतमाळ जिल्ह्यामध्ये एस.टी.ला 21टक्के आरक्षण दिल्यामुळे ओ.बी.सी.चे 27 टक्क्यांचे आरक्षण 11 टक्क्यांवर आलेले आहे. हाच अन्याय पालघर जिल्ह्यातही होणार आहे. त्याचे निराकरण आपण कसे करणार आहात, याचे उत्तरही मंत्री महोदयांनी दिले पाहिजे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) UU-4

SRR/ MMP/ MMP/ AKN/ AKN/ 17:50

श्री.हरिसिंग राठोड........

सभापती महोदय, भविष्यात आरक्षणाची समिक्षा झाली पाहिजे, हे माझेही मत आहे. याबाबत देशात जे वादंग माजले आहे, ते चुकीचे आहे.

...VV-1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड........

हे 27 टक्के आरक्षण कोणाला मिळत आहे, याची तुम्ही कोठे तरी समीक्षा करावी. देशातील 2-4 राज्यातील काही जाती हे आरक्षण फस्त करीत आहेत. त्यामुळे निश्चितपणे याची समीक्षा झाली पाहिजे. पालघर जिल्ह्यातील ओबीसींचे आरक्षण कमी झाले तर ओबीसींवर अन्याय होणार आहे. मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात याबाबत खुलासा करावा, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आता माननीय मंत्री महोदयांनी त्यांचे उत्तराचे भाषण सुरु करावे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद रणपिसे, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री जयंत प्र.पाटील, आनंद ठाकूर, हरिसिंग राठोड यांनी या विधेयकावर आपले मौलिक विचार मांडले आहेत.

श्री.विनायक मेटे (बसून) : सभापती महोदय, मला या विधेयकावर बोलावयाचे होते.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय,....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांचे भाषण संपल्यानंतर मी माननीय मंत्री महोदयांना त्यांचे उत्तराचे भाषण सुरु करण्यास परवानगी दिली. त्यावेळी तुम्ही सभागृहात नव्हते.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय मी सभागृहात नव्हतो, हे मी मान्य करतो. परंतु, भाजपाचे दुर्लक्षित नेते माननीय श्री.विनायक मेटे साहेब सभागृहात उपस्थित होते. ते माझ्यापेक्षा ज्येष्ठ सदस्य आहेत. म्हणून त्यांचे भाषण झाल्यानंतर मी बोलणार होतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी मला बोलावयाचे आहे असे सांगितले असते तर मी त्यांना देखील बोलण्याची संधी दिली असती. त्यांना बोलावयाचे असते तर त्यांनी उभे राहून तसे सांगितले असते.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मला विधेयकावर बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती** : ज्यांनी विनंती केली त्यांना मी बोलण्याची संधी दिलेली आहे. आपणही विनंती करावयास पाहिजे होती. आता माननीय मंत्री महोदयांनी आपले उत्तराचे भाषण सुरु करावे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सनमाननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सर्वांना सोबत घेऊन....

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, माननीय सभापती उभे असताना आपण बोलत आहात हा माननीय सभापतींचा अवमान आहे.

**उप सभापती :** मी त्यावेळी आसनस्थ झालो नव्हतो. तुम्हाला काय सांगायचे आहे ते आता सांगावे. आता माननीय मंत्री महोदयांनी त्यांचे उत्तराचे भाषण पुढे सुरु करावे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर आपले विचार मांडले आहेत. ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाले आणि आपण पालघर जिल्ह्याच्या संदर्भात सतत आश्वासन देत होतो. सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद रणपिसे आणि प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांनी सर्वांचाच विकास झाला पाहिजे, अशी भावना व्यक्त केली आहे. सर्वांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, वैद्यकीय विकास झाला, असे त्यांनी सांगितले. तो स्मार्ट जिल्हा, मॉडेल जिल्हा व्हावयास पाहिजे असाही विचार पुढे आला. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांनी देखील हाच विचार मांडलेला आहे. त्यांनी सांगितले की, आपण जिल्ह्याची निर्मिती करीत आहोत. परंतु, सर्व समावेशक आणि सर्वांना बरोबर घेऊन हा विकास सर्वांपर्यंत पोहोचला पाहिजे. फक्त जिल्ह्याची निर्मिती करुन होणार नाही तर त्यासाठी क्षमता विकास, पायाभूत सुविधांची उभारणी आणि माहिती व तंत्रज्ञान विकास याद्वारे तो जिल्हा अधिक कसा स्मार्ट करता येईल याबद्दलचा विचार पुढे आलेला आहे. या सोबतच असाही विचार मांडण्यात आला की, सर्वांच्या अनुभवाचा फायदा घेण्यासाठी एक बैठक आयोजित करुन पालघर जिल्ह्याच्या सर्वांगीन विकासासाठी या सुचनांचा कसा उपयोग करता येईल हे बघावे. या दृष्टीने एक बैठक घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाकूर यांनी अशी चिंता व्यक्त केली की, कर्मचाऱ्यांची जी भरती होते ती केवळ एस.टी. प्रवर्गातून होऊ नये. नाही तर त्यामुळे समाजात नाराजी व्यक्त होईल. ती सूचना देखील विचारात घेतली जाईल. तसेच, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर साहेबांनी देखील दुसऱ्या समाजाचे वाटोळे होऊ नये अशी भावना व्यक्त केली आहे. असे काही होणार नाही, यासाठी आपण प्रयत्न करू.

सभापती महोदय सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी देखील या विधेयकावर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. मला असे वाटते की, पालघरच्या दृष्टीने हे करणे आवश्यक होते, तशा प्रकारचे आश्वासन सभागृहात देण्यात आले होते आणि पुढील अधिवेशनात आपल्याला हे करावयाचे आहे. आदिवासी या पासून वंचित राहू नयेत म्हणून आपण अध्यादेश काढला. त्यांना लवकर फायदा कसा देता येईल, हा हेतू समोर ठेऊन अध्यादेश काढण्यात आला होता. सभागृहाने हे विधेयक संमत करावे, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा आपला प्रस्ताव मागे घ्यावयाचा आहे काय ?

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधी मी जो प्रस्ताव दिलेला आहे तो मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**उप सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप **सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचा भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 64 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती :** सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 64 संमत झाले आहे.

--------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. LVIII OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 58-मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि क्रमांक 58-मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाने "मेक इन इंडिया मोहीम" हाती घेतली असून देशांतर्गत औद्योगिक क्षेत्रात वाढ व्हावी, औद्योगिक क्षेत्राला चालना मिळावी, औद्योगिक धोरणाचे जे परवाने असतात ती प्रक्रिया सुटसुटीत व्हावी म्हणून त्याच धर्तीवर राज्याने "मेक इन महाराष्ट्र अभियान" अंगीकृत केले आहे. असे लक्षात आले की, ज्या महानगरपालिका, नगरपरिषद क्षेत्रात एमआयडीसीचे क्षेत्र आहे, त्या क्षेत्रात उद्योग उभा करावयाचा असेल तर कॉर्पोरेशन आणि एमआयडीसीकडून ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागत होते. आता येथून पुढे एमआयडीसीकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतर कॉर्पोरेशनकडून दुसरे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता असणार नाही, अशी सुधारणा या विधेयकाद्वारे करण्यात येत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..6...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचा प्रस्ताव आहे त्यांनी तो मांडावा.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेते) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 58- मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2015 विधान परिषदेची सहमती घेऊन विधान परिषदेच्या 12 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 58- मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2015 विधान परिषदेची सहमती घेऊन विधान परिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

..2W-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मेक इन इंडियाच्या संदर्भात राज्य सरकारने उचललेले हे पाऊल आहे. मेक इन इंडियाला आमचा विरोध नाही, राज्यातील उद्योग वाढविण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले आहे. या विधेयकाला आम्हाला विरोध करायचा नाही. यामध्ये काही सुधारणा व सूचना या निमित्ताने करायच्या आहेत, महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या एमआयडीसीमध्ये उद्योग उभारण्यासाठी वेगवेगळ्या परवानग्या महानगरपलिकेकडून घ्यावा लागत होत्या. छोट्या महानगरपालिकांमध्ये औद्योगिक वसाहती होत्या. त्यांना आपण एमआयडीसी म्हणू शकत नाही. त्या छोट्या औद्योगिक वसाहती आहेत, या छोट्या उद्योगांना तेथील नगरपालिका किंवा महानगरपालिकांची परवानगी घ्यावी लागत होती. आज देखील अशा परवानग्या घ्याव्या लागत आहेत. कदाचित हे विधेयक संमत झाल्यानंतर अशा परवानग्या घ्याव्या लागणार नाहीत. आणखी उद्योग येण्यासाठी किंवा पुर्वीच्या उद्योगांना सोईचे होण्यासाठी हे विधेयक संमत करण्यात येत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी एक उदाहरण देणार आहे. मेक इन इंडिया बाबत आपण चांगले पाऊल उचलित आहात, राज्यात जास्त उद्योग यावेत, यासाठी सर्व बाबी आपण सुकर करीत आहात, पूर्वीपासून महानगरपालिकेच्या हद्दीत एखाद्या औद्योगिक वसाहत आहे, ती औद्योगिक वसाहत पूर्वी अतिशय चांगली होती, परंतु तेथे आता उद्योग नावाला देखील उरले नाहीत, त्याबाबत काय अडचणी येणार आहेत, उद्या अशा औद्योगिक वसाहतीमध्ये मला उद्योग टाकायचा आहे, उद्योग टाकताना मला नगरपालिका किंवा महानगरपालिकेची परवानगी लागणार नाही. नदी पात्राच्या बाजूला औद्योगिक वसाहतीमध्ये मला एखाद्या प्लॉट मिळाला असेल तो नदीपात्राच्या नियमाच्या 50 फूट आत किंवा बाहेर असेल त्यासंदर्भातील निर्णय कोणी द्यावा. त्या उद्योगामुळे नदीपात्रात प्रदूषण होणार असेल, ते नदीपात्र प्रदूषीत होणार असेल, यासाठी नगरपालिका व महानगरपालिकेची कोणतीच परवानगी लागत नसेल तर या प्रदूषणाची जबाबदारी नेमकी या विधेयकामुळे कोण घेणार आहे, यासंदर्भातील स्पष्टता होणे आवश्यक आहे, एखादा उद्योग महानगरपालिकेच्या हद्दीत उभारित असताना त्या नगरपालिका किंवा महानगरपालिकेची परवानगी घेणार नसाल, त्या उद्योगात अग्निशमनाची काही व्यवस्था असेल, परंतु एखादी दुर्दैवी घटना घडून फॅक्टरी पेटली, तर अग्निशनमनाची व्यवस्था त्या उद्योगात आहे किंवा नाही याची



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

पाहणी कोण करणार. आग विझविण्याची यंत्रणा आहे किंवा नाही याची पाहणी करुन त्यानंतर परवानगी देण्यात येत होती. आता हे विधेयक संमत झाल्यावर अशा परवानगी लागणार नाही. अशा उद्योगामध्ये भविष्यात एखादी घटना घडली तर काय करावे याची स्पष्टता नवीन कायदा करीत असताना होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, एखादा उद्योग उभारित असताना नगरपालिका व महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोणतीही परवानगी लागणार नाही. नदीचे प्रदूषण होणार नाही, अग्नीच्या बाबतीत धोका येणार नाही. त्या उद्योगातून मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होत असेल. त्या औद्योगिक वसाहतीमधील कचरा साफ करण्याची जबाबदारी नगरपालिका किंवा महानगरपालिकेची असेल तर परवानगीच्या बाबतीत काय होणार आहे. महानगरपालिका व नगरपालिकेकडून परवानगी घ्यावयाची नाही त्यांना विचारावयाचे नाही. तर त्या औद्योगिक वसाहतीमधून निर्माण होणारा कचरा उचलण्याची व्यवस्था कोण करणार आहे ? अशी व्यवस्था होणार नसेल आणि नगरपालिका व महानगरपालिकेच्या परवानगीविना उद्योग येत असतील तर त्या नगरपालिकेच्या परिसरात कचरा व प्रदूषण होणार किंवा नाही याबाबत कायद्यात सुस्पष्टता असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचे काही प्लॉट हे सार्वजनिक आहेत, ते प्लॉट मेक इन इंडियाच्या माध्यमातून त्यांना आवश्यक वाटले तर मुंबई महानगरपालिकेचे ते प्लॉट एमआयडीसीला द्यावयाचे काय ? त्याबाबतीत सुस्पष्टता या कायद्यात होणे आवश्यक आहे. मी ज्या सूचना व सुधारणा सूचवित आहे, त्याचा विचार सरकारने करावा अशी मी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

---------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन 1988 चा अधिनियम क्रमांक 3 याच्या कलम 390 ची सुधारणा**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी खंड 2 ला सुधारणा सूचविली आहे त्यांनी ती मांडावी.

श्री.शरण रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकाला मी प्रस्ताव व सुधारणा दिलेली आहे. त्यामुळे मला त्यावर एकत्र बोलता येईल. ती सुधारणा मांडण्यास मला सभागृहाने अनुमती द्यावी.

पृष्ठ क्रमांक 2, खंड 2, ओळ क्रमांक 8
"आवश्यकता असणार नाही," या मजकुरानंतर
"तसेच या जागेचा वापर उद्योग क्षेत्रातील उत्पादन वाढीसाठी
व रोजगार निर्मितीसाठी केला जाईल."
असा मजकूर दाखल करण्यात यावा.

सभापती महोदय, या विधेयकाबाबत शासनाचा हेतू कदाचित चांगला असेल, मेक इन इंडिया झाले पाहिजे, उद्योगधंदे वाढले पाहिजेत. रोजगार निर्मिती झाली पाहिजे. याबाबीशी आम्ही सहमत आहोत, या विधेयकाच्या निमित्ताने दोन तीन प्रश्न निर्माण होतात. एक प्रश्न असा आहे की, या विधेयकात असे नमूद करण्यात आले आहे की, परंतु महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अधिसूचित केलेल्या क्षेत्रामधील कारखाने, कर्मशाळा किंवा कामाची जागा यांच्या बाबतीत अशा कोणत्याही परवानगीची आवश्यकता असणार नाही. 74 व्या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देण्यात आले. या विधेयकान्वे स्थनिक स्वराज्य संस्थावर गदा आणली जात आहे. आपण मेक इन इंडिया करा, उद्योगधंदे काय करीत आहेत, पुणे येथील हिंजवडीमध्ये आयटीचे मोठे सेंटर तयार झाले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे...

आता दबाव आणून, अनेक लोकांना भेटून ज्या इमारती महापालिकेच्या क्षेत्रात आहेत त्या इमारतींचा कोट्यवधी रुपयांचा प्रॉपर्टी टॅक्स माफ करुन घेण्यात आला. महापालिकांनी जगायचे कसे? यामुळे महापालिकांची स्वायत्तता राहणार नाही. मेक इन इंडियाला आमचा विरोध नाही. शासनाची प्रोसीजर कमी करुन वन विण्डो सिस्टीम करा, उद्योग सुरु करण्यास ताबडतोब परवानगी द्या, त्याला आमचा विरोध राहणार नाही.

सभापती महोदय, आज सकाळी एक प्रश्न सभागृहात चर्चेला आला होता. जेएसडब्ल्यू इस्पात कंपनीच्या रायगड जिल्हयातील उद्योगासाठी विक्री कर माफ करण्यात आला. जवळजवळ 4000 कोटी रुपयांची सवलत या उद्योगाला देण्यात आली. पुन्हा 7 वर्षाची मुदत वाढविण्यात आली. त्या उद्योगपतीने शक्कल लढवून सांगितले की, आमच्या उद्योगाला विद्युत शुल्क लागू होत नसल्यामुळे तो माफ करण्यात यावा. त्या अनुषंगाने 572 कोटी रुपयांचा विद्युत शुल्क माफ करण्यात आल्याचा मुद्दा मी मांडला होता. आता हा प्रॉपर्टी टॅक्सचा विषय पुढे आलेला आहे. अशा प्रकारे झिरो टॅक्स करण्याची पध्दत सुरु झाली तर महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्था कशा जगणार आहेत? शासनाने मुंबई महापालिकेचे क्षेत्र वगळून इतर महापालिकांच्या ठिकाणचा एलबीटी रद्द केला. परिणामी शासनाच्या तिजोरीतून या महापालिकांना अर्थसहाय्य दिले गेले. पुढील वर्षी शासन काय करणार आहे हे आम्ही पाहणार आहोत. तुमच्या खिशात पैसे नाहीत, त्यामुळे अडचण येणारच आहे.

सभापती महोदय, एमआयडीसीने जागा अधिसूचित केली की त्या जागेवर उद्योग सुरु करण्यास इतर कोणाच्याही परवानगीची आवश्यकता भासणार नाही. मी या सभागृहात एक मुद्दा नेहमी मांडत आलो आहे. मोठमोठया उद्योगपतींनी सेझ प्रकल्पासाठी कवडीमोल किंमतीला जागा घेतली. त्या ठिकाणी सेझ प्रकल्प सुरु झाले नाहीत. कालांतराने त्या जागांवर गृहनिर्माण प्रकल्प सुरु झाले. मुंबईमध्ये गिरण्यांच्या जागा घेण्यात आल्या. त्या जागांवर गिरणी कामगारांसाठी घरे उभी राहिली नाहीत. गोरगरिबांना घरे मिळाली नाहीत. परंतु मोठमोठया टोलेगंज इमारती उभ्या राहिल्या, 4-5 लाख चौरस फुट क्षेत्रफळाचे मॉल्स उभारण्यात आले. तुम्ही मेक इन इंडियाच्या माध्यमातून एमआयडीसीच्या जागांवर मॉल्स उभे राहणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे...

त्यादृष्टीने मी या विधेयकाला सुधारणा सुचविली आहे. शासनाचा कारखाने काढायचा उद्देश असेल तर कारखाने काढावेत. शासनाचा उत्पादन वाढीचा उद्देश असेल तर उत्पादन वाढ करावी. शासनाचा रोजगार निर्मितीचा उद्देश असेल तर रोजगार निर्मिती करावी. मी दिलेल्या सुधारणेमध्ये तेच सुचविले आहे. शासनाने जे सुधारणा विधेयक मांडले आहे त्या विधेयकाच्या खंड 2 ला "तसेच या जागेचा वापर उद्योग क्षेत्रातील उत्पादन वाढीसाठी व रोजगार निर्मितीसाठी केला जाईल" अशी सुधारणा मी सुचविली आहे. या सुधारणेमुळे मेक इन इंडियाला कुठेही बाधा येत नाही. आमच्या मनामध्ये ही शंका आहे की, मेक इन इंडियाच्या नावाखाली लाखो चौरस फुटाचे मॉल्स उभे राहतील.

सभापती महोदय, 1990 नंतर जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातून आपल्या देशात भांडवल गुंतवणूक येत आहे. एफडीआयचा विषय सुरु झालेला आहे. यामधून गरीब माणूस भरडला जाऊ नये हाच माझ्या सुधारणेचा मूलभूत हेतू आहे. माझी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की, मी या विधेयकाबाबत विश्लेषण केले आहे, आम्ही मेक इन इंडियाला विरोध करणार नाही, परंतु कोणत्याही परिस्थितीत सर्वसामान्य जनतेवर अन्याय होणार नाही हे अभिवचन आम्हाला दिले पाहिजे. आम्हाला अशी भीती वाटते की, उद्योगांसाठी घेतलेल्या जागांवर बिल्डर लॉबीचे धंदे उभे राहतील, 4-5 लाख चौरस फुटाचे मॉल्स उभे राहतील. तसे झाले तर रस्त्यावरील गरीब माणूस हातामध्ये दगड घेईल आणि तुमचे सगळे मॉल्स उद्ध्वस्त करुन टाकेल, एवढे शासनाने लक्षात ठेवावे. गरीब जनतेच्या हितासाठी, सर्वसामान्य जनतेसाठी आम्ही या विधेयकाला सुधारणा सुचविली आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. मी दिलेली सुधारणा आणि प्रवर समितीकडे विधेयक पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव आम्ही कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही. आपण याबाबत विचार करुन सुधारणा योग्य वाटत नसेल तर आम्हाला विश्वासात घ्यावे, आम्ही त्यात सुधारणा करु. परंतु कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि भारतीय कॉंग्रेस पक्ष सर्वसामान्य जनतेच्या, शेतकऱ्यांच्या बाजूने उभा राहील. तुम्ही शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर केली नाही. गरीब जनतेला घर देत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) XX.3

SGB/ MMP/ AKN/ 18:20

श्री.शरद रणपिसे...

नाही. त्यासाठी जमीन उपलब्ध करुन देत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारावर गदा आणीत आहात. म्हणून मी कोणत्याही परिस्थितीत विधेयकाला सुचविलेली सुधारणा मागे घेणार नाही एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 58 मध्ये मेक इन इंडिया मोहिमेसाठी सरकारने जी भूमिका मांडली आहे ती संपूर्ण चुकीची आहे असे मी म्हणणार नाही. मेक इन इंडिया अंतर्गत एमआयडीसीच्या कार्यक्षमतेत येणारी जागा असेल तर त्या ठिकाणी नवीन उद्योग उभारण्यासाठी नगरपालिका, महापालिका यांची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. आतापर्यंत एखादा नवीन उद्योग काढायचा झाला तर 35 ते 40 प्रकारच्या परवानग्या घेण्याची गरज होती. ती संख्या 26 पर्यंत खाली आणण्यात आली. आता ती संख्या आणखी कमी करुन वन विण्डो सिस्टीम करीत आहात, ती करणे क्रमप्राप्त आहे. अतिशय चांगली योजना केली आहे. जेणेकरुन महाराष्ट्रात उद्योग वाढतील. यापूर्वी महाराष्ट्रात सुरु झालेले जे उद्योग होते ते आता कुठे गेले याचाही शोध घेण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मी मुंबईमधील उदाहरण देऊ इच्छितो. अंधेरी भागात अनेक कारखाने होते. ठाणे, डोंबिवली परिसरातील उद्योगांबाबत माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे हे चांगल्याप्रकारे सांगू शकतील. तुम्ही महापालिकेचे अधिकार काढून घेऊन एमआयडीसीकडून परवानगी घेण्यास सांगत आहात. शासनाने डोंबिवली येथे एमआयडीसी स्थापन केली, त्याकरिता कोळी आणि आगरी समाजाने आपल्या जमिनी दिल्या. त्यांना वाटले होते की, आपल्या भागात कारखाने आल्यानंतर आपल्या मुलांना नोकरी मिळेल, उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होईल, आमच्या भागाची प्रगती होईल. परंतु स्मॉल स्केल इंडस्ट्रीजला प्राधान्य देण्यात आले. परिणामी उद्योग बंद होण्यास सुरुवात झाली. बंद पडलेल्या उद्योगांच्या जागा कोणाला देण्यात आल्या, त्या जागांवर कोणते उद्योग सुरु झाले? शासन एखाद्या भागामध्ये एमआयडीसी सुरु करते त्यावेळी सांगितले जाते की, परिसराचा विकास होण्यासाठी कारखाने उभे राहणे गरजेचे आहे. उभारण्यात आलेले कारखाने चालले नाहीत, त्यांनी तो उद्योग दुसऱ्याला विकला त्या ठिकाणी ती जागा ज्या पर्पजसाठी दिली होती तोच उद्योग उभा राहिला नाही.

सभापती महोदय, ज्या भूमीपुत्रांकडून तुम्ही जागा संपादित केल्या त्यांना त्या जागा परत करणार आहात का, या कायद्यात त्या दृष्टीकोनातून तरतूद करणार आहात का? तसे केले तरच या कायद्याचा उपयोग होऊ शकतो. अंधेरी येथील एमआयडीसी एरियामधील चेंज ऑफ युजर्सच्या केसेसचे प्रमाण सर्वाधिक आहे. फॅक्टरी बंद पडली आहे, ती विकायची आहे, तेथे कोणाला हॉटेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

काढायचे आहे किंवा मॉल आणायचा आहे. मॅन्युफॅक्चरिंग उद्योग कोणाला नको आहे. यावर निर्बंध लादणार आहात का? सीप्झ येथे एक्स्पोर्ट प्रमोशन झोनसाठी जागा घेण्यात आली. तेथे आलेल्या उद्योगांना 15 वर्षापर्यंत टॅक्समध्ये सवलत दिली गेली. एक्स्पोर्ट करणाऱ्या उद्योगांना त्या सवलतीचा फायदा मिळेल.

..2वाय.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते.)**

श्री.किरण पावसकर.....

काही लोक तेथे येतात आणि आपली फॅक्टरी लावतात. पंधरा वर्ष पूर्ण होण्यासाठी एक वर्षाचा कालावधी असतानाच ती फॅक्टरी तेथून निघून जाते. पंधरा वीस वर्षापूर्वी सीप्झमध्ये नोकरी करण्यासाठी लाखो लोक येत होते. तेथे माझी युनियन होती. तेथे हिऱ्याचे अनेक कारखाने होते. हिऱ्याला पैलू पाडणारे अनेक कामगार तेथे आले. जास्त पगार मिळत होता म्हणून त्या लोकांनी दिवसरात्र मेहनत केली. या कामगारांचे वय अगदी लहान होते. त्यांनी आपल्या डोळ्यावर ताण देऊन काम केले. ज्यावेळी तेथील टॅक्सेशन बेनिफिट संपले तेव्हा हिऱ्याचे कारखाने तेथून निघून गेले. एकेका कंपनीमध्ये 3 ते 6 हजार कामगार होते. ते कारखाने बंद झाले. यावर सरकारने कोणती उपाययोजना केली ? सीप्झ मधील कामगारांना आपण रोजगार मिळवून दिला ? उलट त्यांच्या चांगल्या डोळ्यांची वाट आपण लावली. नंतर त्यांच्यासाठी कुठल्याही प्रकारची साधनसामुगी ठेवली नाही. जेणे करून तो आपल्या दोन हाताने पोट भरण्यासाठी कुठे तरी काम करू शकेल. एमआयडीसी किंवा सीप्झसाठी किंवा मेक इन इंडियासाठी एक विशेष एरिया सरकार बनविते तेव्हा कारखाने येण्यापूर्वी आणि आल्यानंतर प्री आणि पोस्ट प्रोसेसवर आपल्याला कुठे तरी चर्चा करावी लागेल. तरच आपल्याला वन विंडो क्लिअरन्सचा फायदा होईल. जास्त विंडो असल्यामुळे ज्यांच्यावर आपण अंकुश ठेवला होता तो अंकुश निघून जाईल. फॅक्टरी लावण्यात आल्यानंतर उद्योजक फायदा घेतील आणि निघून जातील आणि जाताना मात्र त्यात असलेल्या कामगारांना व लोकांना त्रासच होईल. त्याचा फायदा सरकारला होणार नाही. तेव्हा याची काळजी घेणे फार महत्त्वाचे आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात फार्मास्युटिकल इंडस्ट्री होती. यात 22 मल्टी नॅशनल कंपन्या होत्या. त्या सर्व कंपन्या आज मुंबई सोडून गेलेल्या आहेत. तेव्हा किती लोकांचा रोजगार निघून गेला हे लक्षात येईल. टॅक्सेसशनच्या रूपाने जो निधी सरकारकडे जमा होत होता तो किती टक्क्यांने बंद झाला आहे हे देखील आपण पहावे. आज मुंबईतील संपूर्ण ऑटोमोबाईल इंडस्ट्री पूर्णपणे ठप्प आहे. ठाणे-मुंबईमध्ये ऑटो मोबाईलचे कुठलेही युनिट चालू असेल असे मला वाटत नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

आपण फक्त गाड्यांचे सर्व्हीस स्टेशन काढून बसलेलो आहोत. आपल्याकडे कोणत्याही प्रकारचे उत्पादन होत नाही. उत्पादनातून जो काही पैसा यायला हवा होता तो येत नाही. त्याच प्रमाणे एल.अँड टी. सारखी कंपनी विचार करते की, माझे मॅन्युफॅक्चरींग युनिट बाहेर जाऊ द्यावे. त्या जागेवर आय.टी पार्क कसे होईल याचा ते विचार करीत आहे. त्यांच्या पवईतील कारखान्यामध्ये 15 ते 20 हजार कामगार एका वेळी काम करीत होते त्यांची आज संख्या फारच कमी झालेली आहे. त्यामुळे या विधेयकाच्या माध्यमातून काय परिणाम होणार आहे हे देखील पाहणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महानगरपालिका, नगरपालिका यांचा स्वतःचा असा रोल असतो. तो विभाग इंडस्ट्रीयल असला तरी त्याला पाणी पुरवठा कोण करीत आहे ? तेथील रस्त्यांचे काम कोण करणार आहे? एमआयडीसीच्या बाहेरील क्षेत्र असेल हे महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या अखत्यारित येते. यासाठी आपली कोणती योजना असणार आहे ? सुरक्षिततेच्या दृष्टीने आपली कोणती योजना राहणार आहे. मुंबई शहरामध्ये ऑटोमोबाईल इंडस्ट्री जास्त होती. आजही अग्निशमन यंत्रणा वापरायची असेल तर ती महानगरपालिकेची वापरली जाते. एमआयडीसी आहे असे मला वाटत नाही. हे सर्व माध्यम म्हणून वापरू नये. या कायद्याचा आधार घेऊन आपण इंडस्ट्रीसाठी जागा देऊ शकाल. यासाठी कोणी तरी गुजरातमधून येतील. त्यांना आपण जागा द्याल. 4-5 वर्षानंतर कळेल की, हे येथून निघून गेले असून त्यांनी तेथे पाईव्ह स्टार हॉटेल काढले आहे किंवा एखादा मॉल काढला आहे. मॉल आणि पाईव्ह स्टार हॉटेलच्या जागा स्वस्त मिळण्यासाठी आणि त्याचा उपयोग करण्यासाठी एमआयडीसीचा वापर होऊ नये या दृष्टीने आपण त्यात सुधारणा करावी. एमआयडीसीच्या माध्यमातून ज्या जागा द्याल, वन विंडी क्लिअरन्स कराल ती कंपनी तेथे चालली नाही, तो कारखाना बंद झाला तर तो कारखाना पुन्हा एमआयडीसीकडे द्यावा लागेल. तेथे सर्व्हीस इंडस्ट्री येणार नाही, तेथे मॉल येणार नाही, कॉल सेंटर्स येणार नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फाईव्ह स्टार हॉटेल्स येणार नाही यासाठी काही तरी नियम त्यामध्ये समाविष्ट करणार आहात की नाही ? मुंबई शहरातील सर्व मॅन्युफॅक्चरिंग युनिट गेल्यानंतर.....

...3



श्री.किरण पावसकर.....

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) :** सभागृहाच्या कामकाजाची वेळ पुढील निदेश येई पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सदनातील वेळ वाढविण्याचा अधिकार हा आम्ळाला आहे.

**तालिका सभापती :** ठीक आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, महानगरपालिकेचा अधिकार आपण काढून घेत आहात. हे सर्व वजन पेलण्याएवढी आपली एमआयडीसी सक्षम आहे काय ? उत्पन्न निर्माण करण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला की येथेच यावे लागणार आहे. मी अग्निशमन दलाचे सांगितले. कुर्ल्यातील हॉटेल सिटी किनाऱ्याला आग लागली. त्या आगीत बाजूच्या कॉलेजमधील 8 विद्यार्थी जेवणासाठी आले असताना होरपळून मेले. त्यानंतर आयुक्तांनी ताबडतोब कारवाई करण्यासंबंधातील आदेश काढले. उपग्रहाद्वारे तपासणी केली असता 2 आणि 3 नंबरच्या हॉटेलमधून गॅस सिलेंडर जमा करून घेऊन आलात. ते गॅस सिलेंडर पुन्हा डाळी सारखे एक महिन्यानंतर कारवाई करून देऊन टाकले. ज्यांच्याकडून डाळ पकडली त्यांनाच ती डाळ परत देऊन टाकली. म्हणजे पकडण्याचा भातुकलीचा खेळ खेळून आपण मोकळे झालात. कोणाच्या तरी नावाने नंदी बैल घेऊन जायचा आणि बुगू-बुग करायचा तसा प्रकार होता कामा नये. एकीकडे महानगरपालिका, नगरपालिका सक्षम होऊ पाहात आहे. लोकांना चांगल्या सोयी-सुविधा कशा देता येतील हे ते पाहात आहे. आता आपण स्मार्ट सिटी करा, स्मार्ट गाव करा असे म्हणत आहात. पण स्मार्टच्या नावाने आपण खाल पर्यंत कुठे जाणार आहात हे माहीतच नाही. आपण स्मार्ट देश करावा. एकीकडे स्र्माट सिटी करण्याचे चित्र उभे करीत असताना दुसरीकडे महानगरपालिका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि नगरपलिकांचे अधिकार आपण काढून घेत आहात. त्यांच्या हक्कांवर आपण गदा आणत आहेत. नंतर वेळ अशी येईल की, इंडस्ट्रीवाले म्हणतील की, आम्ही त्यांना परवानगी दिलेली आहे.

..4



श्री.किरण पावसकर.....

त्यामुळे महानगरपालिकेकडे परवानगीसाठी जाण्याची आवश्यकता नाही. एखादा उद्योग सुरू झाल्यानंतर काही प्रश्न आला तर मग आपण महानगरपालिकेकडे बोट दाखविणार की, महानगरपालिकेने पाण्याचा पुरवठा केलेला नाही, रस्ता केलेला नाही, रस्त्यावरून आम्ही जाऊ शकत नाही. या सर्व गोष्टींमुळे आपण महानगरपालिकेकडे आणि महानगरपालिका आपल्याकडे बोट दाखविणार. अशात उद्योग बंद पडला की, मग आपण सांगाल की, प्रशासकीय कारणांमुळे उद्योग बंद पडलेला आहे. मग ती उद्योगाची जागा दुसऱ्याकडे जाईल आणि पुन्हा चेंज ऑफ युझर्ससाठी ती एमआयडीसीकडे येईल. तेव्हा त्या एमआयडीसीला आपण सांगणार आपल्या पर्पझला ती जागा द्यावी. तो पर्यंत आपण डान्स बार सुरू करीत आहातच. सुप्रीम कोर्टाचे नाव सांगून डान्सबार आपण सुरू करणार आहातच. नागपूरमध्ये डान्स बार सुरू केले आहेतच. एकीकडे अशा प्रकारे कोर्टाकडे बोटे दाखवायची. कायदा बनविताना तो वीक बनवायचा. त्यामुळे आापण कोर्टापुढे उभेच राहू शकत नाही. एकीकडे आपण महानगरपलिका, नगरपालिका यांच्यावर गदा आणत आहात. त्यामुळे महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात जे लोक राहतात त्यांच्या सुविधांची देखील आपण वाट लावणार. वन विंडी क्लिअरन्समुळे एमआयडीसी आपले काम देखील करू शकणार नाही. फक्त कागदावर परवानगी देणार आणि पुढची मदत मात्र महानगरपलिकेकडे मागणार. तेव्हा याचा विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यात सुधारणा होत असेल तरच त्या विधेयकाला अर्थ राहील. अगोदरच्या नियमांना कुठे तरी बाधा आणायची आणि आम्ही काही तरी नवीन केले आहे असे भासविण्याचा हा प्रयत्न आहे. यासंदर्भात कायदा पास झाल्यानंतर प्रेस कॉन्फरन्स घेतली जाईल आणि सांगितले जाईल की, अगोदर 47 परवानग्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लागत होत्या, आज 26 लागत होत्या, म्हणून आता आम्ही वन विंडो क्लिअरन्स सिस्टीम सुरु केली आहे.  उद्योगाचे स्वागत करण्यासाठी आम्ही हे सर्व केले आहे.

ZZ-1....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर .....

एकीकडे तुम्ही हिरवळ दाखवत आहात परंतु त्यामागे मोठया प्रमाणात चिखल आहे. जो माणूस आपल्या नादाला लागून पुढे येईल तो नंतर डायरेक्ट त्या चिखलात पडेल. तसे होऊ नये यासाठी या कायद्यावर तुम्हाला विचार करावा लागेल. म्हणून मला असे वाटते की, महानगरपालिकेवर येणारी गदा आणि त्याच बरोबर औद्योगिक क्षेत्राला आपण देऊ न शकणारी सिक्यूरिटी यावर विचार करण्याची वेळ आली आहे. तुम्ही उद्योगांना सुरक्षित करु शकत नाही. कोणत्याही उद्योगाला तुम्ही सुरक्षित करु शकत नाही. एमआयडीसीचे बोलावयाचे झाले तर तुम्ही एमआयडीसीली किती तरी एअरपोर्ट दिले आहेत. रत्नागिरी येथे सुध्दा एअरपोर्ट आहे. या एअरपोर्टच्या धावपट्टीवरुन साधी गाडी सुध्दा धाऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. एकीकडे आहे ते तुम्ही सांभाळू शकत नाही. असे असताना तुम्ही सांगत आहात की, आम्ही तुम्हाला अजून अधिकार देतो. हे अधिकार दिल्यानंतर तुम्ही जनतेचीच घोर फसवणूक करणार नाही तर नवीन येणाऱ्या उद्योजकाचीही करणार आहात. जो उद्योजक म्हणेल की, मला मुंबईत जागा मिळते, मला एमआयडीसीमध्ये कारखाना सुरु करता येईल, आता मला कोणताही त्रास होणार नाही. परंतु हा उद्योजक जेव्हा कारखाना टाकेल तेव्हा हा उद्योजक आणखीन 10 उद्योजकवाल्यांना सांगेन की, मी इनव्हेस्टमेंट करुन फसलो आहे, मी नवीन सरकारच्या नादाला लागल्यामुळे तिकडे गेलो परंतु कृपा करुन तुम्ही तिकडे येऊ नका. हे प्रकार होऊ नये असे आपल्याला वाटत असेल तर ते प्रकार थांबवणे गरजेचे आहे. यासाठी प्री अँड पोस्ट एखादा उद्योग तिकडे येणार असेल तर प्री अँड पोस्टच्या संदर्भात चर्चा करणे फार महत्वाचे आहे. या चर्चेतून चांगले काही निघाले तरच हा कायदा संमत करण्याला पाठिंबा देता येईल, अन्यथा या विधेयकाला पाठिंबा देऊन चालणार नाही. सरकारची, जनतेची आणि महानगरपालिकेची क्रुर थट्टा होऊ नये असे आपल्याला वाटत असेल तर या विधेयकाला विरोध करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015 चे विधानसभा विधेयक 58,, मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मध्ये आणखी सुधार करण्यासाठी विधानसभेत 17 डिसेंबर, 2015 रोजी संमत केलेले विधेयक क्रमांक 58 आपल्या सभागृहात संमतीसाठी आले असून त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने "मेक इन इंडिया" नावाची चांगली मोहीम सुरु केली असून, केंद्र सरकारच्या "मेक इन इंडियाच्या" धर्तीवर राज्य सरकारने "मेक इन महाराष्ट्र" अभियान सुरु केले आहे. "मेक इन महाराष्ट्र" अभियान सुरु करीत असताना महाराष्ट्र सरकारने "मेक इन विदर्भाचाही" विचार केला असता तर फार बरे झाले असते.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये "वन विंडो" ही चांगली संकल्पना मांडली आहे. अगोदर उद्योग सुरु करण्यासाठी अनेक प्रकारच्या परवानग्या लागत होत्या. अगोदर 40-45 परवानग्या लागत होत्या, नंतर त्या 20 वर आल्या व आता उद्योग सुरु करण्यासाठी केवळ "वन विंडो" ही सिस्टीम आली आहे. आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून जर परवानगी घेतली असेल तर त्या उद्योगाला पुन्हा महानगरपालिका, आयुक्त किंवा नगरपरिषदेच्या सीईओची परवानगी घेण्याची गरज लागणार नाही अशा प्रकारचे हे विधेयक आहे. आमच्या राज्यात जास्तीत जास्त उद्योग यावेत, राज्याचे औद्योगीकरण व्हावे यासाठी आपण उद्योगपतीसांठी आपण ज्या पायघडया टाकत आहात त्यातून महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात उद्योगांची निर्मिती झाली तर बरेच आहे. परंतु या निमित्ताने काही रास्त शंका आमच्या विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे साहेबांनी उपस्थित केल्या आहेत. महानगरपालिका, नगरपालिकेची परवानगी न घेता जर अशा प्रकारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून परवानगी घेतली असेल तर त्या उद्योगाला बाकीच्या परवानगीची गरज लागणार नाही. पुढे त्यांनी असेही म्हटले की, महानगरपालिकेची गरज काय, तीही बरखास्त करुन टाका. शेवटी स्थानिक स्वराज्य संस्थांचे जे हक्क, अधिकार आहेत ते अबाधित ठेऊन "मेक इन महाराष्ट्र" ही योजना आपण उत्कृष्ठपणे लागू केली तर त्याचे सर्वजण समर्थन करतील, स्वागत करतील तसे आम्हीही करु.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी चांगले विचार मांडले असून ते कामगार क्षेत्रातील नेते आहेत. या उद्योगांमुळे रासायनिक प्रदूषण,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे ....

इंडस्ट्रीयल वेस्ट, हवेचे प्रदूषण, पाण्याचे प्रदूषण होणार आहे. त्यामुळे या प्रदूषणावर आपण अंकुश कशा प्रकारे ठेवणार आहात ? प्रदूषणाच्या संदर्भातील जबाबदारी नगरपालिका, महानगरपालिकेकडे आहे. आपले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे ते किती सक्षम आहे याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची आज काय अवस्था आहे हे सर्वांना ठाऊक आहे. ठाणे जिल्हयामध्ये कशा प्रकारे प्रदूषण आहे याची माननीय मंत्री श्री. शिंदे साहेबांना कल्पना आहे. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ कशा प्रकारे काम करीत आहे याची महाराष्ट्रातील जनतेला कल्पना आहे. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रदूषण हटविण्यासाठी काम करते,प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी काम करते की, प्रदूषण वाढविण्यासाठी काम करते तेच कळत नाही, अशा प्रकारची अवस्था महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची आहे. नवीन येणाऱ्या उद्योगांमुळे जे प्रदूषण होणार आहे त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जर औद्योगिक विकास महामंडळाची असेल तर या उद्योगांमुळे प्रदूषण होणार नाही याची संबंधित उद्योगाकडून गॅरंटी घेतली पाहिजे. या कारखान्यातून कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत असेल तर ते प्रदूषण होणार नाही याची गॅरंटी उद्योगाकडून घेतली पाहिजे. उद्योगासाठी जागा आमची, पाणी आमचे, रस्ते आमचे आणि स्थानिक जनतेला त्या कारखान्यात काम मिळणार नसेल तर आमच्या जनतेला त्याचा काय उपयोग ? ज्या भागात कारखाने निर्माण होतील त्यामध्ये आमची शेती जाणार, आमची जागा जाणार, पाणी आमचे घेणार आणि कारखाना उभा झाल्यानंतर आमच्या स्थानिक लोकांना धत्तुरा दाखवणार ? हे कोठे तरी थांबले पाहिजे. तुम्ही आमच्या क्षेत्रात उद्योग उभे करीत असाल तर स्थानिक जनतेला कारखान्यामध्ये नोकरीमध्ये प्राधान्य मिळेल याची गॅरंटी या उद्योगाकडून घेतली गेली पाहिजे. कौशल्य विकासाच्या कामासाठी माणसे लागत असतील तर ती माणसे तुम्ही बाहेरुन बोलवा. परंतु किमान जी कामे आमची लोक करु शकतात ती कामे आमच्या लोकांनाच मिळाली पाहिजेत. एम्पलॉयमेंट जनरेशन जास्त महत्वाचे आहे. नाही तर असे होऊ नये की, आपल्याकडे म्हण आहे आहे, करायला गेलो काय आणि वरती झाले पाय अशी अवस्था होता कामा नये. नाही तर आसमानसे गिरे खजूर मे अटके अशीही अवस्था होईल.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे ....

सभापती महोदय, शासनाने एक खिडकी योजना सुरु केली असून ही योजना ती फार चांगली योजना आहे. औद्योगिक विकास मंडळाकडे जो उद्योजक अर्ज करेल तेव्हा त्या कारखान्याकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सर्व प्रकारचे ॲग्रीमेंट करुन घेतले पाहिजे. जर कारखानदाराने काही गलथानपणा किंवा चूक केली तर त्याला कठोरातल्या कठोर शिक्षा कशी देता येईल याचे देखील प्रावधान आपल्या कायद्यात असले पाहिजे. तरी सुध्दा महाराष्ट्राचा औद्योगिक विकास होण्यासाठी शासनाने या ठिकाणी हे जे विधेयक आणले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.
धन्यवाद.

AA-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत जो प्रस्ताव दिलेला आहे त्या प्रस्तावाला मला पाठिंबा द्यायचा आहे असे मी आपणास सांगितले. त्यावेळी आपण मला सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचे भाषण झाल्यानंतर बोलण्याची संधी देण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचे भाषण झाल्यावर अन्य सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली. मला या विधेयकावर बोलण्यासाठी किती वेळा हात वर करावा लागेल ते आपण सांगावे.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते ) :** सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, मी या आसनावर येण्यापूर्वी येथे माननीय उपसभापती आसनस्थ होते. त्यांच्याकडे जी नावे आली होती त्यांनी ती क्रमाने माझ्याकडे दिलेली आहेत. त्याच क्रमाने मी नावे वाचत आहे आणि यादीमध्ये काही नावे ॲड केलेली आहेत म्हणून मी आपणास सांगितले की, आपले नाव यादीमध्ये आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले बोलतील त्यांच्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये त्यानंतर हेमंत टकले असा क्रम आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करावी.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले ( पुणे् स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 58- मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक अतिशय घाईघाईने आणलेले आहे. आपण या विधेयकाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार काढून ते अधिकार महामंडळास देणार आहात. आज इंडस्ट्री एरियामुळे बऱ्याच नगरपालिका आणि महानगरपालिकांना नागरिकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी उपयोग होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्लान मंजुरीचे अधिकार काढून घेतल्यानंतर डेव्हलपमेंट प्लानचे पैसे कोणाकडे जाणार याची स्पष्टता होत नाही. आपण महानगपालिकेची परवानगी काढून घेऊन काही उपयोगाचे नाही.

सभापती महोदय, राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांनी "मेक इन इंडिया" या अभियानाच्या निमित्ताने बऱ्याच परदेशी वाऱ्या केल्या. या परदेशी वाऱ्यांवर त्यांनी अनेक कंपन्याशी करार केले. जेव्हा आमची पिंपरी-चिंचवड औद्योगिक नगरी उभी राहिली तेव्हा आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी तेथे महानगरपालिका केली. त्या ठिकाणी टाटा, बजाज सारखे मोठमोठे उद्योगधंदे आणले. त्या उद्योग धंद्यांना चालना मिळण्याकरिता छोटे छोटे पूरक उद्योजक तयार केले. आज काय परिस्थिती आहे ? आज महाराष्ट्रातील उद्योगधंदे राज्याच्या बाहेर का जात आहेत याचा आपण विचार केला पाहिजे. आपण प्लान मंजुरीचे अधिकार काढून घेतल्यामुळे येथील उद्योग टिकणार आहेत काय ? वन विन्डो सिस्टीम करुन येथील उद्योग टिकणार आहेत काय ? माझे असे म्हणणे आहे की, ज्या मूलभूत गरजा आहे त्या आपण पूर्ण केल्या पाहिजेत. दिल्ली येथील गुडगाव येथे इंडस्ट्रीयल एरिया उभा राहिला त्यावेळी तेथे पहिल्यांदा मूलभूत गरजा म्हणजे् रस्ते, ड्रेनेज लाईन, वीज, पाणी या गरजा पूर्ण करण्यात आल्या. आपण या बाबतीत काही करणार नाही काय ? उद्या त्या ठिकाणी उद्योग सुरु झाल्यावर त्या ठिकाणी वाहतूक व्यवस्था चांगली नसेल, दळणवळणाची साधने उपलब्ध नसतील तर उद्योगधंद्याचे काय होणार आहे ? उद्योजकांचा माल वेळेत दुसरीकडे पोहोचला पाहिजे, तो वेळेवर विकला पाहिजे यादृष्टीने आपण विचार केला पाहिजे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले....

सभ्‌पती महोदय, या सरकारने स्मार्ट सिटीची घोषणा केली. त्यासाठी देशातून 89 प्रस्ताव आले. परंतु प्रत्येक महानगरपालिकेकडून वेगवेगळ्या उपसूचना आलेल्या आहेत. ही योजना होत असताना आपण स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार काढून घेण्याचा जो प्रयत्न चालविला आहे तो अत्यंत चुकीचा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याची सूचना केलेली आहे, त्या सूचनेचा आपण विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कोणता उद्योग कोणत्या विभागात असावा याचा आपण अभ्यास केला पाहिजे. म्हणजे रासायनिक उद्योग कुठे असावा, मेडिकल उद्योग कुठे असावा याबाबत आपण उद्योगाचे झोन केलेले आहेत. आमची सत्ता असताना आम्ही व्हीव्हीआयपी आणि फाईव्ह स्टार अशाप्रकारचे उद्योग उभे केले. त्या ठिकाणी त्यांचा व्यवसाय सुरु आहे. त्यावेळी कोणत्याही नगरपालिकेने वा महानगरपालिकेने या उद्योगांना कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांनी या उद्योगांचे स्वागतच केलेले आहे. या उद्योगांनी दिलेल्या टॅक्समुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत गेल्या. आपण स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार काढून घेतले तर त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत बंद होतील मग या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालणार कसा ? स्थानिक स्वराज्य संस्थाचे उत्पन्न बंद झाले तर आपण नागरिकांवर पाणीपट्टी, घरपट्टी वाढवून तो टॅक्स असा वसूल करणार आहात काय ? तेव्हा या संदर्भात स्पष्टता आणावी लागेल. त्या दृष्टीने आपण प्रयत्न करावेत, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 58- मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक आणण्यामागे सरकारची भूमिका आणि उद्देश काय आहे आणि यातून सरकार काय साध्य करणार आहे हे मला कळत नाही. राज्य सरकारने उद्योग धोरण आणून राज्यामध्ये उद्योग सुरु केले असते तर आम्ही त्यांचे स्वागत केले असते. परंतु हे सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायद्यामध्ये सुधारणा करुन त्यांचे अधिकार काढून घेत आहे. या सरकारकडून सर्वसामान्य जनतेला अपेक्षा होत्या. आपले महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर होते, परंतु तो क्रमांक आता मागे पडलेला आहे. या सरकारने औद्योगिक धोरण का आणले नाही ? या सरकारचे धोरण आणि शेतकऱ्यांचे मरण, आता सर्वसामान्य माणूससुद्धा मरायला तयार होईल.

सभापती महोदय, या सरकारने एलबीटी बंद केली. महानगरपालिकेचे अधिकार काढून घेतले. महानगरपालिकांना त्यांच्या कर्मचाऱ्यांचे पगार देण्याइतपत देखील उत्पन्न ठेवले नाही. आपण महानगरपालिकांचा टोल टॅक्स बंद केला. आम्ही महानगरपालिकांच्या उत्पन्नाचे दुसेर स्त्रोत निर्माण केलेले आहे असे येथे छातीठोकपणे सांगावे.

सभापती महोदय, या ठिकाणी मिहान सारखा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरु केला. मिहान प्रकल्पामध्ये ज्या शेतकऱ्याच्या जमिनी गेलेल्या आहेत त्या शेतकऱ्यांनी आज मिहान इमारतीला घेराव घातलेला आहे. या ठिकाणी अधिवेशन सुरु आहे. आपण अधिवेशनाच्या माध्यमातून लोकांना न्याय दिला पाहिजे की त्यांना रस्त्यावर आणले पाहिजे, हा प्रश्न सुद्धा अनुत्तरीत आहे.

....3B-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

त्याच मिहान प्रकल्पाच्या बाबतीत मी बोलत आहे. मिहान प्रकल्पामुळे बाधित झालेल्या 2600 प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून न्याय हवा आहे. त्यांना वाढीव मोबदला मिळाला नाही म्हणून त्यांनी मिहान प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना घेराव घातलेला आहे. मी या शासनाला विचारु इच्छितो की, या राज्य सरकारचे उद्योगाचे धोरण आहे की, कार्पोरेट जगतातील लोकांना मदत करण्याचे धोरण आहे ? आम्हाला वाटले होते की, या सरकारच्या धोरणांमुळे या राज्यातील युवकांच्या हाताला काम मिळेल, त्यांना उद्योग उभा करण्यासाठी सरकार पैसा उपलब्ध करुन देईल, बेरोजगार युवकांच्या हाताला रोजगार देईल, उद्योग सुरु करेल. परंतु असे काहीच झाले नाही. वास्तविक पाहता या गोष्टी करावयाच्या असतील तर शासनाने युवकांसाठी उत्तम प्रकारचे धोरण आखावयास पाहिजे होते.

सभापती महोदय, आमच्या सरकारने 10 हजार कोटी रुपये किंमतींचा मिहान हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पासाठी 4500 कोटी रुपये पहिल्या टप्प्यात देण्याचे ठरविले. अगोदरच्या सरकारने या प्रकल्पासाठी 800 कोटी रुपयांची मदत केली होती. नवीन सरकारने त्यासाठी मागच्या अर्थसंकल्पात 1500 कोटी रुपये देणार असल्याचे सांगितले. परंतु आता मात्र त्या प्रकल्पासाठी केवळ 63 कोटी रुपये दिले जात आहेत. वास्तविक पाहता त्या प्रकल्पाला अगोदर सांगितल्यानुसार 1500 कोटी रुपये निधी देणे आवश्यक होते. महोदय, मी तर म्हणेन की, हे विधेयक आणून आपण राज्याचे वाटोळे करणार आहात की काय, असे मला वाटते. आजच्या काळात राज्यातील बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळाले पाहिजे, त्यांना दोन वेळचे जेवण मिळाले पाहिजे. परंतु या विधेयकाच्या माध्यमातून कार्पोरेट क्षेत्रातील लोक सरकारकडून जमीन घेणार आणि आयआयटी, आयआयएम क्षेत्रातील लोकांना तेथे आणून बसविणार आहेत. त्यामुळे.....

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. महोदय, हे विधेयक ज्या उद्देशासाठी आणले आहे त्या बाबत काहीही न सांगता सन्माननीय सदस्य भलतेच बोलत आहेत. मला वाटते त्यांनी या विधेयकावर बोलावे. महोदय, राज्यात उद्योग सुरु



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रवीण पोटे-पाटील....

करण्यासाठी पूर्वी 78 प्रकारची ना हरकत प्रमाणपत्रे घ्यावी लागत होती. आमच्या सरकारने ती प्रमाणपत्रे 25 वर आणलेली आहेत. ग्रामपंचायती क्षेत्रात उद्योग उभा करण्यासाठी प्रत्येक वेळा अशा प्रकारच्या परवानग्या घ्याव्या लागत होत्या. त्यामुळे त्या विविध परवानगी संदर्भातील हे विधेयक आहे. मला वाटते सन्माननीय सदस्यांनी केवळ या विधेयकावर बोलले तर त्यांना लांबलचक भाषण करण्याची गरज पडणार नाही.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, या सुधारणा विधेयकाच्या माध्यमातून आपण महानगरपालिकांचे, नगर परिषदांचे हात बांधत आहात. या सरकारने दोन दिवसांपूर्वीच नगर पंचायती निर्माण केल्या आहेत. परंतु त्यांचे अधिकार सुध्दा काढण्यात येत आहेत. महोदय, या क्षेत्रात जे उद्योग सुरु होतील, ते उद्योजक त्या ठिकाणी अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती, ओबीसी या प्रवर्गातील लोकांना आरक्षण देणार नाहीत. ते हिटलरसारखे वागतील. अशा वेळी त्यांना कोण बोलेल ? त्यांना कोण न्याय देईल ? या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या क्षेत्रात जेवढे उद्योग सुरु केले आहेत त्या ठिकाणी मागासवर्गीय लोकांसाठी आरक्षण ठेवले आहे काय, हा प्रश्न सुध्दा अनुत्तरीत आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी विदेशातील उद्योजकांनी राज्यात उद्योग सुरु करण्यासाठी चायना, जपान, सिंगापूर, डावोस इत्यादी देशांचा दौरा केला. त्यांनी त्या देशातील उद्योजकांसमोर महाराष्ट्रात उद्योग उभे करण्यासाठी पायघड्या घातल्या. बाहेरच्या देशातील एक-एक उद्योजक आपल्या राज्यात आणण्यासाठी आपण त्यांचे हात-पाय जोडत आहात. काल परवा दिल्लीमध्ये कृतज्ञता सोहळा सुरु होता. त्या ठिकाणी आम्ही उद्योजक बघितले. त्या कार्यक्रमाच्या दोन तास अगोदर त्यांना माननीय श्री.शरद पवार साहेबांचे अभिनंदन करताना बघितले. बाहेरच्या देशातील उद्योजक आणण्यासाठी आपल्याला त्रास घ्यावा लागतो, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे या संदर्भातील धोरण तयार करीत असताना संपूर्ण राज्य उद्योगपतींच्या हातात दिले तर या राज्याचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. आपण अशा प्रकारचे धोरण आणले तर महानगरपालिकेच्या हातामध्ये काहीच राहणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

श्री.प्रकाश गजभिये....

सभापती महोदय, महापालिकेचे सर्व अधिकार काढण्याचा प्रयत्न या सुधारणा विधेयकाच्या निमित्ताने होत आहे. महोदय, असे किती उद्योग राज्य सरकार सुरु करणार आहे ? आज राज्यातील 72 हजार उद्योग बंद पडलेले आहेत. त्यामुळे 3 लाख कामगार बेरोजगार झाले आहेत. त्या कामगारांच्या हाताला आपण कधी काम देणार आहात, बंद पडलेले 72 हजार उद्योग कधी सुरु करणार आहात ?

सभापती महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून नगरसेवकांचे अधिकार काढण्यात येणार आहेत. जर नगरसेवकांचे अधिकार काढावयाचे असतील तर स्थायी समितीचे अध्यक्ष कशाला हवेत, महापौर कशाला हवेत, एवढेच नव्हे तर आयुक्त कशाला हवेत ? मी विनंती करतो की, शासनाने नव्याने सुधारणा विधेयक आणले पाहिजे. कारण शासन या निमित्ताने महानगरपालिकेच्या कायद्यात सुधारणा करीत आहे. आपण महापालिकांचे अधिकार काढत आहात. महोदय, आमच्या पक्षाचे सरकार असताना त्यांनी महानगरपालिकांचे अधिकार वाढविण्याचा प्रयत्न केला होता. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या एका आदेशाने त्या त्या भागात उद्योग सुरु होऊ शकतो. परंतु तसे न करता, हे शासन वेळकाढूपणाचे धोरण स्वीकारत आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये उत्कृष्ट प्रकारचे उद्योग धोरण आखल्याशिवाय राज्यातील लोकांच्या हाताला काम मिळू शकणार नाही. किंबहुना, हे राज्य औद्योगिक क्षेत्रात क्रमांक-1 चे राज्य होऊ शकणार नाही. महोदय, आयुक्तांचे अधिकार काढल्यानंतर ते अधिकार महापौरांला दिले पहिजेत. कारण तो जनतेतून निवडून येतो. मी तर म्हणेन की, आयुक्तांचे अधिकार काढून चालणार नाही. महोदय, महापालिकांचे अधिकार काढून घेतल्यानंतर त्यांना दुसरे कोणते अधिकार देणार आहात ? या माध्यमातून आपण महापालिकांचे वित्तीय अधिकार काढून घेत आहात. राज्य सरकारने एलबीटी बंद केल्यामुळे नागपूर महापालिकेची परिस्थिती खूप वाईट झाली आहे. नागपूर महापालिकेला जोपर्यंत एलबीटीचे अनुदान मिळत नाही तो पर्यंत महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे पगार होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सरकारचे अशा पध्दतीचे धोरण असेल तर ते उपयोगाचे नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

सभापती महोदय, आमच्या सरकारने राज्यात एमआयडीसी सुरु केली. तशा प्रकारची तुम्ही नवीन एमआयडीसी सुरु करावी. त्यांच्यासाठी नवीन कायदा करावा. राज्यातील तरुणांना त्यामध्ये सामावून त्यांना खऱ्या अर्थाने आर्थिक मदत करणे गरजेचे आहे. असे केले तरच खऱ्या अर्थाने राज्याचे धोरण होऊ शकते. नाही तर "चुल्लूभर पाणी में....." पुढचे वाक्य मी बोलत नाही. आज मिहान प्रकल्प बंद होत आहे, कार्गोहब बंद होत आहे, हिंगणा एमआयडीसी बंद होत आहे. तसेच बुटीबोरीतील कारखाना बंद होत आहे. अशाच प्रकारची परिस्थिती शेतकऱ्यांच्या बाबतीत सुध्दा निर्माण झाली आहे. परंतु त्यावर मी आता भाष्य करणार नाही. सभापती महोदय, बेरोजगार लोकांच्या हाताला काम मिळाले पाहिजे अशा प्रकारचे धोरण राज्य सरकारने आणले पाहिजे. त्यानंतर हे सुधारणा विधेयक आणावे एवढीच या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

-------

...3सी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानसभा विधेयक क्रमांक 58 मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विधानपरिषदेत मंजुरीकरिता आणले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे व सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी विधेयकाला सुधारणा सुचविली आहे आणि हे विधेयक विधानपरिषदेच्या प्रवर समितीकडे पाठवावे अशी मागणी केली आहे. मी त्याला पाठिंबा देतो आणि त्या संदर्भात माझे मत व्यक्त करतो.

सभापती महोदय, अधिनियमातील कलम 393 मधील पोट कलम तसेच कलम 390 मधील पोट कलम या दोन्हींमध्ये सुधारणा सुचविल्या आहेत. कलम 390 च्या संदर्भात विधेयक आणण्याचा प्रयत्न केला आहे. मला मान्य आहे की, मेक इन इंडिया हे स्वप्न मागच्या वेळी निवडणुकीमध्ये आणि त्यानंतरही दाखविले गेले. परंतु देशात नंतर मेक इन इंडियाच्या संदर्भात काय झाले, काय झाले नाही याची प्रचिती सर्वांना आली आहे. आपण पाहिजे त्या प्रमाणात याकडे लक्ष देऊ शकलेलो नाही. एमआयडीसीत मोठ्या प्रमाणात उद्योग उभारायला पाहिजे होते. मेक इन इंडियाच्या माध्यमातून आपल्या भागात कारखानदारी उभी राहिली पाहिजे. आपल्याला बाहेरच्या देशातून माल आयात करावा लागतो, भविष्यात आपल्या देशामधून माल बाहेर जावा हा उद्देश केंद्र सरकारला अभिप्रेत आहे. केंद्र शासनाला आणखी मदत होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने अशा प्रकारे मेक इन इंडिया संदर्भात विधेयक आणण्याचा प्रयत्न केला आहे. सभापती महोदय, उल्लेखही असा झाला की, मेक इन महाराष्ट्रात का नको, त्यामध्ये मेक इन विदर्भ का नको ? खरे पाहिले तर ही सुधारणा सुध्दा माननीय मंत्री, शासन करू शकले असते. परंतु पिछें से आयी और आगे ढकेल दी म्हणजेच कोणाचे तरी स्वप्न आम्ही पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून काही तरी राज्यात करीत आहोत हे फक्त दाखविण्याकरिता हे विधेयक आणले आहे. आपल्याला यामध्ये यापेक्षा वेगळा काही अर्थ काढता येईल असे मला वाटत नाही. माननीय मंत्री विधेयक आणत आहेत, त्यांना या संदर्भात किती वेदना होत असतील याची कल्पना न केलेलीच बरी आहे. मनपाचे, नगरपालिकेचे, नगरपंचायतीचे अधिकार काढून ते एमआयडीसीला द्यायचे हे योग्य आहे का, एमआयडीसी या सर्व विषयाच्या संदर्भात कितपत सक्षम आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

सभापती महोदय, एमआयडीसी मेक इन इंडियाचे स्वप्न, उद्देश सफल करू शकेल का किंवा महानगरपालिकेची, नगरपालिकेची यासाठी काही गरज नाही, फक्त एमआयडीसी करू शकते, एवढी ती सक्षम आहे का, तसे अधिकारी जिल्हा स्तरावर किंवा एमआयडीसी स्तरावर उपलब्ध आहेत का ? सभापती महोदय, राज्यात अशी अवस्था आज नाही, याची जाणीव माननीय मंत्र्यांना असताना अशा प्रकारे महानगरपालिकेला बाजूला करीत आहेत. सर्व परवाने काढण्याची गरज नाही, एक खिडकी कार्यक्रम राबवित आहोत आणि त्या माध्यमातून एक परवाना दिला की, इंडस्ट्री कुठेही स्थापा असे सांगून मेक इन इंडियाच्या संदर्भात किती प्रभावीपणे आम्ही काम करीत आहोत हे दाखविण्याचाच प्रयत्न विधेयकाच्या माध्यमातून होताना दिसत आहे. परंतु वास्तविकता वेगळी आहे. मेक इन इंडियाचा उद्देश अभिप्रेत आहे, त्यामध्ये आपण स्थानिक ठिकाणी कच्च्या मालावर जे उद्योग होऊ शकतील ते ग्रामीण, नगरपालिका स्तरावर निर्माण करू शकू, शहरात निर्माण करू शकू आणि त्यातून होणारे उत्पादन बारहेच्या देशात पाठवू शकू असे आहे. सदर बाबतीतील प्लॅनिंग करून आर्थिक सक्षमता कितपत आहे, किती आर्थिक मदत करू शकतो, कोणते उद्योग जनतेपर्यंत घेऊन जात आहोत हे पाहणे गरजेचे आहे. उद्योग स्थापन केल्यानंतर व्यवस्थापनाच्या संदर्भात आर्थिक मदत करीत आहोत असे सेटअप उभे केले असते किंवा माननीय मंत्र्यांनी सांगितले असते की, मेक इन इंडियाच्या संदर्भातील विधेयक आणल्यानंतर पुढच्या चार महिन्यांत इतके उद्योग उभे राहतील तर ते बरे झाले असते. परंतु राज्यात तशा प्रकारची परिस्थिती नाही, विदर्भातही नाही. विदर्भात अधिवेशन होत आहे.

सभापती महोदय, उद्योग हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. महाराष्ट्रात विशेषत : विदर्भात कच्चा माल मोठ्या प्रमाणात आहे. परंतु कारखानदारी नाही. पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखादारी आहे. तेथे साखर तयार होते. विदर्भातही काही प्रमाणात कारखादारी आहे. मात्र तेथील कारखानदारी, साखर कारखाने जवळजवळ बंद पडत चालले आहेत. सूत गिरण्या बंद पडत आहेत. सभापती महोदय, विदर्भातील कारखाने मोठ्या प्रमाणात बंद पडू लागले आहेत. सर्वात जास्त महत्त्वाचे म्हणजे विदर्भामध्ये कारखानदारी उभी करायची असेल तर तेथे शेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

मालावर आधारित प्रक्रिया करणारे उद्योग गावागावत उभे करण्याच्या दृष्टीकोनातून पावले टाकली पाहिजेत. शासन जोपर्यंत असे करीत नाही तोपर्यंत हे तेवढे शक्य नाही. विदर्भात खाणी आहेत, त्या आधारित स्टील प्रकल्प असेल किंवा आवश्यक प्रकल्प असतील, ते आवश्यक बाबींची पूर्तता करीत नाही तोपर्यंत कितीही मेक इन इंडिया म्हटले तरी तसे होणे अवघड आहे. हे नाटक लोकांच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. मोठे शब्द वापरायचे, लोकांना भ्रमात टाकायचे मात्र त्या संदर्भात कोणतीही पावले टाकायची नाही असे चालले आहे. विदर्भात उद्योग उभे करण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत. विदर्भात अधिवेशन सुरू आहे. आपण त्या संदर्भात काय पावले उचलत आहोत हेही पाहिले पाहिजे. मेक इन इंडियाच्या माध्यमातून तुमच्या भागात उत्पादन कसे तयार होईल, त्याचे बाहेरच्या राज्यात आणि परदेशी कशा प्रकारे मार्केटिंग करू शकू या संदर्भात माननीय मंत्र्यांनी निवेदन केले असते तर त्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल राहू शकले असते असे मला वाटते. विदर्भात कोणतीही इंडस्ट्री उभी करायची असेल तर येथे खाणी मोठ्या प्रमाणात असून लोह विपुल प्रमाणात आहे. विदर्भात विजेचे 60 टक्के रॉ मटेरियल आहे आणि तरीही वीज जवळच्या राज्यांपेक्षा 3-4 रुपये जास्त दराने देत असाल तर तर कोणता उद्योग उभा राहणार आहे ? येथील उद्योग रॉ मटेरियलच्या अभावी पळून जात आहेत, एकही उद्योग या क्षेत्रात येत नाही. मेक इन इंडिया हे फक्त नाव उच्चारायचे आणि आम्ही काही तरी फार मोठे मेक इन इंडिया करणार आहोत, तुमचा येथील माल परदेशात पाठविणार आहोत, तुम्ही सधन होणार आहात, रोजगार उपलब्ध करून देणार आहोत हे सांगणे म्हणजे फसवेगिरी आहे. उद्योग उभारायचे असतील तर स्थानिक स्तरावर असलेला कच्च्या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी राहिली पाहिजे. कृषी मालावर प्रक्रिया करण्याच्यासाठी एखादी बैठक झाली असेल असे मला तरी काही वाटत नाही. नागपूरात अधिवेशन होत आहे. उद्योग बंद पडत आहेत ते सुरू करण्याच्या दृष्टीने कोणती पावले टाकली पाहिजेत हे सांगितलेले नाही. त्यामुळे विधेयकामध्ये त्या संदर्भातील उद्देश सफल झालेला नाही. सभापती महोदय, फक्त महानगरपालिका, नगरपालिका या संदर्भातच उल्लेख केला गेला. सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

मुंडे यांनी सुधारणा सुचविल्या आहेत. मनपा, नगरपालिकेचे अधिकार काढून घेतल्याने कोणते परिणाम होतील हेही पाहिले पाहिजे. उद्योगांच्या माध्यमातून मनपाला, नगरपालिकेला कर मिळत असतील, प्रदूषण, कचरा या संदर्भातील व्यवस्था मनपा, नगपालिका करीत असेल तर त्यांचे नेमके कोणते अधिकार काढले पाहिजेत या संदर्भात एखादी बैठक मनपांच्या सर्व मेयरसोबत तरी झाली का ? आपण त्यांचे अधिकार मोठ्या प्रमाणात काढायला निघाला आहात. परंतु त्यांचे अधिकार काढले तर काम करण्यासाठी एमआयडीसीकडे कर्मचारी, अधिकारी यांचा स्टाफ तेवढा सक्षम आहे का, किती कर्मचारी जिल्हा स्तरावर आहेत, किती कर्मचारी मनपा स्तरावर आहेत. शासन आम्ही काही तरी फार मोठे करायला आलो आहोत, जनतेकरिता हे सगळे द्यायला निघालो आहोत असे दाखवत आहे. आम्ही मेक इन इंडियाच्या माध्यमातून देशातील सर्वच उत्पादने येथे तयार करणार आहोत अशी फक्त आवई ठोकत आहे. मात्र त्यातून कोणतही हेतू साध्य होत नाही. शासन मनपाचे अधिकार काढण्याच्या संदर्भात विधेयक आणले आहे. मात्र ते कोणालाही विश्वासात न घेता आणले आहे. आमचा या संदर्भात आक्षेप आहे. सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी विधानपरिषदेच्या प्रवर समितीकडे हे विधेयक पाठवावे असे सूचित केल आहे. मी देखील हे विधेयक प्रवर समितीकडे पाठवावे अशी सूचना करतो आणि थांबतो.

----

....3D

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 58-मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर स्व.यशवंतराव चव्हाण यांनी सांगितले होते की, सर्वसामान्य माणूस आणि महाराष्ट्रातील शेतकरी मुंबईला न येता गावातच त्यांचे प्रश्न सुटु शकतील, असा विचार आपण केला पाहिजे. या उद्देशानेच त्यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा निर्णय घेतला. आता मात्र आपण सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा निर्णय घेत आहोत.

सभापती महोदय, या राज्यात 48 टक्के नागरीकरण झाले असून आपण आता 62 टक्क्यांपर्यंत पोहोचत आहोत. माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी असे सांगतात की, मुंबईमधील उद्योग आपल्याला बाहेर न्यावयाचे आहेत. मुंबईमधील आरसीएफ, पेट्रोकेमिकल आणि प्रोसेसिंग उद्योग त्यांना कोकणात न्यावयाचे आहेत. त्यासाठी जयगड येथे नवीन बंदर बांधावयाचे आहे आणि दुसरीकडे मात्र तुम्ही मुंबई महानगरपालिका क्षेत्रात औद्योगिकीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहात, त्याला माझा विरोध आहे. वास्तविक पाहता, ज्या भागात अद्याप उद्योग उभे राहिलेले नाहीत, ज्या भागात अद्याप विकास झालेला नाही, त्या ठिकाणी उद्योग उभे केले पाहिजेत. आज आपण विदर्भात आलो आहोत. या विदर्भात उद्योग उभे केले पाहिजेत. महानगरपालिका क्षेत्रात अगोदरच अपुऱ्या सुविधा आहेत, ड्रेनेज, रस्ते यांच्या पुरेशा सोयी नाहीत, मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्या झालेल्या आहेत आणि त्या ठिकाणी आपण उद्योग वाढविण्याचा प्रयत्न करीत आहात, हे सर्वस्वी चुकीचे आहे.

सभापती महोदय, या राज्याचे उद्योग मंत्री शिवसेना पक्षाचे आहेत. मुंबई महानगरपालिकेचे अधिकार काढून एमएमआरडीए स्थापन करीत असताना त्या पक्षाने मोठा विरोध केला होता. महानगरपालिकेचे अधिकार शासन काढत आहे, पर्यायी प्राधिकरण स्थापन करीत आहात, त्यामुळे त्याला आपण विरोध केला होता. आज आपण स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार काढून घेऊन वेगळी ॲथॉरिटी निर्माण करीत आहात, हे चुकीचे आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.........

सभापती महोदय, या विधेयकाच्या तांत्रिक बाबींवर मी बोलणार नाही. माझा विरोध या गोष्टीला आहे की, शहरे अगोदरच विस्तारलेली आहेत आणि या विस्तारलेल्या शहरांचे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्या ठिकाणी पाण्याच्या पुरेशा सोयी नाहीत. पुरेसे पाणी नसताना आपण त्या ठिकाणी औद्योगिकीकरण कसे करणार आहात ?

सभापती महोदय, आपण उल्हासनगर येथील आहात. आपल्या आजूबाजूच्या उल्हासनगर, कल्याण येथील परिस्थिती काय आहे ? उल्हास नदीला आज पाणी नाही. पूर्वी अशी परिस्थिती होती की, उल्हास नदीचे पाणी वाहून जायचे. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, शहरांमध्ये औद्योगिकीकरणाचा निर्णय घेत असताना आपण पाण्याच्या संदर्भात नियोजन केले आहे का ? शहरांमध्ये आपण औद्योगिकीकरण करीत आहात, एमआयडीसी वसाहती निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहात. पण यामध्ये प्रमुख अडचण ही पाण्याची आहे. परंतु, या संदर्भात कोणताही उल्लेख यामध्ये नाही. या विधेयकाच्या निमित्ताने राज्य शासनाने खुलासा केला पाहिजे की, या सर्व बाबींचे नियोजन आपण केले आहे का ?

सभापती महोदय, माझा या बिलाला बेसिक विरोध यासाठी आहे की, महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये आपण औद्योगिकीकरण करु नका. त्याऐवजी आपण ग्रामीण भागात जा. त्या ठिकाणी भरपूर वाव आहे. जमिनी स्वस्त आहेत, तेथील बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे. मुंबईकडे येणारा हा तरुण ग्रामीण भागातच राहिला पाहिजे, असे उद्योग आपण उभारा. त्या संदर्भातील विधेयक सभागृहात आणा. त्याऐवजी अशा प्रकारचे विधेयक आणणे बरोबर होणार नाही.

सभापती महोदय, या विधेयकाला काही सन्माननीय सदस्यांनी दुरूस्ती सुचविली आहे. माझे म्हणणे हे आहे की, दुरूस्ती कसली सुचविता, हे विधेयक मागे घेतले पाहिजे, कारण ते चुकीचे आहे. आपण हळुहळु सर्व अधिकार काढून कोणाच्या हातात देत आहात ? आपण हे अधिकार नोकरशहांच्या हातात देत आहात. एमएमआरडीएमध्ये कोण आहे, म्हाडामध्ये कोण आहेत ? हे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अधिकारी तुमचे देखील ऐकत नाहीत. राज्याची या संदर्भातील अवस्था काय आहे ? मंत्री असे

...3....



श्री.जयंत प्र.पाटील.........

सांगतात की, अधिकारी आमचे ऐकत नाहीत. आमच्याकडून असे होऊ शकले नसते. आम्ही लाथ मारली असती. तुमचे अधिकार वापरा, ते आपण वापरीत नाही. सन्माननीय उद्योग मंत्री हळुहळु बोलतात. आपण शिवसेनेचे वाघ आहात, आता आपल्याला काय झाले ? बाकीचे शब्द मी वापरणार नाही. उत्तर देत असताना श्री.देसाई साहेबांकडे बघा. तरूणपणी ते वाघ होते. मघाशी मी आणि सन्माननीय श्री.सुनील तटकरे साहेब चर्चा करीत होतो आणि आमचे असे मत झाले की, श्री.देसाई साहेब आता वाघासारखे उत्तर देत नाहीत. मघाशी औद्योगिकीकरणावर चर्चा झाली. आपण दिघी येथील औद्योगिक वसाहतीला विरोध केला. आज आपलेच नेते बाहेर असे सांगतात की, आमचा विरोध आहे आणि येथे सभागृहात तुमचेच मंत्री त्याचे समर्थन करतात, ही परिस्थिती आहे. हे काय चालले आहे ? हे विधेयक आपण मागे घ्यावे, अशी मागणी मी या निमित्ताने करणार आहे. मला कळत नाही की, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी या बिलात सुधारणा का सुचविली आहे ? पाण्याची परिस्थिती अतिशय वाईट आहे. पुढील दोन वर्षात शेतीसाठी राखून ठेवलेले धरणातील पाणी आपण औद्योगिकीकरणाला देणार आहात. शहरे एकत्र करण्याचे काम करीत आहात, हे चुकीचे आहे. माझी अशी विनंती आहे की, शासनाने हे विधेयक मागे घ्यावे. आपण ग्राम पंचायत क्षेत्रात औद्योगिकीकरण करावे. माझी मागणी आहे की, नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रापासून 50 ते 100 कि.मी.पर्यंत उद्योग क्षेत्र असता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना मी सांगू इच्छितो की, तुमच्या मतदारसंघापर्यंत औद्योगिक क्षेत्र झाले आहे. त्याऐवजी काटोल, सावनेरपर्यंत करा. आपण नागपूरच्या आजूबाजूलाच विकास करीत आहात, हे चुकीचे आहे. हे कशासाठी चालले आहे, हे कळत नाही. या विधेयकाचा उद्देशच आमच्या लक्षात येत नाही. उद्देश एकच आहे की, कोणत्या ना कोणत्या कारणाने अधिकारी आपले अधिकार काढून घेत आहेत. आज कोणी मंत्री असे सांगू शकतील का की, म्हाडामधील अमूक काम ते करुन घेऊ शकतील. अधिकारी रूबाबात बसतात. आपण त्यांना साहेब, साहेब म्हणतो. खरे तर साहेब आपण आहोत. आपण त्यांना सांगतो की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साहेब एवढे करा, तेवढे करा. पण ते मात्र आरामात बसतात. मी मात्र कोणाकडे जात नाही आणि येत नाही. आपल्या सारख्या मंत्री महोदयांकडे मैत्रीखातर जातो. पण अधिकाऱ्यांकडे जात नाही.

...4....



श्री.जयंत प्र.पाटील..........

कारण आपल्याला ते सहन होत नाही, ऐकवत नाही, आपली ती प्रवृत्ती नाही. आज जिल्हाधिकारी कोणाचे ऐकत नाहीत. मंत्र्यांचेही ते ऐकत नाहीत. ते जिल्ह्याचे राजे होऊ बसले आहेत. आपले अधिकार तुम्ही कोणाच्या ताब्यात देत आहात ? एमआयडीसीच्या एम.डीं.कडे अधिकार देत आहात. अपॉईंटमेंट देईपर्यंत ते 'येस सर, येस सर' करतात आणि नंतर ऐकत नाहीत. ही काय बोलण्याची पध्दत आहे ? आपल्या कन्या ठाण्यामध्ये चांगले काम करीत आहेत. पण लोकप्रतिनिधींना वागणूक बरोबर नाही. लोकप्रतिनिधींना चांगली वागणूक दिली पाहिजे. तुमचे सहकारी येथे बसलेले आहेत. याची चर्चा या सभागृहात कधी तरी केली पाहिजे.

...3E-1........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील........

तुमचे सहकारी येथे बसलेले आहेत. सभागृहात याबाबत कधी तरी चर्चा झाली पाहिजे. एक दिवस या सर्व गोष्टींवर बोलले गेले पाहिजे आणि यामध्ये कोणाचे दुमत असेल, असे मला वाटत नाही. कोण कोणत्या पक्षाचा आहे हे महत्वाचे नाही. शेवटी, आपण आमदार आहोत, लोकप्रतिनिधी आहोत. आपण या दृष्टीकोनातून बघितले पाहिजे. आम्ही त्या दृष्टीकोनातून बघतो आणि या पद्धतीने काम झाले नाही पाहिजे, अशी माझी मागणी आहे. माझी तुमच्याकडून अपेक्षा होती. माननीय सभापतींनी मला काही कामकाजाच्या संदर्भात चर्चेसाठी बोलाविले. म्हणून मी त्यांच्याकडे गेलो होतो. आम्ही 4-5 सदस्य तेथे बसलेलो होतो. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे देखील तेथे आले होते. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर साहेब ही मागणी करतील, अशी मला अपेक्षा होती. आपले अधिकार काढायचे नाहीत. आपण एमएमआरडीएच्या संदर्भात केलेले भाषण मी अद्याप विसरलेलो नाही. आपल्याला असलेले अधिकार आपण विधेयक संमत करुन नोकरशाहीच्या ताब्यात देत आहोत, हे सर्व चुकीचे चालले आहे असे माझे म्हणणे आहे. माझी या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक मागे घ्यावे, दुरुस्ती वगैरे काही नाही, या संदर्भात चर्चा घ्यावी आणि त्यानंतरच हे करावे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-------

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहातील कामकाजासंबंधी**

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सकाळी म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा झाली. आपण बघितले की, चर्चेच्या वेळी मंत्री महोदयांवर, शासनावर आरोप होतात आणि दुसऱ्या दिवशी त्या संदर्भातील बातम्या वर्तमानपत्रात छापून येतात. प्रस्तावावरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर त्याच दिवशी मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण झाले पाहिजे. मंत्री महोदयांवर बेछूट आरोप करावयाचे, मंत्री महोदयांचे उत्तर घ्यावयाचे नाही आणि त्या आरोपांबाबत वर्तमानपत्रात बातम्या छापून येतात. आता विधेयकावर चर्चा सुरु आहे, त्याबाबत माझे काहीही म्हणणे नाही. आपण विधेयक घ्यावे. परंतु, एखाद्या दिवशी मंत्री महोदयांवर किंवा शासनावर आरोप झाला तर त्या दिवशी उत्तराचे भाषण देखील झाले पाहिजे.

**तालिका सभापती** : आपण मंत्री महोदयांचे उत्तर घेऊ.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कामकाज ठरविण्याची जबाबदारी माननीय संसदीय कार्य मंत्र्यांची आहे. मंत्री महोदयांनी जे सांगितले त्याला माझी हरकत आहे. आम्ही सकाळ पासून सांगतो की, आपण अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा सुरु करावी. आता बराच वेळ झालेला आहे. आम्ही सभागृहात किती वेळ बसायचे ? मी सकाळी 9.00 वाजता विधान भवनात आलो. सकाळी 10.00 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झाले आणि आता आणखी किती वेळ होणार आहे ? आम्ही 12-15 तास येथे बसल्यानंतर त्या चर्चेचा दर्जा काय राहतो, आमची मानसिक तयारी राहते काय ? मंत्री महोदयांचे उत्तर घेण्याचा प्रश्न नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. मंत्री महोदय असे म्हणाले की, चर्चा झाल्यानंतर आम्हाला तत्काळ चर्चेला उत्तर द्यायचे असते. परंतु, आपण आता पर्यंतचे रेकॉर्ड काढून बघावे. चर्चा झाल्यानंतर 2-4 तास थांबल्यानंतर मंत्री महोदयांकडून सांगितले जात होते की, आम्ही अमूक वेळी उत्तर देऊ. आता उलट होत आहे. मंत्री महोदयांची वेळीच उत्तर देण्याची तयारी नसते. त्यामुळे शासनाकडून उत्तर येण्यास विलंब झालेला आहे. आम्ही सर्वानुमते असे ठरविले की, आजच्या ऐवजी उद्या घ्यावे. त्यामध्ये वावगे काय आहे ?

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागील रेकॉर्ड बघायचे झाले तर एका प्रस्तावामध्ये किती खाती कव्हर करावयाची याचेही रेकॉर्ड काढले पाहिजे. आम्हाला माननीय सभापतींनी रात्री 12.00 किंवा 1.00 वाजता बोलावून प्रस्तावात दोनपेक्षा अधिक खाती असतील तर ती प्रस्तावातून वगळण्यास सांगितली.

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विधेयकावर आपले विचार व्यक्त करावेत.

--------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. LVIII OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE.

(चर्चा पुढे सुरु.........

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 58- मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक या छोटेखानी विधेयकावर सभागृहात प्रदीर्घ चर्चा सुरु आहे. खरे म्हणजे, या सभागृहाचे सर्वात महत्वाचे काम कोणते असेल तर राज्य शासनाकाडून जी विधेयके मांडली जातात त्यावर सविस्तर चर्चा करण्याचे काम आहे. विधेयकावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे. मग ते विधेयक किती लांबीचे आहे, किती रुंदीचे आहे, यापेक्षा त्याचा हेतू काय आहे आणि त्या हेतूच्या पूर्ततेसाठी आपण कोणते प्रयोजन करीत आहात, हा महत्वाचा विषय आहे. आपण मेक इन इंडिया मोहिमेनुसार मेक इन महाराष्ट्र अभियान राबविणार आहात. म्हणजे मेक इन इंडिया ही मोहीम आहे आणि मेक इन महाराष्ट्र हे अभियान आहे असे मी गृहीत धरतो. आज जागा बदलल्यामुळे आदरणीय श्री.दिवाकर रावते साहेब सत्ताधारी पक्षाच्या बाकावर बसलेले आहेत. परंतु, आपल्या खात्याचा कारभार कसा आहे ? आपण विधेयकात काय लिहितो, कसे लिहितो हे बघितले पाहिजे. आपण ग्रामीण भागात गेलो तर कोणी 'लायसन्स' असे म्हणत नाही तर 'लायसन' असे म्हणतात. आपण मराठीत लायसन असाच शब्द वापरलेला आहे. आपल्याला ग्रामीण भागातील मराठी भाषेची किती आवड आहे, हे आमच्या हाती विधेयकाची जी छापील प्रत आहे त्यावरुन दिसते. आपण मेक इन महाराष्ट्राच्या पूर्ततेसाठी परवानग्या, परवाने वगैर संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांना जे अधिकार होते ते अधिकार कमी करुन, कमीत कमी वेळात उद्योग सुरु करता येईल, अशा पद्धतीची



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले........

रचना लवकरात लवकर व्हावी, म्हणून आपण याचे प्रयोजन ठेवले आहे, असा या विधेयकाचा उद्देश दिसतो. परंतु, काय होते ? आपण आम्हाला जे कागद देता ते आम्ही वाचावेत, त्याचे रेफरन्स शोधावेत आणि आपल्या खात्याने हे रेफरन्स कोठून गोळा केले असतील हे बघावयाचे असेल तर कलम 393 (1) च्या परिच्छेदाच्या उजव्या बाजूला जे नमूद कले आहे त्यावरुन लक्षात येते. कलम 393 च्या परिच्छेदाच्या उजव्या बाजूला आपण असे नमूद केले आहे की, आयुक्तांच्या परवानगी वाचून वाफेची शिट्टी किंवा वाफेची तुतारी वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. ब्रिटीशांच्या काळातील या प्रोव्हिजन्स असतील. मुंबई सारख्या मोठ्या महानगरांमध्ये पूर्वी कापड गिरण्या होत्या आणि त्या कापड गिरण्यांचा भोंगा वाजत होता, हे आपणा सर्वांना माहीत आहे. त्या भोंग्यावर बरेच कवित्वही झाले आहे, त्यावर गिरणी कामगारांचे जीवन कसे अवलंबून होते, ते कसे राहत होते हेही आपण पाहिले आहे. एकदा नागरी भागात औद्योगिकीकरण सुरु झाले की, त्याचे कोणते परिणाम भोगावे लागतात याचा सर्वंकष विचार आपण कोणतीही सुधारणा मांडताना करतो काय, असा प्रश्न आपल्याला पडला पाहिजे. आपण त्याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मी मुद्दाम सांगू इच्छितो की, देशाच्या औद्योगिक किंवा आर्थिक राजधानीत बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स व्हावे आणि खूप कोंदट वातावरणात, एका इमारतीत 3 ते 4 हजार कामगार हिऱ्यांना पैलू पाडण्याचे काम करतात तो उद्योग पहिल्या प्रथम राज्यात मुंबईच्या गजबजलेल्या वस्तीतून बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये स्थलांतरीत करण्यात आला. हे स्थलांतर करताना कोणती काळजी घेण्यात आली ? त्या काळात बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये कोणी जाण्यास तयार नव्हते. त्यावेळी माननीय श्री.शरद पवार साहेबांनी सर्व हिरे व्यापाऱ्यांना एकत्र करुन हिऱ्यांना पैलू पाडण्याचा उद्योग मुंबईच्या नागरी वस्तीतून बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये स्थलांतरीत केला. आज त्या ठिकाणी किती कामगार काम करतात आणि किती रुपयांची उलाढाल होते याचा जरी आपण विचार केला तरी ते आपल्या लक्षात येईल. उदाहरण द्यावयाचे झाले तर ज्यावेळी नाशिक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शहराचे औद्योगिकीकरण सुरु झाले त्यावेळी प्रथम को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रीयल एरिया आला आणि

..6...



श्री.हेमंत टकले........

त्यामध्ये कोणते उद्योग होते ? तेथे कोणाचा प्रिंटींग प्रेसचा उद्योग होता, कोणाचा मोझॅक टाईल्स बनविण्याचा कारखाना होता तर कोणाचा छपाईचा उद्योग होता. त्यातून औद्योगिकीकरण वाढले आणि प्रथम बॉश कंपनीचा मायको कारखाना नाशिक येथे आला. ज्याचा करार काल तुम्ही केला. स्किल डेव्हलपमेंच्या संदर्भातील करार काल तुम्ही केला.

..3F-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..

तो करार केला, मायको कंपनी तिकडे आली, परंतु त्यावेळी सातपूर हे छोटेसे गाव होते, तेथे नंतर एमआयडीसी आली. सातपूर गावाची नगरपालिका होती, त्या नगरपालिकेच्या क्षेत्रात एमआयडीसी आली. त्यानंतर एक एक प्रस्ताव येत गेला. जेथे अशा मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण करणार आहोत, त्या भागातील नागरी सुविधांसाठी वेगळा म्युनिसिपल ऐरिया क्रियेट करावा. उद्देश कोणता होता व कोणत्या दिशेने प्रवास चालू होता, कोणत्या कामासाठी होता. मुंबईतील उद्योग बाहेर गेले, मुंबई देशाची आर्थिक राजधानी असतांना तेथे मोठ्या प्रमाणात सर्व्हीस इंडस्ट्री आहे. येथे उत्पादन नाही पण सर्व्हीसेस दिल्या जातात. या सर्व्हीसेस देतांना जे नवीन तंत्रज्ञान मोठ्या शहरात वापरले जाणार आहे. अगदी साधी उदाहरणे मी देतो. कोल्हापूर मध्ये मला आठवते की, दहा वर्षापूर्वी आम्ही जात होतो, कोल्हापूर ही उद्योग नगरी आहे, तेथील प्रत्येक माणूस काही ना काही उद्योगात गुंतलेला असतो.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे मघाशी बोलले की, उद्योजक होणे, हे कोल्हापूरच्या संस्कृतीत आहे. तेथे छोटी लेथ मशीन असणारी वर्कशॉप आहेत. ते लोक जॉब ऑर्डर करीत असतात. दिवसभर तेथे शिफ्टप्रमाणे काम चालते. एका लेथ मशीन ऑपरेटरकडे मी गेलो होतो, आतल्या भागात लेथ मशीन ठेवण्यात आली होती. बाहेरच्या बाजुला पडवी होती, तेथे बाकडे ठेवले होते, तेथे लेथ मशीन सुरु होण्या अगोदर सकाळी कोल्हापूरी मिसळ मिळत होती. त्यासाठी भरपूर गर्दी असे. हा प्रकार शहरात घडतो, शहरात उद्योग आल्यानंतर काय काय होऊ शकते या सर्व संभावनांचा आपण नीट विचार केला आहे किंवा नाही, असा प्रश्न या विधेयकाच्या माध्यमातून समोर येत आहे. कारखानदारीसाठी या विधेयकात आपण उदीम शब्द वापरला आहे, उदीम म्हणजे व्यापार कारण हा शब्द आपण ट्रेडवरुन घेतला आहे, असे मी समजतो. भाषांतराचे काय करायचे ते सरकारने नक्की ठरविले पाहिजे. या विधेयकावर बोलायचे असेल तर ते आम्हाला नीट समजेल अशा भाषेत आले पाहिजे. व्यापार उदीम हा पूर्वी वापरात असलेला शब्द आहे, मग व्यापार कोठे गेला, त्याची कोठारे कोठे गेली, मालाची चढ उतार तेथे होत राहणार. रस्ते लहान झाले तर ट्रक तेथपर्यंत कसा जाणार. वाहतुकीची समस्या कशी सोडविणार. असे असंख्य प्रश्न आहेत, नव्याने हे सर्व आपले सुरु झाले आहे, स्वच्छ भारत अभियान सुरु झाले आहे. आपणाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..

पर्यावरणाची काळजी करावयाची आहे. नो व्हेईकल डे, दिल्ली शहरात एक जानेवारीपासून सुरु होत आहे. त्याचप्रमाणे एक जानेवारीपासून डिझेलवर चालणाऱ्या वाहनांचे रजिस्ट्रेशन होणार नाही. आपण मुंबई, पुण्याचा विषय सोडला तरी छोट्या नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या क्षेत्रात वाहनांचे रजिस्ट्रेशन किती प्रमाणात वाढले आहे. मुंबईमध्ये व्हर्टीकल ग्रोथ केली जात आहे. तेथे सहा मजल्यांचे पार्किंग आहे, सहाव्या मजल्यावर लिफ्टने गाडी वर नेण्यात येते. या विधेयकाच्या उद्दिष्टामध्ये उद्‌वाहन म्हणून आपण उल्लेख केला आहे. एखादा उद्योग आठव्या मजल्यावर असेल महानगरपालिकेच्या दृष्टीने तेथे फायरची व्यवस्था नसेल तर तेथे काय होणार. तेथे त्यांनी काय करावे, त्याला महानगरपालिकेकडे जाण्याची गरज नाही. आपला मुक्ततेचा परवाना आहे, आपण काहीही करु शकता, उद्योग करा, उद्योग करा, असा ध्यास आपण घेतला आहे. आपण ज्या स्वप्नाच्या मागे धावत आहोत ते स्वप्न साकार करण्यासाठी वास्तव काय आहे, यापासून आपण लांब का जात आहात, हे आम्हाला कळत नाही. त्यामुळे अत्यंत गांभीर्याने सर्व बाबींचा विचार हे विधयेक आणण्यापूर्वी करायला पाहिजे होता. माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी जी सुधारणा दिली आहे, तसेच हे विधेयक प्रवर समितीकडे पाठवावे (..अडथळा..) प्रवर म्हणजे सिलेक्ट, आता दोन्ही भाषेवर प्रभुत्व मिळवावे लागणार आहे. कारण त्या शिवाय सभागृहात काही चर्चा होणार नाही. Let's be serious about these things, let's not take this lightly. दोन ओळीचे विधेयक आहे, लवकर पास करुन टाका, हा प्रकार थोडा थांबवू या, आपण विचार करु या. तुमच्या मनातील उद्देश चांगले आहेत, उद्दिष्टांपर्यंत जाण्याचा मार्ग सुकर करावयाचा असेल तर यामधील सर्व अडथळे, अडचणी आपण व्यवस्थितपणे दूर करावेत, त्यामुळे दोघांचाही या मार्गावरील प्रवास सुखकर होईल या गोष्टीची आपण खबरदारी घ्यावी,एवढी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

-------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 58 मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी सुधारणा विधेयक 2015 यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक अत्यंत महत्वाचे आहे, महाराष्ट्राच्या औद्योगिकीरणास चालना देणारे व मेक इन महाराष्ट्राच्या घोषणेला मजबूत करणारे विधेयक आहे असे माझे मत आहे. काही मुद्दांकडे मी सदनाचे लक्ष वेधू इच्छितो. हे विधेयक म्हणजे सद्या महानगरपालिका परिसरात असणाऱ्या औद्योगिक वसाहती निर्माण करणारे आहे अशातला भाग नाही. ज्या महानगरपालिकांमध्ये औद्योगिक वसाहती निर्माण करण्यासाठी कोणताही स्कोप नाही, तेथे एमआयडीसी देखील औद्योगिक वसाहत निर्माण करणार नाही. आज जे मुद्दे सदनात उपस्थित होत आहेत, त्यामध्ये साफसफाई, वॉटर सप्लाय, एनओसी हे सर्व विषय गौण ठरतात. ज्या औद्योगिक वसाहती महानगरपालिकांच्या हद्दीत ऑलरेडी आहेत, त्या संदर्भात महानगरपालिकांनी त्या एमआयडीसीला एकत्रितपणे दिलेल्या एनओसीच्या आधारावर त्या आतापर्यंत चालू आहेत. नवीन औद्योगिक वसाहत त्या ठिकाणी निर्माण होत असेल तर एमआयडीसीच्या नियमांच्या अंतर्गत ती निर्माण करण्यात येणार आहे. त्या नियमात अनेक कंडीशन्स अंतर्भुत असतात. या कंडीशन्स पूर्ण केल्यावर एमआयडीसी त्या पूर्ण एरियाला औद्योगिक वसाहत म्हणून घोषित करते.

सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. औद्योगिक वसाहतीची निर्मिती करताना उद्योग विभाग संपूर्ण निकष पाहून निर्णय घेत असतो. त्यामुळे ज्या एक्स्ट्रा एनओसी चार ठिकाणावरुन जमा कराव्या लागतात त्यामध्ये महानगरपालिकेच्या एनओसीची आवश्यकता नससायला पाहिजे. जेणेकरुन एनओसीची संख्या कमी होईल. आपल्याकडे औद्योगिकीकरण होण्यास, बेरोजगारीचे निर्मुलन करण्यास व गतीशिलता निर्माण करण्यास फायद्याचे होईल. हा या विधेयकाचा मूळ उद्देश आहे.

सभापती महोदय, हे विधेयक विधानसभेत मंजूर झाले आहे, हे सुधारणा विधेयक आहे, यामध्ये असलेल्या नगरपरिषदा व महानगरपालिका तसेच मुंबई महानगरपालिका कायद्याअंतर्गत

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.अनिल सोले...

असणारी ही एक सुधारणा आहे. येथे प्रशासकीय अधिकार एकवटण्याचा धोका किंवा भीती या सदनात विविध सदस्यांनी मांडली, त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, या विधेयकाचे वाचन आपण केले तर आपल्या असे लक्षात येईल की, महानगरपालिकांच्या एनओसी महासभा इश्यू करीत नाहीत. या ठिकाणच्या प्लॅनला मंजूरी महासभा देत नाही. कोणत्याही लोकप्रतिनिधीच्या हातात एनओसी इश्यू करण्याचे काम नसते. या विधेयकात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, आयुक्तांची एनओसी घ्यावी लागेल. महासभेची एनओसी घ्यावी लागणार नाही. आपले सदन सार्वभौम आहे. सदन नियमांची निर्मिती करते, विधेयकांची निर्मिती करते, कायद्याची निर्मिती करते, कायद्याची अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासकीय अधिकाऱ्यांना देण्यात येते. या ठिकाणी जनतेच्या प्रतिनिधीचे अधिकार कमी करुन प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे हे अधिकार जात आहेत, ही भीती सदनात व्यक्त होत आहे, ती निरर्थक आहे, याचे कारण महानगरपालिकांचे आयुक्त एनओसी इश्यू करतात.

...3G-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.अनिल सोले...

त्याची आयुक्त एनओसी इश्यू करणार आहेत. याचे प्लॅन महासभेपुढे येत नाहीत, धोरणात्मक बाबी महासभेपुढे येतात. म्हणून महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाला गती देण्यासाठी शासनाने उचललेले हे पाऊल आहे असे माझे मत झाले आहे. आज आपल्या लक्षात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका कायदा मंजूर झालेला आहे. त्या कायद्यामध्ये कालानुरूप आवश्यक असलेली सुधारणा या ठिकाणी मांडण्यात आली आहे. मेक इन इंडियाचा नारा दिला त्यानुसार कार्यरत झाले आहे. Ease of doing business या दृष्टीने आपण प्रयत्नशील आहोत.

सभापती महोदय, जागतिक बँकेने 189 देशांचा सर्व्हे केला. त्या सर्व्हेमध्ये औद्योगिकरणाच्या संदर्भात आपला भारत देश 142 व्या क्रमांकावर आहे. याचे कारण असे की, आपल्या देशातील कायदे अतिशय क्लिष्ट आहेत. त्यामुळे गुंतवणूक करणारे उद्योगपती आपल्या देशात उद्योग उभारण्यासाठी उदासीन असतात. कारण आपल्या देशापेक्षा इतर देशामध्ये त्यांना उद्योग उभारण्यासाठी सहज मान्यता मिळते. त्यामुळे त्यांचा बिझिनेस फास्ट डेव्हलप होतो. उद्योग सुरु करण्याच्या संदर्भात आपल्या देशात अनेक कायदे करण्यात आले. तीन महिन्यांपूर्वी देशामध्ये केलेल्या पाहणीमध्ये महाराष्ट्र आठव्या क्रमांकावर होता. महाराष्ट्र आठव्या क्रमांकावर असल्याबद्दल सरकारवर टीका केली गेली. हा क्रमांक खाली आणायचा असेल तर सुटसुटीत कायदे करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शासनाने केलेल्या सुधारणांमुळे एनओसीची संख्या 76 वरुन 37 वर आली असली तरी ती संख्या यापुढे 25 वर आणली जाणार आहे. सरकारने ही सकारात्मक भूमिका स्वीकारली आहे, असे माझे या चर्चेच्या निमित्ताने मत झाले आहे. केंद्र शासनाने अनेक निर्णय घेतले. आपल्या देशामध्ये नदी नियामक मंडळ असलेले महाराष्ट्र हे एकमेव राज्य होते. ज्या ठिकाणी उद्योग उभारण्याकरिता प्रश्न निर्माण होत होते. केंद्र सरकारने त्याबाबत सुधारणा करण्याची भूमिका घेतली आणि बदल करण्यात आला. 20 हजार मीटरच्या वरच्या भूखंडासाठी आपल्याला परवानगी घ्यावी लागायची, त्यामध्ये केंद्र सरकारने सुटसुटीतपणा आणला. त्यासाठी केंद्र सरकारने परवानगी दिली. बेरोजगारीचे निर्मूलन करावयाचे असेल, आपले प्रॉडक्ट, आपली इंडस्ट्री आपल्या परिसरात उभी करावयाची असेल तर कौशल्य विकसित करुन बेरोजगार युवकांच्या हाताला रोजगार देण्याच्या दृष्टीने अशा पध्दतीची सुधारणा सदनाने मंजूर करण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.अनिल सोले...

आवश्यकता आहे, असे माझे मत आहे. इन्स्पेक्टर राज संपुष्टात आणणे ही देखील त्यात एक भूमिका आहे. सेल्फ सर्टिफिकेशनची भूमिका घेण्यात आली आहे. तसेच अनेक बाबतीत

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

सेल्फ सर्टिफिकेशन त्या त्या उद्योगांनी दिले पाहिजे, तसे बंधन त्यांच्यावर असले पाहिजे या दृष्टीने भूमिका घेण्यात आली आहे. एमआयडीसीने जी जागा नोटिफाय केलेली असेल.........

**सभापती** : मला दोन बाबी सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायच्या आहेत. एक म्हणजे आज सकाळी विशेष बैठकीमध्ये नियम 260 च्या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्षनेते, काँग्रेस पक्षाचे गटनेते माननीय श्री.शरद रणपिसे यांनी आपले विचार मांडले असून माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस या प्रस्तावावर ऑन लेग आहेत. आजचा दुसरा प्रस्ताव महत्वाचा आहे आणि नेहमीच विरोधी पक्षाकडून देण्यात येणारा अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येतो. अंतिम आठवडा प्रस्ताव आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेला आहे. आज दोन विधेयके मंजूर केलेली आहेत. तिसऱ्या विधेयकावर बरीच चर्चा व्हावयाची आहे.

अनेक मंत्री महोदयांशी माझी चर्चा झाली. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर आम्हाला उत्तर देण्याची संधी मिळावी अशी त्यांनी विनंती केली. तशाच प्रकारची सूचना राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याकडून माझ्याकडे आलेली आहे. माझ्यापुढे यक्षप्रश्न आहे. चर्चा सुरु असलेले विधेयक त्वरेने संपवावे हे निश्चित आहे. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर आतापर्यंत तीनच वक्त्यांनी आपले विचार मांडले असून अजून किती वक्त्यांना बोलायचे आहे याची नोंद मला घ्यावी लागणार आहे. वि.स.वि.क्रमांक-58 लवकर संपवावे.

माननीय तालिका सभापतींनी माझ्याकडे वक्त्यांच्या नावाची यादी दिली आहे त्यानुसार माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील व ॲड.राहुल नार्वेकर यांनी विचार मांडले असून माननीय सदस्य प्रा.अनिल सोले विचार मांडण्यासाठी उभे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव, माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांची नावे आलेली आहेत, त्यापैकी माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी बोलावे अशी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

माझी सूचना आहे. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर आणखी किती वक्ते बोलणार आहेत याची माहिती सचिवांनी मला द्यावी. वि.स.वि.क्रमांक 58 लवकर संपवावे.

..3..



**सभापती**......

नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर उर्वरित सदस्यांनी थोडक्यात विचार मांडले आणि सभागृहाची भावना असेल तर आजच्या आज या प्रस्तावावर उत्तर घ्यायला माझी हरकत नाही.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिला तो आम्हाला मान्य आहे. मी एकच सूचना करु इच्छितो की, वि.स.वि.क्रमांक 58 ऑन लेग थांबवून त्यावरील चर्चा उद्या घेता येईल. नियम 260 च्या प्रस्तावावर एक-दोन सदस्यांना विचार मांडण्याची संधी द्यावी.

**सभापती** : माननीय मुख्यमंत्री केव्हा मोकळे होणार आहेत याची मला सूचना द्यावी. या चर्चेत आणखी वेळ घालविण्यापेक्षा माननीय मुख्यमंत्र्यांचा आदर राखला पाहिजे, या दृष्टीने मी निर्णय दिला. माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांनी थोडक्यात आपले विचार मांडावेत. कोणाचेही अधिकार काढून घेतले जाणार नाहीत. माननीय सदस्यांनी दोन दोन मिनिटात आपले विचार मांडताना मुद्यांचे रिपिटेशन टाळावे. माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांनी आपले भाषण सुरु करावे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, जेव्हा एमआयडीसी नोटिफाय क्षेत्र जाहीर करते त्यानंतर आपल्या निकषाच्या आधारे नोटिफाय क्षेत्रामध्ये इंडस्ट्री येतात. त्यावेळेला ज्या अटी आहेत, प्रदुषणाचे निकष आहेत, पाणी पुरवठा व वीज पुरवठा या संदर्भातील काळजी एमआयडीसीला स्वतः घ्यावी लागते. मला असे वाटते की, या अनुषंगाने महापालिकेवर जबाबदारी येणार ही भीती बाळगण्याची आवश्यकता नाही. याचे कारण असे की, एनओसी आणि जबाबदारी औद्योगिक वसाहतीची राहणार आहे. मी एका बाबीकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. विकासाच्या दृष्टीकोनातून औद्योगिक वसाहतीची निर्मिती एखाद्या शहराजवळ होऊ नये.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2एच.1..

प्रा.अनिल सोले....

निव्वळ गावांच्या जवळ एमआयडीसी व्हावी असा कुठल्याही प्रकारचा भेद करण्याची गरज नाही. जेथे विकासाची आवश्यकता आहे, अपेक्षित असलेले रॉ मटेरियल ज्या प्रदेशातून आणि ज्या ठिकाणाहून आपल्याला मिळत असेल, जेथे पाणी पुरवठा होऊ शकतो तसेच औद्योगिकीकरणाला आवश्यक असलेला कुशल, अकुशल कामगार मोठ्या प्रमाणावर मिळू शकतो, मजूर मिळू शकतो तेथे एमआयडीसी सुरू करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अस्तित्त्वात असलेल्या शहरांमधील इमारती पाडून एमआयडीसी घोषित करण्यात येईल अशी भीती बाळगण्याची आवश्यकता नाही. जेथे गरज असेल, जागा असेल तेथेच ती उभारण्यात येईल. येथे अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत त्यांनी येथे अनेक सुधारणा सुचविल्या आहेत. कृपया हे विधेयक प्रवर समितीकडे न पाठविता या विधेयकावर त्यांनी विचार करावा. मेक इन महाराष्ट्राची योजना या बिलाच्या माध्यमातून मांडण्याचा सरकारचा प्रयत्न होत आहे. त्याची आवश्यकता लक्षात घेऊन हे बिल आपण मंजूर करावे अशी मी आपल्या मार्फत सदनाला विनंती करतो. आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल धन्यवाद. जय हिंद.

......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 58- मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यात आले आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नगर परिषदा आणि महानगरपालिका या कशासाठी आहेत ? त्या नगरामध्ये, महानगरामध्ये सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, दिलेल्या परवानगीचे मॉनेटरींग करणे हे त्यांचे काम आहे. सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट, प्रदूषण नियंत्रण, पाणी पुरवठा, वीज पुरवठा, रस्ते, गटार इत्यादी विविध सुविधा उपलब्ध करून देणे हे महानगरपालिकांचे काम आहे. तसेच दरवर्षी लायसेन्स देताना या सुविधांचे असेसमेंट करणे हे त्यांचे काम आहे. या विधेयकाच्या माध्यमातून कलम 293 आणि 300 याला सुधारणा सुचविण्यात आलेली आहे. त्यामुळे नगर परिषदेचे सी.ओ.आणि महानगरपालिकांचे आयुक्त यांच्याकडून अधिकार काढून तो एमआयडीसीला देण्याची तरतूद करण्यात आली आहे. एमआयडीसीकडून वन विंडो सिस्टीम द्वारे ती परवानगी दिली जाणार आहे. त्याचे आम्ही स्वागत करतो. पूर्वी शायनिंग इंडिया झाले होते. आता मेक इन महाराष्ट्र सुरू आहे. खरे म्हणजे हे सर्व केंद्र शासनाने करायला पाहिजे होते. म्हणजे एकदमच शायनिंग इंडिया झाले असते. देशातील सर्व महानगरपालिका व नगर परिषदांना तो ॲक्ट लागू झाला असता. त्याप्रमाणे राज्य शासनाने देखील ॲक्ट केला असता आणि त्यात सुधारणा आणली असती. पण तसे न करता आपल्याला जे सोयीस्कर आहे त्यासंबंधी लहान लहान सुधारणा आणण्याचे व त्या द्वारे आता वन विंडो सिस्टीम उघडण्याचे काम हे सरकार करू पहात आहे. त्या विंडोच्या विरोधात आज लोकांचा आवाज संपूर्ण महाराष्ट्रात गाजत आहे. फायर अलार्म, गिरणीवरील भोंगा, स्टीम बॉयलर्स, जनरेटर्स सेटसचे डिझेल टँक, सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचे ॲफ्युलंट टँक, या सर्वांसाठी नगरपरिषद आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन...

महानगरपालिकेकडून परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी लायसेन्स दिले जाते. यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देखील लायसेन्स दिले जाते. स्टीम आणि बॉयलर्ससाठी वेगळ्या एजन्सी आहेत. त्यांच्याकडून देखील परवानगी दिली जाते. त्याच बरोबर महानगरपालिका आणि नगर परिषद यांचा बिल्डींग परवाना लागतो. या सर्वांचे तंतोतंत पालन करण्यासाठी विविध कंडीशन्स असतात. अग्निशमन दलाकडून, बांधकाम विभागाकडून दरवर्षी चाचपणी केली जाते. त्यानंतर सी.ओ.आणि आयुक्त त्या लायसेन्सला परवानगी देते. काही सन्माननीय सदस्य बोलले की, येथे सभागृहाचा अधिकार घेतला जात नाही. वन विंडी सिस्टीम केली जात आहे. ती आपल्याला नको आहे काय, लायसेन्सी राज संपविले जात आहे. तसे जर घडणार असेल तर आम्ही त्याचे स्वागत करतो. पण तसे घडणार नाही. एखाद्या कारखान्यामध्ये अपघात घडला तर सर्वप्रथम पाणी पुरवठ्याची गरज पडते. अग्निशमन दलाची गरज पडते. आरोग्य सेवेची गरज पडते. या सर्व सुविधा तेथील स्थानिक स्वराज्य संस्था देते. त्या नगर परिषदेमध्ये अंडर ग्राऊंड ड्रेनेज सिस्टीम असेल, ॲफ्युलंट सिस्टीम असेल तर त्या इंडस्ट्रीचे कनेक्शन नगर परिषदेच्या कनेक्शनला जोडले जाते. पाण्याचे कनेक्शन नगर परिषद, महानगरपालिका देते. इंडस्ट्रीमध्ये अपघात झाल्यानंतर जखमींना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रूग्णालयात दाखल केले जाते. एवढेच नव्हे तर रूणवाहिका देखील उपलब्ध करून दिले जाते. संपूर्ण आरोग्य सेवा तेथे पुरविली जाते. .... (अडथळा) .... सभापती महोदय, ही सर्व व्यवस्था स्थानिक स्वराज्य संस्था करीत असते. मुंबई महानगरपालिका अधिनियम तयार करण्यात आलेला आहे. हा अधिनियम एका रात्रीत तयार झालेला नाही. मेक इन इंडियाची पॉलिसी एका रात्रीत तयार झालेली आहे. तसे हे नियम तयार झालेले नाहीत. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर ग्रामपंचायतींचे नगर परिषदामध्ये रूपांतर करण्याचे ठरले म्हणून नगर पंचायती कायदे झाले. त्या माध्यमातून कायदा तयार झाला आणि त्यांना अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे दरवर्षी मॉनेटरींग करण्याची जबाबदारी कोणाची असेल तर ती स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. या बिला द्वारे आपण एमआयडीला अधिकार दिले तरी एमआयडीसच्या भूखंडावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3H 4

BGO/ AKN/ MMP/ श्री.भोगले... 20:00

श्री.मुझफ्फर हुसेन...

एखाद्या उद्योगासाठी इमारत बांधायची असेल तर एमआयडीसी देखील लिहिते की, स्थानिक स्वराज्य संस्थेकडून बिल्डींग परवानगी घ्यावी लागेल. इमारतीसाठी महानगरपालिका आणि नगर परिषद परवानगी देतात. त्यांचे देखील स्वतःचे कायदे आहेत. टाऊन प्लानिंग ॲक्ट आहे. त्यात अनेक तरतुदी आहेत. त्या तरतुदींचे तंतोतंत पालन करून एक्झीक्यूट करणे, मॉनेटरींग करणे, याची जबादारी नगरपालिका आणि महानगरपालिकांवर आहे. त्यामुळे हे बिल चुकीचे आहे. यात भरपूर बदल करण्याची गरज आहे. तरतूद करण्याची गरज आहे. हे आपण केले नाही तर मोठ्या प्रमाणावर ॲक्सिडंट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्यात शायनिंग होणार की नाही हे परमेश्वराला माहीत.

III-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन .......

परंतु या बिलामुळे कारखान्यांमध्ये मोठया प्रमाणात अपघात होतील व अपघात झाल्यानंतर तुम्ही कोणत्याही अधिकाऱ्याला, कोणत्याही महानगरपालिकेला दोषी धरु शकणार नाही. कारखान्यामध्ये स्फोट झाला तर त्यामध्ये प्रथम नगरपरिषदेच्या सीईओला जबाबदार धरले जाते, तहसीलदार, कलेक्टर,आयुक्त,अग्निशमन कार्यालयातील अधिकाऱ्याला जबाबदार धरले जाते. परंतु हे बिल पास झाल्यानंतर अशा प्रकारचे अपघात कारखान्यामध्ये झाले तर यासंदर्भातील जबाबदारी कोणीही स्वीकारणार नाही आणि शासनाला सुध्दा त्यांच्यावर जबाबदारी टाकता येणार नाही. शासन कोणालाही दोषी धरु शकणार नाही. म्हणून हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यात यावे, या विधेयकावर भरपूर विचार करण्याची गरज आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या ठिकाणी सर्व प्रथम हा प्रश्न निर्माण होत आहे की, ज्यावेळेस उद्योगांसाठी अनेक परवानग्या लागत होत्या त्यावेळेस आपल्या राज्यात उद्योग येत नव्हते काय ? त्यावेळेस आपल्या राज्यात उद्योगांची वाढ झालीच नाही काय ? आज राज्याराज्यामध्ये उद्योगांना आमंत्रण देण्याची, सुविधा देण्याची स्पर्धा निर्माण झाली आहे. उद्योग उभारतांना नियम असण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळेस या नियमांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असते त्यावेळी नियमांमध्ये सुधारणा केलीच पाहिजे.

सभापती महोदय, मी बिलावर फारसा वेळ घेणार नाही. परंतु आमच्या नाशिक महानगरपालिकेतील एक दोन गोष्टी सांगणार आहे. या ठिकाणी सन्माननीय राज्यमंत्री बसले असून ते अतिशय सक्षम आहेत. आमच्या नाशिक महानगरपालिकेने नियम 37(1) च्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही ज्यावेळेस राज्य शासनाकडे येतात परंतु 4-4 वर्षे होऊन गेली तरी त्यावर काहीही कार्यवाही शासनाकडून होत नाही. महापालिका शासनाकडे अनेक वेळा ठराव पाठवते,, महापौर विनंती अर्ज करतात, आयुक्त पत्र पाठवतात त्यावेळेस शासन या सर्व बाबीची पूर्तता तातडीने का करुन देत नाही ? ज्यावेळेस आमच्या सारखा सदस्य या ठिकाणी लक्षवेधी सूचना उपस्थित करतो त्योवळी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगावे लागते की, होय आम्ही महिन्याच्या आत सर्व कार्यवाही पूर्ण करु आणि 37(1) ला मान्यता देऊ.

सभापती महोदय, जो मधला प्रवास आहे, तो मधला प्रवास थांबविण्याच्या ज्या प्रवृत्त्या आहेत त्या प्रवृत्त्या तुमच्या डोक्यात गोष्टी घालतात व त्या सभागृहाच्या पटलावर आणतात आणि आम्ही म्हणाचे "होयचे बहुमत, होयचे बहुमत आणि समोरच्या बाजूने म्हणायचे होयचे बहुमत, होयचे बहुमत आणि विषय थांबवायचा.

सभापती महोदय, आज बिल्डर व्यवसाय अतिशय वाईट परिस्थितीतून जात आहे. राज्यामध्ये आणि आमच्या नाशिक मध्ये अनेक सदनिकांना कम्प्लीशन सर्टिफिकेट मिळालेले नाही. कम्प्लीशन सर्टिफिकेटपासून वंचित असलेले जे बिल्डर आहेत त्यांनी सदनिका बांधताना महानगरपालिकेच्या प्रचलित नियमाप्रमाणे सदनिका बांधल्या आहेत, त्यांनी भिंतीमध्ये जी काही कपाटे बांधली आहेत ते एफएसआयमध्ये काऊंट करावे की, करु नये अशा परिस्थितीमध्ये हा व्यवसाय आलेला आहे. या विषयाच्या संदर्भात आम्ही मंत्री महोदयांना विनंती केली की, आज ज्या इमारती उभ्या आहेत त्या इमारतींना मागच्या नियमाप्रमाणे मान्यता द्या. यापुढे ज्या इमारती बांधल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

जातील त्यांना तुम्हाला जो काही नियम लावायचा असेल तो नियम लावा. बांधकामामध्ये जो काही फरक पडला असेल त्यासाठी वाटले तर तुम्ही चार्ज करा. आमच्या नाशिक महानगरपालिकेला जर कम्प्लीशसर्टिफिकेट ट मिळाले असते तर किती तरी करोड रुपयांच्या रेव्हेन्यू आमच्या नाशिक महानगरपालिकेला मिळाला असता. आम्हाला हा रेव्हेन्यू मिळाला असता तर कुंभमेळ्यासाठी लागणाऱ्या पैशासाठी आम्हाला सरकारकडे भीक मागावी लागली नसती. आमच्या हक्काचे पैसे असताना ते पैसे आमच्या महानगरपालिकेला पैसे मिळत नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींना अधिकार आहेत की, नाही असा प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, परवा माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी क्रांतीकारक निर्णय घेतल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी अनधिकृत असलेल्या बांधकामांना मान्यता दिली आहे. असे असेल तर आमच्या नाशिक महानगरपालिकेतील हजारो सदनिकांन कम्प्लीशन सर्टिफिकेट न मिळाल्यामुळे त्या धूळ खात पडलेल्या आहेत. बिल्डरांवर आता आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी बिलाच्या संदर्भात विचार मांडावेत.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी महानगरपालिकेच्या संदर्भातच बोलत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजरचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर खाली बसून बोलत आहेत. खालच्या सभागृहात माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार, माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब हे विरोधी पक्षात होते तेव्हा ते 5-5 तास बिलावर बोलत होते. सन्माननीय सदस्य बिलावर कितीही वेळ बोलू शकतात.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय,....

**सभापती :**या विषयाच्या संदर्भात मी निर्णय देणार आहे. तुम्ही कशाला वाद घालत बसता ? सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर काही बोलत असले तरी माझा निर्णय शेवटचा राहणार आहे. मी सर्व सदस्यांचे अधिकार मान्य केलेले आहेत. त्यामुळे मी निर्णय घेतला आहे की, सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांना बिलावर मोकळेपणाने बोलू द्यावे. सन्माननीय सदस्यांना बोलण्यामध्ये कृपया अडथळा करु नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

ॲड.रिाहूल नार्वेकर : महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह रुल्सप्रमाणे कोणताही सदस्य डिस्कशन चालू असताना पॉईंट ऑफ प्रोसिजर घेऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजर घेतला आहे आणि तो यासभागृहाच्या ज्युरिसडिक्शनमध्ये असल्यामुळे आता सत्तारुढ पक्षाने त्याबाबतीत ऑब्जेक्शन घेणे किती उचित आहे, हे आपण ठरवावे.

**सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांच्या ऑब्जेक्शनची दखल घेतलेली नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आम्ही सकाळी 10 वाजेपासून येथे बसलेलो आहोत. आता रात्रीचे 8.30 वाजून गेले आहे. आम्ही किती वेळ बसायचे यालाही काही मर्यादा आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजाला सकाळी 10 वाजता सुरुवात झाली असून आता रात्रीचे 8.30 वाजले आहे. आज सभागृहाचे कामकाज सलग सुरु आहे. सभागृहाने एक मिनिटाची सुध्दा सुट्टी घेतली नाही. असे असतानाही आम्ही बिलावर चर्चा करीत आहोत. एखाद्या सदस्याने पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या माध्यमातून सूचना केली आणि त्यावर सत्ताधारी पक्षाच्या बाजूने ऑब्जेक्शन घेतले जात असेल तर आपण यासंदर्भात सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांला समज दिली पाहिजे अशी आमची विनंती आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांच्या ऑब्जेक्शनवर मी निर्णय घेतलेला आहे. मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण आता बिलावरील चर्चेला सुरुवात करु या.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज आपण किती वाजेपर्यंत चालविणार आहात ?

**सभापती :** हे बिल पूर्ण झाल्यानंतर आज सकाळी सुरु झालेल्या नियम 260 च्या प्रस्तावावर 8-10 सन्माननीय सदस्य बोलणार आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या बिलावर आमच्या काही सन्माननीय सदस्यांना विचार मांडावयाचे आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना विधेयकावर बोलण्याची संधी देणार आहे. आपण प्रथम विधेयकावरील चर्चा संपवू या. या विधेयकावर बोलण्यासाठी फक्त तीन सदस्य राहिलेले आहेत. माझ्याकडे नावांची जी यादी आहे ती मी वाचून दाखवितो. श्री.जयवंतराव जाधव बोलत आहेत, त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, नंतर सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आणि त्यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.राहूल नार्वेकर यांचे नाव आहे. यांच्या व्यतिरिक्त आणखी कोण सदस्य बोलणार आहेत काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी आपली माफी मागून सांगू इच्छितो की, विधेयकावर बोलण्यासाठी नावांची यादी येत नाही. कोणत्याही सन्माननीय सदस्यांना विधेयकावर बोलावयाचे असेल तर ते केव्हाही हात वर करुन आपल्या परवानगीने बोलू शकतात. तेव्हा ज्या सन्माननीय सदस्यांना विधेयकावर बोलायचे असेल त्यांना आपण बोलण्याची मुभा द्यावी, अशी आपणास विनंती आहे.

**सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी या ठिकाणी आल्यावर सुरुवातीलाच सांगितले की, आपण सर्वजण मर्यादित स्वरुपात बोललात तर हे विधेयक आपणास मंजूर करता येईल. मलाही नियम माहीत आहेत. आपण कधी नियमाने चाललो आहोत असे मला कधीही वाटत नाही. आपण एकमेकांना ॲडजेस्ट करुन पुढे चाललो आहोत. माझे असे म्हणणे आहे की, आपणास शक्यतो मर्यादित स्वरुपात बोलता येईल तेवढया मर्यादित स्वरुपात बोलावे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून आपल्यासारख्या ज्येष्ठ सदस्य बोलल्यानंतर बाकीचे सन्माननीय सदस्य आणखी काय ॲडीशन करणार आहेत, असा विषय माझ्या मनात आहे. म्हणून मी असे म्हणालो की, आपण बोलल्यानंतर बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी दोन-दोन मिनिटांत आपले विचार मांडावेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर बोलण्यासाठी हात वर केला असेल त्या सन्माननीय सदस्यांना विधेयकावर बोलण्यासाठी कधीही रोखण्यात आलेले नाही. आम्ही देखील सत्ताधारी पक्षात असताना विरोधी पक्षातील एकेका सन्माननीय सदस्यांची चार-चार तास केलेली भाषणे ऐकलेली आहेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी अगोदरच सांगितलेले आहे की, कोणत्याही सन्माननीय सदस्यांचे अधिकार मी रोखत नाही.

श्री.धनंजय मुंडे :सभापती महोदय, मला एका गोष्टीची आठवण करुन द्यायची आहे. या सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य जे आता सत्ताध्‍ारी पक्षात मंत्री आहेत, ते विरोधी पक्षात असताना एका विधेयकावर दोन दिवस बोलत होते. विधेकाच्या बाबतीत चांगल्या सूचना येत असतील आणि त्या सूचनेमुळे चांगला कायदा होत असेल तर त्या सूचना या सदनाने ऐकल्या पाहिजेत.

**सभापती :** मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपण या चर्चेमध्ये अधिक वेळ घालवू नये. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करावी. या विधेयकावर अजून काही सन्माननीय सदस्यांना बोलायचे असेल तर मी त्यांना बोलण्यासाठी परवानगी देईन.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, नाशिकमध्ये 12 वर्षांनी कुंभमेळा भरतो. त्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने ज्या काही सुधारणा करावयाच्या होत्या त्यासाठी राज्य शासनाची आणि केंद्र शासनाची मदत मिळालेली आहे. पण जो सेल्फ रेव्हेन्यू जनरेट होत होता तो आज थांबलेला आहे. या गोष्टीचे गांभीर्य फक्त रेव्हेन्यू जनरेशनपुरता मर्यादित नाही. त्या ठिकाण्ी सर्वसामान्य लोकांना सदनिका आरक्षित केलेल्या आहेत, इमारतींना कम्प्लीशन मिळालेले नाही. इमारत पूर्ण झाल्याशिवाय बिकासक लोकांना तेथे रहावयास देऊ श्कत नाही. आयुक्तांनी सांगितलेले आहे की, आपण इतक्या दिवशी कमीन्समेट सर्टीफिकेट घेतलेले आहे. तेव्हा इतक्या दिवसात तुमची बिल्डींग पूर्ण होणे भाग होते. आपली इमारत पूर्ण न झाल्यामुळे आपणास यापुढे अमुक अमुक टॅक्स भरावा लागणार आहे. इमारतींचे कम्प्लीशन नसल्यामुळे तेथे सदनिकाधारक रहावयास येऊ शकत नाही. तेथील स्थानिक प्रशासन त्यांना सांगत आहे की, एवढ्या दिवसात तुमची इमारत पूर्ण व्हावयास पाहिजे होती, ती झाली की नाही मला माहीत नाही, पण जी काही घरपट्टी आहे किंवा इतर जे लोकल टॅक्सेस आहेत ते आपणास भरावे लागणार आहेत. आपण कम्प्लीशन देत नाही आणि वर टॅक्सेस घेत आहात. आपण जे टॅक्स घेत आहात त्याची जबाबदारी राज्य शासन घेण्यास तयार नाही, राज्य शासन निर्देश देण्यास तयार नाही. तेथील महासभेला अधिकार नाहीत. आयुक्तांनी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव......

कोणाचे ऐकायचे हे मला समजत नाही. आपण एलबीटी बंद केली आहे. आमच्या नाशिक महानगरपालिकेमध्ये सातपूड व अंबड या भागात एमआयडीसी आहे. तेथे हजारो कामगार रात्रंदिवस काम करीत आहेत. त्या ठिकाणी रस्ते, स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यासाठी महानगरपालिका कोठून पैसा आणणार आहे. काही दिवसांनी अशी वेळ येईल की, विकास हा भाग बाजूला राहील परंतु, आस्थापनेचा खर्च भागविण्याची ऐपत महानगरपालिकेमध्ये राहणार नाही. त्याठिकाणी एका टक्केचा देखील व्हायलेशन होत नाही. आपण एलबीटी बंद केलेली आहे. महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत बंद झालेले आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले आपण महापौर म्हणून काम केलेले आहे. मी नाशिक महानगरपालिकेमध्ये विरोधी पक्ष नेता म्हणून काम केलेले आहे. नगरसेवकांचा सर्वसामान्य माणशांची थेट संबंध येतो. आपण या सभागृहात आल्यामुळे आपला तसा थेट संपर्क होत नाही. आपण स्थानिक स्वराज्य संस्थेतून काम करुन आलेलो आहोत.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी जो विषय मांडला त्याबाबत सांगू इच्छितो की, बिल्डींग कम्प्लीशन सर्टीफिकेट इश्यू करण्याचे काही नियम आहेत. ओ.सी. देण्याचे देखील काही नियम आहेत. त्यांनी जो विषय मांडलेला आहे त्याप्रमाणे ते इश्यू करण्याचे अधिकार महासभेला नसतात. ते अधिकार आयुक्तांनाच असतात. माझे सांगण्याचे तात्पर्य हेच होते की, प्रशासकीय अधिकार देण्याचे आपण नियमावली बनवित आहोत. आपण कायदे तयार करतो. त्याची अंमलबजावणी प्रशासन काटेकोरपणे करते की नाही आणि त्यांच्यावर जी कारवाई करावयाची जबाबदारी आपल्यावर निश्चितपणे येते, एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. आयुक्तांवर जी.बी.चा दबाव असतो. जनरल बॉडी अंतिम असते. आयुक्त जर वेडेवाकडे वागले तर जी.बी. त्यांच्यावर अविश्वास आणू शकते हे आपण लक्षात घ्यावे. या ठिकाणी तो कोणताही अधिकार राहिलेला नाही. आयुक्तांना, जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अधिकार आहेत पण त्यांच्यावर अविश्वास ठराव आणून त्यांना पदावरुन बाजूला करु शकतो. तेव्हा अधिकाऱ्यांना आमसभेला आणि सभासदांना विश्वासात घेऊन काम करावे लागते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले महानगरपालिकेमध्ये महापौर होते. मी बरीच वर्षे फलटण नगरपालिकेचा नगराध्यक्ष होतो. मलाही या नियमांची माहिती आहे. आपण आपल्या प्रोसिजर वेगळ्या माध्यमातून पुढच्या अधिवेशनात आणाव्यात.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांनी या विधेयकावर चांगल्या प्रकारे युक्तिवाद केलेला आहे. ते सत्तारुढ पक्षातील ज्येष्ठ सदस्य आहेत. आपण त्यांना बोलण्यापासून रोखू नये, अशी आपणास विनंती आहे.

**सभापती :** ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना माझी अशी विनंती आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना बोलण्यापासून आपण त्यांना रोखू नका.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आपण मला संरक्षण दिल्याबद्दल आपले आभार मानतो. सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांचे म्हणणे मला तंतोतंत मान्य आहे. एखादा विकासक महानगरपालिकेमध्ये आपला डेव्हलपमेंट प्लान सादर करतो तेव्हा प्रथम फाईल इन्व्हर्ड होते. प्रथम कनिष्ठ अभियंता ती फाईल चेक करतो. नंतर ती फाईल उप अभियंत्याकडे जाते, त्यानंतर कार्यकारी अभियंत्याकडे जाते. त्याठिकाणी एडीडीपी असेल तर तो त्या फाईलला मान्यता देतो. काही ठराविक स्वे.फुटाच्यावर जागा असेल तर ती फाईल आयुक्तांकडे जाते, अशी प्रचलित पद्धत आहे. त्यावर हरकत असण्याचे काही कारण नाही. या ठिकाणी विषय असा निर्माण होत आहे की, जर विकासकाकडून काही अंशी एफएसआयमध्ये व्हायलेशन झाले असेल तर त्याबाबत काय जबाबदारी असली पाहिजे ? आयुक्तांनी काहीतरी चार्ज करुन, काही दंड घेऊन त्या इमारतीला कम्प्लीशन द्यायला पाहिजे. मी वारंवार येथे हेच सांगत आहे की, नाशिक महानगरपालिकेमध्ये या सर्व प्रोसिजर फॉलो केल्यानंतर आज आमच्याकडे हजारो सदनिका पडून आहेत. आपण या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे की, ज्यांनी त्या इमारतीमध्ये सदनिका आरक्षित केली असेल त्यासाठी त्याने कोणत्या तरी बँकेचे कर्ज घेतलेले आहे आणि त्या कर्जावर त्याला व्याज भरावे लागत आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहापुढील कामकाजाबाबत**

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, रात्रीचे 8.30 वाजले आहेत.

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, मी मघाशी जाहीरपणे सांगितले आहे की, या विधेयकावरील चर्चा पूर्ण करण्यात येणार आहे. शेवटी हे विधेयक संमत होणे तुम्हा सन्माननीय सदस्यांवर अवलंबून आहे. तुम्ही जर सन्माननीय श्री.दिवाकर रावते यांच्यासारखे विधेयकावर पाच तास बोलायचे ठरविले असेल तर तेवढा वेळ लागेल. मी वेळेचे बंधन घालत नाही. मी सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना नियम 260 वरील प्रस्तावाला उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री उपलब्ध आहेत की नाही, हे विचारले होते. परंतु अद्यापपर्यंत मला त्या बाबत काही कळालेले नाही. या विधेयकानंतर नियम 260 चा प्रस्ताव घ्यावयाचा की नाही, या बाबतचा निर्णय घ्यावयाचा आहे. माझा 260 च्या प्रस्तावाच्या बाबतीतील निर्णय ठाम आहे. जर नियम 260 च्या प्रस्तावावरील चर्चेला सत्ताधारी पक्षाला उत्तर द्यावयाचे असेल तर या प्रस्तावावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण झाल्याशिवाय ते उत्तर पूर्ण होणार नाही.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती. परंतु ते सध्या विधानसभा सभागृहात आहेत. नियम 260 च्या प्रस्तावावर उर्वरित सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर आम्ही मंत्री महोदय उत्तर देण्यास तयार आहोत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, नियम 260 च्या प्रस्तावावरील उत्तरासाठी या विधेयकावरील चर्चा संपवायची हा विषय सभागृहाला समजला नाही. या विधेयकावरील चर्चा ऑन-लेग ठेवायची असेल तर नियम 260 च्या प्रस्तावावरील उत्तर उद्या घेण्यास काय अडचण आहे ? यासाठी आम्ही तयार आहोत. हा नियम 260 चा प्रस्ताव विरोधी पक्षाने मांडलेला आहे. सन्माननीय सदस्यांना अजून या प्रस्तावावर बोलावयाचे आहे. त्यानंतर नियम 260 च्या प्रस्तावावर सुध्दा सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. कारण आज नियम 260 च्या प्रस्तावावर केवळ दोनच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत आणि तिसरे सन्माननीय सदस्य ऑन-लेग आहेत. या प्रस्तावावर विरोधी पक्षाकडून 18 सन्माननीय सदस्य आपले विचार व्यक्त करणार आहेत. या प्रस्तावावर 18 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे झाल्यास आजची रात्र आणि उद्याचा दिवस सुध्दा पुरणार नाही. विधेयकावरील चर्चा संपल्यानंतर नियम 260 च्या प्रस्तावावरील चर्चा

..2..

श्री.धनंजय मुंडे....

सुरु होईल व त्यानंतर ती संपेल. या विधेयकावर सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केल्यानंतर नियम 260 च्या प्रस्तावावर चर्चा होऊ शकते. या सभागृहाने नियम पाळलेले आहेत. या सभागृहात पूर्वी सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर किती वेळ चर्चा केली हा विषय नाही. परंतु मागच्या काळात विधेयकावरील चर्चा लांबल्यानंतर अनेकदा ती चर्चा ऑन-लेग ठेवण्यात आली आणि दुसऱ्या विषयावर चर्चा सुरु केली गेली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा त्या विधेयकावर चर्चा केली. त्यामुळे या गोष्टीचा सुध्दा आपण विचार केला पाहिजे. या ठिकाणी केवळ सत्ताधारी पक्षाच्या....

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर बोलण्यास आमची हरकत नाही. नियम 260 च्या प्रस्तावावर सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. आपल्या दालनात यावर एकमत झाले की, नियम 260 च्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्यांनी आपली भाषणे आज पूर्ण करावीत. माननीय मुख्यमंत्री त्या प्रस्तावाला उत्तर देण्यासठी येण्यास तयार होते. आता संबंधित माननीय मंत्री सुध्दा उत्तर देण्यास तयार आहेत. ही चर्चा जेवढी चालवायची तेवढी चालवावी. कारण उद्या अजून दोन प्रस्तावांवर चर्चा करावयाची आहे. शिवाय उद्या शेवटचा दिवस आहे. त्यामुळे त्या प्रस्तावांवर उद्याच उत्तरे होतील. त्यामुळे आम्ही आपल्याला विनंती केली. ती विनंती मान्य करावयाची की नाही हे आपण ठरवावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आम्ही सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी नेहमीच सहकार्य करतो. आम्ही कामकाजाच्या बाबतीत कधीही दुराग्रह केला नाही. सभागृहात माननीय मंत्री उपस्थित नसतील तर त्यांच्या सोयीनुसार आम्ही उत्तर ऐकलेले आहे. आज विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. शिवाय नियम 260 च्या प्रस्तावावर सुध्दा बोलावयाचे आहे. मला हे समजत नाही की, आपण आजच्या आज ही चर्चा संपविण्याचा दुराग्रह कशासाठी करीत आहात, उद्या या प्रस्तावावरील उत्तर होऊ शकत नाही काय ? सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना विधेयकावर बोलण्यापासून अडविण्याचे कारण काय आहे ?

**सभापती** : मी तिसऱ्यांदा रिपीट करीत आहे. विधेयकावर पूर्णपणे चर्चा करण्याचा अधिकार सन्माननीय सदस्यांना आहे. विधेयकावर सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. त्यानंतर विधेयक

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

संमत होऊ द्यावे, अशी माझी भूमिका आहे. आपण जर सन्माननीय सदस्यांचे अधिकार राखण्याबाबत मला सांगत असाल तर मी त्यांचे अधिकार पूर्णपणे राखतो. मी विधेयकावरील चर्चेला पूर्णपणे वेळ देईन. असे असताना सुध्दा ही चर्चा 9.00 किंवा 9.30 वाजेपर्यंत पूर्ण करा असे आपण सांगू शकत नाही. त्यामुळे विधेयकावर दोन-चार सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केल्यानंतर, सभागृहाचा सेन्स घेऊन सभागृहाचे कामकाज कधीपर्यंत सुरु ठेवायचे आणि नियम 260 चा प्रस्ताव आज घ्यायचा की नाही, उर्वरित सन्माननीय सदस्यांना त्या प्रस्तावावर बोलण्याची परवानगी द्यायची की नाही आणि मंत्र्यांचे उत्तर कधी घ्यायचे हे नंतर ठरवू या. आता सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव आणि त्यानंतर एक-दोन सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर सभागृहाच्या कामकाजाबाबत निर्णय घेऊ या. या पध्दतीने सभागृहाचे कामकाज चालेल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, नियम 260 चा प्रस्ताव हा विरोधी पक्षाने मांडलेला आहे. शिवाय उद्या अंतिम आठवडा प्रस्तावावर सुध्दा चर्चा होणार आहे. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले की, आजच्या आणि उद्याच्या प्रस्तावांवर उत्तर ठेवले तर ही दोन्ही उत्तरे कशी होतील ? हे सभागृह प्रस्तावावरील चर्चा आणि उत्तरासाठी सुध्दा तितकेच आवश्यक आहे. नियम 260 च्या प्रस्तावावर विरोधी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. शिवाय विधेयकांवरील चर्चा सुध्दा बाकी आहे. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्री या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी येणार आहेत की नाही या बाबत त्यांच्याकडून निरोप आलेला नाही. त्यामुळे आता माननीय मंत्री महोदय या प्रस्तावाला उत्तर देण्यासाठी तयार आहेत. मी विचारु इच्छितो की, नियम 260 च्या प्रस्तावावरील चर्चा संपलीच नाही तर त्यावरील उत्तराची घाई कशासाठी करीत आहात ?

**सभापती** : मला वाटते आपण सर्कलमध्ये चर्चा करीत आहात. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव आणि इतर दोन सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर सभागृह कधीपर्यंत चालवायचे हे ठरवू या. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांना सुध्दा बोलायचे आहे. अन्य सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर बोलण्याची इच्छा व्यक्त केली तर त्यांना सुध्दा संधी देण्यात येईल. त्यानंतर सभागृह किती वाजेपर्यंत चालवायचे आणि नियम 260 च्या

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

प्रस्तावावरील उत्तर कधी घ्यायचे हे मी नंतर ठरवेन.

आता सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी विधेयकावरील भाषणास पुढे सुरुवात करावी.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. LVIII OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE.

(चर्चा पुढे सुरु...)

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी वारंवार सभागृहाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देतो की, राज्य सरकारने एलबीटी बंद करुन, स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्नाचे स्त्रोत बंद केले आहेत. त्याच वेळी सेल्फ रेव्हेन्यू जनरेट होण्यासाठी जे कम्प्लीशन देणे गरजेचे असते ते दिले जात नाही. त्यामुळे माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सभापती महोदय, हे सर्व अधिकार कोणाला द्यायचे ? हे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रशासनाला द्यावयाचे की महासभेला द्यायचे ? आमच्या महापालिकेच्या महासभेने ठराव करुन दिला आहे की, या सर्व सदनिका कायम कराव्यात. राज्यमंत्री महोदय, आम्ही आपल्याकडे क्रेडाईसारख्या संस्थेच्या बैठका घेतल्या. आपण सांगितले की, या विषयी माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलून सकारात्मक मध्य मार्ग काढण्यात येईल. दोन वर्षापासून त्या ठिकाणी इमारती उभ्या आहेत. त्या इमारतीला कम्प्लीशन सर्टिफिकेट मिळालेले नाही. मग अशा परिस्थितीत त्या इमारती आपण पाडणार आहात काय ? प्रशासन अनेक अनधिकृत बांधकामे कायम करीत असताना आणि कुठेही 1 टक्का एफएसआयचे उल्लंघन झालेले नसताना त्या सदनिकांना कम्प्लीशन सर्टिफिकेट देण्यापासून वंचित ठेवत आहे.

सभापती महोदय, मी बालिशपणे हे सांगत नाही. माझी त्यांच्या विषयी तळमळ आहे. माननीय राज्यमंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांच्याकडे या विषयाच्या संदर्भात बैठका झालेल्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

आहेत. आपण या विधेयकाच्या अनुषंगाने महापालिकेच्या अधिनियमामध्ये बदल करणार आहात. परंतु असे करुन आपण हे अधिकार कोणाला देत आहात ? स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी हे जनतेतून निवडून येतात. परंतु त्यांना सुध्दा अधिकार नाहीत. महापालिकेच्या सर्वसामान्य जनतेने निवडून दिलेले महापौर, स्टॅण्डींग कमिटीचे अध्यक्ष किंवा नगरसेवक या बाबतीत काहीच ठरवू शकत नाहीत. मी राज्य सरकारला विनंती करतो की राज्य सरकारने यामध्ये हस्तक्षेप करावा.

..3एल...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव ....

माझ्या मते आज एक वर्ष झाले. आम्ही याच सदनात या विषयाच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. मात्र आमच्या अजून कलम 37 (1) च्या कारवाया सुध्दा मंजूर होऊन आलेल्या नाहीत. माननीय राज्यमंत्र्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष दिले तर बरे होईल. मी पुनश्च: विनंती करतो की, कलम 37(1) च्या कारवाया पहाव्यात की किती वर्षे त्या आपल्याकडे प्रलंबित होत्या. आपल्याकडे होते असे नाही. पूर्वी आमचे शासन होते, त्यावेळी सुध्दा प्रलंबित होत्या हे मी मान्य करतो. परंतु त्या प्रलंबित असताना आपण एक गोष्ट लक्षात घ्यावी. माननीय मंत्री म्हणून मी यामध्ये आपल्याला जबाबदार धरत नाही. परंतु प्रशासनामध्ये जे अधिकारी आहेत ते यावर कारवाया करू देत नाहीत. सर्वसामान्य जनतेला वेठीस धरले जाईल असा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे आमच्या नाशिक मनपाच्या बाबतीत मी स्पेसिफिक प्रश्न अधोरेखित करू इच्छितो की, आमच्या सदनिका तुम्ही कायम कधी करणार आहात ? आम्ही पाहत आहोत की, महसुलच्या मार्फत अनेक निर्णय झाले आहेत. मागच्या काळात आमचा उल्हासनगरचा विषय येथेच मार्गी लागला आहे. परंतु फक्त एक ते दीड टक्का तर काही ठिकाणी अर्धा टक्का एफएसआय व्हायोलेट झाला आहे, तेथे अजुनही त्या सदनिका कायम करण्याकरिता संबंधित आमच्या आयुक्तांना आदेशित करण्याकरिता का थांबले आहे ? आपण मान्य केले होते की, आजपर्यंत ज्या सदनिका बांधून तयार आहेत त्यांना आपण मंजुरी देऊ आणि त्यानंतर ज्या पुढे काही चूका झाल्या तर त्या आम्ही मान्य करणार नाही. हे कार्यवृत्तामध्ये आले होते. कार्यवृत्तामध्ये आले, माननीय मंत्र्यांनी मान्य आहे. परंतु काही अधिकारी सांगतात की, हे होऊ द्यायचे नाही. सर्व सन्माननीय सदस्य विचार व्यक्त करीत आहेत, त्यांची तळमळ सांगत आहेत. माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेब, आपण सुध्दा मनपामधून येथे आलेला आहात. पुणे मनपामध्ये आपली कारकीर्द अतिशय देदिप्यमान अशी झाली आहे आजही पुणे मनपाच्या आपल्या वॉर्डाचे तेथील नागरीक नगरसेवक कसा असावा तर माननीय श्री. गिरीश बापट साहेबांसारखा असावा असे नाव घेत आहेत.

**सभापती** : माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेबांची कारकीर्द तुमच्यापेक्षा फारच जवळून बघितली आहे. आपण विधेयकावर बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी माझी कळकळ व्यक्त करीत आहे. (अडथळा) सभापती महोदय, मी देखील मनपापासून माझी राजकीय कारकीर्द सुरू केली आहे. मला पुन्हा सांगावेसे वाटत आहे की, आपल्या लोकप्रतिनिधींना अधिकार राहत नाहीत. लोकप्रतिनिधी लक्षवेधी सूचना मांडतो, तेव्हा सभागृहात उत्तर दिले जाते की, प्रश्न मार्गी लावण्यात येईल. सर्वांना कम्प्लिशन देण्यात येईल. परंतु ज्यावेळी त्यांच्या दालनात बैठका होतात त्यावेळी प्रशासनातील अधिकारी सांगतात की, आम्ही देऊ शकत नाही. कोंडी फुटणार कधी, ही कोंडी फोडणार कोण ? कोंडी फुटत नाही. (अडथळा) माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेब, आमचे तेच म्हणणे आहे की, तुम्ही कोंडी फोडा. सभापती महोदय, आमच्या नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये असलेल्या विकासकांना तुम्ही न्याय द्या. आम्ही क्रेडाई, नाशिक मनपाच्या वतीने माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेब तुमचे, माननीय राज्यमंत्र्यांचे, माननीय मुख्यमंत्र्यांचे जाहीर आभार मानू, एवढे आम्ही कासावीस झालो आहोत. लोक आमच्याकडे येतात, कम्प्लिशन नसल्यामुळे आम्ही रहायला जाऊ शकत नाही. आम्ही व्याज किती दिवस भरायचे, आम्हाला आमचा निवारा कधी मिळणार आहे अशा प्रश्नांनी सर्वसामान्य जनता अतिशय व्याकुळ झालेली आहे. मनपाच्या संदर्भात असे विधेयक येत असेल आणि या विधेयकाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदू न ठेवता प्रशासनातील अधिकारी सांगतील त्याप्रमाणे त्यांच्या हाताला हात लावून मम म्हणत असू, अट्टाहास करत असू की हे विधेयक मंजूर करावे तर ते बरे आहे का ? तुम्ही चांगला निर्णय घ्या. आम्ही माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांचे अभिनंदन केले. माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेब, मागच्या वेळी तुम्ही धान्य बाजारामधील घोटाळ्याच्या संदर्भात नाशिकच्या तहसिलदारांना निलंबित केले होते. आम्ही अभिनंदन करायला आलो होतो. माझाच प्रश्न होता. त्यावेळी तुम्ही जी कार्यवाही केली त्यावेळी त्या संदर्भात आम्ही तुमचे समर्थन केले, स्वागत केले. जे चांगले आहे, ते चांगले म्हणण्याची आमची निश्चितच प्रवृत्ती आहे. शासन सर्वसामान्य नागरिकांकरिता आहे, आपण नियम सर्वसामान्य नागरिकांकरिता करायचे आहेत. मात्र सर्वसामान्य नागरिक हा केंद्रबिंद ठरविण्याऐवजी अधिक नाडला जात असेल, त्याच्या गळफास प्रशासन अधिक जोरदार पध्दतीने ओढायला लागला असेल तर त्यावेळी आपल्याला असे प्रस्ताव आणताना माननीय मंत्री महोदय निश्चितच विचार केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव ....

पाहिजे. तुमची कारकीर्द मोठी आहे. आज माननीय मुख्यमंत्र्यांनी तुमच्याकडे त्यांच्याकडे जी खाती आहेत ती तुमच्याकडे दिली आहेत. हे सदन उद्याचा मुख्यमंत्री म्हणून तुमच्याकडे पाहत आहे. उद्या जर हे सर्व गेले, बहुजन समाजाला संधी देण्याची वेळ आली तर निश्चितच तुमचे नाव पुढे आले पाहिजे हे सुध्दा आम्ही सांगतो. गंमतीचा विषय नाही. खरेच त्यांचे चांगले कामकाज आहे.

**सभापती** : त्यांच्या पदाची ते काळजी घेतील, आपण विधेयकावर बोलावे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, चांगल्याला चांगले म्हटले पाहिजे. विभागाच्या माननीय मंत्र्यांनी चांगले केले आहे, तुम्ही आमच्या प्रश्नांना न्याय दिला आहे त्याचे कौतुक केलेच पाहिजे. ते आपच्या सभागृहातील सन्माननीय सदस्य आहेत, त्यांना भविष्यातील शुभेच्छा देणे हे सुध्दा माझ्यासारख्याचे काम आहे.

**सभापती** : आपण त्यांच्या मतदारसंघात जाऊन त्यांना शुभेच्छा द्याव्यात, आता येथे विधेयकावर बोलावे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी पुन्हा त्या विषयावर येत नाही. परंतु तो विषय माझा सुटत नाही, तोपर्यंत आमच्या भावना आहेत. माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेब म्हणाले की आम्ही कोंडी फोडणार आहोत. परंतु माननीय मंत्री श्री. गिरीश बापट साहेब, आमचा नाशिक मनपाचा अतिशय शुल्लक विषय आहे. विषय किती गांभीर्याच आहे हे आपण मान्य करता, किती वेळा बैठका झाल्या हे आपण मान्य करता. ही कोंडी फुटत नाही हे दुर्दैव आहे. आमच्या संस्थांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठका झाल्या, माननीय राज्यमंत्र्यांबरोबर बैठका झाल्या. सभागृहात विषय झाले आहेत. सर्व गोष्टी होऊन सुध्दा काही नाही. आपण कोंडी फोडणार आहात. निश्चितच ही कोंडी फोडली पाहिजे. ही कोंडी फुटत नाही. सर्वसामान्य माणसाचे एका निवाऱ्याचे स्वप्न असते. आपल्याला हक्काचा निवारा मिळावा असे त्याचे स्वप्न असते.

**सभापती** : तुमचे भाषण ऐकून माझ्या डोक्यात कोंडा पडायला लागला आहे. आपण भाषण पूर्ण करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सर्वसामान्यांचे एक स्वप्न असते की, आपल्याला स्वत:चा हक्काचा निवारा असावा. तो त्याच्या आयुष्यात घाम गाळून काही पैसे गोळा करतो आणि विकासकाकडे फ्लॅट बूक करतो, त्याच्या डोळ्यांपुढे त्याला त्याचा फ्लॅट रेडी दिसतोच. मात्र त्याला त्या घरात राहण्यापासून वंचित ठेवले जात आहे याचा विचार कोणी केला पाहिजे ? कदाचित माझे भाषण तुम्हाला हास्यास्पद वाटत असेल. पण गोरगरीब वन रुम किचनचा फ्लॅट घेतो आणि ते पैसे भरून कर्जाचे व्याज भरतो. मात्र त्या घरात त्याला रहायला जाणे मिळत नाही. सभापती महोदय, त्याच्या यातना बसून अशा लक्षात येत नाहीत, त्याच्या यातना काय आहेत त्यावेळी त्या लक्षात येतात. मी आता शेवटची विनंती करून रजा घेतो की, आपण आणलेल्या विधेयकाचा विचार निश्चित केला पाहिजे.

....3M

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.......

सभापती महोदय, मी सुचविलेल्या सर्व सुधारणा या विधेयकात आपण कराव्यात, आमच्या नाशिक महानगरपालिकेशी संबंधित विषय तातडीने मार्गी लावावेत, अशी विनंती करतो आणि थांबतो.

**सभापती :** आपण कोंडी फोडल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

----------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**केंद्र सरकारने जाहीर केलेल्या मदतीबाबत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

सभापती महोदय, या अधिवेशनाची सुरुवातच शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नाने झाली. पहिल्या आठवड्यात शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसंबंधी आणि दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नासंबंधी आम्ही मागणी केली. सभापती महोदय, आपण मध्य काढला आणि चर्चा झाली, परंतु, शेवटपर्यंत या सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हाताला काही लागलेले नाही. 10 हजार कोटी रुपयांचे पॅकेज सन्माननीय सभागृह नेत्यांनी जाहीर केले. हे अधिवेशन सुरु असताना सुध्दा महाराष्ट्रातील 10 शेतकरी कर्जबाजारीपणामुळे आणि नापिकीमुळे आत्महत्या करीत होते आणि त्या परिस्थितीतही आपण अधिवेशन सुरु ठेवत आहोत, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करीत आहोत, पॅकेजवर पॅकेज सरकार जाहीर करीत आहे आणि दुसरीकडे मात्र आमच्या शेतकऱ्यांच्या मायमाऊलींच्या कपाळावरील कुंकु पुसले जात आहे. हे आम्हाला शोभणारे नाही.

**सभापती :** आपला पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन काय आहे ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन हा आहे की, माझ्याकडे प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स यांची प्रेस रिलिज आहे. ही 21 डिसेंबरची प्रेस रिलिज आहे. ती मी आपल्याला वाचून दाखवितो. "The Union Home Minister Chaired High Level Committee meeting of Central assistance to the State affected by natural disasters." यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "The Union Home Minister Shri Rajnath Singhji Chaired a meeting of High Level Committee held today for the Central assistance to the State affected by Drought, Land Slide and Flood. The Union Minister of Finance and Corporate Affairs and Information and Broadcasting Shri Arun Jaitely, Vice Chairman NITI, Shri Arvind Panigrahi, The Union Home Minister, Secretary, Shri Rajiv Maharshi, Agriculture Secretary, Shri Shiraj Hussain and Senior Officers and Minister of Home, Finance and Agriculture attended the

...3....

Shri.Dhananjay Munde......

meeting. The Committee examined the proposal based on the report of the Central Team which visited the State affected by seviour natural disasters. The HLC approved the assistance of National Disaster Relief Funds in respect of Chattisgarh to the tune of Rs. 925 Cr., Rs. 1004 Crs. for West Bengal, Rs. 31 Crs. for Manipur. The Committee also reviewed the decision in the case of Orissa and approved the assistance of Rs. 380 Cr. यामध्ये महाराष्ट्राविषयी एक शब्द सुध्दा नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ही महाराष्ट्राची चेष्टा आहे. आमच्या शेतकऱ्यांच्या मायमाऊलींच्या कपाळावरील कुंकु पुसले जात आहे आणि या ठिकाणी या प्रेस रिलिजमध्ये सांगितले आहे की, ज्या ज्या ठिकाणी सेंट्रल टिम येऊन गेली त्या सर्व राज्यांना मदत जाहीर केली. महाराष्ट्राला कवडी सुध्दा दिलेली नाही. या शासनाचा आम्ही धिक्कार करतो. शेतकऱ्यांच्या कपाळावरील लोणी खाण्यासाठी शेतकऱ्याला स्वप्न दाखविली, मदत देण्याच्या वेळी त्याला केंद्र सरकारच्या एनडीआरएफ फंडमधून एक रुपया सुध्दा मिळत नाही....

**सभापती :** सभागृहात कामकाज चालविण्यासारखी परिस्थिती नाही.

ज्या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरु होती, त्या विधेयकावर सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर हे ऑन लेग राहतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनाक 23 डिसेंबर, 2015 रोजी सकाळी 10.00 ते 11.45 या वेळात सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत विरोधी पक्षाचा दिनांक 22 डिसेंबर, 2015 रोजीच्या कामकाजात दर्शविलेला महागाई व दरवाढ या संबंधी नियम 260 चा प्रस्ताव माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह पूर्ण करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 54 मिनिटांनी बुधवार, दिनाक 23 डिसेंबर, 2015 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही